# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.११/ २०१८** **दिनांक ०५.१०.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.०५.१०.२०१८ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.३० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३०६२/२०१८, दि.२५.०९.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार शुक्रवार दि.०५.१०.२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह, सदस्य
०५. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य ०६. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांनी जा.क्र.१५५/२०१८, दि.०४.१०.२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.अमोल कीर्तिकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०५.१०.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०६.०९.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५७७** **दिनांक ०६.०९.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.**

**निर्णय क्र.५६७-** यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये अन्न पाकीटे तयार करणेकामी सध्या काम करत असलेले ठेकेदार, दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांना अन्नपाकीटांअभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता आवश्यकता भासल्यास एक महिना मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये अन्न पाकीटे तयार करणेकामी सध्या काम करत असलेले ठेकेदार, दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांना अन्नपाकीटांअभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता आवश्यकता भासल्यास दोन महिने मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग)**

---

**विषय नं.०२** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१.अधिनियमाचेकलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने

व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचेकलम२१मधीलपोटकलम१ (ख) रुढीवप्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८२

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७५०

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८१

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १५१

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५२९

'श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी महोत्सव २०१८ समारोप कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत प्रस्तावातील कलाकार हे किंती मानधन घेणार हे विचारुन नामांकित कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करुन मा. स्थानिक उपसमिती सभेपुढे प्रस्ताव सादर करावा'

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्यात येत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.०९.२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७५० अन्वये मान्यता मिळालेली असुन यामध्ये दि. १० ते १९ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत असे ठरले आहे.

आता मा. व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत दि. १५/१०/२०१८ ते १९/१०/२०१८ या कालावधीत साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** आता मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत दि.११/१०/२०१८ ते २०/१०/२०१८ या कालावधीत श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोपप्रसंगी साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रमासह प्रस्ताव सादर करणेत येत आहे. त्यात दि.१५/१०/२०१८ ते १९/१०/२०१८ या कालावधीत साईभजन सध्या व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. .

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५२९ नुसार श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी महोत्सव २०१८ समारोप कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी निरनिराळ्या कलाकारांशी संपर्क करण्यात आला असून, त्याची माहिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे:

| अ.नं. | कलाकारांचे नांव | कार्यक्रमाचे स्वरुप | संख्या | मानधन (GST सह) | प्रवास खर्च | निवास, भोजन खर्च | एकूण | उपलब्ध तारखां |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. प्रसाद कांबळी, मुंबई | नाटक- देवबाभळी | २२ | २,००,००० | -- | संस्थानचे निवासस्थान व प्रसाद भोजन | २,००,००० | १५/१०/२०१८ |
| २. | श्री. प्रताप फड, मुंबई | सामाजिक नाटक- अनन्या | २० | १,५०,००० | -- | संस्थानचे निवासस्थान व प्रसाद भोजन | १,५०,००० | १०, ११ व १६.१०.२०१८ |
| ३. | श्री.महेश काळे | भजन संध्या | ६ | ४,७२,००० | २०००० | ३०,००० | ५,२२,००० | १८.१०.१८ |
| ४. | श्री राहुल देशपांडे | भक्तीगीत | ५ | ४,७२,००० | २०००० | ३०,००० | ५,२२,००० | १८.१०.१८ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | श्री शार्दुल महाडीक | परंपरा महाराष्ट्राची | ४० | १,५०,००० | - | संस्थानचे निवासस्थान व प्रसाद भोजन | १,५०,००० | कुठलीही तारखेस |
| ६. | श्री.ए.आर. रेहमान, मुंबई | भजन संध्या | | | | | | |
| ७. | सुषमा श्रेष्ठ (पुर्णिमा) ९८३३२४८३६३ | भक्ती व भाव गीत | ८ | ७५,००० | - | ३०,००० | १,०५,००० | १०, ११ व १९.१०.२०१८ |
| ८. | अक्षत पारीख | गरबा | १० | २,३६,००० | ३०,००० | ३०,००० | २,९६,००० | |
| ९. | याशिता शर्मा | सुफी व गरबा | १० | ४,००,००० | ३०,००० | ३०,००० | ४,६०,००० | |
| १० | पृथ्वी गंधर्व, | भकतीगीत व सुफी | १० | २,९५,००० | ३०,००० | ३०,००० | ३,५५,००० | |
| ११ | पं. राकेश चौरसिया, पं. निलाद्रिकुमार पं.विजय घाटे व इतर | फ्युजन | १० | - | ५०,००० | ५०,००० | १,००,००० | १७.१०.२०१८ |

वरील तक्यातील अ.नं.१ श्री प्रसाद कांबळी यांचे देवबाभळी नाटक, अ.नं.२ श्री प्रताप फड यांचे अन्यन्या नाटक व अ.नं.५ शार्दुल महाडीक यांचे परंपरा महाराष्ट्राची हे कार्यकम श्री साईसच्चरित पारायण २०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. मात्र भारताचे माजी पंतप्रधान, श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे निधनामुळे सदरील कार्यक्रम रद्द करण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी श्री साईबाबांचे चरणी परत कार्यक्रम मिळणेबाबत दुरध्वनीवरुन विनंती केलेली आहे सबब उपरोक्त तीनही कार्यक्रम श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करावेत असे मत आहे . तसेच मा. श्री. जयकर साहेब यांनी श्री.प्रसाद कांबळी यांचेशी चर्चा करुन दि.१५.१०.२०१८ ही तारीख निश्चित केली आहे. असे समक्ष सांगितले आहे.

उपरोक्त तक्यातील अ.नं.३ व ४ मध्ये नमुद केलेले श्री महेश काळे व श्री. राहूल देशपांडे यांची जुगलबंदी कार्यक्रम दि.१८.१०.२०१८ रोजी आयोजित केले असलेबाबत मा.श्री. जयकर सो.सदस्य, व्यवस्थापन समिती यांनी समक्ष सांगितले आहे. तसेच अ.न.६ मध्ये नमुद केलेले कलाकार श्री.ए.आर.रेहमान यांचेशीही संपर्कात असल्याचे सांगितले आहे.

**प्रस्ताव:-** तरी श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सवव श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कालावधीत उपरोक्त तक्यातील नमुद केलेले कार्यक्रम निश्चित करणेसाठी निर्णयार्थ सादर .

निर्णय क्र.५७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कालावधीत खालील प्रमाणे कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम व त्यांचे मानधन निश्चित करण्यात आले.**

| अ. नं. | कार्यक्रमाची दिनांक | कलाकारांचे नांव | कार्यक्रमाचे स्वरुप | संख्या | मानधन (GST सह) | प्रवास खर्च | निवास, भोजन खर्च | एकूण मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १४/१०/२०१८ | | | | | | | |
| १ | १५/१०/२०१८ | वैशाली माडे | भजनसंध्या | | ३,५०,००० +GST | | | ३,५०,००० +GST |
| २ | १६.१०.२०१८ | पं. राकेश चौरसिया, पं. निलाद्रिकुमार पं.विजय घाटे व इतर | फ्युजन | १० | - | ५०,००० | ५०,००० | १,००,००० |
| ३ | १७.१०.२०१८ | श्री. प्रसाद कांबळी, मुंबई | नाटक- देवबाभळी | २२ | २,००,००० | -- | संस्थानचे निवासस्थान व प्रसाद भोजन | २,००,००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १८.१०.२०१८ | श्री. महेश काळे | भजन संध्या | ६ | ४,७२,००० | २०००० | ३०,००० | ५,२२,००० |
| | | श्री. राहुल देशपांडे | भक्तीगीत | ५ | ४,७२,००० | २०००० | ३०,००० | ५,२२,००० |
| ५ | १९.१०.२०१८ | अनुराधा पौडवाल | भजन संध्या व भक्ती गीते | ०७ | ३,५०,००० +GST | | | ३,५०,००० +GST |

**तसेच उपरोक्त तक्त्यातील जे कलाकार कार्यक्रमासाठी येणार नाहीत त्यांचे ऐवजी व दि.१४.१०.२०१८ करीता नवीन कलाकारांचे कार्यक्रम आयोजीत करणेस व त्यांचेशी चर्चा करुन मानधनाची रक्कम ठरवून आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त दि.११ ऑक्टोबर २०१८ ते दि.२० ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववायाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**शासन निर्णय-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१७१.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८.

शताब्दी वर्षाचेसुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नुमन्यांमधील अ.नं. ०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लोगो व श्रींचा श्रध्दा –सबुरी हा मंत्र छापणेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारणपणे ६० फुट म्हणजेच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व ऊन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल याकरीता प्रत्येक उत्सवाच्या वेळेस ध्वजाचे कापड बदलण्यात यावे. ध्वजाची पाद्यपूजा, उभारणी व स्तंभ संरजाम बागेत करावी. **शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे. याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे.** सदर कार्यक्रमास प्रसिध्दी मिळणेसाठी देशभरातील चॅनल/पत्रकारांना निमंत्रीत करावे.

याशिवाय शताब्दीचे अनुषंगाने इतर विविध विषयावर चर्चा करणेत आली. व उपरोक्त चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

३. मा. व्यवस्थापन समितीचेदि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ५०७

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त दि.१० ते १९ ऑक्टोंबर, २०१८ या कालावधीमध्ये सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजनाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. दि.१०/१०/२०१८ - शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध, गायन व वक्तृत्व इ. स्पर्धांचे आयोजन.

२. दि. ११/१०/२०१८ – एक दिवसीय श्री साईचरित्र अखंड पारायण सोहळा( श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडप)

३. दि. १२/१०/२०१८ - सांधेरोपण शस्त्रक्रिया शिबिर.(शिबिराचे दिवशी केवळ रुग्णांची तपासणी व नोंदणी करावी, त्यांनतरच्या महिनाभरात शस्त्रक्रिया पूर्ण कराव्यात.

४. दि.१३/१०/२०१८ –संस्थानचे सर्व माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी,लेखाधिकारी, प्रशासकिय अधिकारी यांचे संमेलन

५. दि.१४/१०/२०१८ – संस्थानमधील अधिक्षक, प्र. अधिक्षक, व कर्मचारी यांचे संमेलन.

६. दि.१५/१०/२०१८ – जागतिक साईमंदिर संमेलन ऐवजी साईसेवक संमेलन

७. दि.१६/१०/२०१८ – ५०० ॲम्बुलन्स वाटप–**तुर्त स्थगित**

८. दि.१७/१०/२०१८ – श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव.- साईभजन संध्या / इतर सांसकृतिक कार्यक्रम

९. दि.१८/१०/२०१८ – श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव.- साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम

१०. दि.१९/१०/२०१८ – श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव.- साईभजन संध्या / इतर सांसकृतिक कार्यक्रम

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीकोनातून कामकाज चालू आहे.

आता मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समारोपानिमित्त माहे ऑक्टोंबर, २०१८ या महिन्यामध्ये दि.११ ते १९ या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत निर्णय झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे माहे ऑक्टोंबर २०१८ या समारोपी महिन्यामध्ये श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव असल्याने साईभक्तांची लक्षणिय गर्दी होण्याची शक्यता आहे त्यामुळे प्रशासकिय कामकाजाच्या सोईचे दृष्टीनेमा. व्यवस्थापन समितीने दि.२२/०८/२०१८ रोजीच्या सभेत घेतलेल्या निर्णयातील कार्यक्रमांच्या फक्त तारखांमध्ये बदल करावा, असे वाटते त्यासाठी तारखेनुसार खालीलप्रमाणे सुधारीत कार्यक्रम आयोजित करता येतील, असे मत आहे.

| अ.नं. | दिनांक | प्रस्तावित कार्यक्रमांचा तपशिल | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | ११/१०/२०१८ | एक दिवसीय श्री साईचरित्र अखंडपारायण सोहळा | श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) |
| ०२ | १२/१०/२०१८ | शालेय/महाविदयालय विदयार्थ्यासाठी चित्रकला, निबंध, गायन व वक्तृत्व भाषण स्पर्धा | शैक्षणिक संकुल (कन्या शाळा) |
| ०३ | १३/१०/२०१८ | महाआरोग्य शिबिर(सांधेरोपण शिबिर, नेत्र तपासणी व चष्मेवाटप, आदि ) | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०४ | १४/१०/२०१८ | संस्थानचे माजीअध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त, का. अधिकारी उप का. अधिकारी लेखाधिकारी, प्रशासकिय अधिकारी अधिक्षक व कर्मचारी संमेलन | श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) |
| ०५ | १५/१०/२०१८ | साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ | १६/१०/२०१८ | साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) |
| ०७ | १७/१०/२०१८ | साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०८ | १८/१०/२०१८ | साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०९ | १९/१०/२०१८ | शताब्दी समारोह / साईसेवक संमेलन व रात्रौ साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळमैदान |
| १० | २०/१०/२०१८ | श्री साईबाबा संस्थान कर्मचारी स्नेह संमेलन | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |

**प्रस्ताव**–तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे माहे ऑक्टोबर २०१८ या समारोपी महिन्यामध्ये दि.११/१०/२०१८ ते दि.२०/१०/२०१८ या कालावधीत पुर्वी निर्णय घेतलेल्या कार्यक्रमांचे आयोजन फक्त सुधारीत तारखांनुसार करणेकामी सदरचा प्रस्ताव अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.५७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त खालील प्रमाणे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, असे ठरले.**

| अ.नं. | दिनांक | प्रस्तावित कार्यक्रमांचा तपशिल | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | ११/१०/२०१८ | एक दिवसीय श्री साईचरित्र अखंडपारायण सोहळा | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) |
| ०२ | १२/१०/२०१८ | शालेय/महाविदयालय विदयार्थ्यासाठी चित्रकला, निबंध, गायन व वक्तृत्व भाषण स्पर्धा | शैक्षणिक संकुल (कन्या शाळा) |
| ०३ | १३/१०/२०१८ | महाआरोग्य शिबिर (सांधेरोपण शिबिर, नेत्र तपासणी व चष्मेवाटप, आदि ) | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०४ | १४/१०/२०१८ | वैशाली माडे – भजनसंध्या | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०५ | १५/१०/२०१८ | संस्थानचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी अधिकारी उप कार्यकारी अधिकारी लेखाधिकारी, प्रशासकिय अधिकारी अधिक्षक व कर्मचारी संमेलन | श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) |
| | | त्यानंतर भजन संध्या. | श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) |
| ०६ | १६.१०.२०१८ | पं. राकेश चौरसिया, पं. निलाद्रिकुमार पं.विजय घाटे व इतर , फ्युजन | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०७ | १७.१०.२०१८ | श्री. प्रसाद कांबळी, मुंबई, नाटक-देवबाभळी | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०८ | १८.१०.२०१८ | श्री.महेश काळे – भजन संध्या<br>श्री. राहुल देशपांडे - - भक्तीगीत | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |
| ०९ | १९.१०.२०१८ | अनुराधा पौडवाल | श्री साईआश्रम भक्तनिवास समाधी शताब्दी मंडप |

**तसेच श्री साईबाबा संस्थानचे अधिकारी/कर्मचारी यांचे सहपरिवार स्नेहसंमेलन दिवाळीचे कालावधीत घेण्यात यावे, यावेळी चांदीचे नाणे वाटप, भोजन आणि भजनसंध्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.०४ **श्री साईबाबा समाधी शताब्दीनिमित्त पुण्यतिथी (दसरा) उत्सवात दि. १७ ते १९ ऑक्टोबर २०१८ या ३ दिवसांचे 'स्वर विहार' कार्यक्रमाचे आयोजनाबाबत.**

प्रस्ताव- **संस्थान अधिनियमातील तरतूद:**

(१) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:**

(१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे बैठकीतील निर्णय क्र. १७१

'श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे'

(२) मा. व्यवस्थापन सतीचे दि. २२/०८/२०१८ रोजीचे बैठकीतील निर्णय क्र. ५२९

'श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव व श्री साईबाबा समाधी महोत्सव २०१८ समारोप कालावधीत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत प्रस्तावातील कलाकार हे किंती मानधन घेणार हे विचारुन नामांकित कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करुन मा. स्थानिक उपसमिती सभेपुढे प्रस्ताव सादर करावा'

प्रस्तावना:- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.१ऑक्टोबर२०१७ ते दि. १८ ऑक्टोबर२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. त्यानिमित्तसंपूर्ण वर्षभर वेगवेगळे धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा समाधी सोहळा अविस्मरणीय होईल, यादृष्टीने कामकाज चालू आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे अनुषंगाने श्री संजय सरकटे, मॅनेजिग डायरेक्टर, स्वरविहार कॉन्सेंट प्रा. लि., औरंगाबाद यांनी दि. ०३/०९/२०१८ अन्वयेखालीलप्रमाणे पत्र दिलेले आहे :

With Reference to the subject noted above & as per our discussions we are pleased to perform 3 concerts on Date 17.1.2018, Dt. 18.10.2018 & 19.10.2018 with the well known celebrity & playback singers form the Musical Industry Hon. AnuradhajiPaudwal, Hon. SadhnaSargamji, Hon. Vaishali Made, Hon. Rajeshji Sarkate, NitinSarkate&SangeetaBavsar.

We are happy to know you that above all celebrity singers has given their concent to perform the show at ShirdiSansthan campus for SaibabaDashraMahotsava 2018 on said dates. Their honorarium & remuneration expenses along with their stay Trasporation cost and other arrangement is attached herewith.

Hope we will celebrate a memorable concert with these celebrity singers & artists from musical industry.

Please call us for further discussions.

Honororium& Remuneration Details.

| Sr. No. | Particulars | | Amount |
|---|---|---|---|
| 1. | Hon. AnuradhajiPaudwal | @ | 4,00,000.00 |
| 2. | Hon. SadhnajiSargam | @ | 4,00,000.00 |
| 3. | Hon. Vaishaliji Made | @ | 2,00,000.00 |
| 4. | Hon. RajeshjiSarkate&NitinSarkate | @ | 1,50,000.00 |
| 5. | Hon. SangeetaBhavsar | @ | 11,000.00 |
| 6. | Accomponoment Artists<br>1) Umashankar Mishra, Mumbai – Sitar<br>2) Pratamesh Salunke, Mumbai – Flute<br>3) Rajesh Dehade – Synthesizer<br>4) Raju Tayde / R. Pradhan – Synthesizer<br>5) Sanket Dehade – Guitar<br>6) Ajay Tayde – Guitar<br>7) Jagdish Vywahre – Table<br>8) AnkushBorde - Dholak<br>9) Baba Khandagle – Dholki<br>10) Rajesh Bhavsar – Octopad Player (1,00,000.00 x 3 day) | @ | 3,00,000.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | Comparer PreshitRudrawar, Samadhan Ingle, VishakhaRupal | @ | 27,000.00 |
| 8. | Transporation Cost for 3 days | @ | 25,000.00 |
| 9. | Flight Fare AnuradhajiPaudwal +1, DadhnajiSargam + 1, Vaishali Made +1 | @ | 90,000.00 |
| 10. | Hotel Stay at Sun & Sand for 3 days x 3 room | @ | 30,000.00 |
| 11. | Rajesh Sarkate& Group Transportation & Hotel Accommodation | @ | 30,000.00 |
| 12. | Other Misclenous Expenses | @ | 10,000.00 |
| | | Total Rs.: | 16,73,000.00 |

Light & Sound Details.

| Sr. No. | Particulars | Qty | Per Day | Amount |
|---|---|---|---|---|
| Light Details | | | | |
| 1. | Truss Gol Post 60 x 30 ft. | 1 | 85,000/-x3 | 2,55,000.00 |
| 2. | Sharpy | 12 | | |
| 3. | LED Par | 30 | | |
| 4. | Blinder | 4 | | |
| 5. | Light Console | 1 | | |
| Sound Details (JBL Vertec 4889-17) | | | | |
| 1. | Top 8 JBL Vertec | 60,000/- x 3 Days | | 1,80,000.00 |
| 2. | Base 8 JBL | | | |
| 3. | Stage Monitor 4 | | | |
| 4. | Digital Consel | | | |
| 5. | Microphones 12 as per requirement | | | |
| | | | Total Rs.: | 4,35,000.00 |

उपरोक्त दोन्ही तक्तातील खर्चाचा विचार करता, खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | तपशील | एकूण रुपये |
|---|---|---|
| १. | गायिका -अनुराधा पौडवाल, साधना सरगम, वैशाला माडे व इतर गायक यांचे मानधन | ११,६१,०००/- |
| २. | संगीत कलाकार | ३,००,०००/- |
| ३. | कलाकारांचे हॉटेल व्यवस्था, विमान तिकीटे, प्रवास व इतर खर्चासाठी | २,१२,०००/- |
| ४. | लाईट व्यवस्था | २,५५,०००/- |
| ५. | साऊंड सिस्टीम | १,८०,०००/- |
| | **एकत्रित खर्च रुपये :** | **२१,०८,०००/-** |

विभागाचा अभिप्राय:- श्री पुण्यतिथी उत्सवाचे तिनही दिवशी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केल्यास संयुक्तिक ठरेल, त्यामुळे स्वरविहार यांचा ३ दिवस कार्यक्रम आयोजित करणे उचित ठरणार नाही. त्याशिवाय त्यांनी प्रस्तावात नमूद केलेले रक्कम रुपये २१,०८,०००/- (अक्षरी रुपये एकवीस लाख,आठ हजार) मात्रचे मानधन हे खुपच जास्त वाटते. तरी सदरहु कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे ठरल्यास खालील मुदयावर निर्णय होणे आवश्यक आहे :

(१) अर्जदारांनी विनंती केल्याप्रमाणे दि. १७ ते १९ ऑक्टोबर, २०१८ या ३ दिवशी स्वरविहार यांचे कार्यक्रमाचे आयोजन करावे किंवा कसे?

(२) कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे ठरल्यास एकूण मानधन निश्चित करणेबाबत

प्रस्ताव:- तरी श्री साईबाबा समाधी शताब्दीनिमित्त पुण्यतिथी (दसरा) उत्सवात दि.१७ ते १९ ऑक्टोबर २०१८ या ३ दिवसांचे'स्वरविहार' कार्यक्रमाचे आयोजन करावे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र. ५८० उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.०५** **श्री साई समाधी शताब्दीचे समारोपाचे कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचा Dias Plan मसुदा अंतिम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितिची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

शासन निर्णय- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१ / का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः -

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८.

शताब्दी वर्षाचेसुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नुमन्यांमधील अ.नं. ०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लोगो व श्रींचा श्रध्दा –सबुरी हा मंत्र छापणेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारणपणे ६० फुट म्हणजेच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व ऊन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल याकरीता प्रत्येक उत्सवाच्या वेळेस ध्वजाचे कापड बदलण्यात यावे. ध्वजाची पाद्यपूजा, उभारणी व स्तंभ संरजाम बागेत करावी. शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्याकार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे. याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे. सदर कार्यक्रमास प्रसिध्दी मिळणेसाठी देशभरातील चॅनल/पत्रकारांना निमंत्रीत करावे. याशिवाय शताब्दीचे अनुषंगाने इतर विविध विषयावर चर्चा करणेत आली. व उपरोक्त चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्याकार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४४८

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ चे अनुषंगाने मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील संभाव्य दौरा व कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :

०२. मा. पंतप्रधान यांचे संभाव्य कार्यक्रमासाठी इतर कोणत्या मान्यवरांना आमंत्रित करावयाचे याबाबत दौरा निश्चित झाल्यानंतर ठरविण्यात यावे.

१३. SPG, राजशिष्टाचार,Blue Book प्रमाणे आवश्यक कामे करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अनुषंगक खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दिनांक १ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. या महोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या महोत्सवाचा समारोप श्रींचे पुण्यतिथी उत्सवाचे शेवटचे दिवशी म्हणजेच दि. १९ ऑक्टोबर २०१८ रोजी करण्याचे नियोजन असून, या कार्यक्रमासाठी मा. पंतप्रधान, भारत सरकार, मा. मुख्यमंत्री,

महाराष्ट्र राज्य हे उपस्थित राहण्याची शक्यता असल्याचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४४८ मध्ये नमूद आहे.

**विभागाचा अभिप्राय**– सदरहु कार्यक्रमासाठी स्टेजवर उपस्थित असणा-या मान्यवरांचा डायस प्लॅन तयार करणे आवश्यक आहे. या डायस प्लॅनची शासकीय यंत्रणेलाही आवश्यकता असते. सदरहु कार्यक्रमासाठी उपस्थित असणा-या मान्यवरांचे संख्येनुसार खालील तपशीलाप्रमाणे डायस प्लॅन बनविता येईल :

Proposed Dias Plan for the Stage Function of concluding ceremony

| | | | |
|---|---|---|---|
| D | C | B | A |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 24 | 22 | 20 | 18 | 16 | 14 | 12 | 10 | 8 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 5 | 7 | 9 | 11 | 13 | 15 | 17 | 19 | 21 | 23 | 25 |

First Row

1. Hon'blePrime Minister
2. Hon. Governor of Maharashtra
3. Hon. Chief Minister, Govt. of Maharashtra
4. Hon. Prof. Ram Shinde, Guardian Minister
5. Hon.ShriRadhakrushnaVikhePatil, Leader of Opposition
6. Hon.ShriRanjitPatil, State Minister for Law & Judiciary
7. Hon. Dr. Suresh Haware, Chairman, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi
8. Hon. Smt. ShalinitaiVikhePatil, Chairman, Z.P., Ahemednagar
9. Hon.Smt.YogitaShelkePatil, Chair Person, ShirdiNagarpanchyant& Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi
10. Hon. ShriSadashivraoLokhande, Member of Parliament, Shirdi
11. Hon.ShriDilip Gandhi, Member of Parliament, Ahmednagar
12. Hon. ShriSudhirTambe, M.L.A., Nashik Divisional Graduate Constituency.
13. Hon. ShriArun Jagtap, M.L.A., Ahmednagar
14. Hon. Smt. Snehlatatai Bipindada Kolhe, M.L.A., Kopargaon
15. Hon.Shri.ChandrashekharKadam, Vice Chairman, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
16. Hon.Smt.RubalAgarwal (IAS) CEO, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
17. Hon.Dr.ManishaKayande, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
18. Hon.Shri Mohan Jaikar, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
19. Hon.ShriPratap Bhosle, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
20. Hon.ShriRajendra Sinh, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
21. Hon.ShriBhausaheb Wakchaure, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
22. Hon.ShriBipindada Kolhe, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
23. Hon.ShriRavindra Mirlekar, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
24. Hon.ShriAmol Kirtikar, Trustee, ShriSaibabaSansthan Trust, Shirdi.
25. Special Invitee

Second Row

A) Secretary to Hon. PrimeMinister
B) PS to Hon. PrimeMinister
C) Security Officer - 01
D) Security Officer- 02

**प्रस्ताव**– तरी श्री साई समाधी शताब्दी समारोपाचे कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचा डायस प्लॅन अंतिम करणेसाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी समारोपाचे कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचा खालील प्रमाणे Dias Plan अंतिम करुन सदरचा Dias Plan मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावा, तसेच जे समिती सदस्य व्यवस्थापन समितीचे सभेस हजर असतात व यापुर्वी मा.राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांचे कार्यक्रमास उपस्थित होते त्यांचीच नावे डायस प्लॅन घ्यावीत, असे ठरले.

व्यासपिठावरील बैठक व्यवस्था (Dias Plan)

| | | | |
|---|---|---|---|
| D | C | B | A |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | 18 | 16 | 14 | 12 | 10 | 8 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 5 | 7 | 9 | 11 | 13 | 15 | 17 | 19 | 21 |

**First Row**

1. Hon'ble Prime Minister
2. Hon. Governor of Maharashtra
3. Hon. Chief Minister, Maharashtra
4. Hon. Smt. Pankaja Gopinath Munde, Minister of Rural Development, Women and Child Welfare, Maharashtra.
5. Hon. Prof. Ram Shinde, Minister of Water Conservation, Protocol, VJ, NT, SBC, OBC Welfare, Maharashtra.
6. Hon. Shri. Radhakrushna Vikhe Patil, Leader of Opposition, Maharashtra Legislative Assembly.
7. Hon. Shri. Dada Bhuse, State Minister of Rural Development Dept. Maharashtra
8. Hon. Shri Ranjit Patil, State Minister for Law & Judiciary Dept. Maharashtra
9. Hon. Dr. Suresh Haware, Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
10. Hon. Smt. Shalinitai Vikhe Patil, Chairman, Zilha Parishad, Ahemednagar
11. Hon. Shri Sadashivrao Lokhande, Member of Parliament, Shirdi
12. Hon. Smt. Snehlatatai Bipindada Kolhe, M.L.A., Kopargaon
13. Hon. Shri.Chandrashekhar Kadam, Vice Chairman, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
14. Hon. Smt.Yogitatai Shelke-Patil, President, Shirdi Nagarpanchyant & Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi
15. Hon. Shri. Bipindada Kolhe, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
16. Hon. Shri. Mohan Jaykar, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
17. Hon. Shri. Rajendra Sinh, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
18. Hon. Shri. Bhausaheb Wakchaure, Trustee, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.
19. Hon. Shri.Dinesh kumar Jain, (IAS) Chief Secretary, Government of Maharashtra
20. Hon. Shri. Asim Kumar Gupta, (IAS) Secretary, Rural Development,
21. Hon. Smt. Rubal Agarwal, (IAS) CEO, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

**Second Row**

A) Secretary to Hon. Prime Minister
B) PS to Hon. Prime Minister
C) Security Officer - 01
D) Security Officer- 02

(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)

---

विषय नं.०६ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाचे स्टेज डेकोरेशन भाडेतत्वावर उभारणेकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चाचे मान्यतेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी

आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

शासन निर्णय- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१ डिसेंबर,२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ६५८.

--------- "यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष भव्य साजरे करण्यासाठी पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने उपलब्ध करावयाच्या सोई सुविधा तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनाचा कृती आराखडा तयार करणे तसेच त्याची प्रभावी अंमलबजावणी करणेकामी इव्हेंट मॅनेजमेंटसाठी या क्षेत्रातील श्री नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तत्वतः मान्यता देण्यात आली.त्यासाठी सल्लागार नेमणुकीविषयी शासनाचे निर्देश अथवा मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करणेसाठी याकामी शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच यासाठी येणारा खर्च हा "Major Financial Decision" या स्वरूपाचा असल्याने या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची पूर्व परवानगी घेणेत यावी असे ठरले."

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१७१.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८.

शताब्दी वर्षाचेसुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नुमन्यांमधील अ.नं. ०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लोगो व श्रींचा श्रध्दा –सबुरी हा मंत्र छापणेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारणपणे ६० फुट म्हणजेच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व ऊन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल याकरीता प्रत्येक उत्सवाच्या वेळेस ध्वजाचे कापड बदलण्यात यावे. ध्वजाची पाद्यपूजा, उभारणी व स्तंभ संरजाम बागेत करावी. शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत महंत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्याकार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे. याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे. सदर कार्यक्रमास प्रसिध्दी मिळणेसाठी देशभरातील चॅनल/पत्रकारांना निमंत्रीत करावे. याशिवाय शताब्दीचे अनुषंगाने इतर विविध विषयावर चर्चा करणेत आली. व उपरोक्त चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्याकार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने संस्थानतर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी

वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीकोनातून कामकाज चालू आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत शताब्दीचे अनुषंगाने विविध विषयावंर चर्चा करणेत आली यावेळी शताब्दी वर्षाची सुरुवात ध्वजारोहणाच्याकार्यक्रमाने करावी शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या  कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे. याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे, असे ठरले असून बांधकाम विभागाने मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेत आयत्या वेळी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ चे अनुषंगाने मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथिल संभाव्य दौरा व कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावावार मा. पंतप्रधान,भारत सरकार यांचा दौरा निश्चित झालेनंतर त्यांचे शुभहस्ते कोणते कार्यक्रम आयोजित करावे व या कार्यक्रमासाठी इतर कोणत्या मान्यवरांना आमंत्रित करावे याबाबत निर्णय झालेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१८ व दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयाप्रमाणे मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचा संभाव्य दौरा निश्चित झालेनंतर सदर समारोप कार्यक्रमासाठी मा. पंतप्रधान भारत सरकार यांचे बरोबर मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचेशिवाय मा. व्यवस्थापन समितीने सूचविलेल्या मान्यवरांना निमंत्रीत करावे लागेल त्यामुळे सदर कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता आहे. यासाठी सदरचा कार्यक्रम भव्य दिव्य व संस्मरणीय होण्याच्या दृष्टीकोनातून सर्व सोयी सुविधायुक्त मंडप व्यवस्था उभारावी लागेल.

संस्थानने  श्री नितीन देसाई यांची श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष भव्य साजरे करण्यासाठी पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने उपलब्ध करावयाच्या सोई सुविधा तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नियोजनाचा कृती आराखडा तयार करणे तसेच त्याची प्रभावी अंमलबजावणी करणेकामी इव्हेंट मॅनेजमेंटसाठी या क्षेत्रातील श्री नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई यांची सेवाभावी स्वरुपात सल्लागार म्हणून नेमणूक केलेली असून महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. सासंवि-१०१६/२७९/प्र. क्र.४५/१६/का, १६ दि.१५/१२/२०१६ अन्वये  श्री नितीन देसाई,यांची सल्लागार म्हणून सेवाभावी तत्वावर काम करण्यास मान्यता दिलेली आहे.

दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा उदघाटन समारंभ व शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उदघाटन समारंभ महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोविंद, भारत गणराज्य यांचे उपस्थितीत मोठ्या थाटामाटात पार पडला. सदर  कार्यक्रमाचे स्टेज डेकोरेशन श्री नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली झाले आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रम मा. पंतप्रधान, भारत सरकार, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य किंवा इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडण्याची संभावना असल्याने सदर कार्यक्रमासाठी मंडप, स्टेज, भव्य स्वरुपात उभारावे लागणार आहे  याबाबत बांधकाम विभागामार्फत टेंडर कार्यवाही सुरु असून सदर टेंडरमध्ये फोटोग्राफी, एलईडी स्क्रीन तसेच व्हीडीओ शुटींग कॅमेरे यांचा समावेश आहे. तथापि सदर कामात स्टेज डेकोरेशन समावेश केलेला नाही.

दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ रोजी आयोजित श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा उदघाटन सोहळा कार्यक्रमात स्टेज डेकोरेशन, कामासाठी रु.११,१०,०००/- मात्र इतका खर्च आलेला आहे. त्यावेळी सदरचे काम श्री नितीन देसाई यांचे आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई या कंपनीकडून करुन घेण्यात आले आहे.

श्री देसाई यांना भव्य दिव्य कामांचा मोठा अनुभव असून त्यांचेकडे याबाबतच्या सर्व संकल्पना आहेत. याशिवाय त्यांचेकडे तशा स्वरुपाचे आवश्यक साहित्य, मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्यामुळे अशा प्रकारचे उत्कृष्ट काम फक्त श्री देसाई हेच करु शकतात. तरी स्टेज डेकोरेशनसुयोग्य तसेच व्यवस्थितरित्या होणेसाठी सदरचे कामश्री नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई यांचेकडूनच करून घेणे सोईस्कर होईल. आता अशा प्रकारचे काम करुन घेणेसाठी सुमारे रु.२० लक्ष पर्यंत खर्च येण्याची शक्यता आहे.

प्रस्ताव– तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाच्या आयोजित कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडप स्टेज सुविधेमधील स्टेज डेकोरेशनचे काम श्री नितिन देसाईयांचे आयकॉनिक चंद्रकांत

प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई या कंपनीकडून करून घेणेस व याकामी येणा-या सुमारे रु.२० लक्ष पर्यंतच्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

निर्णय क्र.५८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाच्या आयोजित कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडप स्टेज सुविधेमधील स्टेज डेकोरेशनचे काम श्री.नितिन देसाई यांचे आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई या कंपनीकडून करून घेणेस व याकामी येणा-या सुमारे रु.२० लक्ष पर्यंतच्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या व्यतीरिक्त Screen साठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१५ ते २० लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.०७ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रम निमंत्रण पत्रिका छपाई खर्चास व दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावना– श्री साईबाबा यांच्या समाधीस दि. १८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पुर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे वतीने श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि. ०१ ऑक्टोबर २०१७ ते दि. १८ ऑक्टोबर २०१८(विजयादशमी) या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतीक तसेच सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, तर्फे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम दि.१९.१०.२०१८ रोजी निश्चित करण्यात आला असुन सदर सोहळयाच्या कार्यक्रमाची निमत्रंण पत्रिका छपाई करुन मंत्री महोदय, जिल्हाधिकारी, शासकीय आधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक, ग्रामस्थ, अशा काही महत्वाच्या मान्यवरांना पाठविणेचे नियोजन आहे.

विभागाचा अभिप्राय– श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव उदघाटन समारोह कार्यक्रमाच्या १५०० मराठी निमंत्रण पत्रिका छापून घेण्यात आल्या होत्या सदर पत्रिका छापून घेणेकामी प्रति पत्रिका रक्कम रु.२५/- इतका खर्च आलेला आहे

आता समारोपाच्या कार्यक्रमासाठी मराठी २,००० नग निमंत्रण पत्रिका पाकीटासह छपाई करुन घ्याव्या लागतील. याकामी एका पत्रिकेचा छपाईसह दर रु ६०/- याप्रमाणे २,००० पत्रिकांची छपाई करण्यास एकूण रक्कम रु १,२०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्ताव– तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपकार्यक्रमांच्या निमंत्रण पत्रिका २००० पाकीटासह प्रती दर रु.६०/- प्रमाणे छपाई करणेकामी येणा-या अंदाजे एकुण रु.१,२०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख वीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर किंवा येणा-या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.५८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाच्या १०,००० निमंत्रण पत्रिका छापणेकामी दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास, तसेच आवश्यकतेनुसार जादा निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.०८ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमात उपस्थित असणारे मान्यवर अतिथींचे सत्काराचे नियोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-

१) अधिनयामाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यवस्थेची उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

२) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पा

३) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

शासन निर्णयः- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८

मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील संभाव्य दौ-यासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम दि.१९/१०/२०१८ रोजी घेणेबाबत प्रस्तावित करण्यात आले असून, सदरहू समारोपाचे कार्यक्रमांसाठी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांना निमंत्रीत करण्यात आलेले आहे.

विभागाचा अभिप्रायः-उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समाधी शताब्दी समारोपाच्या कार्यक्रमांसाठी मा. पंतप्रधान महोदय यांचेसह इतर प्रमुख मान्यवर उपस्थित राहाणार आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरून समारोप कार्यक्रमांसाठी येणा-या प्रमुख मान्यवरांचा सत्कार संस्थानतर्फे मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. समिती सदस्य व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करता येईल असे नम्र मत आहे.

**प्रस्तावः**- तरी समारोप कार्यक्रमांसाठी खालील तपशिलात नमूद केलेल्या प्रमुख मान्यवरांचा सत्कार करणेकामी मा. व्यवस्थापन समिती सदस्य व इतर नांवे निश्चित होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

| अ.नं. | कार्यक्रमांचा तपशिल | स्वागत /सत्कार मुर्ती | हस्ते |
|---|---|---|---|
| ०१. | प्रमुख मान्यवरांचा संस्थानमार्फत सत्कार | ०१) मा. पंतप्रधान महोदय<br>०२) मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन | ०१)<br>०२) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ०३) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य<br>०४) मा. प्रो. श्री. राम शिंदे, पालकमंत्री तथा राजशिष्टाचार मंत्री<br>०५) मा. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विरोधीपक्ष नेते<br>०६) मा. श्री. रणजितपाटील, विधी व न्याय विभाग, राज्यमंत्री<br>०७) मा. श्रीमती. शालिनीताई विखे-पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष<br>०८) मा. श्रीमती. योगिताताई शेळके, पाटील, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत<br>०९) मा. श्री.सदाशिवराव लोखंडे,खासदार, शिर्डी लोकसभा<br>१०) मा. दिलीप गांधी, खासदार, अहमदनगर लोकसभा<br>११) मा. श्रीमती. स्नेहलता बिपीनदादा कोल्हे, आमदार,<br>१२) मा. श्री. सुधीर तांबे, विधान परिषद सदस्य, नाशिक पदवीधर मतदार संघ | ०३)<br>०४)<br>०५)<br>०६)<br>०७)<br>०८)<br>०९)<br>१०)<br>११)<br>१२) |
| | | १३) मा. श्री. अरूण जगताप, विधान परिषद सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ | १३) |

**निर्णय क्र.५८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमात स्टेजवर खालील प्रमाणे मान्यवर अतिथींचे सत्कार करणेत यावे, असे ठरले.**

| अ.नं. | स्वागत /सत्कार मुर्ती | हस्ते |
|---|---|---|
| ०१ | मा. पंतप्रधान महोदय | मा. मुख्यमंत्री महोदय |
| ०२ | मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन | मा. प्रो. श्री. राम शिंदे, पालकमंत्री तथा राजशिष्टाचार मंत्री |
| ०३ | मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | मा.अध्यक्ष महोदय |
| ०४ | मा.ना.पंकजाताई मुंडे (उपस्थित असल्यास) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०५ | मा.केन्द्रीय मंत्री (उपस्थित असल्यास) | मा.उपाध्यक्ष महोदय |

**तसेच या व्यतिरिक्त इतर मान्यवर आल्यास राजशिष्टाचाराप्रमाणे सत्काराचे नियोजन करावे, असे ठरले.**
**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.०९ **श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील तहसिलदार संवर्गातील उपकार्यकारी अधिकारी हे पद व्यपगत करुन उपजिल्हाधिकारी दर्जाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पद निर्माण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १३ (१) अन्वये निर्माण करण्यात आलेल्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्त अधिकारी यांच्यावर कामाचा ताण पडत असल्याने दैनंदिन कामाव्यतिरिक्त संस्थानच्या विकासाच्या कामकाजाकडे लक्ष देणे शक्य होत नसल्याने तसेच साईभक्तांना आवश्यकत्या सुविधा पुरविणे व विश्वस्तव्यवस्थेचे उचित व्यवस्थापन होणेसाठी कार्यकारी अधिकारी यांच्या मदतीसाठी व त्यांच्या अनुपस्थितीत कामकाज सांभाळण्यासाठी शासनाने निर्णय क्र.सासंवि-२००८/(१००)-

का.सोळा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१८ मार्च, २००९ नुसार व संस्थानचे दि.०७/०८/२००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार संस्थानचे आस्थापनेवर तहसिलदार संवर्गातील उप कार्यकारी अधिकारी हे सावधि पद प्रतिनियुक्तीने भरणेची तरतूद केलेली आहे.

या तरतुदीनुसार संस्थानचे आस्थापनेवर तहसिलदार संवर्गातील श्री.संदिप आहेर हे उप कार्यकारी अधिकारी या प्रतिनियुक्तीचे पदावर कार्यरत होते. परंतु शासनाने त्यांची आदेश क्र.संकीर्ण-०४१६/प्र.क्र.६६/ई-२, मंत्रालय, मुंबई-३२ दि.११/०५/२०१८ अन्वये उप जिल्हाधिकारी या पदावर तदर्थ पदोन्नती केली असून त्यांना संस्थानचे उप कार्यकारी अधिकारी या पदावरुन दि.११/०६/२०१८ (मध्यान्हपुर्व) पासून कार्यमुक्त केले आहे. सध्यःस्थितीत संस्थानचे आस्थापनेवरील उप कार्यकारी अधिकारी हे पद रिक्त आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे आस्थापनेवरील कार्यकारी अधिकारी या पदावर यापुर्वी उप जिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिका-याची प्रतिनियुक्तीने नेमणूक केली जात होती. मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील विशेष अनुमती याचिका क्र.१९८५६/२०१४ मधील दि.१७/०२/२०१७ रोजीच्या आदेशानुसार मा.उच्च न्यायलय, खंडपीठ औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्र.१२२४०/२०१३ मध्ये दि.०२/०५/२०१४ रोजी आदेशित केल्याप्रमाणे संस्थान अधिनियम, २००४ कलम १३(१) अन्वये शासनाला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, संस्थानचे कार्यकारी अधिकारी या पदावर भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ श्रेणीतील अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्त करणेची तरतूद करणेत आली असून सध्यःस्थितीत या पदावर श्रीमती रुबल प्रखेर अग्रवाल, भा.प्र.से. या दि.०९/०३/२०१७ (म.पू.) पासून कार्यरत आहेत.

**ब**) श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत साजरा करणेत येत आहे. यासाठी सुमारे ३ हजार कोटींचा कृती आराखडा तयार करणेत आलेला असून त्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. कृती आराखडा समितीने घेतलेल्या निर्णयानुसार शताब्दी महोत्सवानिमित्त प्रस्तावित विविध विकास प्रकल्प विहित मुदतीत पुर्ण करण्याच्या अनुषंगाने, सदर प्रकल्पांचे नियोजन करण्यासाठी व शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे नियोजन करण्यासाठी व कामात सुसूत्रता व समन्वय आणून भक्तांना द्यावयाच्या सोयीसुविधांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी शासनाने क्र.बैठक-२०१५/८३०/प्र.क्र.१५२/का.१६ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.३० मे २०१७ नुसार कार्यकारी अभियंता -०१, जिल्हा शल्य चिकित्सक-०१, उप जिल्हाधिकारी -०२, पोलीस उप अधिक्षक-०१, उप अभियंता-०२, उप अभियंता (विद्युत) -०१ असे एकूण ०८ स्थायी व अस्थायी पदांना दि.३१/०३/२०१९ अखेर मान्यता दिलेली आहे.

संस्थानचे मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवर एकूण ४० विभाग कार्यरत असून स्थायी व कंत्राटी मिळून साधारणतः ६००० कर्मचारी कार्यरत आहेत. यात प्रामुख्याने साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीत येणा-या साईभक्तांना पायाभूत सेवा-सुविधा पुरविणेकामी मंदिर, जनसंपर्क कार्यालय, प्रसादालय विभाग, कॅन्टीन विभाग, निवासस्थाने, रुग्णालये, संरक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, विद्युत या सारखे महत्वाचे विभाग कार्यरत आहेत. त्याचबरोबर शिर्डी व परिसरातील मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी संस्थानमार्फत कन्या शाळा, इंग्लिश मिडीयम स्कूल, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कनिष्ठ महाविद्यालय कार्यरत आहेत. त्याचबरोबर आता, शासनाने सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता वरिष्ठ महाविद्यालय सुरू करणेस मान्यता दिलेली असून ते कार्यान्वीत करणेत आले आहे.

संस्थानचे सर्व विभागांना आवश्यक लागणारी साहित्ये / वस्तु खरेदी विभागामार्फत खरेदी करणेत येतात. खरेदीची प्रक्रिया ही मोठया प्रमाणात चालत असून ती शासकीय नियमानुसार करणेत येते. यासाठी प्रशासकीय स्तरावर पडताळणी करणेकामी उच्च श्रेणीतील अनुभवी अधिका-यांची संस्थानला आवश्यकता आहे.

विभागाचा अभिप्रायः- कृती आराखडा समितीने घेतलेल्या निर्णयानुसार शताब्दी महोत्सवानिमित्त प्रस्तावित विविध विकास प्रकल्प पुर्ण करणे, सदर प्रकल्पांचे नियोजन करण्यासाठी व शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे नियोजन करण्यासाठी व कामात सुसूत्रता व समन्वय आणून भक्तांना द्यावयाच्या सोयीसुविधांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी शासनाने प्रतिनियुक्तीने नेमणूक केलेल्या दोन उपजिल्हाधिकारी यांचेकडे संस्थानचे २०-२० विभागाचे प्रशासकीय कामकाजाचे वाटप केल्यामुळे दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आली आहे. शासनाने सदरची अस्थायी पदे दि.३१/०३/२०१९ अखेर निर्माण केलेली असलेमुळे त्यांच्या कार्यकाळ लवकरच संपुष्टात येणार आहे.

परंतु शताब्दी निमित्त तयार करणेत आलेल्या कृती आराखडयानुसार करावयाची विकास कामे पुढील ५ वर्ष चालणार आहे. तसेच भविष्यात संस्थानतर्फे मेडीकल कॉलेज व कॅन्सर हॉस्पिटल सुरु करणे प्रस्तावीत आहे. त्याचप्रमाणे स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करणे प्रस्तावीत आहे. त्यामुळे प्रशासकीय कामांचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील कामाचा व्याप मोठया प्रमाणावर वाढणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सहाय्य करणेसाठी कायमस्वरुपी यापुर्वीचे तहसिलदार संवर्गातील उप कार्यकारी अधिकारी हे पद उप जिल्हाधिकारी या संवर्गात दर्जोन्नत करुन पदनाम उप मुख्य कार्यकारी अधिकारी करावे, असे मत आहे.

प्रस्तावः- उपरोक्त नमुद सर्व बाबींचा विचार करुन शासनाने यापुर्वी संस्थान आस्थापनेवरील मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद भा.प्र.से.संवर्गात दर्जोन्नत केलेले आहे. त्याचबरोबर संस्थानचा वाढता विकास, दैनंदिन भक्तांचे संख्येत होणारी लक्षणीय वाढ, कृती आराखडयानुसार करावयाची विकास कामे विचारात घेता मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सहाय्य करणेसाठी कायमस्वरुपी यापुर्वीचे तहसिलदार संवर्गातील उप कार्यकारी अधिकारी हे पद उप जिल्हाधिकारी या संवर्गात दर्जोन्नत करुन पदनाम उप मुख्य कार्यकारी अधिकारी करणेकामी समितीचे मान्यतेने प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाने यापुर्वी संस्थान आस्थापनेवरील मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद भा.प्र.से.संवर्गात दर्जोन्नत केलेले आहे. त्याचबरोबर संस्थानचा वाढता विकास, दैनंदिन भक्तांचे संख्येत होणारी लक्षणीय वाढ, कृती आराखडयानुसार करावयाची विकास कामे विचारात घेता मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सहाय्य करणेसाठी कायमस्वरुपी यापुर्वीचे तहसिलदार संवर्गातील उप कार्यकारी अधिकारी हे पद उप जिल्हाधिकारी या संवर्गात दर्जोन्नत करुन पदनाम उप मुख्य कार्यकारी अधिकारी करणेस मान्यता देण्यात आली. व सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असे ठरले.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१०** **संस्थान आस्थापनेवरील दिव्यांग (अपंग) अनुशेष भरतीबाबत.**

**प्रस्ताव-** शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/६१५/प्र.क्र.६०/भाग-१/का. १६ विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ०१ जून, २०१६ रोजीचा शासन निर्णय व त्यासोबतचे प्रपत्रानुसार दिव्यांग अधिनियम, १९९५ नुसार दिव्यांग आरक्षण लागू करण्यात येत असलेबाबत तसचे सोबतच्या प्रपत्रानुसार संस्थान आस्थापनेवरील एकूण २९ पदांना दिव्यांग आरक्षण लागू करण्यात आलेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७८ नुसार अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार अपंग आरक्षण लागू करणेस तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे.

श्री बाळासाहेब आढाव, अध्यक्ष, कोपरगांव तालुका अपंग संघटना यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे अपंग अनुशेष भरत नसलेबाबत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रार केलेली आहे. त्याबाबत विधी व न्याय विभाग यांनी श्री. बाळासाहेब आढाव यांना कार्यालयात बोलावून आपल्या कार्यालयामार्फत दिव्यांगांची अनुशेष भरण्यासंदर्भात करण्यात येत असलेली कार्यवाही व त्याबाबतची सध्यस्थिती अवगत करण्यात यावी, असे निर्देश दिलेले असून शासनाकडून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच श्री बाबासाहेब संभाजी माडेकर, संस्थापक अध्यक्ष, प्रहार युवाशक्ती सेवा संघ यांनी ही अपंग अनुशेष भरतीबाबत इकडील कार्यालयास पत्र देऊन विचारणा केली आहे.

दिनांक ०१/०१/१९९७ नंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमध्ये विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/६१५/प्र.क्र.६०/भाग-१/का.१६, दिनांक ०१ जून, २०१६ सोबतचे प्रपत्र “अ” मध्ये दर्शविण्यात आलेल्या २९ पदांवर करण्यात आलेल्या कर्मचारी भरतीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशिल | दि. ०१/०१/१९९७ नंतर भरती करण्यात आलेले एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| ०१ | गट “अ” कर्मचारी | १० |
| ०२ | गट “ब” कर्मचारी | २५७ |
| ०३ | गट “क” कर्मचारी | २४० |
| ०४ | गट “ड” कर्मचारी | ८४९ |
| | **एकूण** | १३५६ |

दिनांक ०१/०१/१९९७ नंतर संस्थान सेवेत एकूण १३५६ इतके कर्मचारी भरती करण्यात आलेली आहे. दिनांक ०१/०१/१९९७ नंतर संस्थान सेवेत घेण्यात आलेल्या १३५६ कर्मचारी संख्येनुसार दिव्यांग भरतीचा ढोबळमानाने ४० पदांचा अनुशेष आहे. सध्या एकूण १८ अपंग कर्मचारी कार्यरत आहेत. ढोबळमानाने ४०-१८= २२ कर्मचारी अनुशेष आहे. (१८ कर्मचा-यांपैकी ५ कर्मचारी दृष्टी दोष असलेले व १३ कर्मचारी शारिरीक दिव्यांग असलेले आहेत.) परंतू सदर कर्मचारी यांची भरती दिव्यांगासाठीचे राखीव ठेवण्यात आलेल्या जागेवर झालेली नाही.

सदर कर्मचारी हे सेवेत रूजू झालेनंतर त्यांनी जसे-जसे दिव्यांगांचे सर्टिफिकेट सादर केले तसे-तसे त्यांना वाहतूक भत्ता रु २०००/- देण्यात येत आहे. तसेच काही दिव्यांगांना व्यवसाय करात सुट देण्यात आलेली आहे.

संस्थान सेवेत असलेल्या १८ दिव्यांग कर्मचा-यांची महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार दिव्यांग प्रकारानुसार विभागाणी केली असता, दृष्टीचे दिव्यांग असलेले ५ कर्मचारी व शारिरीक दिव्यांग असलेले १३ कर्मचारी आहेत. परंतु कर्णबधिर दिव्यांग एकही कर्मचारी नाहीत. अनुशेषानुसार एकूण ४० पैकी १८ कर्मचारी कार्यरत असून उर्वरीत २२ दिव्यांग कर्मचारी भरती करावी लागणार आहे.

ढोबळमानाने २२ दिव्यांग अनुशेष दिसून येत असून, सेवा प्रवेश नियम व बिंदू नामावली निश्चित झालेनंतर याबाबतची स्पष्ट व सविस्तर स्थिती दिसून येईल. विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/६१५/प्र.क्र.६०/भाग-१/का.१६,दिनांक ०१ जून, २०१६ सोबतचे पदनिहाय प्रपत्रनुसार अपंग अनुशेषाबाबतचे परिशिष्ट “अ” सोबत सादर केलेले आहे.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/६१५/प्र.क्र.६०/भाग-१/का. १६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक ०१ जून, २०१६ रोजीचा शासन निर्णय व त्यासोबतचे प्रपत्रानुसार व मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७८ नुसार आणि अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार सोबतच्या

परिशिष्ट “अ” नुसार एकूण ४० अनुशेष असून पैकी १८ कर्मचारी कार्यरत असून उर्वरीत २२ दिव्यांग कर्मचारी भरती प्रक्रिया संस्थान सेवेबाबतचे सेवा प्रवेश नियम व बिंदू नामावली निश्चित झालेनंतर राबविणेबाबतचे निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील दिव्यांग (अपंग) अनुशेष भरतीसाठी पदे व संवर्ग यासह जाहिरात प्रसिध्द करुन भरती प्रक्रिया राबविणेत यावी, तसेच मे.वैभव प्लेसमेंट, नाशिक यांनी सादर केलेल्या संस्थानचे मनुष्यबळ अहवाल-भाग १ व भाग २ च्या प्रती सर्व.मा.सदस्यांना पुरविणेत याव्यात. सदर अहवालाबाबत फेर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा या अहवालावर अंतीम निर्णय झाल्यानंतर संस्थान सेवेबाबतचे सेवा प्रवेश नियम व बिंदू नामावली अंतीम करणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.११** **संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी. ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेच्या दराचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै, २००९ अन्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काच्या परताव्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२९ संस्थान कायम कर्मचा-यास पाल्यांचा सन २०१७-१८ या वर्षातील शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.६५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन संस्थान कायम कर्मचा-यांचा पाल्यांचा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाचा शैक्षणिक शुल्क परताव्याकामी एकुण रक्कम रु.५२,२५,१८८/- (अक्षरी रुपये –बावन लाख पंचवीस हजार एकशे अठयान्सी) मात्र (रुग्णालय विभागांसह) प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

तसेच संस्थानचे शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात ज्या कर्मचा-यांचे पाल्य शिक्षण घेत आहेत, त्यांचेकडून प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क न घेता, सदरची रक्कम जमा नावे करण्यात येते. तसेच यावर्षी संस्थान व्यवस्थापनामार्फत श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी हे वरिष्ठ
महाविद्यालय सुरु करणेत आलेले आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील कर्मचा-यांचे पाल्यांनी शैक्षणिक शुल्क रोखीने भरलेले असल्यास त्यांनाही फी परतावा दयावा लागेल. त्यानुसार उपरोक्त दोन्ही शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या
कर्मचा-यांच्या पाल्यांची रक्कम रु.१८,०४,६७०/-(अक्षरी रुपये-आठरा लाख चार हजार सहाशे सत्तर ) मात्र जमा नावे करण्यात आलेली आहे. म्हणजेच संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परताव्याकामी सन २०१७-१८ मध्ये मंजुर रक्कम रु.६५,००,०००/- मात्र पैकी रक्कम रु.५२,२५,१८८/- मात्र एकुण खर्च झालेला आहे.

आता सन २०१८-१९ या वर्षाच्या कर्मचा-यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | २०१७-१८ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | २०१८-१९ मध्ये अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | सर्व विभाग (रुग्णालये वगळता) | रु.१९,५१,७८७/- | रु.२२,००,०००/- |
| ०२. | रुग्णालये विभाग | रु.१४,६८,७३१/- | रु.१७,००,०००/- |
| | **एकुण रक्कम** | **रु.३४,२०,५१८ /-** | **रु.३९,००,००० /-** |
| ०३. | शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण घेत असलेल्या कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा | रु.१८,०४,६७०/- | रु.२१,००,०००/- |
| | **अ.क्र.१, २ व ३ एकुण रक्कम** | **रु.५२,२५,१८८ /-** | **रु.६०,००,०००/-** |

उपरोक्त शासन मंजुरीस अनुसरुन संस्थानचे प्रचलित पद्धतीप्रमाणे संस्थानच्या कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.६०,००,०००/- (अक्षरी रुपये-साठ लाख) मात्रखर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात येऊन, मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर विहित पद्धतीने कायम कर्मचा-यांच्या
पाल्यांचा सन २०१८-१९ या वर्षाचा शैक्षणिक फी परतावा करता येईल.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात कायम कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.६०,००,०००/- (अक्षरी रुपये- साठ लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात कायम कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६०,००,०००/-मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१२** **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२२-२३/०९/२००१ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र. ४१८ अन्वये, दिनांक ०१ ऑक्टोबर, २००१ पासुन संस्थान कायम कर्मचाऱ्यासांठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युईटी योजना (Policy No.635692) लागु करण्यात आलेली आहे. तदनंतर निर्णय क्र. ९३ दि.१२/०३/२०१५ अन्वये दिनांक

०१ एप्रिल, २०१५ पासुन IRDA च्या नियमानुसार नवीन कर्मचाऱ्यांसाठी नवीन ग्रुप ग्रॅच्युईटी योजना (Policy No.709002248) लागु करण्यात आलेली आहे.

सदर दोन्हीही योजनेंचे नुतनीकरण दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात करण्यात येत असते. नुतनीकरण करताना त्या वर्षाच्या अंशदानाची रक्कम, लाईफ कव्हर प्रिमीयम आदा करण्यात येतो. मागिल वर्षी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.८१४, दि.२५.०९.२०१७ अन्वये रक्कम रु.२.८५ कोटी मात्र डिपॉझीट व प्रिमीयम म्हणून भरण्यास मान्यता मिळाली होती. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली होती.

आता सन २०१८-१९ या वर्षासाठी एल.आय.सी.ऑफ इंडीया, पुणे यांनी दि.१०.०९.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे रक्कम ग्रुप ग्रॅच्युईटी योजनेत डिपॉझिट करणेबाबत कळविलेले आहे.

| Policy No:GGCA/635692 | | | Policy No:NGGCA/709002248 | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr | Premiun Detail | Amount | Sr | Premiun Detail | Amount |
| 1 | Current Year Contribution | 2,90,84,574.00 | 1 | Current Year Contribution | 12,75,214.00 |
| 2 | Life Cover Premium | 20,16,229.00 | 2 | Life Cover Premium | 83,871.00 |
| 3 | GST | 3,62,921.00 | 3 | GST | 15,097.00 |
| 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 5,88,00,740.00 | 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 51,28,513.00 |
| | **Total Amount Payable** | **9,02,64,464.00** | | **Total Amount Payable** | **65,02,695.00** |
| | | | | **Total Amount Payable for both Policies** | **9,67,67,159.00** |

उपरोक्त नमुद रक्कम संस्थानचा खर्च नसुन एलआयसी ग्रुप ग्रॅच्युईटी योजनेत गुंतवणुक म्हणुन होते व त्यावर वार्षिक ७.६५% सरासरी दराने व्याज जमा होते. अशाप्रकारे ३१/०३/२०१८ अखेर ग्रॅच्युईटी फंडात एकुण रक्कम रु.५१,९०,७९,०५७/-मात्र जमा असून मागिल वर्षी त्यावर रक्कम रु.३,६५,३४,५६१/-मात्र व्याज जमा झाले होते. यामधून ३५ निवृत्त झालेल्या/राजीनामा दिलेल्या कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी फंडातील व्याजातून रक्कम रु.२,०२,१२,४५०/-मात्र ग्रॅच्युईटी म्हणुन देण्यात आली व ७ मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना (वारसांना) त्याच्या उर्वरीत सेवेच्या प्रमाणात क्लेमची रक्कम रु.७,११,०११/- मात्र ग्रॅच्युईटी फंडातील रक्कमेव्यतीरिक्त क्लेम म्हणून प्राप्त झाली.

तरी सालाबादप्रमाणे एलआयसी, पुणे यांचेकडून उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे कळविलेली रक्कम रु.९,६७,६७,१५९/-मात्र एवढी होते. पुर्णांकीत रक्कम **रु.९,६७,६७,०००/-***(अक्षरी रुपये नऊ कोटी, सदोसष्ठ लाख, सदोसष्ठ हजार)* मात्र एल.आय.सी., पुणे यांचे खात्यामध्ये ग्रुप ग्रॅच्युईटी फंडात RTGS द्वारे वर्ग करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युईटी इन्शुरन्स स्कीम नुतनीकरण करणेकामी रक्कम रु.९,६७,६७,०००/- मात्र एल.आय.सी., पुणे यांचे खात्यामध्ये ग्रुप ग्रॅच्युईटी फंडात RTGS द्वारे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१३** **मुख्यमंत्री सहाय्यता निधीस अर्थसहाय्य देणेबाबतच्या प्रस्तावावर (अर्धशासकीय पत्र) निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्री भूषण गगराणी यांनी डॉ. सुरेश हावरे, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अर्धशासकीय पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

“मुख्यमंत्री सहाय्यता निधी” हा राज्यातील तथा देशातील नैसर्गीक आपत्ती मधील आपादग्रस्तांना अर्थसहाय्य करणे तसेच राज्यातील आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील नागरीकांना त्यांच्या गंभीर व दूर्धर आजारावरील अर्थसहाय्य देण्याच्या दृष्टीने स्थापन करण्यात आला आहे.

या प्रयोजनसाठी लागणारा निधी हा केवळ देणग्यांवर अवलंबून आहे. राज्यातील अधिकाधिक जनतेस अर्थसहाय्य देणे शक्य व्हावे यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीला देणगी देणेबाबतची आवाहनाची प्रत सोबत जोडली आहे. आपल्या न्यासाकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला यथाशक्ती रक्कम देणगी म्हणून दिल्यास यापुढेही उदात्त हेतू साध्य करणे शक्य होईल.

तसेच सदर अर्धशासकीय पत्रासोबत एक "आवाहन" पत्र ही जोडण्यात आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

"मुख्यमंत्री सहाय्यता निधी" हा राज्यातील तथा देशातील नैसर्गीक आपत्ती मधील आपादग्रस्तांना अर्थसहाय्य करणे तसेच राज्यातील आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील नागरीकांना त्यांच्या गंभीर व दूर्धर आजारावरील अर्थसहाय्य देण्याच्या दृष्टीने स्थापन करण्यात आला आहे.

यामधून इमारत पडणे, रेल्वे अपघात, भूस्खलन, दुष्काळ, भूकंप पूर इ. नैसर्गीक आपत्तीग्रस्तांना मोठया प्रमाणात मा. मुख्यमंत्री महोदयांनी वेळोवेळी मानवतावादी दृष्टीकोनातून अर्थसहाय्य जाहिर केले आहे. त्यामुळे काही प्रमाणात अशा कुटुंबियांना दिलासाही मिळाला आहे. त्याचबरोबर राज्यातील आर्थिक दृष्टया दूर्बल घटकातींल रुग्णांना अतिगंभीर आजारावरील शस्त्रक्रिया /उपचारासाठी आतापर्यंत मोठया प्रमाणात आर्थिक मदत देण्यात आली आहे. मागील ४ वर्षात सुमारे ४४ हजार रुग्णांना रु. ४२२ कोटी इतके अर्थसहाय्य विविध दूर्धर व गंभीर आजारांच्या उपचारासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. रुग्णांकडून प्राप्त झालेले अर्ज वैद्यकीय अधिका-यांच्या कमिटीसमोर तपासणीसाठी ठेवले जातात व त्यानंतर त्यांच्या शिफारसीनुसार व न्यासाच्या नियमानुसार रुग्णांना अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजना ही उपचारादरम्यान अर्थसहाय्य देण्याच्या उद्दीष्टाने आखली असल्याने इस्पितळातील उपचाराचे देयक कसे भागवावे, यामधून मोठया प्रमाणात रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना दिलासा मिळत आहे.

या प्रयोजनांच्या आर्थिक सहाय्यासाठी लागणारा निधी समाजातील दानशूर व्यक्ति तसेच संघटनांकडून प्राप्त होणा-या देणग्या व साखर कारखान्यामधील गळीप हंगामानुसार प्राप्त होणारे अंशदान यामधून प्राप्त होतो. नैसर्गीक आपत्तीच्या वेळी मा. मुख्यमंत्री यांनी केलेल्या आवाहनानुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी हे देखील वेतनातून सढळ हस्ते देणगी देत असतात. मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा स्वतंत्र न्यास असल्याने सदर निधी संपूर्णपणे देणग्यांवर अवलंबून आहे. उपरोक्त मानवतावादी काम अविरतपणे चालू राहण्यासाठी समाजातील दानशुर संस्था व व्यक्ती यांच्याकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला सढळ हस्ते देणगी प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे कार्य यापुढेही अविरतपणे चालू राहण्यास हातभार लागेल.

यासाठी समाजातील दानशूर संस्था, व्यक्ती यांना आवाहन करण्यात येते की, मुख्यमंत्री सहाय्यता निधीला यथाशक्ती रक्कम देणगी म्हणून दिल्यास मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या या उदात्त हेतूसाठी मोठाच हातभार लागेल व हे कार्य अविरत चालू ठेवण्यास मदत होईल, असे पत्रात नमूद केले आहे.

अर्थ सहाय्यसाठी अधिनियमातील तरतुद :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

प्रस्ताव :- शासनाचे अर्धशासकीय पत्र व आवाहन यांचे अवलोकन होऊन "मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी" अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.५८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे अर्धशासकीय पत्र व आवाहन यांचे अवलोकन करण्यात येऊन "मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी" रक्कम रु.५० कोटी मात्र अनुदान देणेत यावे, असे ठरले. त्यापैकी रक्कम रु.३० कोटी मात्र अनुदान मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये व उर्वरीत रक्कम रु.२० कोटी मात्र अनुदान मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या Drought Mitigation Fund च्या माध्यमातुन Village Social Foundation यासाठी देण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१४** **संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांसाठी Group Leave Encashment Scheme लागु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये सध्या एकुण २०३७ कायम कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचारी सेवानिवृत्त/मयत झाल्यास त्याला/वारसांना संस्थानकडून त्याच्या खात्यावर शिल्लक असलेल्या रजेचे वेतन त्यांच्या शेवटच्या वेतनानुसार आदा करण्यात येत असते. उपरोक्त विषयांस अनुसरुन संस्थानचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचेचे वैधाधिक लेखापरिक्षण करत असतांना वैधानिक लेखापरिक्षक यांनी संस्थान कर्मचा-यांना Group Leave Encashment Scheme, लागु करणेसाठी पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

"As per the policy of Sansthan Leave Encashment is payable at the time of retirement of the employee and the said amounts are not provided in books over the years but the same is accounted on cash basis as and paid to employees at the time of retirement. This accounting treatment is not in accordance with the provision of AS-15 Employee

benefit. The Sansthan should calculate the amount of Leave encashment payable to its employee and the same should be provided in the books of accounts of the sansthan.”

म्हणजे एखादा कर्मचारी सेवानिवृत्त /राजीनामा/मयत झाला असेल तर त्याला देय असलेल्या शिल्लक रजेचे वेतन हे त्याच्या शेवटच्या पगारानुसार रोखीने आदा करण्यात येते तसेच त्याची Provision केली जात नाही असे वैधानिक लेखापरिक्षकांचे म्हणने आहे.

त्यांअनुषंगाने, दि.२३/१०/२०१७ रोजीच्या झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत संस्थान कर्मचा-यांना Group Gratuity Scheme प्रमाणे Group Leave Encashment Scheme लागू करणेबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत एलआयसी, पुणे यांचेकडे चौकशी करण्यात आली. त्यास असुनसरुन एलआयसी पुणे यांचेकडील अधिका-यांनी शिर्डी येथे प्रत्यक्ष येऊन त्यांनी सदर स्कीमची माहिती सांगितली.

Group Leave Encashment Scheme ची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणेः

1. संस्थानमध्ये कायम कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास, किंवा त्याने राजीनामा दिल्यास त्याला संस्थान देत असलेल्या शिल्लक रजेच्या वेतनाइतकीच रक्कम एल.आय.सी.कडुन मिळणार आहे.

2. Life Insurance Benefit (जिवन विमा): Group Leave Encashment Scheme मध्ये सेवेत असतांना कोणत्याही कारणास्तव कर्मचा-याचे निधन झाल्यास, त्याच्या वारसांना शिल्लक रजेच्या वेतनाव्यतीरीक्त एलआयसीकडुन फक्त रु.२५,०००/- किंवा रु.२,००,०००/- मात्र विमा संरक्षण म्हणून मिळणार आहेत. अर्थात Life cover किती रक्कमेचा घ्यायचा हे संस्थानवर अवलंबुन राहील.

3. Interest Rate(व्याजदर): सदर योजनेत संस्थानने गुंतवणुक केल्यास संस्थानला दरवर्षी साधारणतः ८.१५% या दराने व्याज मिळणार आहे तथापि सदर व्याजदर हा किती फंड गुंतवणार यावर अवलंबुन राहील.

4. <u>**Competitive Yield (स्पर्धात्मक उत्पन्न):**</u> या योजनेत गुंतवणुक केल्यानंतर त्याच्या व्याजाच्या रक्कमेवर सदर योजना चालू राहील व संस्थान दरवर्षी पुनःश्च गुंतवणुक करावी लागणार नाही असे त्यांनी म्हटले आहे.

5. Income Tax: सदर योजनेत भरण्यात येत असलेल्या Premium वर संस्थानला खर्च करण्यास Income Tax under section 37 नुसार मान्यता मिळते.

LIC, Pune यांनी विमा संरक्षण रु.२५,०००/-व रु.२,००,०००/-मात्र साठी खालीलप्रमाणे कोटेशन दिलेले आहे.

| Sr. | Particular | Life Cover Rs.25,000/- | Life Cover Rs.2,00,000/- |
|---|---|---|---|
| 1 | Initial Contribution | 21,97,40,913.00 | 21,97,40,913.00 |
| 2 | Current Service cost | 1,70,60,509.00 | 1,70,60,509.00 |
| 3 | Life Cover Premium | 2,83,573.00 | 22,68,582.00 |
| 4 | GST @ 18% | 51,043.00 | 4,08,345.00 |
| | Total Investment | 23,71,36,038.00 | 23,94,78,349.00 |

एलआयसी, पुणे यांचे कोटेशननुसार त्यांच्याकडे साधारणतः २४ कोटी रुपयांची लगेचच गुंतवणुक करावी लागणार आहे. संस्थानने मागिल ३ आर्थिक वर्षात आदा केलेली शिल्लक रजेची रक्कम तसेच मयत कर्मचा-यांची संख्या पुढीलप्रमाणे दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | वर्ष | आदा केलेले वेतन | सेवानिवृत्त कर्मचारी | मयत कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | २८,८३,३६८/- | ३३ | ७ |
| २ | २०१६-१७ | ८१,६२,१८३/- | ४९ | १२ |
| ३ | २०१७ -१८ | ४१,६४,७१३/- | ३५ | ७ |

एलआयसी पुणे यांचेकडे दरवर्षी Group Gratuity प्रमाणे Group Leave Encashment Scheme चा Premium स्वरुपात गुंतवणुक करावी लागणार आहे. तथापि, संस्थानने जर तीच रक्कम रु.२४ कोटी राष्ट्रीयीकृत बॅंकेत फिक्स केली तर त्यावर किमान ८ टक्के व्याजदराने रक्कम रु.१.९२ कोटी दरवर्षी व्याजापोटी संस्थानला मिळणार आहेत. म्हणजेच उपरोक्तप्रमाणे रजेचे वेतन आदा केल्यानंतर व्याजातील साधारणतः एक कोटीपेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहत आहे. **म्हणजेच** संस्थानने एलआयसी कडे रक्कम रु.२३ कोटी भरण्याऐवजी साधारणतः रक्कम रु.१५ कोटींची गुंतवणुक राष्ट्रीयीकृत बॅंकेत फिक्स केली तर त्यावरील व्याजाची रक्कम संस्थानमधील कर्मचा-यांचे शिल्लक रजेचे वेतन आदा करणेकामी पुरेसे होईल. तसेच एकदा केलेल्या गुंतवणीनंतर पुन्हःश्च गुंतवणुक करण्याची आवश्यकता भासणार नाही.

तथापि, Group Leave Encash Scheme लागू केल्यानंतर Life Cover Premium व GST @ 18% म्हणुन संस्थानला एलआयसी, पुणे यांचेकडे वर्षाला साधारणतःरक्कम रु.२७ लाख मात्र भरावे लागणार आहे. संस्थानमधील कर्मचारी सेवानिवृत्त /राजीनामा दिल्यास त्याला या Scheme चा काहीही फायदा मिळणार नाही. जर कर्मचारी मयत झाल्यावर त्यास फक्त रक्कम रु.२,००,०००/-मात्रचा अतिरिक्त फायदा मिळणार आहे. आणि मयत कर्मचा-यांची संख्या ही अत्यल्प आहे. आणि Group Leave Encashment Scheme ही एलआयसीकडून घेतल्यास संस्थान कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास Group Leave Encash Scheme चे वेतन, गृप ग्रॅच्युईटी प्रमाणेच एलआयसी पुणे यांना क्लेम पाठविल्यानंतरच आदा होणार आहे. म्हणजेच कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास त्याला शिल्लक रजेचे वेतन मिळण्यास उशिर होणार आहे. एकुणच एलआयसी Group Leave Encashment Scheme ही खर्चीक असुन याबाबत खुपच कमी कर्मचा-यांना फायदा मिळणार आहे. तसेच यामध्ये कर्मचा-यास रक्कम मिळण्यास उशिर होणार आहे, असे मत आहे.

तरी संस्थानच्या कायम कर्मचा-यांसाठी Group Leave Encashment Scheme लागु करणेकामी निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, एखादा कर्मचारी सेवानिवृत्त /राजीनामा/मयत झाला असेल तर त्याला देय असलेल्या शिल्लक रजेचे वेतन हे त्याच्या शेवटच्या पगारानुसार रोखीने आदा करण्यात येते तसेच त्याची Provision केली जात नाही याकरीता संस्थानने एलआयसी कडे रक्कम रु.२३ कोटी भरण्याऐवजी साधारणतः रक्कम रु.१५ कोटींची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बॅंकेत फिक्स करुन त्यावरील व्याजाच्या रक्कमेमधुन संस्थानमधील कर्मचा-यांचे शिल्लक रजेचे वेतन आदा करावे, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१५ शिडी नगरपंचायतीस अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी रक्कम रु.५० लक्ष अर्थसहाय्य देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून खालील प्रमाणे विनंती केली आहे. त्यात त्यांनी शिर्डी नगरपंचायतीच्या मालकीचे एक अग्निशमन वाहन असून सदर वाहन फोम टेंडर नाही. सध्याचे अग्निशमन वाहन हे साधे वॉटर टेंडर असून शिर्डी परिसरातील इलेक्ट्रीक व इंधन आग लागल्यास अशा स्वरुपाच्या आग विझविण्यासाठी या वाहनाचा वापर करण्यात अडचणी येतात. “श्री साईबाबांचे” दर्शनासाठी मोठया प्रमाणात व्ही.व्ही.आय.पी. यामध्ये महामहिम राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्र्यासह इतर महत्वाचे शासकीय अतिथी आलेनंतर शिर्डी नगरपंचायतीचे अग्निशमन वाहन हेलीपॅड व विमानतळावर पाठवावे लागते, तसेच या दरम्यान आग लागल्यास विझविण्यासाठी आग लागलेल्या ठिकाणी एकच अग्निशमन वाहन असल्याने जाता येत नाही. त्याचप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीच्या परिसरामध्ये ३० ते ४० कि.मी. अंतरापर्यंत लागलेल्या आग विझविण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीचे अग्निशमन वाहन पाठवावे लागते. अशा वेळेस दुसरी आग लागल्यास अग्निशमन वाहन उपलब्ध नसते, असे त्यांचे पत्रात नमूद केले आहे.

शिर्डी नगरपंचायतीचे वाहन हे साधे वॉटर टेंडर असल्याने व फोम टेंडर नसल्याने आधुनिक पद्धतीने व लवकरात लवकर आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अडचणी येतात. साईशताब्दी महोत्सव व त्यानंतर कायमस्वरुपी नगरपंचायतीस अतिरिक्त एक अग्निशमन वाहन उपलब्ध करून देण्यासाठी रक्कम रु. ५० लक्षची मागणी केली आहे.

संस्थानतर्फे अनुदान देणेबाबात अधिनियमातील तरतुद :- श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

विभागाचा अभिप्राय:- नगरपंचायतीला अग्निशमन वाहन खरेदी करून देणेऐवजी नगरपंचायतीने विहित खरेदी पद्धतीचा अवलंब करून वाहन खरेदीसाठी अनुदान देणे योग्य राहील.

प्रस्ताव:- शिर्डी नगरपंचायतीस अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी रक्कम रु. ५० लक्ष देणेबाबतच्या प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.५९१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायतीचे अग्नीशमन वाहन हे वॉटर टेंडर आहे. शिर्डी परिसरातील इलेक्ट्रीक व इतर आग लागल्यास, अशा प्रकारच्या आग विझवण्यासाठी फोम टेंडर वाहन आवश्यक आहे.**

**याकरीता शिर्डी नगरपंचायत करीता फोम टेंडर वाहन खरेदी करणेकामी सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेबाबत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना कळविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१६ माहे एप्रिल २०१८ ते ऑगष्ट २०१८ या कालावधीत रु.२५,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तास प्रसादरुपाने भेट देण्यात आलेल्या श्री साईच्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ३० नोव्हेबर २०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.८७२ अन्वये, "रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची/वस्तु, साहित्याची देणगी देणा-या साईभक्तास २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साईच्या पादुका तसेच एक श्री साईचरित्र ग्रंथ व एक थ्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार दि.०९ जुलै,२०१७ रोजी झालेल्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या मुख्य दिवसापासून प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. दि.०९ जुलै ते दि.३१ मार्च २०१८ अखेर एकूण ७३३८ नग चांदीच्या पादुकांचे प्रसादरुपाने वाटप करण्यात आले आहे.

तसेच, माहे एप्रिल २०१८ ते ऑगष्ट २०१८ मध्ये अशा देणगीदार भक्तांना संस्थानतर्फे सप्रेम भेट देण्यात आलेल्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.नं | महिना | चांदीच्या पादुका नग | श्री साईसतचरित्र | | | | | | | श्री डी फोटो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मराठी | हिंदी | इंग्रजी | तेलगू | तामीळ | गुजराथी | कन्नड | |
| ०१. | एप्रिल- २०१८ | ७७७ | ४८ | २०० | १३९ | २१३ | १०५ | ३२ | ३२ | ७७४ |
| ०२. | मे - २०१८ | ७८९ | ७९ | २४६ | -- | २६३ | १११ | ३९ | ४६ | ७८९ |
| ०३. | जून - २०१८ | ९११ | ६२ | ३२३ | -- | ३०१ | १२५ | ४१ | ५५ | ९१० |
| ०४. | जुलै - २०१८ | ११२९ | ६७ | २२२ | २८१ | ३५३ | १११ | ४६ | ३५ | ११०१ |
| ०५. | ऑगष्ट - २०१८ | ११०२ | ६४ | २०४ | ३७५ | २८९ | १११ | ४१ | १८ | १०६१ |
| | **एकूण** | ४७०८ | **३२०** | **११९५** | **७९५** | **१४१९** | **५६३** | **१९९** | **१८६** | ४६३५ |

(जे साईभक्त नेहमीचे देणगीदार आहेत व त्यांचेकडे पूर्वीचे श्री साईसत्चरित्र असल्याने ते श्री साईसत्चरित्र/थ्री डी फोटो सप्रेम भेट घेत नाहीत.)

तरी एप्रिल २०१८ ते ऑगष्ट २०१८ या कालावधीत, रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांस उपरोक्तप्रमाणे चांदीच्या पादुका व इतर साहित्य सप्रेम भेट देण्यात आले असून, त्याची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.५९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल २०१८ ते ऑगष्ट २०१८ या कालावधीत रु.२५,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तास प्रसादरुपाने भेट देण्यात आलेल्या श्री साईंच्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याचे अवलोकन करण्यात येऊन त्यांची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.१७ कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी कुशल (लिपीक) पदासाठी घेण्यात आलेल्या प्रात्यक्षीक परिक्षेमध्येपात्र ठरलेल्या ५१ अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना कुशल पदाचे वेतन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांकित कामी दि.१९.०६.२०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांचेसमवेत मंदिर परिसरात व संस्थानचे इतर विभागांकडे घेतलेल्या राऊंडमध्ये तसेच व्यवस्थापन समितीचे बैठकीमध्ये दिलेल्या सुचनांनुसार विभागांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यात अ.नं. ४ अकुशल मधुन कुशल पदावर नियुक्ती देणेसाठी परिक्षा घेणेसंदर्भात कार्यवाही निश्चित करणेबाबत निर्देशित केलेले आहे.

त्यानुसार संस्थानचे विविध विभागामध्ये कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या अकुशल कंत्राटी कर्मचा-यांच्या कंत्राटी कुशल (लिपीक) पदासाठी परिक्षा घेणेकामी कामगार विभागाच्या दि.२९.०५.२०१८ व दि.१२.०७.२०१८ रोजीच्या मंजूर टिपणीवरील निर्देशानुसार प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी व विभाग प्रमुख, माहिती तंत्रज्ञान विभाग यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५७६/२०१८, दि.३०.०८.२०१८ अन्वये ११२ अकुशल कंत्राटी कर्मचारी कुशल करणेकामी त्यांच्या प्रात्यक्षिक (टायपिंग-मराठी व इंग्रजी) परिक्षा घेऊन त्यांचा अहवाल देणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार प्राचार्य, औ.प्र.संस्था, शिर्डी व माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी दि.१२.०९.२०१८ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सदर नमूद केलेल्या अकुशल कंत्राटी

कर्मचा-यांच्या संगणकावर प्रात्यक्षिक परिक्षा (टायपींग – मराठी व इंग्रजी) परिक्षा घेऊन त्यांचे निकालपत्रक तयार करुन दि.१५.०९.२०१८ रोजी सिलबंद पाकीटामध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचेकडे सादर केले. सदरचे सिलबंद पाकीट दि.१५.०९.२०१८ रोजी मा.उपजिल्हाधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात येऊन सदरचे पाकीट कामगार विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आले. सदर उघडलेल्या बंद पाकीटामधील तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

कामगार विभागाकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५७६/२०१८, दि.३०.०८.२०१८ रोजीचे आदेशानुसार ११२ उमेदवारांच्या परिक्षा घेणेबाबत झालेल्या आदेशानुसार दि.१२.०९.२०१८ रोजी एकूण ४ स्लॉटमध्ये (प्रत्येक ३० उमेदवार) परिक्षा घेण्यात आल्या, वरील ११२ उमेदवारांपैकी २ उमेदवार परिक्षा घेणेस अपात्र, १ उमेदवार अगोदरच मयत झालेला असल्याने तसेच २ उमेदवाराचे नाव नजरचुकीने २ वेळा आल्यामुळे व १ उमेदवाराचे कागदपत्र उशीरा आल्याने त्याची मान्यता घेऊन त्याचे नाव यादीत समाविष्ठ करण्यात आले. असे प्रात्यक्षिक परिक्षेसाठी एकूण १०८ उमेदवार पात्र ठरले. सदर १०८ उमेदवारांपैकी ४ उमेदवार अनुपस्थित राहिले ते वगळून १०४ उमेदवारांच्या प्रात्यक्षिक परिक्षा (टायपिंग-मराठी व इंग्रजी) घेण्यात आल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | स्लॉट नं. व वेळ | कर्मचारी संख्या | गैरहजर संख्या | पात्र संख्या | अपात्र संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | स्लॉट नं.-१ (अ.नं. १ ते ३०) वेळ- ९.०० ते १०.१५ | ३० | ०१ | ०७ | २२ | ३० |
| ०२ | स्लॉट नं.- २ (अ.नं.३१ ते ६०) वेळ- ११.०० ते १२.१५ | ३० | ०१ | १८ | ११ | ३० |
| ०३ | स्लॉट नं.- ३ (अ.नं.६१ ते ९०) वेळ – १.३० ते २.४५ | ३० | ०२ | १४ | १४ | ३० |
| ०४ | स्लॉट नं.- ४ (अ.नं.९१ ते १०८) वेळ- ३.३० ते ४.४५ | १८ | ०० | १२ | ०६ | १८ |
| ०५ | **एकूण-** | **१०८** | **०४** | **५१** | **५३** | **१०८** |

सदर अहवालातील तक्त्याचा विचार करता एकूण १०८ पैकी ४ गैरहजर उमेदवार वगळून ५१ उमेदवार कंत्राटी कुशल (लिपीक) पदासाठी पात्र ठरले आहेत. त्यांच्या नावाची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | परिक्षा क्र. | उमेदवाराचे नाव | अ.नं. | परिक्षा क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अ ००४ | श्री एकनाथ रघुनाथ गोंदकर | २७ | क ०६३ | श्रीमती पद्मा भाऊसाहेब आत्रे |
| ०२ | अ ००५ | श्री सुदेश रामदास शिंदे | २८ | क ०६४ | श्री योगेश अरुण सोनवणे |
| ०३ | अ ००६ | श्री समाधान सिताराम कहांडळ | २९ | क ०६८ | श्री विवेक मोतीलाल छल्लारे |
| ०४ | अ ०१३ | श्रीमती परिविन ईस्माईल इनामदार | ३० | क ०७० | श्री गोरक्ष पतिंगराव इंगळे |
| ०५ | अ ०१५ | श्री अनिल रमेश बनसोडे | ३१ | क ०७२ | श्री जगन्नाथ बापू नवले |
| ०६ | अ ०१८ | श्री संदिप मच्छिंद्र डांगे | ३२ | क ०७६ | श्री महेश वसंत गोर्डे |
| ०७ | अ ०२८ | श्री तुकाराम चंद्रोदय धनवटे | ३३ | क ०७७ | श्री नितीन मारुती खळदकर |
| ०८ | ब ०३३ | श्री अरुण बाळासाहेब साबळे | ३४ | क ०७८ | श्री दशरथ भागवत चासकर |
| ०९ | ब ०३५ | श्री सुयोग गोरक्षनाथ वाणी | ३५ | क ०८१ | श्री शेखर तुकाराम गोर्डे |
| १० | ब ०३८ | श्रीमती सोनाली रंगनाथ वाकचौरे | ३६ | क ०८३ | श्री गणेश भागवत शितोळे |
| ११ | ब ०३९ | श्री मयुर रामचंद्र देशमुख | ३७ | क ०८५ | श्री सचिन नवनाथ कोते |
| १२ | ब ०४० | श्रीमती संगीता भाऊसाहेब मते | ३८ | क ०८७ | श्री चेतन पुंजाहरी कोते |
| १३ | ब ०४२ | श्री शशिकांत तुकाराम गोंदकर | ३९ | क ०९० | श्री संदिप वसंत वाणी |
| १४ | ब ०४३ | श्री योगेश सोपान लाड | ४० | ड ०९१ | श्रीमती सुनिता गोपिनाथ गोंदकर |
| १५ | ब ०४४ | श्री सतिष सुभाष धुळसैंदर | ४१ | ड ०९२ | श्रीमती सोनाली बाबासाहेब माकुडे |
| १६ | ब ०४५ | श्री राहुल कचेश्वर जाधव | ४२ | ड ०९४ | श्री अतुल सुभाष निकम |
| १७ | ब ०४६ | श्री प्रविण वसंतराव लहारे | ४३ | ड ०९६ | श्री हरिशचंद्र संपत शिरोळे |
| १८ | ब ०४७ | श्री किरण आनंदराव अमोलिक | ४४ | ड ०९७ | श्रीमती सुरेखा रमेश दिवेकर |
| १९ | ब ०४८ | श्री ऋषिकेश आत्माराम धनवटे | ४५ | ड ०९९ | श्री श्रीकांत मच्छिंद्र तेलोरे |
| २० | ब ०४९ | श्री दगडू राजाराम अनर्थे | ४६ | ड १०१ | श्री राजेंद्र खंडेराव थोरात |
| २१ | ब ०५१ | श्री अशोक गोरखनाथ गायके | ४७ | ड १०२ | श्री राजेंद्र भानुदास चव्हाण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | ब ०५२ | श्री संतोष मच्छिंद्र वाणी | ४८ | ड १०३ | श्री सुदेश दिलीप कातोरे |
| २३ | ब ०५३ | श्री अजय अप्पासाहेब कोते | ४९ | ड १०५ | श्रीमती राणी गोरक्षनाथ वाघे |
| २४ | ब ०५७ | श्री दिगंबर बबनराव सोमवंशी | ५० | ड १०७ | श्री अमोल अर्जुन कोळगे |
| २५ | ब ०५८ | श्री सागर प्रभाकर पठारे | ५१ | ड १०८ | श्री सुभाष गोरक्षनाथ लोखंडे |
| २६ | क ०६२ | श्री आकाश जनार्दन पावडे | -- | -- | --------------------------------- |

विभागाचा अभिप्राय:- उपरोक्त तक्त्यात नमूद केलेले कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले एकूण ५१ अकुशल कंत्राटी कर्मचारी कुशल (लिपीक) पदासाठी व कुशलचे वेतन देणेसाठी पात्र ठरत आहेत. त्यानुसार विविध विभागांमध्ये कुशल(लिपीक) कंत्राटी कर्मचारी आवश्यकता व त्या विभागातील रिक्त जागांचा विचार करुन, ज्या विभागाला कुशल (लिपीक) पदाची मंजूरी देण्यात आलेली आहे परंतू प्रत्यक्षात सदर जागेवर कुशल कर्मचारी देण्यात आलेले नाही. तसेच ज्या विभागाकडे सध्या कुशल(लिपीक) पदाचे जागेवर अकुशल कंत्राटी कर्मचारी काम करतात अशा विभागांकडे अकुशल कंत्राटी मंजूरी कमी करुन अशा विभागांना कुशल (लिपीक) पदाची मंजूरी देऊन संबंधित विभागाकडे उपरोक्त ५१ अकुशल कंत्राटी कर्मचारी कुशल (लिपीक) पदासाठी पात्र झाले असल्यामुळे वर्ग करता येईल व संबंधित ठेकेदारांना तसे सुधारित मंजूरीचे आदेश देता येतील. किमान वेतन दर व अधिक ४०% वाढ धरुन सध्या अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना प्रतिदिनी रु.४३३.१८ इतके व कंत्राटी कुशल (लिपीक-टंकलेखक) कर्मचारी यांना प्रतिदिनी रु.४७६.२६ इतके वेतन देणेत येत आहे. उपरोक्त ५१ अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना अकुशल ऐवजी कुशल(लिपीक) पदाचे वेतन द्यावयाचे झाल्यास प्रतिदिनी प्रतिकर्मचारी रु.४३.०८ पैसे व त्यानुसार प्रतिमहा आर्थीक भार रु.५७,१२४/- एवढा होईल.

प्रस्ताव:- कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या अकुशल कंत्राटी कर्मचा-यांच्या कंत्राटी कुशल (लिपीक) पदासाठी घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या ५१ अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना कुशल पदाचे वेतन देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कंत्राटी कुशल (लिपीक) पदासाठी घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या ५१ अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना दि.१ नोव्हेंबर,२०१८ पासुन कुशल पदाचे वेतन देण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कामगार विभाग)**

---

**विषय नं.१८** **महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगाराचे विनियम व सेवेच्या शर्ती) कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगारी आठवडा सुट्टी, सार्वजनिक सुट्टी व किरकोळ रजा देणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांकित श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झाले असून त्यात- श्री साईबाबा संस्थानमध्ये गेली १५ ते १७ वर्षांपासून कंत्राटी कर्मचारी विविध विभागांमध्ये अविरत व प्रमाणीकपणे सेवा देत आहेत. या कंत्राटी कर्मचा-यांना सध्या महाराष्ट्र शॉप अॅण्ड कमर्शिअयल इस्टॅब्लीशमेंन्ट अॅक्ट, १९४८, झोन नं.३ नुसार किमान वेतन दिले जाते. कंत्राटी कर्मचा-यांना पगारी आठवडा, शासकीय व किरकोळ रजा/सुट्ट्या दिल्या जात नाहीत.

मात्र याबाबत आपणास नम्रपणे कळविण्याचे की, महाराष्ट्र शासनाने दि.०७.०९.२०१७ पासून महाराष्ट्र शॉप अॅण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट अॅक्ट, २०१७ ची अंमलबजावणी सुरु केलेली आहे.नव्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे यापूर्वीचा महाराष्ट्र शॉप अॅण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट अॅक्ट, १९४८ हा रद्द झालेला आहे.

त्यामुळे संस्थानने कंत्राटी कर्मचा-यांना महाराष्ट्र शॉप अॅण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट अॅक्ट, २०१७ नुसार किमान वेतन वा इतर लाभ/ भत्ते देणे आवश्यक आहे, मात्र संस्थानने दि.०८.०६.२०१८ रोजी जुन्याच व यापुर्वी रद्द झालेल्या महाराष्ट्र शॉप अॅन्डकमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट अॅक्ट, १९४८ नुसार बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस या दोन्ही ठेकेदारांस कार्यादेश दिलेला आहे.

संस्थानने अद्याप सोईस्करपणे महाराष्ट्र शॉप अॅण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट अॅक्ट, २०१७ ची अंमलबजावणी केलेली नाही व जुन्या कायद्याप्रमाणे कामगार ठेकेदारांना कार्यादेश दिलेला आहे. नवीन महाराष्ट्र शॉप अॅण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट अॅक्ट, २०१७ नुसार कंत्राटी कर्मचा-यांना आठवडा, सुट्ट्या,सरकारी सुटया व इतर किरकोळ सुट्या देणेची तरतुद असतानाही त्या दिल्या जात नाहीत. हे कंत्राटी कर्मचा-यांवर अन्याय करणारे आहे.

तरी दि.०७.०९.२०१७ पासून महाराष्ट्र शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट ॲक्ट, २०१७ ची अंमलबजावणी होवून त्यातील तरतुदींप्रमाणे कंत्राटी कर्मचा-यांना फरकासह पगारी आठवडा रजा/सुट्ट्या, सरकारी /राष्ट्रीय व इतर किरकोळ रजा /सुट्या लागू कराव्यात, ही नम्र विनंती आहे. असे नमूद केले आहे.

सदरचे पत्र दि.११.०९.२०१८ रोजी इकडिल कार्यालयास प्राप्त झाले असून त्यात, सदरचे पत्रावर मा.उपजिल्हाधिकारी सो. यांचे निर्देशानुसार चर्चा झाली असून सदरचे पत्रासोबत जोडलेल्या अधिनियमातील तरतूदीबाबत कामगार विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करावा असे निर्देश दिलेले आहेत. असे नमूद करुन सदर पत्र इकडिल कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी वर्ग केले आहे.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी दरवर्षी निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदारांची नेमणूक करण्यात येऊन त्यांना विभागांना लागणारे कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी आदेश देण्यात येतात. सध्या दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ अखेर संस्थानमधील विविध विभागांना आवश्यक असणा-या अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया.लि.पुणे व मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई या दोन ठेकेदारांची नेमणूक करण्यात आलेली असून, सदर ठेकेदारांमार्फत संस्थानला पुरविण्यात येत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत खालीलप्रमाणे सुविधा देण्यात येत आहेत.

अ) कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये आज अखेर इनसोर्स पध्दतीने एकूण २६५० अकुशल, कुशल , सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी काम करत असून, सदर कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील, दि.२८ सप्टेंबर-२०१०, रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८, अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अधिसुचनेस उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई, यांचेकडील, दि.०४.०८.२०१८, रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौंन्सप्रमाणे व सध्या किमान वेतनदरानुसार तसेच माहे-एप्रिल-२०१७ पासुन किमान वेतनावर ४०% वेतनवाढ धरुन अकुशल कंत्राटी कामगार रूपये ४३३.१८ प्रतिदिनी व कुशल कंत्राटी कामगार रूपये ४७६.२६ प्रतिदिनी वेतन देण्यात येत आहे. व वेळोवेळी स्पेशल अलौंन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवून कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतनदराप्रमाणे वेतन अधीक ४०% वाढ धरुन वेतन देणेत येत आहे.

ब) सदर कंत्राटी कर्मचा-यांना मोफत वैद्यकिय सेवा व नियमावलीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.११.२०११ निर्णय क्र.७६५(२३) अन्वये मान्यता मिळालेली असुन, सदर नियमावली दि.०१.०१.२०१२ पासुन लागु करण्यात आलेली आहे सदर वैद्यकिय उपचारासाठी वार्षिक मर्यादा व सेवेचा कालावधी खालीलप्रमाणेः-

०१ ते ०५ वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.३०,०००/- पर्यंत

०५ ते १० वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.४०,०००/- पर्यंत

१० वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.५०,०००/- पर्यंत

क) सदर कंत्राटी कर्मचा-यांना एकुण हजर दिवसावर ८.३३% प्रमाणे दिपावली निमित्त सानुग्रह अनूदान देण्यात येत आहे.

ई) सदर कुशल, अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना संबंधित ठेकेदारामार्फत गणवेश, ओळखपत्र देण्यात येते. तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश, ओळखपत्र, बुट, टोपी, शिटी व काठी देण्यात येते.

उ) तसेच संस्थानकडे ठेकेदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांस नुकसान भरपाई अधिनियमन १९२३(वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट,१९२३ नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख पर्यंतचा विमा उतरविण्यात येतो.त्याकामी विम्याची,अंशदानाची रक्कम संस्थान कंत्राटदारास अदा करते.

या उपरोक्त व्यतिरीक्त सदर कंत्राटी कामगारांना इतर कायदेशीर आर्थीक देणी, सुविधा देणेची जबाबदारी ही करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार संबंधित कंत्राटदाराची आहे.

याबाबत संबंधित ठेकेदार यांचेशी निविदेतील व कार्यादेशातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करण्यात आलेला आहे.

आता, महाराष्ट्र शॉप्स ॲड एस्टॅब्लिशमेंटस (नोकरी व सेवाशर्ती नियामक) कायदा २०१७ ची अंमलबजावणी- महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था ( नोकरीचे नियम व सेवाशर्तीच्या अटी) कायदा २०१७ ची अंमलबजावणी १९ डिसेंबर २०१७ पासून संपूर्ण महाराष्ट्रात सुरु केलेली आहे. नव्या

कायद्याच्या अंमलबजावणमुळे यापूर्वीचा महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था अधिनियम १९४८ हा कायदा रद्द झाला आहे.

खाली दिलेल्या तक्त्यात पूर्वीचा जुना १९४८ चा कायदा व नव्याने लागू केलेला २०१७ चा कायदा यातील फरक.

| अ.क्र | कलम | जुनी तरतूद | नवीन तरतूद | परिणाम/ प्रभाव |
|---|---|---|---|---|
| ३. | कलम- २ (४) | व्यापारी संस्था या शब्दाची व्याख्या दुकान व्यापारी आस्थापना, निवासी हॉटेल, रेस्तरॉ, इटिंग हाऊस, थिएटर किंवा लोकरंजन किंवा मनोरंजनाचे ठिकाण ज्याला या कायद्याच्या तरतुदी लागू होतात व राज्य सरकार अधिसुचना काढून या कायद्याच्या अनुपालनासाठी जाहीर करेल अशी ठिकाणे. | या नव्या व्याख्येमुळे पूर्वीच्या कायद्याच्या कक्षेत न येणारे अनेक उद्योगधंदे व आस्थापना नव्या कायद्याच्या कक्षेत आणले गेले आहेत. सोसायटी नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणी झालेली सोसायटी व धर्मादाय किंवा इतर प्रतिष्ठान नोंदिणी ज्यामध्ये राज्य सरकार व्दारा काढलेल्या नोटिफिकेशनमधील अधिसुचित केलेली आस्थापना यांचा समावेश आहे. | या नव्या व्याख्येमुळे पूर्वीच्या कायद्याच्या कक्षेत न येणारे अनेक उद्योगधंदे व आस्थापना नव्या कायद्याच्या कक्षेत आणले गेले आहेत. |
| १०. | नवीन कायदा कलम १५ | पूर्वीच्या कायद्याप्रमाणे प्रत्येक दुकान व आस्थापना आठवड्यातून एका दिवशी बंद ठेवणे आवश्यक होते. | सी) एखाद्या कामगाराला साप्ताहिक सुट्टी दिली नसेल तर अशा साप्ताहिक सुटीच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत त्याला भरपाई म्हणून एक दिवसाची सुटी देणे आवश्यक असेल.<br>ई) सुटीच्या ठरलेल्या दिवशी कामगाराला कामावर येणे भाग पडल्यास त्याला त्याच्या नियमित वेतनाच्या दरापेक्षा दुप्पट दराने त्या दिवसाचे वेतन देण्यात येईल. | नव्या तरतुदीप्रमाणे आस्थापना आठवड्यातील सर्व दिवशी काही अटींच्या अधिन चालू राहतील. |
| ११. | **नवीन कायदा कलम १८** | **अे)** कोणत्याही वर्षातील ३ महिन्यांच्या कालावधीसाठी नोकरीत असलेला प्रत्येक कर्मचारी त्याने ६० दिवस केलेल्या कामाबद्दल सलग किंवा अन्यथा ५ दिवसाच्या रजेस पात्र ठरत असे.<br>**बी)** एका वर्षात २४० दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीत काम केलेला प्रत्येक कर्मचारी २१ दिवसांपेक्षा कमी नसलेल्या सलग किंवा अन्यथा रजेस पात्र ठरत असे.<br>**सी)** अशी रजा जास्तीत जास्त ४२ दिवसांपर्यंत साठवता येत असे. | **अे)** एका आस्थापनेत एका कॅलेंडर वर्षात २४० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी काम केलेल्या प्रत्येक कर्मचा-याला त्याने काम केलेल्या प्रत्येक २० दिवसांसाठी १ दिवसाची भरपगारी रजा पुढील वर्षात घेता येईल. तथापि, एका वर्षात ३ महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीसाठी नोकरीवर असलेल्या प्रत्येक कर्मचारी त्याने काम केलेल्या प्रत्येक ६० दिवसाला ५ दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीच्या सलग किंवा अन्यथा रजेस पात्र होईल.<br>**सी)** प्रत्येक कामगार जास्ती जास्त ४५ दिवसांची रजा साठवू शकेल. | नव्या कायद्याप्रमाणे ३ दिवसाची अधिक रजा प्रत्येक कामगारास साठवता येईल. |
| | | किरकोळ रजेची कोणतीही तरतूद नव्हती. | प्रत्येक कामगाराला प्रत्येक कॅलेंडर वर्षात ८ दिवसांची भरपगारी किरकोळ रजा मिळेल व अशी रजा प्रत्येक तिमाहिला संबंधित कामगाराच्या रजा खात्यात जमा करण्यात येईल अशी रजा घेतली गेली नाही. वर ती वर्षा-अखेरीलस रद्द करण्यात येईल. | ही तरतुद सर्वस्वी नवीन आहे. यामुळे प्रत्येक कामगार प्रत्येक कॅलेंडर वर्षात ८ दिवसांची किरकोळ रजा घेण्यास पात्र होईल. व तो त्याचा कायदेशीर अधिकार असेल. |
| | | **राष्टीय सणांची सुटीः** | **राष्ट्रीय सणांची सुटीः-** | **राष्ट्रीय सणांची सुटीः** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रत्येक कर्मचारी, त्याच्या नोकरीचा कालावधी कितीही असला तरी २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर या अतिरिक्त सुटींसाठी पात्र होता. | **अे**) नव्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक कर्मचारी प्रत्येक वर्षात ८ सुट्यांसाठी पात्र होईल, ज्यामध्ये २६ जानेवारी, १मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर व उर्वरित ४ दिवसांची सुटी मालक व नोकर हे आपापसात चर्चा करुन वर्षाच्या सुरुवातीलाच ठरवतील. तथापि, अशा सुट्टीच्या दिवशी मालकाने कामगाराला काम करण्यास भाग पाडले, तर त्या कामगाराला नेहमीच्या वेतनाच्या दरापेक्षा दुप्पट दराने वेतन मिळेल व अशा रजेच्या दिवशी काम केल्याबद्दल आणखी एका दिवसाची रजा मिळेल. | हा कर्मचा-यांचा कायदेशीर अधिकार असेल. राष्ट्रीय सण व इतर सण मिळून ८ दिवसांची सुटी असेल. रजेच्या कालावधीपूर्वी व कालावधीनंतर येणारे अर्थात रजेच्या कालावधीस जोडून येणा-या सुट्या ही संकल्पनाच काढून टाकण्यात आलेली आहे व अशी रजा निव्वळ दिवसांवर आधारित असेल. |

**विभागाचा अभिप्रायः-** संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना सध्या महाराष्ट्र शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट,१९४८, झोन नं.३ नुसार किमान वेतन दिले जात असून, अधिक किमान वेतनावर ४०% वेतनवाढ देणेत येत आहे. त्याउपर सदरचे कंत्राटी कर्मचा-यांना पगारी आठवडा, शासकीय व किरकोळ रजा/सुट्टया दिल्या जात नाहीत. संस्थानमार्फत कंत्राटी कर्मचा-यांना त्यांच्या प्रत्यक्ष हजर दिवसांनुसार वेतन अदा केले जाते. सदरचे वेतन २६ दिवसांच्या वर म्हणजे आठवडा सुट्टीचे वेतन दिले जात नाही.

सबब, महाराष्ट्र शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट,२०१७ नुसार ठेकेदारामार्फत लावण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना नव्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक कंत्राटी कर्मचा-यास एका कॅलेंडर वर्षात २४० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी काम केलेल्या प्रत्येक कर्मचा-याला-०१) त्याने काम केलेल्या प्रत्येक २० दिवसांसाठी १ दिवसाची भरपगारी रजा पुढील वर्षात देता येईल. तथापि, एका वर्षात ३ महिन्यांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीसाठी नोकरीवर असलेल्या प्रत्येक कंत्राटी कर्मचारी त्याने काम केलेल्या प्रत्येक ६० दिवसाला ५ दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीच्या सलग किंवा अन्यथा रजेस पात्र होईल .प्रत्येक कंत्राटी कामगार जास्तीत जास्त ४५ दिवसांची रजा साठवू शकेल. ०२) प्रत्येक कंत्राटी कामगाराला प्रत्येक कॅलेंडर वर्षात ८ दिवसांची भरपगारी किरकोळ रजा देता येईल व अशी रजा प्रत्येक तिमाहिला संबंधित कामगाराच्या रजा खात्यात जमा करण्यात येईल. अशी रजा घेतली गेली नाही. तर ती वर्षा- अखेरीस रद्द करण्यात येईल. ०३)तसेच कंत्राटी कामगारांना प्रत्येक ०६ कामाचे दिवसांनंतर सातव्या दिवशी भर पगारी आठवडा सुट्टी देता येईल. ०४) तसेच कंत्राटी कर्मचारी प्रत्येक वर्षात ८ राष्ट्रीय सणांच्या सुटयांसाठी पात्र राहील. (ज्यामध्ये २६ जानेवारी, १मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर व उर्वरित ४ दिवस) सणांच्या सुट्टया आपापसात चर्चा करुन देता येईल. सदर सुट्टया ज्या-त्या दिवशी न देता संबंधित विभाग प्रमुख यांनी विभागांचे कामाचे नियोजन करुन २ महिन्याचे आत कधीही देणेबाबतचे नियोजन करता येईल. तसे संबंधित कंत्राटी कर्मचारी ज्या ठेकेदारामार्फत काम करीत असतील तो ठेकेदार व संस्थान विभागप्रमुख आपापसात राष्ट्रीय सणांच्या सुट्टयांचे नियोजन करतील.विभाग प्रमुख हे त्या ठेकेदारास राष्ट्रीय सणांच्या सुटयांबाबत वेळोवेळी कळवतील सदर रजा/सुट्टयांचे रेकॉर्ड संबंधित ठेकेदारास ठेवावे लागेल.

उपरोक्त कायद्याची अंमलबजावणी करावयाची झाल्यास सदर रजा/सुट्टयाचे तरतुदीबाबत सध्या दि.१०.०६.२०१८ ते दि.०९.०६.२०१९ अखेर नेमणुका केलेल्या ठेकेदारांनी भरलेल्या (निविदेतील व त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये नमूद केलेले नाही.) ठेकेदाराकडून करुन घेतलेल्या करारनाम्यामध्ये पगारी रजा/ सुट्टया देणेची जबाबदारी कंत्राटदारावर टाकलेली आहे.वरीलप्रमाणे ठेकेदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना पगारी रजा व सुट्टया लागू करावयाचे झाल्यास त्याबाबत त्या अटी व शर्ती तयार करुन करारनाम्यामध्ये सदरबाबत नमूद करुन ठेकेदाराकडून नवीन सुधारीत दुरुस्ती करारनामा करुन घ्यावा लागेल. तसेच, उपरोक्त कंत्राटाची मुदत संपुष्टात आल्यानंतर नव्याने ठेकेदाराची नेमणूक करणेबाबत प्रक्रिया सुरु करताना निविदेमध्ये सदर पगारी रजा/सुट्टयाबाबत अधिनियमात झालेल्या बदलानुसार अटी व शर्ती नमूद कराव्या लागतील. असे मत आहे.

उपरोक्त अधिनियमातील बदलानुसार कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना द्यावयाच्या पगारी आठवडा सुट्ट्या तसेच सार्वजनीक सुट्ट्या लागू करणेबाबतची बाब धोरणात्मक असल्याने याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (रोजगाराचे विनियम व सेवेच्या शर्ती) कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना पगारी आठवडा सुट्टी, सार्वजनिक सुट्टी व किरकोळ रजा देणेबाबत समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी सविस्तर अभ्यास करुन अहवाल सादर करावा, व त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कामगार विभाग)**

---

**विषय नं.१९** **दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया यांना त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी शांतिनिकेतन इमारतीतील ३ रुम लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने वापरास देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**– साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजनासंदर्भात दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि.यांना कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामीचा कार्यादेश देणेचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीच्या बैठकीत निर्णय क्रं.५८० प्रमाणे करणेत आलेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे जा.नं.एसएसएसटी/वशी-आय.टी./२४६५/२०१६ दि.१७/०८/२०१६ अन्वये पुढील ५ वर्षाकरीता कार्यादेश देणेत आलेला आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१२२ प्रमाणे मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. यांना त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी शांतीनिकेतन इमारतीमध्ये दिलेल्या ६ खोल्यांपैकी ३ खोल्या ताब्यात घेवून उर्वरित खोली क्रं.६,७ व किचन रुम या ३ खोल्या दि.१७/११/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्याप्रमाणे उक्त कंपनीबरोबर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा दि.२६/०२/२०१८ रोजी करुन घेण्यात आलेला आहे.

सदर करारनाम्याची मुदत दि.१६/१०/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याकारणाने मा.व्यवस्थापक, मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.तिरुपती कॅम्प शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२१/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त ३ खोल्या वापराची मुदत दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/०९/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन मुदत वाढवून मिळणेकामी इकडेस विनंती केलेली आहे.

सदर विनंतीचे अनुषंगाने संस्थानचे आय.टी.विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.एसएसएसटी/आय.टी./७४/२०१८ दि.०१/०९/२०१८ अन्वये "मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५८० नुसार दर्शनरांग व्यवस्थापन (Timebase) कार्यप्रणाली कार्यान्वित करणेकामी, मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांना जा.नं.एसएसएस/आयटी/२४६५/ २०१६ दि.१७/०८/२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. यांनी सदरची कार्यप्रणाली सुरु केलेली आहे. त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे सदर प्रकल्पाचा कार्यकाल ५ वर्षांचा आहे. सबब संदर्भ क्रं.१ नुसार मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि.यांचे कर्मचारी निवासासाठी संस्थानचे शांतीनिकेतन इमारती मधील वापरास देण्यात आलेल्या खोली नं.६,७ व किचन अशा तीन खोल्यांची मुदत वाढवून देता येईल." असे बाबत इकडेस कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** आय.टी.विभागाकडील उपरोक्त अभिप्रायाप्रमाणे व मॅनेजर, मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. तिरुपती कॅम्प शिर्डी यांचेकडील दि.२१/०७/२०१८ रोजीच्या विनंती पत्राप्रमाणे त्यांचे कंपनीच्या कर्मचा-यांना संस्थानचे शांतीनिकेतन इमारती मधील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा तीन खोल्यांची दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/०९/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठीची

मुदत संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापराची मुदत वाढवून देता येईल व त्याप्रमाणे करारनामा करुन घेता येईल.

**प्रस्ताव-** मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. तिरुपती कॅम्प शिर्डी यांचे कर्मचा-यांना संस्थानचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीमधील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा ३ खोल्यांची दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/०९/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठीची मुदत संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापराची मुदत वाढवून देणेकामीच्या व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.त्रिलोक सिकयुरिटी सिस्टीम इंडीया प्रा.लि. तिरुपती कॅम्प शिर्डी यांचे कर्मचा-यांना संस्थानचे शिर्डी येथील शांतीनिकेतन इमारतीमधील वापरास दिलेल्या खोली नं.६,७ व किचन रुम अशा ३ खोल्यांची दि.१७/१०/२०१८ ते दि.१६/०९/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापराची मुदत वाढवून देणेस व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.२० **संस्थान परिसरात महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास विक्री केंद्राकरीता नि:शुल्क गाळा वापरास मिळणेबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. नागपुर यांचेकडील पत्र जा.नं.हातगाम/ विपणन/ ५७५/१८ दि.२७.०७.२०१८.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.हातमाग/विपणन/५७५/१८ दि.२७/०७/२०१८ अन्वये संस्थान परिसरात महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास विक्री केंद्राकरीता नि:शुल्क गाळा वापरास मिळणेबाबत विनंती केलेली असून त्यात त्यांनी "महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर महाराष्ट्र शासनाचे अंगीकृत प्रतिष्ठान असून महामंडळाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. हातमाग महामंडळ प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या हातमाग व्यवसायासाठी असलेल्या योजनांचा लाभ हातमाग विणकरीपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यरत आहे. महामंडळ हातमाग विणकरांकडून उच्च प्रतीच्या कापडाचे जसे टसर-सिल्क साडी व कापड,अनारकली ड्रेस,ड्रेस मटेरियल व त्यापासून तयार केलेले जाकेट,शर्ट,जेंटस कुर्ती,लेडीज वेअर, स्टोल,शगुन लिफाफे,डायरी,नोटबुक,क्यूब बॉक्स,टेबल रनर,फोटोफ्रेम बॅग,हॅण्डबॅग तसेच दैनंदिन वापरावयाच्या चादरी,बेडशिट,टॉवेल,साडी ईत्यादीचे उत्पादन करुन त्यांच्या मार्केटींगची व्यवस्था सातत्याने करीत आहे. महाराष्ट्रातून व संपूर्ण भारतातून भक्तगण नियमित शिर्डी येथे येत असतात. देवस्थान परिसरात एक गाळा महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास नि:शुल्क उपलब्ध करुन दिल्यास हातमाग महामंडळाद्वारे उत्पादित मालाचे विक्री केंद्र सुरु करता येईल. विणकरांनी कला कौशल्याने तयार केलेल्या हातमाग कापडाची जाणीव शिर्डी येथे येणा-या भक्तगणांना होईल. यामुळे मागणी वाढून प्रचारात भर पडेल व विक्रीत वाढ होण्यास मदत होईल. तरी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास संस्थेच्या परिसरात विक्री केंद्र सुरु करण्यास गाळा नि:शुल्क मिळणेस विनंती आहे,"असेबाबत नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- यापूर्वी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत (महाटेक्स),मुंबई यांनी संस्थान मालकीचे नवीन भक्तनिवास (५०० रुम) च्या दक्षिणेकडील गाळा संस्थेच्या दुकानासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबतची विनंती संस्थानकडे केलेली होती. तदनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेपूढे सदरचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रं.८३६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत (महाटेक्स),मुंबई यांना त्यांच्या संस्थेच्या दुकानासाठी संस्थानची जागा उपलब्ध करुन दिल्यास इतरही संस्था जागेची मागणी करतील,याकरीता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला."

मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या.नागपूर यांचे उपरोक्त विनंतीप्रमाणे उक्त महामंडळास विक्री केंद्राकरीता संस्थान परिसरात संस्थान मालकीचा गाळा नि:शुल्क वापरास दिल्यास इतर संस्था/महामंडळे देखील संस्थान परिसरात संस्थान मालकीची जागा/गाळा नि:शुल्क वापरास मिळणेकामी आग्रह धरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तत्राप शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडे दराने गाळा/जागा वापरास देण्याचा विचार करता येईल.

प्रस्ताव- महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास विक्री केंद्राकरीता संस्थान परिसरात सशुल्क गाळा/जागा वापरास देणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. नागपूर यांना शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या दराने विक्री केंद्राकरीता संस्थान परिसरात गाळा/जागा वापरास देण्यात यावा, तसेच मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर करारनामा करुन घेणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.२१ **मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२६/६ पैकी ०.८९.७३ हेक्टर श्री.चंद्रकांत रतिलाल मेहता यांचे मालकीचे असलेले क्षेत्र संस्थानला खरेदी देणेकामी जनरल मुखत्यार श्री.पुनम सोमप्रकाश ग्रोवर आणि श्री.देवजीभाई एल.पटेल, रा.अहमदाबाद यांचा मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांना उद्देशून केलेला दि. ०४.०६.२०१८ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– श्री.चंद्रकांत रतिलाल मेहता यांचे मालकीची असलेली मौजे शिर्डी,ता.राहाता येथील जमीन सर्वे नं.१२६/६ पैकी क्षेत्र ०.८९.७३ हेक्टर इतकी संस्थानला कायमस्वरुपी खरेदी देणेकामी जनरल मुखत्यार श्री.पुनम सोमप्रकाश ग्रोवर व श्री.देवजीभाई एल.पटेल यांनी मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांना उद्देशून दि.०४/०६/२०१८ रोजीचा अर्ज सादर केलेला आहे. सदरचा अर्ज मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिवालयाकडील उपरोक्त जा.नं.ई-टपाल मुमंस/१८/३२०७८२९ दि.११/०७/२०१८ अन्वये इकडेस उचित कार्यवाहीसाठी प्राप्त झालेला आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/६ च्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता त्यात कब्जेदार सदरी चंद्रकांत रतिलाल मेहता यांचे नावासमोर क्षेत्र ०.८९.७३ व आकार रु.३.३५ असे दर्शविलेले असून इतर हक्कात चंद्रकांत रतिलाल मेहता यांनी सोमप्रकाश ग्रोवर व देवजीभाई लड्डाभाई पटेल,पुनम सोमप्रकाश ग्रोवर यांना क्षेत्र ८९.७३ क्षेत्राचा विकसन करारनामा करुन दिला,असेबाबतची नोंद फेरफार नं.२६४६९ अन्वये असून त्याखाली नोटीस ऑफ लिज पेंडन्सी नोंद रे.मु.नं.९९/२०१३ न्यायप्रविष्ट बाब अशी नोंद २८१९९ अन्वये करण्यात आलेली असल्याचे दिसून येते.

यापूर्वी श्री साईबाबा संस्थानचे विविध उपक्रमांसाठी आरक्षण क्रं.३९ हे टाकण्यात आलेले होते. सदर आरक्षणामध्ये उपरोक्त क्षेत्राचा देखील समावेश केलेला होता व सदर आरक्षणातील जमीनी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेमार्फत एलएक्युएसआर १६/२००० प्रमाणे भुसंपादन करणेची प्रक्रिया चालू होती.

भूसंपादन आरक्षण क्रं.३९ मध्ये वाढीव मोबदला मिळावा यासाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे संस्थानचे विरोधात १) रिट पिटीशन नं.२०४०/२०१४ डॉ.संतोष लोढा विरुध्द महाराष्ट्र शासन २) रिट पिटीशन नं.३३०/२०१५ भिमाबाई पंढरीनाथ शेळके विरुध्द महाराष्ट्र शासन ३) रिट पिटीशन नं.२०८४/२०१६ श्री.चंद्रकांत रतिलाल मेहता विरुध्द महाराष्ट्र शासन हे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४,१२६ आरक्षण क्रं.३९ क्षेत्र ४ हे.५४ आर १८ चौ.मी.चे भूसंपादना संदर्भात दाखल झालेले होते.

प्रस्तुत प्रकरणी मा.कोर्टाने सन २०१३ चे नोटीफिकेशननुसार भूसंपादन करण्याचा आदेश केला तर दि.०१/०१/२०१४ पर्यंत अंदाजे रु.९१,४८,२०,७६४/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून द्यावी लागणार आहे. सदरची रक्कम मा.कोर्टाचा आदेश होईपावेतो आणखी वाढण्याची शक्यता असल्याने तसेच सदर बाब आर्थिक महत्वाची असल्याने त्याबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत सादर करण्यात आला आहे. त्यावर निर्णय क्रं. ९१५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरचे आरक्षण क्रं.३९ मधील क्षेत्रासंबंधी जमीन मालकांमध्ये आपआपसात वाद असून, त्या जागेवर बेकायदेशीर अतिक्रमणे सुध्दा आहेत. सुधारित भूसंपादन सन २०१३ चे तरतूदीनुसार जागेची किंमत फार जास्त होत आहे. जागेचे क्षेत्र व त्यासाठी द्यावी लागणार किंमत संयुक्तिक नाही.

तसेच शेती महामंडळाची शिर्डी व लगतच्या गावांतील ३०१ हे.८४ आर (५५४ एकर ६० आर) जमीन संस्थानला मिळणेकामी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडे दि.२४/१०/२०१६ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर जमीन संस्थानला कमी किंमतीत मिळणार आहे या सर्व बाबींचा विचार करता, सदरचे क्षेत्र भुसंपादनाने घेणे संस्थानच्या दृष्टिने किफायतशीर व सोयीचे नाही म्हणून आरक्षण क्रं.३९ मधील ४ हे.५४ आर १८ चौ.मी.हे क्षेत्र भूसंपादनाद्वारे घेऊ नये व सदर आरक्षण रद्द करणे व भूसंपादनापोटी शासनाकडे जमा केलेली रक्कम परत मिळणेकामी कार्यवाही करण्यात यावी,असे ठरले. सदर निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीचे आरक्षण क्रं.३९ ची भुसंपादन कार्यवाही रद्द करणेत आलेली आहे. तसेच आरक्षण क्रं.३९ हे रद्द करणेकामी कार्यवाही करणेत आलेली आहे.

सदरचे क्षेत्र हे शिर्डी-नांदुर्खी रोडच्या पूर्वेस रोडलगत असून श्रीं चे मंदिरापासून सुमारे अर्धा किमी.अंतरावर आहे. सदर क्षेत्र हे श्री.चंद्रकांत रतिलाल मेहता यांचे मालकीचे असून त्यांनी सदरच्या क्षेत्राबाबत दि.०३/०८/२०१३ रोजीचे जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी श्री.पुनम सोमप्रकाश ग्रोवर यांना करुन दिलेले असून दि.०३/०८/२०१३ रोजी डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट श्री.देवजीभाई लडडाभाई पटेल व पुनम सोमप्रकाश ग्रोवर यांना करुन दिले असलेचे दिसून येते.

तदनंतर उक्त क्षेत्राची भुसंपादन कार्यवाही चालू असतांना मुळ मालक श्री.चंद्रकांत रतिलाल मेहता यांनी संस्थानकडे अर्ज सादर करुन त्यात त्यांनी त्यांचे मालकीचे उक्त क्षेत्राचे ७/१२ उता-यात इतर हक्कात पुनम सोमप्रकाश ग्रोवर आणि देवजीभाई लडडाभाई पटेल यांनी लबाडीने खोटया विकासाच्या माध्यमातून गैरमार्गाने स्वत:चे नाव लावून घेतले आहे, वगैरेबाबतच्या तक्रारी नमूद केलेल्या आहेत. तथापि त्यावेळेस सदर क्षेत्राची भुसंपादन कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग, शिर्डी यांचेमार्फत चालू असलेने सदर तक्रारीकामी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे कार्यालयाशी संपर्क साधणेबाबत त्यावेळेस त्यांना कळविणेत आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– प्रस्तुत प्रकरणी मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१२६/६ पैकी क्षेत्र ०.८९.७३ हेक्टर इतके संस्थानने कायम खरेदी घेणेकामी अर्जदार पुनम सोमप्रकाश ग्रोवर यांनी मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांना उद्देशून अर्ज केलेला असून त्यावर मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी प्रस्तुतच्या अर्जाची तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी,अशाबाबतच्या सुचना नमूद केलेल्या आहेत.

यापूर्वी शिर्डी विकास योजना आरक्षण क्रं.३९ मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकरीता विविध उपक्रमासाठी सदर परिसरातील एकूण क्षेत्र ४ हे.५४ आर १८ चौमी.इतके आरक्षित करण्यात आलेले होते. सदरचे क्षेत्र भुसंपादन करणेबाबतची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील एलएक्युएसआर १६/२००० अन्वये चालू होती. तथापि उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव आरक्षण क्रं.३९ हे भुसंपादन प्रक्रियेतून वगळण्यात आलेले आहे.

सदरचे क्षेत्र मंदिर परिसरापासून सुमारे अर्धा किमी.अंतरावर शिर्डी-नांदुर्खी रोड (एअरपोर्ट रोडचे) पूर्वेकडेस रोडलगत असून सदर क्षेत्राची पश्चिमेकडील रोड फ्रंट लांबी सुमारे १४५ मीटर असून दक्षिणेकडील रुंदी सुमारे ८२ मीटर इतकी आहे व उत्तरेकडील रुंदी सुमारे ४२ मीटर इतकी आहे. (सोबत समजुतीचा नकाशा सादर केला आहे.)

सध्यस्थितीत संस्थानचे फायर ॲण्ड सेफटी विभागाचे अग्निशमन केंद्रासाठी यथायोग्य अशा सोयीस्कर जागेची आवश्यकता आहे. सदर क्षेत्राचा उपयोग संस्थानला अग्निशमन केंद्रासाठी,प्रेक्षागृहासाठी (ऑडीटोरियम हॉल), व्यायामशाळा इ.कारणांसाठी होवू शकेल.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यासाठी "जमीन खरेदी करणेकामीचे धोरण" महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील निर्णय क्रं.सासंवि/१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५ जुन २०१८ अन्वये निश्चित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेणे उचित होईल,असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार यांचे मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१२६/६ पैकी क्षेत्र ०.८९.७३ हेक्टर ची संस्थानसाठीची उपयुक्तता निश्चित करुन विचार विनिमय करुन खरेदी करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२६/६ पैकी ०.८९.७३ हेक्टर श्री.चंद्रकांत रतिलाल मेहता यांचे मालकीचे असलेले क्षेत्र संस्थानला खरेदी देणेबाबतचा प्रस्ताव मुळ मालकाकडून आलेला नसुन इतर हक्कात नोंदी असलेले विकसक सोमप्रकाश ग्रोवर, देवजीभाई लड्डाभाई पटेल व पुनम सोमप्रकाश ग्रोवर यांचेमार्फत आलेला आहे. त्यामुळे त्यांना संस्थानला खरेदी द्यावयाच्या जमिनीच्या मालकीहक्काबाबत व इतर कायदेशीर बाबी बाबत समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करुन अभिप्राय द्यावेत, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२२** **शिर्डी वाढीव विकास आराखड्यातील संस्थानसाठी आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– शिर्डी वाढीव विकास आराखडयात संस्थानसाठी खालीलप्रमाणे आरक्षणे दर्शविलेली आहेत.

| अ.नं. | आरक्षण क्रं. | आरक्षणाचा हेतू | बाधीत सर्वे नं. | क्षेत्र हे.आर.चौमी. | भूसंपादन संस्था |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पार्कींग | २०७ पै.,२०८ पै.,२१५ ते २१९ पै. | २.५९.०० | शिर्डी नगरपंचायत/ शिर्डी साईबाबा संस्थान |
| २ | २ | मनोरंजन पार्क | २०५ पै.,२०६ पै. | २.९७.०० | श्री साईबाबा संस्थान |
| ३ | ४ | वृध्दाश्रम | २२१ पै. ते २२३ पै. | १.००.०० | श्री साईबाबा संस्थान |
| ४ | ७ | संस्थान हेतू (पिलग्रिम ॲमिनिटीज) (भक्तनिवास,सांस्कृतिक केंद्र,समाज भवन, मनोरंजन केंद्र इ.) | २०२ पै.,२०३ पै. | २.००.०० | शिर्डी नगरपंचायत/ श्री साईबाबा संस्थान |
| ५ | २२ | शैक्षणिक कारणासाठी | १९५ पै.,१९६ पै.,२१२ पै.,२१३ पै. | ६.५५.०० | श्री साईबाबा संस्थान |

सदर वाढीव विकास आराखडयात संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनीसंबंधी व प्रस्तुत आरक्षणापैकी संस्थानने खरेदी केलेली जमीन व उर्वरित खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबतची माहीती परिशिष्ट अ मध्ये यासोबत सादर केलेली आहे.

त्यात संस्थानसाठीचे आरक्षण क्रमांक,आरक्षण हेतू,जागेचे लोकेशन,भूसंपादन संस्था,आरक्षित केलेले एकूण क्षेत्र,आरक्षणामुळे बाधीत होणारे सर्वे नंबर, एकूण आरक्षणापैकी संस्थानने खरेदी केलेले क्षेत्र,खरेदी करावयाचे राहीलेले एकूण क्षेत्र,उर्वरीत क्षेत्रापैकी जमीन खरेदी देणेसाठी प्राप्त झालेल्या अर्जदाराचे नाव व अर्जाची तारीख,खरेदी द्यावयाचे सर्वे नंबर,क्षेत्र आणि सन २०१७-१८ चे रेडी रेकनरप्रमाणे जमीनीचे दर इ.बाबतची सविस्तर माहिती सोबतचे परिशिष्ट अ मध्ये सादर केलेली आहे. तसेच श्री साईबाबा संस्थानकरीता आरक्षित असलेल्या शिर्डी (बिरेगाव) वाढीव विकास आराखडयातील क्षेत्र,सर्वे नं.,स्थळदर्शक इ.बाबतची माहीती दर्शविणारा बिनस्केली कच्चा नकाशा परिशिष्ट ब मध्ये यासोबत सादर केलेला आहे.

उक्त वाढीव विकास आराखडयातील आरक्षित असलेल्या क्षेत्राचे झोनबाबतची माहीती मा.सहायक संचालक,नगररचना,अहमदनगर यांचेकडून मागविली असता त्यांनी सदर क्षेत्राचा विकास आराखडा नकाशा इकडेस सादर केलेला आहे. तो परिशिष्ट क मध्ये यासोबत सादर केलेला आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता उक्त वाढीव विकास आराखडयातील आरक्षित क्षेत्र हरित पट्टयात येत नसलेचे दिसून येते.

उपरोक्त परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेल्या आरक्षणापैकी संस्थानला जमीन खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावातील जमीनी खरेदी करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेकामी यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे

दि.०२/०५/२०१८ रोजीच्या सभेपूढे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन निर्णय क्रं.३०७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"शिर्डी वाढीव विकास आराखडयातील संस्थानसाठी आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील शेतजमीनीच्या रेडीरेकनरचे दर खूपच जास्त आहे. त्या तुलनेने शेती महामंडळाच्या जमीनीचे दर कमी असून सदर जमीनी खरेदी करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच प्रस्तावित आरक्षणाखालील प्रयोजनासाठी संस्थानकडून यापूर्वीच अन्य ठिकाणी प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यामुळे तुर्त आरक्षणाखालील जमीनी खरेदी करण्याचे कोणतेही प्रयोजन नाही. यास्तव शिर्डी वाढीव विकास आराखडयातील संस्थानसाठी आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीनी खरेदी न करता त्यावरील आरक्षण रद्द करण्यासाठी संबंधीतांना कळविण्यात यावे,"असे ठरले.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने शिर्डी वाढीव विकास आराखडयातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीनीवरील उपरोक्त आरक्षण रद्द करणेबाबतची कार्यवाही करणेकामी

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/१८०८/२०१८ दि.१३/०७/२०१८ अन्वये अलाहीदा कळविणेत आलेले आहे व प्रत मा.सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडेस माहीतीसाठी व उचित कार्यवाहीसाठी पाठविणेत आलेली आहे.

तथापि उपरोक्त आरक्षित असलेल्या जमीनीचे मालक सर्वश्री आबासाहेब भास्कर कोते, गणेश बापूराव बनकर, सचिन बनकर,अर्जुन शिवराम जगताप, राजेंद्र बाबासाहेब जगताप, मधुकर शिवराम कोते, मनोहर रामचंद्र देशमुख यांनी दि.२०/०८/२०१८ रोजीचा इकडेस संयुक्त अर्ज सादर करुन त्यात त्यांनी "मौजे शिर्डी शिवारातील आम्ही आरक्षित जमीन धारक शेतकरी आहोत. सन २००२ मध्ये आमच्या जमीनी आरक्षित म्हणून सर्वे झाला.सन २०१५ मध्ये यातील ८.५ एकर क्षेत्र व तत्पूर्वी ०.८० आर (२ एकर) असे एकूण १०.५ एकर क्षेत्र संस्थानने खरेदी घेतले आहे. आम्ही सुध्दा खरेदीचे प्रस्ताव दोन वर्षापूर्वी सादर केले आहे. सन २०१५ साली संस्थानने त्यावेळी असणा-या रेडीरेकनर दराने जमीनी खरेदी घेतल्या. आज रेडीरेकनर दर वाढलेला आहे. तरीसुध्दा आम्ही दरासंबंधी तडजोड करण्यास तयार आहोत असे आपणास लेखी दिले आहे. त्यानंतर मा.शासनाने साईबाबा संस्थानला जमीन खरेदी संदर्भात जी.आर.दिला. सदर जी.आर.चे ठळक मुद्दे बघितल्यास त्यात आम्ही जमीनधारक नियमात बसतो. आरक्षित जमीन धारकांचा विचार व्हावा,जमीन (अर्जदार) साईबाबा संस्थानचे प्लॉट लगत असावे. जमीन येलो झोनमध्ये असावी,आरक्षित जमीनपैकी १०.५ एकर खरेदी झालेली आहे.(सन २०१५). तरी कृपया आमच्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा,ही विनंती" असेबाबत नमूद केलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेबाबतचा शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५ जुन २०१८ अन्वये पारित करणेत आलेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कोणत्याही स्वरुपाची जमीन ही शासन मान्यतेशिवाय खरेदी करु नये. जमीन खरेदीच्या सर्व प्रस्तावांना शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी,अशी तरतुद आहे.

उपरोक्त जमीनी संस्थानसाठी खरेदी करावयाच्या झाल्यास उपरोक्त निर्णयातील धोरणाप्रमाणे खालील मुद्यांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

<table>
<tr><th>मुद्दा क्रं.</th><th>मुद्दा</th><th>खुलासा</th></tr>
<tr><td>१</td><td>खरेदी करावयाच्या जमीनीचे क्षेत्रफळ<br>अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यासाठी खाजगी जमीन खरेदी करावयाची झाल्यास त्याचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे असणे बंधनकारक राहील.<br>i) बागायती क्षेत्र असल्यास असे क्षेत्र १ एकरपेक्षा कमी असू नये.<br>ii) जिरायती क्षेत्र असल्यास असे क्षेत्र २ एकरपेक्षा कमी असू नये.</td><td>सोबतचे परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेप्रमाणे.<br>
<table>
<tr><th>आरक्षण क्रं.</th><th>आरक्षण हेतू</th><th>सर्वे नं.</th><th>जमीन खरेदीकामी प्राप्त प्रस्तावातील एकूण क्षेत्र हे. आर</th></tr>
<tr><td>१</td><td>पार्कींग</td><td>२०७ पै.,२०८ पै., २१५ ते २१९ पै.</td><td>१.४०</td></tr>
<tr><td>२</td><td>मनोरंजन पार्क</td><td>२०५ पै.,२०६ पै.</td><td>३.२७</td></tr>
</table></td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td>iii) संस्थानच्या मालकीच्या असलेल्या जमीनीलगत एखादी बागायत अथवा जिरायत १ एकरापेक्षा कमी क्षेत्र असलेली जमीन जर संस्थानच्या जमीनीलगत व सलग होत असेल तर सदरचे क्षेत्र प्रस्तुत धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेता येईल.</td>
<td>
<table>
<tr><td>४</td><td>वृध्दाश्रम</td><td>१२१ पै. ते २२३ पै.</td><td>०.६७</td></tr>
<tr><td>२२</td><td>शैक्षणिक हेतू</td><td>१९५ पै.,१९६ पै., २१२ पै.</td><td>३.३७</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>२</td>
<td>खरेदीची वारंवारता – श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीने अवास्तव प्रमाणात जमीन खरेदी करु नये. केवळ प्रस्तावित असलेल्या एखाद्या प्रकल्पासाठी आवश्यकता असल्यास जमीन खरेदीचा विचार करण्यात यावा. जमीन खरेदीविषयी शासनाकडे पाठवावयाच्या प्रस्तावामध्ये संबंधीत प्रकल्पाचा तपशिल व व्यवस्थापन समितीचा ठराव सादर करणे आवश्यक राहील. केवळ खाजगी भूधारकाने जमीन विकत घेण्याची विनंती श्री साईबाबा संस्थानला केली आहे या कारणास्तव जमीनीची गरज आणि उपयुक्तता विचारात न घेता अशी जमीन विकत घेण्याबाबत विचार करण्यात येवू नये.</td>
<td>उपरोक्त मुद्या क्रं.१ मध्ये दर्शविलेल्या क्षेत्रात सध्यस्थितीत संस्थानचा कोणताही प्रकल्प प्रस्तावित नाही.<br>तथापि उपरोक्त मुद्या क्रं.१ मधील आरक्षण क्रं.१,२,४ तसेच आरक्षण क्रं.२२ ही आरक्षणे रद्य करणेकामीचा मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं.३०७ प्रमाणे निर्णय घेतलेला असून तदनुषंगाने सदर आरक्षणे रद्य करणे बाबतची कार्यवाही करणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अलाहीदा कळविणेत आलेले आहे.<br>उपरोकृत आरक्षण क्रं.१,२,४ या ठिकाणचे क्षेत्रात व आरक्षण क्रं.२२ मध्ये दर्शविलेल्या क्षेत्रात संस्थानसाठी प्रकल्प प्रस्तावित करणेचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीला घ्यावा लागेल.</td>
</tr>
<tr>
<td>३</td>
<td>अंतर – श्री साईबाबा संस्थानसाठी खरेदी करावयाची जमीन ही शिर्डी शहरातील असावी किंवा शिर्डी शहरापासून जास्तीत जास्त १५ किमी.परिघातील असावी. श्री साईबाबा समाधी मंदिरापासून अति दूर असलेल्या जमीनी खरेदी करुन संस्थानच्या निधीचा अपव्यय करु नये. मात्र पालखी थांब्यासाठी पालखी मार्गावरील विविध ठिकाणी भाविकांना निवारा व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी खरेदी करावयाच्या जमीन प्रकरणी अंतराची सदर मर्यादा शिथील करता येईल.</td>
<td>प्रस्तावित क्षेत्र शिर्डी शहरापासून सुमारे २ ते ३ किमी. अंतरावर असून शिर्डी शहरापासून १५ किमी.परिघातील आहे.</td>
</tr>
<tr>
<td>४</td>
<td>जमीनीची सलगता– खरेदी करावयाचे क्षेत्र/जमीन ही खंड/ तुकडयांच्या स्वरुपात असू नये. जमीनीची सलगता आणि उपयुक्तता विचारात घेवूनच अशा जमीनीच्या खरेदीचा प्रस्ताव विचारात घेण्यात यावा. तसेच हरीत पट्टयात समाविष्ट असलेली खाजगी जमीन खरेदी करु नये. मात्र श्री साईबाबा संस्थानच्या मालकीच्या जमीनीलगत किंवा अशा जमीनीजवळ हरीत पट्टयात समाविष्ट एखादी शासकीय जमीन असेल व अशा ठिकाणी संस्थानचा असा एखादा प्रकल्प प्रस्तावित असेल आणि अशा प्रकल्पासाठी हरीत पट्टयात समाविष्ट शासकीय जमीनीची संस्थानला आवश्यकता असल्यास असे क्षेत्र सदर धोरणातील कार्यपध्दती अवलंबून विकत घेता येईल.</td>
<td>प्रस्तावित जमीनी खरेदी केल्यास त्या सलग होतील. सदर जमीनी विकास आराखडयातील आरक्षित क्षेत्रातील असलेने हरित पट्टयात येत नाहीत.</td>
</tr>
<tr>
<td>५ (अ)</td>
<td>जाहीर नोटीस प्रसिध्द करणे –अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्याकरीता जमीन खरेदी करावयाची झाल्यास तशा आशयाची जाहीर नोटीस मोठया प्रमाणात वितरीत होणा-या स्थानिक दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात यावी.</td>
<td>प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास तशा आशयाची जाहीर नोटीस स्थानिक दैनिकामध्ये प्रसिध्द करावी लागेल.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ५ (ब) | **ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी खाजगी भूधारकांची जमीन खरेदी करावी असा स्वतंत्र अर्ज खाजगी भूधारकांकडून प्राप्त झाल्यास अशा जमीनीबाबत हरकती मागविण्यासाठी देखील जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात यावी. | प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास जाहीर नोटीस प्रसिध्द करुन हरकती मागविता येतील. |
| ६ | **भूधारकांची संमती घेणे**– मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी संबंधीत खाजगी भूधारक त्यांची जमीन वाटाघाटीद्वारे विकण्यास तयार आहेत असे संमतीपत्र खाजगी भूधारक यांच्याकडून घ्यावे. | प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास त्या वाटाघाटीद्वारे भुधारक विकण्यास तयार असलेबाबतचे त्यांचेकडून संमतीपत्र घेता येईल. |
| ७ | **मोजणी करुन घेणे**– मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान यांनी खरेदी करावयाच्या खाजगी जमीनीची मोजणी भुमी अभिलेख विभागाकडून करुन घ्यावी. | प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास भुमी अभिलेख विभागाकडून मोजणी करुन घेता येतील. |
| ८ | **कायदेशीर शोध घेणे**– अ) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी संबंधीत खाजगी जमीनीचे सर्वे नं./गट क्रं. निहाय सन १९५० पासून आजतागायत पर्यंतचे महसुल अभिलेख (गाव नमुना नं., ७/१२, फेरफार नोंदी,गट बुक नकाशा) इ.तपशिल तहसिलदार/संबंधीत महसुल कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावा.<br>ब) मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थायांनी संबंधीत खाजगी जमीनीची सर्वे नं. /गट क्रं.निहाय गत ३० वर्षातील नोंदणीकृत दस्ताचा तपशिल(खरेदीखते,गहाणखते,बक्षिसपत्र,मृत्यपत्र,दानपत्र इ.) दुय्यम निबंधक कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावा.<br>क) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खरेदी करावयाच्या जमीनीचे शिर्षक शोध प्रमाणपत्र (Title Search Certificate) प्राप्त करुन घ्यावे. | प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास मुद्या क्रं.८ बाबत पुर्तता करुन घेता येईल. |
| ९ | **मुल्यांकन**– खाजगी भुधारकाची जमीन ही केवळ शासनाच्या नोंदणी विभागाकडील बाजारमुल्य दर तक्त्यातील दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने खरेदी करण्यात यावी. | प्रस्तावित भुधारक हे शासनाच्या नोंदणी विभागाकडील बाजारमुल्य तक्त्यातील दरापेक्षा कमी दराने जमीन खरेदी देण्यास तयार असलेबाबत उपरोक्त अर्जात नमूद केलेले आहे. |
| १० | **जमीन खरेदीचे अधिकार**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी कोणत्याही स्वरुपाची जमीन ही शासन मान्यतेशिवाय खरेदी करु नये. जमीन खरेदीच्या सर्व प्रस्तावांना शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी. | उपरोक्त प्रस्तावित दोन्ही ठिकाणच्या क्षेत्रात संस्थानसाठीचा प्रकल्प प्रस्तावित केल्यानंतर सदर जमीनी खरेदी करणेकामीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करता येईल. |
| ११ | **अभिहस्तांरण पत्र/खरेदीखत करणे**– अ) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कायदेशीर शोध अहवालाच्या आधारे खाजगी जमीनीसंदर्भात कोणताही न्यायालयीन विवाद नसल्याची व खरेदी प्रक्रियेसाठी कोणतीही बाधा येत नसल्याची खात्री करावी.<br>ब) शासनाच्या नोंदणी विभागाच्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे जमीनीची निश्चित केलेली रक्कम | प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास मुद्या क्रं.११ प्रमाणे पुर्तता करता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | अथवा त्यापेक्षा कमी दराने निश्चित केलेली रक्कम भुधारकाला अदा करण्यापूर्वी विहित नमुन्यात भुधारकाकडून क्षतीपूर्ती बंधपत्र घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.<br>क) क्षतीपूर्ती बंधपत्र घेतल्यानंतरच भुधारकाला देय असणारी रक्कम संबंधीत भुधारक यांच्या बॅंक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.<br>ड) मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांनी व संबंधीत भुधारक यांनी अभिहस्तांतरण पत्र/खरेदीखताची नोंदणी संबंधीत दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये करावी. खरेदीखतामध्ये क्षतिपूर्ती बंधपत्र देय मोबदला अदा केल्याचा तपशिल आणि अनुषंगिक बाबी नमुद कराव्यात व त्याची कागदपत्रे दस्ताचा भाग म्हणून खरेदीखतात समाविष्ट करण्यात यावा. अशा नोंदणीकृत खरेदीखताच्या मुळ प्रती प्राप्त कराव्यात.<br>इ) खरेदी करावयाच्या जमीन पूर्णपणे निर्वेध,निर्जोखमी व बोजाविरहीत आहे याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी करावी. जेणेकरुन कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार निर्माण होवून न्यायालयीन प्रकरण उद्भवणार नाही. | |
| १२ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्यासाठी शिर्डी शहराच्या विकास आराखडयात आरक्षित केलेल्या जमीनींच्या बाबतीत भूसंपादन कायद्यानुसार करावयाच्या प्रक्रीयेऐवजी खाजगी वाटाघाटीने जमीन खरेदी देण्यास जमीन मालक तयार असल्यास अशा जमीनी देखील शासनाच्या पूर्वपरवानगीने खरेदी करता येतील. | प्रस्तावित जमीनींवरील उपरोक्त आरक्षणे रद्य करणेकामीचा मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्रं.३०७ प्रमाणे अलाहीदा निर्णय घेतलेला आहे. तत्राप सदर जमीनमालक वाटाघाटीने सदर जमीनी संस्थानला खरेदी देण्यास तयार असलेबाबत उपरोक्त अर्जात नमूद केलेले आहे. |
| १३ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्याकरीता जमीन खरेदी करतांना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम-१८८२ मधील कलम ५४ व ५५ मधील तरतुदीचे पालन करण्यात यावे. | प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास मुद्या क्रं.१३ प्रमाणे पुर्तता करता येईल. |
| १४ | अटी व शर्ती शिथिल करण्याचे अधिकार – अपवादात्मक व विशेष प्रकरणांमध्ये वरीलपैकी कोणतीही अट वा शर्ती शिथिल करण्याचे अंतिम अधिकार शासनास असतील. | -- |
| १५ | खाजगी जमीनी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने खरेदी करण्याच्या अनुषंगाने वरील विहीत कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. | प्रस्तावित जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास सदर मुद्या क्रं.१५ प्रमाणे पुर्तता करता येईल. |

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त शिर्डी वाढीव विकास आराखडयातील संस्थानसाठी आरक्षित असलेल्या शिर्डी व परिसरातील जमीनी खरेदी न करता त्यावरील आरक्षण रद्य करण्याबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ प्रमाणे अलाहीदा निर्णय झालेला आहे व सदर निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त आरक्षणे रद्य करणेबाबतची कार्यवाही करणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना अलाहीदा कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त जमीन खरेदी धोरणातील मुद्या क्रं.१ मध्ये दर्शविलेल्या जमीनी खरेदी करावयाच्या झाल्यास प्रथमत: शासन निर्णयाचे जमीन खरेदी धोरणातील उपरोक्त मुद्या क्रं.२ प्रमाणे प्रस्तावित क्षेत्रांमध्ये संस्थानसाठी प्रकल्प प्रस्तावित करणे आवश्यक आहे व मुद्या क्रं.५ अ प्रमाणे संस्थानला जमीनी खरेदी करणेकामीची जाहीर नोटीस स्थानिक दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करावी लागेल.

**प्रस्ताव** - प्रस्तुत प्रकरणातील उपरोक्त मुद्दा क्रं.१ मध्ये दर्शविलेल्या जमीनी खरेदी करणेबाबत शासनाने संस्थानसाठी निश्चित केलेल्या जमीनी खरेदी धोरणाच्या उपरोक्त मुद्यांचे अनुषंगाने विचार विनिमय करुन निर्णय घेणेकामी सादर.

**निर्णय क्र.५९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानकरीता शिर्डी (बिरेगाव) येथे वाढीव विकास आराखडयामध्ये पार्कींग, मनोरंजनपार्क, वृध्दाश्रम, संस्थानहेतू (पिलग्रिम ॲमिनिटीज) (भक्तनिवास,सांस्कृतिक केंद्र,समाज भवन, मनोरंजन केंद्र इ.), शैक्षणिक कारणासाठी इत्यादी करीता विविध ठिकाणी ६.५५.०० हे.इतके क्षेत्र संस्थान/नगरपंचायत करीता आरक्षित केलेले आहे.**

**तथापी ज्या उपक्रमांसाठी उपरोक्त क्षेत्र आरक्षित केलेले आहे, ते उपक्रम संस्थानच्या इतर मिळकतीमध्ये प्रस्तावीत केलेले असुन त्यावर कार्यवाही चालू आहे. त्यामुळे उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमिनींची संस्थानला आवश्यकता नाही. याकरीता उपरोक्त संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमिनीवरील आरक्षण काढून टाकणेबाबत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना कळविण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२३** **सन २०१९-२० करीता मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फीप्रसाद निर्मितीसाठी शुध्द गावरान तुप खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१)(घ)** - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानचा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. तयार केलेले मोतीचूर लाडू पाकीटांची लाडू विक्री काऊंटरवर विक्री करणे तसेच मंदिर दर्शनरांगेत भक्तांना सुटी बुंदीची पाकीटे मोफत वाटप करणे ही कामे सदरचे विभागामार्फत करण्यात येतात.

मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मितीसाठी लागणारे कच्चे मटेरियल गावरान तुप, संस्थानचे मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. दैनंदिन गरजेनुसार मध्यवर्ती भांडारकडे मागणीपत्र देऊन त्यांचेकडुन मटेरियल घेऊन लाडू व बुंदी प्रसाद निर्मीतीचे काम करण्यात येते. सन २०१७-१८ (जानेवारी २०१८ ते ऑगस्ट २०१८) पर्यंत या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे शुद्ध गावराण तुप वापरण्यात आलेले आहे.

| अ.नं | महिना | वापरण्यात आलेले गावराण तुप (क्विंटलमध्ये) | | एकुण वापरलेले गावराण तुप (क्विंटलमध्ये) | क्विंटलचे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लाडु प्रसाद | बुंदी प्रसाद | | | |
| ०१ | जानेवारी २०१८ | ५४९.८४५ | २५५.४७० | ८०५.३१५ | ३११५०/- | २,५०,८५,५६२.२५ |
| ०२ | फेब्रुवारी २०१८ | २५५.९९४ | १६४.२१६ | ४२०.२१ | | १,३०,८९,५४१.५० |
| ०३ | मार्च २०१८ | ४७९.३८३ | २३९.२५० | ७१८.६३३ | | २,२३,८५,४१७.९५ |
| ०४ | एप्रिल २०१८ | २८१.५० | २००.८७० | ४८२.३७ | ३१८५०/- | १,५३,६३,४८४.५० |
| ०५ | मे २०१८ | २५४.४६ | ३०४.८७८ | ६५९.३३८ | | २,०९,९९,९१५.३० |
| ०६ | जुन २०१८ | ४२९.९५० | २९९.२५५ | ७२९.२०५ | | २,३२,२५,१७९.२५ |
| ०७ | जुलै २०१८ | ४२२.९७२ | २६९.९१० | ६९२.८८२ | | २,२०,६८,२९१.७० |
| | **एकुण** | **२७७४.१०४** | **१७३३.८४९** | **४५०७.९५३** | ... | **१४,२२,१७,३९२.४५** |
| | **सरासरी** | **३९६.३०१** | **२४७.६९३** | **६४३.९९३** | | **२,०३,१६,७७०.३५** |

उपरोक्त तक्यात नमुद केल्यानुसार माहे जानेवारी २०१८ ते जुलै २०१८ अखेर मोतीचुर लाडु करीता २७७४.१०४ क्विंटल व बुंदी प्रसाद करीता १७३३.८४९ क्विंटल असे एकुण ४५०७.९५३ क्विंटल तुप वापरण्यात आले आहे. त्यासाठी एकुण रक्कम रूपये १४,२२,१७,३९२.४५ एवढा खर्च आलेला आहे.

त्यास अनुसरून प्रती महिना सरासरी लाडु प्रसादाकरीता ३९६.३०१ क्विंटल व बुंदी प्रसादाकरीता २४७.६९३ क्विंटल असे एकुण ६४३.९९३ क्विंटल शुद्ध गावराण तुपाची आवश्यकता आहे. त्यानुसार वार्षिक सरासरी ६४३.९९३ X १२ =७,७२७.९१६ क्विंटल गावराण तुप लागणार आहे. दिवसेंदिवस वाढत्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता १० % वाढ ग्राह्य धरावी लागणार आहे.

त्यानुसार १०% वाढ गृहीत धरून एकुण ८५००.७० क्विंटल (७,७२७.९१+७७२.७९) गावरान तुप खरेदीसाठी आजच्या बाजार भावाप्रमाणे (रूपये.३१,८५०/-) अंदाजे रक्कम रू. २७,०७,४७,२९५/- (अक्षरी- सत्तावीस कोटी सात लाख सत्तेचाळीस हजार दोनशे पंच्यान्नव मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

अंदाजपत्रकीय तरतुद- किराणा खरेदी रू.५४,००,००,०००/-

मागणी- तरी लाडु प्रसाद निर्मिती विभागाकरीता सन २०१९-२० (जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०१९) या कालावधीत अंदाजे लागणारे ८५००.७० क्विंटल शुद्ध गावरान तुप खरेदी विभागाकडुन टप्या-टप्प्याने खरेदी करुन घेता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागासाठी लाडु व बुंदी प्रसाद तयार करण्यासाठी वार्षिक सरासरी ८५००.७० क्विंटल गावरान तुप खरेदी करावे लागणार आहे. सदरचे गावरान तुप संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी विभागामार्फत टप्या-टप्प्याने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे एकूण रक्कम रू. २७,०७,४७,२९५/- (अक्षरी- सत्तावीस कोटी सात लाख सत्तेचाळीस हजार दोनशे पंच्यान्नव मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे योग्य त्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० करीता लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास लाडु व बुंदी प्रसाद तयार करण्यासाठी सरासरी ८५००.७० क्विंटल शुध्द तुप खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२७,०७,४७,२९५/-मात्र तसेच संस्थानचे प्रसादालय व मंदिर विभागाकरीता आवश्यक असलेले १०० क्विंटल शुध्द तुप खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३१,८५,०००/-मात्र असे एकुण ८६००.७० क्विंटल शुध्द तुप संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी विभागामार्फत टप्या-टप्प्याने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत रककम रु.२७.४० कोटी खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

विषय नं.२४ **साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे नुतनीकरण करणेसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:**- श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून संस्थानमार्फत निवासस्थान इमारतींची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांचे आर्थिक देणगीतून संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी हद्दीतील सर्व्हे नं.१०७,१०८,१०९ पैकी मधील जमिनीमध्ये साईआश्रम प्रकल्प भाग-१ (साईआश्रम भक्तनिवास) या निवासी प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. या निवासी प्रकल्पातील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी सन २०१२ पासून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. इमारतीच्या खोल्या/हॉलमधील फ्लश व फ्लशचे स्पेअर नादुरुस्त/लिकेज होण्याच्या प्रमाणात वाढ झालेने साईआश्रम भक्तनिवास इमारतीमधील A व B ब्लॉक करीता आवश्यक प्लंबींग मटेरियल खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.१८९ अन्वये सदरहू साहित्य ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१५,८४,३९२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार खरेदी विभागामार्फत साहित्य खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून आवश्यक साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे.

बांधकाम विभागाकडुन साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे नुतनीकरण करणेचे काम सुरु होत असून पाणी पुरवठा विभागांतर्गत रुममधील प्लंबीगची कामे करावी लागतील. साईआश्रम भक्तनिवास इमारतीमध्ये एकुण १२ ब्लॉक आहेत. नुतनीकरण करणेचे कामासाठी A व B ब्लॉक करीता आवश्यक प्लंबींग मटेरियल खरेदी करणेत आलेले आहे. यापूर्वी इमारतींमध्ये प्लंबींग कामाची फिटिंग फिनोलेक्स/आशिर्वाद कंपनीचे मटेरीयल वापरुन करण्यात आलेली आहे.सदरचे काम हे नवीन नसुन नुतनीकरणाचे आहे. म्हणुन या ठिकाणी इतर कंपनीचे प्लबिंग मटेरियल वापरले तर ते पुर्वीचे मटेरियलवर मॅच होणार नाही व पाईप लाईन लिकेज राहुन भिंतीमध्ये पाणी पाझरुन भिंती ओल्या होतील. त्यामुळे वारंवार लिकेज काढणेसाठी संडास बाथरुमची तोड- फोड करावी लागेल. याकरीता उर्वरीत ब्लॉकचे कामासाठी खालीलप्रमाणे फिनोलेक्स/आशिर्वाद कंपनीचेच साहित्य खरेदी करणे गरजेचे आहे.

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | कंपनी | मागणी | एकक | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1.1/4" CPVC पाईप. (11 SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 7680 | फुट | 49.00 | 3,76,320.00 |
| 2 | 1.1/4" CPVC एलबो. (11 SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 150 | नग | 45.00 | 6,750.00 |
| 3 | 1" CPVC एलबो. (11 SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 50 | नग | 21.30 | 1,065.00 |
| 4 | 3/4" CPVC एलबो. (11 SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 100 | नग | 10.00 | 1,000.00 |
| 5 | 1.1/4" CPVC सॉकेट. (11 SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 300 | नग | 26.90 | 8,070.00 |
| 6 | 1.1/4" CPVC-MTA. (11 SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 50 | नग | 30.00 | 1,500.00 |
| 7 | 1" CPVC-MTA. (11SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 50 | नग | 16.90 | 845.00 |
| 8 | 1.1/4" CPVC-FTA. (11SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 50 | नग | 59.50 | 2,975.00 |
| 9 | 1" CPVC-FTA. (11 SDR) | फिनोलेक्स/आशिर्वाद | 50 | नग | 22.20 | 1,110.00 |
| 10 | ओरीसा संडास भांडे. (P ट्रॅप कव्हरसह) | सेरा /पॅरिवेअर/हिंदवेअर | 150 | नग | 1507.00 | 2,26,050.00 |
| 11 | कमोड संडास भांडे (P ट्रॅप कव्हरसह) | सेरा /पॅरिवेअर/हिंदवेअर | 100 | नग | 1665.00 | 1,66,500.00 |
| 12 | स्क्रु नेटल फोर्ड. (हेवी) (75 x 12) | --- | 25 | पॅकेट | 400.00 | 10,000.00 |
| 13 | टु वे कॉक | प्लंबर/जग्वार/हिंदवेअर | 50 | नग | 746.00 | 37,300.00 |
| | | | | | **एकुण:-** | **8,39,485.00** |
| | | | | | **एकुण रक्कम रु. (पुर्णांकित):-** | **8,39,485.00** |

सदर मटेरीयलची इस्टिमेट कॉस्ट काढतांना प्रत्यक्ष मार्केटमध्ये चौकशी करुन प्राप्त कोटेशननुसार आजचे बाजार भावाप्रमाणे असलेले दर नमूद केलेले आहे. याकामी साहित्य खरेदी करणेकरीता अंदाजे रु.8,39,485/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:- बांधकाम विभागामार्फत साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे नुतनीकरण करणेचे काम हाती घेणेत आले असून पाणी पुरवठा विभागांतर्गत रुममधील प्लंबीगची कामे करावी लागतील. याकरीता वरील नमुद मटेरियल खरेदी करणे गरजेचे आहे.

प्रस्ताव:- तरी साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे पाणी पुरवठा विषयक दुरुस्तीची कामे करणेसाठी साहित्य खरेदी करणेकरीता येणारे अंदाजे रु.8,39,485/- (अक्षरी रुपये आठ लाख एकोणचाळीस हजार चारशे

पंच्याऐंशी मात्र) मात्रचे खर्चास व सदरचे साहित्य विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.६००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास इमारतीचे नुतनीकरण करणेसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.8,39,485/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)**

---

**विषय नं.२५** **०१ एप्रिल, २०१८ ते ०२ जुन २०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या मालाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणी वरील निर्देश नुसार संस्थानला प्राप्त होणा-या गावरान तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश झालेले आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

संदर्भीय निर्णयांनुसार, गावरान (गाईचे शुद्ध) तुपाचे सध्याचे पुरवठादार हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा. लि., हरीद्वार, यांचेकडून प्राप्त होणा-या तूपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक (NABL Lab) व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (शासकीय प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येत आहे, तसेच आवश्यकतेनुसार केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचेकडूनही तपासणी करणेत येत आहे. तसेच खाद्यतेलाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह शासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येत आहे.

माहे मार्च २०१८ पर्यंतचे सर्व प्रयोगशाळा तपासणी अहवाल यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेले आहेत. आता संस्थानला दि.०१ एप्रिल २०१८ ते दि.०२ जून २०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या गावरान तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल तपशिलवार परिशिष्ठासह यासोबत सादर केले आहेत.

उपरोक्त तपासणी अहवालांमध्ये **अ)** जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नासिक, यांचे बॅच नं. २०/ Dtd.१०.०५.२०१८, बॅच नं. २१/ Dtd.१२.०५.२०१८ व बॅच नं. २२/Dtd.२७.०५.२०१८ या तीन बॅचचे तपासणी अहवालांमध्ये "The Above samples of Ghee **do not conform** to the standards of ghee as per F.S.& S. Act 2006. & there Regulations 2011." असा शेरा/ अभिप्राय नमुद आहे, तर केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचे सोबतच्या तपासणी अहवालांमध्ये सूस्पष्ठ अभिप्राय नमुद नाही.

अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार बिगर कापूस उत्पादीत क्षेत्र (Areas, other than cotton track areas) साठी BRR हा ४० ते ४३ इतका तर कापूस उत्पादीत क्षेत्र (Cotton track areas) साठी तो ४१.५ ते ४५ इतका असणे आवश्यक असते.

तथापि, **ब)** केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, या प्रयोगशाळेकडील उपरोक्त कालावधीतील सर्व तपासणी अहवालांमध्ये BRR ४३ पेक्षा अधिक असल्याचे निर्देशनास येत आहे, ते पुढीलप्रमाणे दर्शविलेले आहेत तसेच त्याचे तपशिलवार परिशिष्ठही यासोबत जोडलेले आहे.

| अ.नं. | बॅच नं./ दि. | BRR | अ.नं. | बॅच नं. / दि. | BRR |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | 13/ 16.03.2018 | 44.23 | ०६ | 19/ 04.05.2018 | 44.15 |
| ०२ | 14/ 18.03.2018 | 43.46 | ०७ | 20/ 10.05.2018 | 43.87 |
| ०३ | 15/ 14.04.2018 | 43.94 | ०८ | 21/ 12.05.2018 | 43.78 |
| ०४ | 17/ 18.04.2018 | 44.18 | ०९ | 22/ 27.05.2018 | 44.11 |
| ०५ | 18/ 02.05.2018 | 44.35 | | | |

तथापि, गावरान तुपाचे सध्याचे पुरवठादार हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा. लि., हरीद्वार, हे उत्तराखंड राज्यातील उत्पादक आहेत. अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार उत्तराखंड हे कापूस उत्पादीत क्षेत्र (Cotton track areas) मध्ये येत नाही, त्यामुळे तेथील उत्पादीत गावरान तुपाचा **BRR** हा ४० ते ४३ या दरम्यान असणे गरजेचे आहे, मात्र त्यांचे तुपाचे BRR हा त्यापेक्षा अधिक असल्याने तो अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे **norms** मध्ये बसत नाही.

यापुर्वी स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला, हरियाणा, या पुरवठादाराचे बॅच नं.५३/ Dtd. १६.०७.२०१७ व बॅच नं. ५८/ Dtd.२७.०७.२०१७ चे जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नासिक, यांचेकडील तपासणी अहवालामध्ये “The Above samples **do not conform** to the standards of ghee as per F.S.&S. (Food products and Additives) Regulations 2011” असा अभिप्राय/ शेरा नमुद होता. तसेच केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, यांचेकडील बॅच नं. ५३/ Dtd. १६.०७.२०१७ चे तपासणी अहवालात Test of Rancidity ही **Positive** आलेली होती. वरील दोन्ही तपासणी अहवालातील बाबी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) चे Norms मध्ये बसत नसल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.१०.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८८६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे ऑगस्ट- २०१७ या महिन्यामध्ये प्राप्त झालेले गाईचे तुप, खाद्यतेल व किराणा माल यांचे विविध प्रयोगशाळेमार्फतकरणेत आलेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करणेत आले. त्यामधील केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, या प्रयोगशाळेच्या अहवालामध्ये Rancidity आढळून आली आहे. मात्र इतर सर्व Parameter व अहवाल योग्य आहेत. मात्र म्हैसूर येथील प्रयोगशाळेच्या अहवालावरून सदर तूप जास्त काळ साठा करण्यासाठी योग्य नसल्याने या तुपाचा पुढील पुरवठा थांबविण्यात यावा व भांडार विभागामध्ये शिल्लक असलेल्या तुपाच्या प्रत्येक बॅचची संस्थानचे प्रयोगशाळेकडून तपासणी करुनच, त्याचा वापर करणेत यावा. सध्याचे तुपाचे पुरवठाधारक स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि. अंबाला, यांचा तीन वर्षांसाठी काळ्या यादीत समावेश करणेत येऊन, तसे त्यांना लेखी कळविण्यात यावे.

तसेच संस्थानसाठी वार्षिक गाईचे तुप खरेदी करणेकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. सदरहू ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत गाईचे तुपाअभावी अडचण येऊ नये, याकरीता अल्प कालावधीची (०५ दिवस) दरपत्रके (तातडीची खरेदी) मागविणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, गाईचे तुप खरेदी करणेत यावे व यासाठी येणारा वाढीव खर्च स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांचेकडील जमा अनामत रकमेतून वसूल करणेत यावा, असे ठरले.”

त्यामुळे आता उपरोक्त तपासणी अहवाल (दि.०१.०४.२०१८ ते दि.०२.०६.२०१८ अखेर) पुढील निर्णयास्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**क**) उर्वरित सर्व प्रयोगशाळांचे तपासणी अहवालामध्ये उपरोक्त कालावधीतील सर्व बॅचचे गावरान तुप व खाद्यतेल अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार conform असल्याचे नमुद आहे. तसेच भांडार विभागातून उपरोक्त सर्व बॅचचे गावरान तुपाचा साठा विनातक्रार संपलेला आहे.

उपरोक्त अ, ब व क प्रमाणे तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती व तपशिलवार परिशिष्ठ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ/ निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळणेस्तव दि.३०.०७.२०१८ रोजी टिपणी/ प्रस्ताव सादर केला असता, त्यावर मा. उप कार्यकारी अधिकारी यांनी “पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्ट्स प्रा.लि. हरिद्वार, यांना पत्र देऊन त्यांचा लेखी खुलासा घ्यावा व खुलाशासह व्यवस्थापन समिती समोर सादर करणे योग्य राहिल, असे मत आहे”. असा शेरा/ अभिप्राय नोंदविला होता. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी “खुलासा घ्या”, असा शेरा/ अभिप्राय नोंदविला होता.

पुरवठादारांचा लेखी खुलासा घेण्याची बाब खरेदी विभागाचे कार्यक्षेत्रातील असल्याने उपरोक्त निर्देशांप्रमाणे कार्यवाही करणेकामी इकडील जा.नं. १५२/२०१८, दि.०९.०८.२०१८ रोजीचे पत्रान्वये त्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार त्यांनी जा.नं. एसएसएस/वशी-खरेदी/२४८१/२०१८, दि.२१.०८.२०१८ अन्वये गावरान तुपाचे पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. यांना कारणे दाखवा नोटीस बजावून सात दिवसांचे आत लेखी खुलासा मागविला होता.

मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि., हरिद्वार, यांचा लेखी खुलासा खरेदी विभागामार्फत दि.२८.०८.२०१८ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे, तो खालीलप्रमाणे.

*"Dear Sir, With reference to your letter, we would like to bring your notice that when we ware send the product to you we had checked the every batch number with NABL Lab & that the BR Reading we ware getting always in the range of (42.43).*

*As promised, we had to give you the perfect and the best product from our side Hanes we would like to request to you kindly recheck the sample ones again. To resolve this issue we can send the same sample to any NABL Adopted Lab. Maybe it is conditional on the lab to lab testing report. After tasting the sample difference will become to max 1 to 1.5. While you may give the same sample to three different labs the report will have come to in three different ways. We can ensure you that our products are perfectly fine. We will be trying our level best that this will be not to happen again in future.*

*As you probably know to work with you & our business relationship with you it is mean a lot to us and we like to take this opportunity to assure you that we are serving you with the best product Thank you for trusting us to be your source for top quality Product & We appreciate your kind expressions of appreciation, and are especially grateful for all the support we get from your side.*

*This letter to show our gratitude towards your continued trust in our business. We are happy to serve you always with the best products and would like to continue this forever "*

उपरोक्त खुलाशासह टिपणी/ प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ/ निर्णयार्थ सादर करणे मान्यता मिळणेस्तव दि.२८.०८.२०१८ रोजी टिपणी/ प्रस्ताव फेर सादर केला असता, त्यावर मा. उप जिल्हाधिकारी महोदय यांनी "BRR test चा अर्थ काय?, पूर्वी मे. स्मृती प्रॉडक्ट्स, अंबाला यांचे Rancidity test fail होती. Rancidity test म्हणजे काय?" असा शेरा/ अभिप्राय नोंदविला आहे.

मा. उप जिल्हाधिकारी महोदय यांनी विचारणा केलेली माहिती प्रयोगशाळेचे तांत्रित विषयाशी निगडीत असल्याने संस्थानचे प्रयोगशाळेला उपरोक्त माहिती तात्काळ सादर करणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार त्यांनी जा.नं.१४६/ २०१८, अन्वये खालीलप्रमाणे माहिती इकडील कार्यालयास सादर केलेली आहे.

***"Refractive Index :- (BRR Test)- Butyro Refractrometer Reading at 40°C***

*This test helps to judge the purity of oil/ Ghee sample. DGHS/ FSSAI authorities have set the standard range OF B R Value after analysing adequately large number of different variety of different oil/ghee samples, If two different oils having different B R mixed together or mixed in ghee, resulting oil/ ghee will not fit in the range fixed by DGHS/ FSSAI.*

*Definition:- The ratio of velocity of light in vacuum to the velocity of light in the oil or fat, more generally, it expresses the ratio between the sine of angle of incidence to the sine of angle of refraction when a ray of light of known wave length (usually 589.3 nm, the mean of D line of Sodium) passes from air into the oil of fat. Refractive index varies with temperature and wavelength.*

*बी.आर.आर. (ब्यूट्रो रिफरॅक्ट्रोमीटर रीडींग) चाचणीचा उपयोग शुध्द तूपात इतर वनस्पती फॅट अथवा खादयतेल मिक्स केले असल्यास किवा दोन वेगवेगळे तेल एकत्र केले असल्यास त्याचे बी.आर. रीडीग हे एफ.एस.एस.अे.आय. (FSSAI) ने दिलेल्या रेंज मध्ये येत नाही. थोडक्यात कोणत्याही खादयतेलात इतर तेल भेसळ केले असल्यास तसेच शुध्द तुपात इतर वनस्पती फॅट भेसळ केली असल्यास बी.आर. रीडींग हे (FSSAI) ने ठरवून दिलेल्या रेंज मध्ये येत नाही.*

*फुड सेफ्टीच्या कायदयानुसार बिगर कापुस उत्पादीत क्षेत्राकरीता शासनाने शुध्द तूपासाठी बी.आर. ४०.० ते ४३.० असा, तसेच कापुस उत्पादीत क्षेत्राकरीता बी.आर. ४१.५ ते ४५ असा निश्चित केलेला आहे.*

***Rancidity Test:-***

*Definition:- Rancidity is the characteristic, unpalatable odour and flavour of edible fats and oils following oxidative or hydrolytic dearadation.*

*This process can occur in raw foodstuffs, refined or used edible oils and processed foods containing edible oils.*

रॅनसिडीटी म्हणजे खवटपणा. तेल/तुपास खवटलेला वास असेल किंवा तेल/तुप खराब झाले असल्यास सदरची चाचणी हि होकारार्थी (Positive) येते. ज्या तेलात अनसॅच्युरेटेड फॅट जास्त असतात अशा तेलात खवटण्याची प्रकिया लवकर होते. अशी तेले प्रदिर्घ कालावधीसाठी साठवून ठेवल्यास, सुर्यप्रकाशाच्या संपर्कात जास्त वेळ अल्यास, उष्णतेच्या संपर्कात आल्यास, आर्दतेच्या संपर्कात आल्यास खवटपणाची प्रकिया लवकर होऊ शकते व तेल /तुप खराब होते. अशा तेलास /तुपास खवट वास येतो. तेल/तूप खवटलेले असल्यास त्याचे पोषणमुल्य कमी होते व त्यातील घटकांचे रुपांतर अवांछित घटकामध्ये झाल्यामुळे त्याचे आरोग्यावर दुष्परिणाम होतात. सदरची माहिती हि अन्न सुरक्षा आणि मानके कायदा– २००६ नियम अणि विनियमन -२०११ व FSSAI चे Manual of method of analysis of foods चे आधारे देत आहोत. याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर /नाशिक यांचेशी संपर्क साधून आपले विभागामार्फत महिती घेणेत यावी.” (प्रयोगशाळेने उपरोक्तप्रमाणे दिलेल्या माहितीची प्रत यासोबत जोडलेली आहे)

मा. उप जिल्हाधिकारी महोदय यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची वरीलप्रमाणे पुर्तता करणेत आलेली आहे.

तरी उपरोक्त तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती (पा.नं.१ते३६), तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं.१ते८) तसेच गाईचे शुद्ध तुपाचे पुरवठादार मे. हर्ष फ्रेश डेअरी प्रॉडक्टस प्रा.लि. हरिद्वार, यांच्या लेखी खुलाशाची प्रत मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ/ निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ०१ एप्रिल, २०१८ ते ०२ जुन २०१८ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या मालाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)**

---

**विषय नं.२६** **श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या) पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६ (०३)

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनात देण्यात येणारी चपाती/पुरी ही उक्ते आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार श्री साई प्रसादालयातील चपाती/पुरी तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६(०३) नूसार,जा.नं.एसएसएस/वशी/ ६११७/२०१८ दि.१४/०२/२०१८ अन्वये, श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना दि.०३/०२/२०१८ ते ०२/०२/२०१९ अखेर ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+मैद्यास रु.१,२२१/- (अक्षरी रक्कम रु. एक हजार दोनशे ऐकवीस मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.०२/०२/२०१९ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी चपाती/पुरी तयार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहेत. त्यासाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे गरजेचे आहे.

मागणी:- प्रास्तविक नूसार श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे चपाती/पुरी तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ०२/०२/२०१९ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती/पुरी तयार करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती/पुरी तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ०२/०२/२०१९ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी श्री साई

प्रसादालयातील चपाती व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे वार्षिक खर्चाचे रकमेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.१२२१/- प्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार माहे फेब्रुवारी-१८ ते माहे ऑगस्ट-१८ अखेर ७ महिन्याचे बिलाची रक्कम रु.१६,७०,३८७/- एवढी झालेली आहे. त्यानूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.२८,६३,५२०/- इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास पुढील एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.३४,३६,२२४/- (अक्षरी रक्कम रुपये चौतीस लाख छत्तीस हजार दोनशे चोवीस मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपाती) व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी पुढील एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.३४,३६,२२४/- (अक्षरी रक्कम रुपये चौतीस लाख छत्तीस हजार दोनशे चोवीस मात्र) इतका खर्च अपेक्षीत असून सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी व मान्यतेतर वर्तमान पत्रात जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये पुढील एक वर्ष कालावधीसाठी स्वामी नारायण पोळी (चपाती) व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३४,३६,२२४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२७** **श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६** (०४)

**प्रस्तावना**:- श्री साई प्रसादालयामध्ये दररोज गर्दीचे प्रमाणानूसार ४०,००० ते ८५,००० पर्यंत साईभक्त प्रसादभोजन घेतात. गर्दीनूसार दररोज अंदाजे ३५ क्विंटल ते ४० क्विंटल आटयाच्या चपाती/पुरी बनवावी लागते. श्री साई प्रसादालयामध्ये ०३ ॲटोमॅटीक चपाती मशिन्स कार्यरत आहे. प्रत्येक चपाती मशिनवर तुंबवलेला (मळलेला) आटा टाकणे, भाजतांना अडकलेली चपाती काढणे, तेल लावणे, चपाती थंड झाल्यावर कॅरेटमध्ये, हॉटकेसमध्ये ठेवणे, मशिन्सची साफ-सफाई करणे या कामासाठी पुरेसे कर्मचारी पुरविणे व इत्यादी कामे चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेचे काम हे उक्ते ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिंग व्दारे तयार करुन घेण्यात येत आहे.

श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर चपाती तयार करण्याचे काम मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६(०४) नूसार,जा.नं.एसएसएस/वशी/६११५/२०१८ दि.१४/०२/२०१८ अन्वये, श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना दि.०३/०२/२०१८ ते ०२/०२/२०१९ अखेर ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+मैद्यास रु.३६१/- (अक्षरी रक्कम रु.तीनशे एकसष्ट मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेले आहेत. या कामाची मुदत दि.०२/०२/२०१९ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी मशिनवर चपाती तयार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहेत. त्यासाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे गरजेचे आहे.

**मागणी**:- प्रास्तविक नूसार श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे चपाती मशिनवर चपाती तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ०२/०२/२०१९ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेचे काम उक्ते आऊटसोर्स पध्दतीने देणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ०२/०२/२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे वार्षिक खर्चाचे रकमेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे. सध्याचे ठेकेदारास माहे फेब्रुवारी-१८ ते माहे ऑगस्ट-१८ अखेर ७ महिन्याचे बिलाची रक्कम रु.१४,९१,६६२/- एवढी झालेली आहे. त्यानूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.२५,५७,१३४/- इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास पुढील एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.३०,६८,५६०/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लाख अडुसष्ट हजार पाचशे साठ मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती तयार करणेकामी पुढील एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.३०,६८,५६०/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लाख अडुसष्ट हजार पाचशे साठ मात्र) इतका खर्च अपेक्षीत असून सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी व मान्यतेतर वर्तमान पत्रात जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये पुढील एक वर्ष कालावधीसाठी चपाती मशिनवर आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३०,६८,५६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समारोपाच्या कार्यक्रमाची जाहिरात राज्य व देशपातळीवरील दैनिकात व्यापक स्वरुपात प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद** - महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक** – मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ चे सभेतील निर्णय क्रमांक ७८६.

**प्रस्ताविक** – श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. अशा सुचना मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीच्या सभेत समक्ष दिल्या होत्या. या संदर्भात श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात वर्तमानपत्रात थेट प्रसिध्दीस देणेबाबतचा विषय दिनांक २५.०९.२०१७ रोजीचे सभेत सादर केला होता. याबाबत, प्रस्तावात नमुद केलेल्या दि.०५.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार संस्थानला व्यावसायिक दराने जाहिराती देता येणार नाहीत, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. असा निर्णय झालेला आहे.

१) मा.राष्ट्रपती महोदयांचे शिर्डी भेटीची व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची जाहिरात वर्तमानपत्रात थेट प्रसिध्द करणेबाबत बांधकाम शताब्दी कक्षाने त्यावेळी मौखिकरित्या कळविले होते. तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या जाहिराती मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ चे सभेतील निर्णयान्वये शासकीय दराने प्रसिध्दीसाठी दिल्या जातात. तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ६१९ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना दिनांक ३०.०९.२०१६ रोजी संस्थानच्या जाहिराती व्यावसायिक दराने देणेबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत पत्र दिले होते. त्यानुसार संदर्भ क्रमांक ३ अन्वये विधी व न्याय विभागाने क्र.सासंवि-२०१६/१४२७/ प्र.क्र. १७६/ का.१६ दिनांक २१.०४.२०१७ चे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"दि.२९.११.२०१६ रोजी मंत्रीपरिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार दि.३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली असून सर्व शासकीय विभागांनी आणि त्यांच्या नियंत्रणाखालील मंडळे/महामंडळे /प्राधिकरण/उपक्रम यांनी त्यांच्या दर्शनी जाहिराती (Display Advertisement) तयार करण्याचे, वितरणाचे व सर्वकष जाहीरात मोहिमा आखणी व अंमलबजावणीचे काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत करावे. कोणत्याही परीस्थितीत ही कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येवू नये अशा स्पष्ट सूचना दि.०५.०१.२०१७ च्या शासन निर्णयात देण्यात आल्या आहेत''.

२) तसेच यासंदर्भात दिनांक ०६ सप्टेंबर २०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.१८ निर्णय क्रमांक ५७४ प्रमाणे शताब्दी वर्षाच्या समारोपासाठी विविध माध्यमाव्दारे व्यापक स्वरुपात जाहिरात करण्याबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. तथापी भाविकांच्या दर्शनासाठी समाधी मंदिराची क्षमता मर्यादीत असल्याने संस्थानने कोणत्याही पध्दतीची जाहिरात करु नये असे ठरले.

३) सदर जाहिरात शासकीय दराने प्रसिध्द करणेबाबत श्री.किरण मोघे, उपसंचालक माहिती व जनसंपर्क, नाशिक यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा केली असता त्यांनी नाशिक येथे झालेल्या कुंभमेळा कार्यक्रमाच्या जाहिराती मा.संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचेमार्फत शासनाचे डीएव्हीपी दराने प्रसिध्दीस दिल्या होत्या. यासाठी जाहिरातीचा मसुदा मान्यतेअंती डिझाईन करुन व आकारमान ठरवून कोणत्या राज्यातील किती दैनिकात व कोणत्या भाषेत प्रसिध्द करावयाची आहे याबाबतची माहिती मा.संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांना कळविलेस शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करता येईल असे कळविले आहे. याबाबत श्री.किरण मोघे, उपसंचालक माहिती व जनसंपर्क, नाशिक व शिर्डी माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी श्री.गणेश फुंदे यांचेही मार्गदर्शन घेता येईल. मात्र टाईम्स ग्रुप, सकाळ व लोकमत ही वर्तमानपत्रे संस्थानच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्द करत नाहीत.

विभागाचा अभिप्राय– श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समारोपाच्या कार्यक्रमास मा.पंतप्रधान महोदय यांचा संभाव्य दौरा व त्यांचे हस्ते शुभारंभ होणा-या प्रकल्पांची देशभरातील साईभक्तांना माहिती होण्यासाठी व्यापक जाहिरात होणे आवश्यक आहे असे प्रशासनाचे मत आहे. तरी त्यासाठी राज्यपातळीवरील व देशपातळीवरील मराठी, हिंदी, इंग्रजी व तेलगू भाषेतील वृतपत्रांमध्ये एक पुर्ण पानाची जाहिरात देणे प्रस्तावित आहे.

तथापि,मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०९.२०१७ चे सभेतील निर्णयान्वये संस्थानला व्यावसायिक दराने जाहिरात देता येणार नाहीत. मात्र मा.पंतप्रधान महोदय यांचे सभाव्य दौ-याची जाहिरात श्री.किरण मोघे, उपसंचालक माहिती व जनसंपर्क, नाशिक यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे मा.संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचेमार्फत शासनाचे डीएव्हीपी दराने प्रसिध्दीस देणेसाठी जाहिरातीचा मसुदा मान्यतेअंती डिझाईन करुन व आकारमान ठरवून (अहमदनगर जिल्ह्यातील सर्व प्रमुख दैनिकासह) व इतर कोणत्या राज्यातील किती दैनिकात व कोणत्या भाषेत प्रसिध्दीस द्यावयाची आहे याबाबतची माहिती कळवून मा.संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचे मार्फत शासकीय दराने प्रसिध्दीस देता येईल.

**प्रस्ताव** - श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समारोपाच्या कार्यक्रमाची जाहिरात राज्य व देशपातळीवरील दैनिकात व्यापक स्वरुपात प्रसिध्द करणेस निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.६०४** **उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** **(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.२९** **श्री साई समाधी शताब्दी वर्षा निमीत्त शैक्षणिक संकुलात माहे आक्टोंबर २०१८ मध्ये राज्यस्तरीय मराठी निबंध व वत्कृत्व स्पर्धा, जिल्हास्तरीय शालेय चित्रकला स्पर्धा व शालेय इंग्रजी वत्कृत्व स्पर्धा आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद– सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक– नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक –सन २०१७ ते २०१८ मध्ये श्री साईबाबा शताब्दी पुण्यातिथी महोत्सवाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय शालेय विद्यार्थी/ विद्यार्थीनी करीता चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व वत्कृत्व स्पर्धा आयोजन शिर्डी येथे साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुलात करण्याचा मानस आहे. शालेय विद्यार्थ्याचा सर्वागीण विकास होणेकरिता व साईबाबाच्या जीवनचरित्राविषयी माहीती मिळावी व या माहितीचा प्रचार प्रसार व्हावा व त्यांच्या

अंगी असलेल्या कलागुणांना एक हक्काच व्यासपीठ मिळावं व त्या अनुषंगोन शताब्दी वर्षात या बाळ गोपाळांचा मेळावा साई संस्थान संकुलात भरवावा असे नम्र मत आहे.

**१ ) राज्य स्तरीय वत्कृत्व व  निबंध स्पर्धासाठी खालीलप्रमाणे विषय.**

| अ.क्र. | विषय | खुला गट | वरिष्ठ महाविद्यालय गट | कनिष्ठ महाविद्यालय गट | माध्यमिक शाळा गट | उच्च प्राथमिक शाळा गट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री साईबाबा व शिर्डी** | श्री साईबाबांची प्रेरणादायी शिकवण | शिर्डी-एक धार्मिक पर्यटन स्थळ | श्री साईबाबा – सर्वधर्मसमभाव | साईंच्या शिरडीची वाटचाल | जीवनाचा मूलमंत्र - श्रद्धा आणि सबुरी |
| २ | **स्त्री** | जिजाऊ ते सावित्रीएक स्त्री - संघर्ष | निर्भया खरंच निर्भय आहे का ? | चला मोजू या बाईच्या कष्टाची किंमत ! | महिला सबळीकरण- सत्य की आभास | लेक वाचवा देशवाचवा |
| ३ | **शेतकरी** | शेतकयांचा संप - आणि कर्जमुक्ती | कधी थांबतील शेतकरी आत्महत्या ? | शेतकयांची - कैफियत | आजच्या शेतक-यांपुढील आव्हाने | शेती आणि विज्ञान |
| ४ | **पर्यावरण** | प्लॅस्टिक बंदी - साध्य काय? | आज केरळ उद्या पश्चिम महाराष्ट्र | विकास की निसर्गहानी ? | स्वच्छतेतून समृद्धीकडे | माझ्या स्वप्नातील निर्मलगाव |
| ५ | **विज्ञान** | भारत आणि मंगळ अभियान | सोशल मिडिया आणि आजचा युवक | विज्ञानाने माणूस सुखी झाला का ? | विवेक आणि विज्ञान निष्ठा | इंटरनेट आणि आजचा विद्यार्थी |
| ६ | **सामाजिक आर्थिक/** | डॉलर झाला मोठा –रुपया झाला छोटा | GSTनवीन - वाटा नवीन डचणीअ | भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हाने आणि संधी | जलसंवर्धन – काळाची गरज | कृत्रिम बुधद्धिमत्ता आणि माणूस |

**वत्कृत्व स्पर्धाः-**

**निर्धारीत वेळ** -खुला गट,वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गट वकृत्व स्पर्धेस ०७ मिनीटे

**बक्षिस** -  खुला गट, वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गट – प्रथम क्रमांक रु. ५०००/- , द्वितीय क्रमांक रु.

३०००/- तृतीय क्रमांक – रु. २०००/- उत्तेजनार्थ ( दोन ) रु. १०००/- मात्र रोख रक्कम तसेच प्रशिस्तपत्र व साई प्रतिमा असे स्वरुप राहील तसेच सहभागी स्पर्धकांसाठी प्रशस्तीपत्र पत्र देता येईल.

**निर्धारीत वेळ** -माध्यमिक शाळा गट, उच्च प्राथमिक शाळा गट वत्कृत्व स्पर्धेस ०५ मिनीटे

**बक्षिस** -  खुला गट, वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गट – प्रथम क्रमांक रु. ३०००/- , द्वितीय क्रमांक रु.

२०००/- तृतीय क्रमांक – रु. १५००/- उत्तेजनार्थ ( दोन ) रु. १०००/- मात्र रोख रक्कम तसेच प्रशिस्तपत्र व साई प्रतिमा असे स्वरुप राहील तसेच सहभागी स्पर्धकांसाठी प्रशस्तीपत्र देता येईल.

**निबंध स्पर्धा नियमावलीः-**

१) निबंध स्पर्धा श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय ( साई आश्रम फेज -२) येथे वर्ग खोल्यांमध्ये घेता येईल.

२) निबंध स्पर्धाकरीता कनिष्ठ महाविद्यालयामार्फत पांढरा आखीव पेपर पुरविला जाईल.

३) निबंध स्पर्धा वेळ सर्व गटांकरीता ०१ तास ३० मिनीटे राहील.

४) स्पर्धा स. १० ते ११.३० या वेळेत संपन्न होतील. स्पर्धा सुरु होणेपुर्वी ३० मिनीटे हजर राहाणे बंधनकारक आहे.

५) स्पर्धकांना स्पर्धा ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल प्रवास भाडे दिले जाणार नाही.

६) स्पर्धेचे परीक्षण बहिस्थ परीक्षकामार्फत केले जाईल.

७) स्पर्धकाने लेखणी साहित्य स्वतःचे आणावे. (निबंध फक्त निळया शाईतच लिहणे बंधनकारक आहे. )

८) पांढ-या आखीव दर्शनी भागात स्पर्धकाने स्वतःचे नांव, शाळेचे नांव, तालुका, जिल्हा, मोबाईल नंबरचा उल्लेख करावा.

९) निबंध स्पर्धाकरीता उपस्थित पालक व विद्यार्थी अंदाजे ३०० व्यक्ती प्रसाद भोजनाची व्यवस्था प्रसादालयात पास देऊन करता येईल. सदर पासचे वितरण कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करण्यात येईल.

१०) निबंध स्पर्धेकरीता एका शाळेचे एका गटासाठी फक्त ०२ स्पर्धकच सहभागी करण्यात येतील.

११) सदर निबंध स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी शैक्षणिक संकुलातील सर्व प्राचार्य / मुख्याध्यापक हे शिक्षकांवर जबाबदारी निश्चित करतील.

१२) स्पर्धेचा निकाल व ऐनवेळी होणारा बदल याबाबत सर्व हक्क आयोजकांनी राखून ठेवलेले आहेत.

निबंध स्पर्धाः-

**निर्धारीत वेळ** -खुला गट,वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गट निबंध स्पर्धेस ०१ तास ३० मिनीटे

**बक्षिस** - खुला गट, वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गट – प्रथम क्रमांक रु. ५०००/- , द्वितीय क्रमांक रु. ३०००/- तृतीय क्रमांक – रु. २०००/- उत्तेजनार्थ ( दोन ) रु. १०००/- मात्र रोख रक्कम तसेच प्रशिस्तपत्र व साई प्रतिमा असे स्वरुप राहील तसेच सहभागी स्पर्धकांसाठी प्रशस्तीपत्र देता येईल.

**निर्धारीत वेळ** -माध्यमिक शाळा गट, उच्च प्राथमिक शाळा गट निबंध स्पर्धेस ०१ तास ३० मिनीटे

**बक्षिस** - खुला गट, वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गट – प्रथम क्रमांक रु. ३०००/- , द्वितीय क्रमांक रु.२०००/- तृतीय क्रमांक – रु. १५००/- उत्तेजनार्थ ( दोन ) रु. १०००/- मात्र रोख रक्कम तसेच प्रशिस्तपत्र व साई प्रतिमा असे स्वरुप राहील तसेच सहभागी स्पर्धकांसाठी प्रशस्तीपत्र पत्र देता येईल.

**२) चित्रकला स्पर्धासाठी खालीलप्रमाणे विषय.**

| गट वर्गवारी | इयत्ता | चित्रांचा विषय |
|---|---|---|
| अ गट | इ. १ ली ते ४ थी | **बाबांची चावडी, बाबांची द्वारकामाई, साईबाबांचे मंदिर** |
| ब गट | इ. ५ वी ते ७ वी | **साईबाबा व्यक्ती चित्र , लेंडीबागेत साईबाबा, साईबाबांचे जीवनातील प्रसंग.** |
| क गट | इ. ८ वी ते १० वी | **साईबाबांची पालखी दृश्य, बाबांनी पेटीविलेली धुनी- द्वारकामाई , श्री साईबाबांची दिवाळी** |
| ड गट | इ. ११ वी ते १२ वी | **समाधी मंदिरातील आरती दृश्य ,श्री साईबाबांची लेंडीबाग पाणी टाकतांना साईबाबा , साईचरित्रातील एक प्रसंग** |

चित्रकला स्पर्धा नियमावलीः-

१) चित्रकला स्पर्धा प्रवेश विनामुल्य असून श्री साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुल प्रांगणात घेता येईल.

२) चित्रकला स्पर्धाकरीता कन्या शाळे मार्फत पांढरा कार्डशिट पेपर मोफत पुरविला जाईल.

३) चित्रकला स्पर्धा वेळ सर्व गटांकरीता ०२ तास राहील.

४) स्पर्धा सकाळी १० ते १२ या वेळेत असून स्पर्धा सुरु होणेपुर्वी ३० मिनीटे हजर राहाणे बंधनकारक आहे.

५) स्पर्धकांना स्पर्धा ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल प्रवास भाडे दिले जाणार नाही.

६) स्पर्धेचे परीक्षण बहिस्थ परीक्षकामार्फत केले जाईल.

७) स्पर्धेकरीता कोणत्याही रंग साहित्याचा वापर करता येईल.

८) चित्राच्या मागील बाजूस स्पर्धकाने स्वतःचे नांव, शाळेचे नांव, तालुका, जिल्हा, मोबाईल नंबरचा उल्लेख करावा.

९) चित्रकला स्पर्धाकरीता उपस्थित पालक व विद्यार्थी अंदाजे ५०० व्यक्ती प्रसाद भोजनाची व्यवस्था शैक्षणिक संकुलात केली जाईल.

१०) चित्रकला स्पर्धेकरीता एका शाळेचे एका गटासाठी फक्त ०२ स्पर्धकच सहभागी करण्यात येतील.

११) सदर चित्रकला स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी शैक्षणिक संकुलातील सर्व प्राचार्य / मुख्याध्यापक हे शिक्षकांवर जबाबदारी निश्चित करतील.

१२) स्पर्धेचा निकाल व ऐनवेळी होणारा बदल याबाबत सर्व हक्क आयोजकांनी राखून ठेवलेले आहेत.

चित्रकला स्पर्धा

**निर्धारीत वेळ** - सर्व गटांसाठी एकूण ०२ तास

**बक्षिस - अ, ब, व क गट** –प्रथम क्रमांक रु. ३०००/- , द्वितीय क्रमांक रु. २०००/- तृतीय क्रमांक – रु. १०००/- उत्तेजनार्थ ( दोन ) रु. ५०० /- मात्र रोख रक्कम तसेच प्रशस्तीपत्र व साई प्रतिमा असे स्वरुप राहील तसेच सहभागी स्पर्धकांसाठी प्रशस्तीपत्र देता येईल.

**ड व इ गट - बक्षिस -** प्रथम क्रमांक रु. ५०००/- , द्वितीय क्रमांक रु. ३०००/- तृतीय क्रमांक – रु. २०००/- उत्तेजनार्थ ( दोन ) रु. १०००/- मात्र रोख रक्कम तसेच प्रशस्तीपत्र व साई प्रतिमा असे स्वरुप राहील तसेच सहभागी स्पर्धकांसाठी प्रशस्तीपत्र देता येईल.

**३ ) फक्त शालेय विद्यार्थी इंग्रजी वत्कृत्व स्पर्धासाठी खालीलप्रमाणे विषय.**

| गट वर्गवारी | इयत्ता | इंग्रजी वत्कृत्व विषय | वेळ मर्यादा |
|---|---|---|---|
| **अ गट** | इ. ५ वी ते ७ वी | 1) Shraddha Saburi<br>2) Sabka Malik Ek<br>3) My Sai - My Experience | **०५ मिनिट** |
| **ब गट** | इ. ८ वी व १० वी | 1) Teachings of Saibaba<br>2) Sai Charitra- Art of living<br>3) Sai Leela - An Experience | **०५ मिनिट** |

**इंग्रजी वत्कृत्व स्पर्धा नियमावलीः-**

१) सदरच्या स्पर्धेसाठी फक्त इंग्रजी माध्यमातील शालेय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतील.

२) इंग्रजी वत्कृत्वस्पर्धा श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील हॉल मध्ये घेता येईल.

३) स्पर्धा सकाळी १० वाजता सुरु होतील. स्पर्धा सुरु होणेपुर्वी ३० मिनीटे हजर राहाणे बंधनकारक आहे.

४) स्पर्धकांना स्पर्धा ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल प्रवास भाडे दिले जाणार नाही.

५) स्पर्धेचे परीक्षण बहिस्थ परीक्षकामार्फत केले जाईल.

६ ) स्पर्धकाने शाळेच्या मुख्याध्यापकाचे संमतीपत्र स्पर्धा ठिकाणी जमा करुन नोंदणी करणे आवश्यक आहे.

७) स्पर्धाकरीता उपस्थित पालक व विद्यार्थी अंदाजे ३०० व्यक्ती प्रसाद भोजनाची व्यवस्था शैक्षणिक संकुलात केली जाईल.

८) इंग्रजी वत्कृत्व स्पर्धेकरीता एका शाळेचे एका गटासाठी फक्त ०२ स्पर्धकच सहभागी करण्यात येतील.

९) इंग्रजी वत्कृत्व स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी शैक्षणिक संकुलातील सर्व प्राचार्य / मुख्याध्यापक हे शिक्षकांवर जबाबदारी निश्चित करतील.

१०) स्पर्धेचा निकाल व ऐनवेळी होणारा बदल याबाबत सर्व हक्क आयोजकांनी राखून ठेवलेले आहेत.

**शालेय विद्यार्थी इंग्रजी वत्कृत्वस्पर्धा पारीतोषिक तपशिल खालीलप्रमाणे.**

**निर्धारीत वेळ** – सर्व गटांसाठी एकुण ०५ मिनिटे

**बक्षीस –अ, ब** गट- प्रथम क्रमांक रु. ३०००/- द्वितीय क्रमांक – रु. २०००/- तृतीय क्रमांक रु. १५००/- उत्तेजनार्थ ( दोन) – रु. १०००/- मात्र रोख रक्कम तसेच प्रशस्तीपत्र व साईप्रतिमा असे स्वरुप राहील तसेच सहभागी स्पर्धकांसाठी प्रशस्तीपत्र देता येईल.

<u>विभागाचा स्पष्ट अभिप्राय-</u> या उपरोक्त मराठी निबंध, मराठी भाषा वत्कृत्व स्पर्धेत राज्यातील व चित्रकला स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हयातील सर्व माध्यमांच्या शाळांना सहभागी करुन घेता येईल तसेच शालेय इंग्रजी वत्कृत्व स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हयातील फक्त इंग्रजी माध्यामाच्या शाळांना सहभागी करुन घेता येईल. बाबांच्या जीवनपटाचा प्रचार व प्रसार होणेसाठी व शालेय विद्यार्थ्यांना बाबांचे जीवन व त्यांचे कार्य समजण्यासाठी ही स्पर्धा घेता येईल.

यामध्ये सर्व माध्यमांच्या शाळांना ई-मेल/ दुरध्वनीवरुन/ मोबाईलद्वारे कळवून अथवा आवश्यकतेनुसार पत्रव्यवहार करुन संपर्क केला जाईल. तसेच आवश्यकता वाटल्यास वर्तमान पत्रात प्रेस नोट देऊन स्पर्धेत सहभागी होणेकामी आवाहन करता येईल. स्पर्धेबाबतची नियमावली वर्तमान पत्रातून प्रेसनोट द्वारे जाहीर करता येईल तसेच जाहिरात पत्रके / भिंतीपत्रके छापून माहिती देता येईल. या स्पर्धा फक्त शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजीत करता येईल.

सदर स्पर्धा ही आपल्या शैक्षणिक संकुलात आयोजीत करुन तज्ञ परीक्षकांकडून परीक्षण करुन विजयी स्पर्धकांना बक्षिसे देता येईल. तसेच स्पर्धे नंतर आकर्षक चित्रांचे प्रदर्शन इतर मुलांना पाहाणेसाठी भरविता येईल जेणेकरुन विद्यार्थ्यांचे कलागुणांना वाव मिळेल.

या स्पर्धा <u>दि. ०७ आक्टोंबर २०१८ रोजी</u> रविवारचा दिवस ठरवून अयोजित करता येईल. स्पर्धा ही शाळेच्या खुल्या प्रांगणात शाळेच्या समोरील व मागील बाजूचे प्रांगणात अथवा वर्ग खोल्यांमध्ये घेता येईल.

१) स्पर्धेत सहभागी होणेसाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

२) सदरचे चित्रकला व निबंध स्पर्धेतविद्यार्थ्यां समवेत उपस्थितशिक्षक यांची चहा-पाणी व्यवस्था, तसेच आवश्यकतेनुसार संस्थानचे वतीने शाळेकडेच मोफत भोजन व्यवस्था करता येईल.

३) सदर चित्रकला व निंबध स्पर्धा उदघाटन समारंभ व समारोप समारंभ करीता मान्यवरांचे उपलब्धतेनुसार मा. अध्यक्ष , मा. उपाध्यक्ष व मा. विश्वस्त समिती सदस्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांची उपस्थिती असावी असे मत आहे.

४) चित्रकला, निंबध व वत्कृत्व स्पर्धा पारितोषिक खरेदी ,संस्थानचे नाव असलेले प्रमाणपत्र छपाई खर्च, ट्रॉफी खरेदी, परीक्षक सत्कार , भोजन व चहापाणी खर्च, बॅनर खर्च, कागद खरेदी खर्च , फुले सजावट खर्च , विशेष कापडी कमान उभारणे खर्च, ध्वनीक्षेपण व्यवस्था व इतर अनुषंगीक किरकोळ खर्चासाठी अंदाजे रुपये ७ ,५०, ००० /- **( अक्षरी सात लाख पन्नास हजार रुपये** )खर्च अपेक्षित आहे.

| अ. नं. | तपशिल | अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१ | रोख बक्षिसे रक्कम | रु. १,६८,०००/- |
| ०२ | मंडप व सांऊड सिस्टम व्यवस्था | रु. २,२५,०००/- |
| ०३ | भोजन व अल्पोपहार इ. ( अंदाजे १५०० व्यक्ती ) | रु. १,५०,०००/- |
| ०४ | स्टेशनरी , बॅनर (फ्लेक्स बोर्ड ) , हॅन्डबीलव इ. खर्च | रु. २,०७,०००/- |
| | एकूण रक्कम रुपये | रु. ७,५०,०००/- |

५) या प्रदर्शनाचे आयोजनाकामी वरिष्ठांच्या सुचनेनुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे स्वाक्षरीने जिल्हा परीषद अ. नगर शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक विभाग यांना पत्र देता येईल.

६) उपरोक्त सर्व स्पर्धा पारितोषीक वितरण शताब्दी समारोह कार्यक्रमात एकत्रीत वितरीत करण्यात येईल.

**मागणीः-** तरी श्री साई समाधी शताब्दी २०१८ निमित्त राज्यस्तरीय व अहमदनगर जिल्हा स्तरीय स्पर्धा आयोजित करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ७ ,५०, ००० /- ( अक्षरी सात लाख पन्नास हजार रुपये ) खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी २०१८ निमित्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय व अहमदनगर जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ७,५०,००० /- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच वकृत्वस्पर्धा ही जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय अशा दोन्ही स्तरावर घ्यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल, मुख्यध्यापक,कन्या विद्या मंदिर व ज्यु.कॉलेज, श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालय)**

**विषय नं.३०** **विविध न्यायालयांमध्ये संस्थानमार्फत व संस्थानविरुध्द दाखल असलेल्या दाव्यांची माहिती.**

**प्रस्ताव-** जा.नं.एसएसएस/वशी-विधी/१८४/२०१७, दिनांक १२.०४.२०१७ रोजीचे आदेशानुसार,ज्या-त्या प्रशासकीय विभागाने त्यांच्या संबंधातील दाव्यांची सखोल माहिती व मुळ संचिका त्या-त्या विभागाकडे उपलब्ध असल्यामुळे, संबंधीत विभागांकडे कोर्ट केसेसचे कामकाज वर्ग करणेत आलेले आहे. न्यायालयीन कामकाजात अडचण येत असेल तर विधी अधिकारी यांची मदत घ्यावी. तसेच संस्थानशी संबंधीत आर्थिक बाबी, धोरणात्मक निर्णय, महत्वाचे विषय इ. बाबतीतील न्यायालयीन प्रकरणात विधी अधिकारीयांनी कार्यकारी अधिकारीयांचे मान्यतेने न्यायालयात उपस्थित राहून कामकाज पहावे, असे सर्व विभागांना कळविणेत आलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०० अन्वये, संस्थानच्या कोणकोणत्या कोर्टात किती केसेस चालू आहेत, प्रत्येक केसमध्ये वकील कोण आहेत याबाबतचा सविस्तर तपशील व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात यावा. केसेसमध्ये काय कामकाज झाले याच्या सद्यस्थितीसह अहवाल ठेवावा,असे ठरलेले आहे.

उपरोक्त संमत निर्णयावर कार्यवाही करणेकामी, जा.नं.एसएसएस/ वशी-विधी/ १४८२/ २०१८, दिनांक २१.०८.२०१८ रोजीचे परिपत्रकान्वये, संस्थानचे सर्व विभागांकडून त्यांचेमार्फत चालू असलेल्या न्यायालयीन प्रकरणांची सद्यस्थीती मागविणेत आली होती, त्यानुसार विविध न्यायालयांमध्ये संस्थानमार्फत व संस्थानविरुध्द दाखल असलेल्या दाव्यांची दिनांक ०१.०९.२०१८ पर्यंतची सद्यस्थीती सोबत **परिशिष्ट अ** म्हणून सादर केली आहे. न्यायालयीन प्रकरणांची आकडेवारी खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | मा.कोर्टाचे नांव | संस्थानने दाखल केलेले दावे | संस्थानचे विरुध्द दाखल झालेले दावे | एकुण दाव्याची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली. | -- | १ | ०१ |
| २ | मे.नॅशनलकंज्युमरफोरम, दिल्ली. | -- | १ | ०१ |
| ३ | मा.आरबिट्रेशन न्यायालय, मुंबई. | १ | --- | ०१ |
| ४ | मा.उच्चन्यायालयमुंबई, साईधामचॅरिटेबलट्रस्ट, मुंबई, यांचेमार्फत (Criminal Case). | -- | १ | ०१ |
| ५ | मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद. | ९ | ५० | ५९ |
| ६ | मा.कामगार न्यायालय, अहमदनगर | १ | २ | ०३ |
| ७ | मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर | --- | १५ | १५ |
| ८ | मा.ग्राहक तक्रार मंच, अहमदनगर | --- | १ | ०१ |
| ९ | मा.अति. जिल्हावसत्रन्यायालय, कोपरगाव. | ८ | ६ | १४ |
| १० | मा.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन, कोपरगाव. | २ | १४ | १६ |
| ११ | मा.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन, राहाता. | ३ | १० | १३ |
| १२ | मे.न्यायदंडाधिकारी, वर्ग १ ला, राहाता. | १ | --- | ०१ |
| १३ | मा.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन, आग्रा. | --- | १ | ०१ |
| १४ | मा.जॉईंट डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, नाशिक | --- | १ | ०१ |
| १५ | मा.पिठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, सोलापुर | --- | २ | ०२ |
| | **एकुण** | **२५** | **१०५** | **१३०** |

तरी न्यायालयीन प्रकरणांची सद्यस्थीती अवलोकनार्थ व पुढील मार्गदर्शनासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विविध न्यायालयांमध्ये संस्थानमार्फत व संस्थानविरुध्द दाखल असलेल्या दाव्यांचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली. तसेच याबाबत समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर, यांनी संस्थानमार्फत व संस्थानविरुध्द दाखल असलेल्या महत्वाच्या दाव्यांची माहिती घेऊन संबधीत वकीलांशी चर्चा करावी, असे ठरले.** **(कार्यवाही- प्र.विधी अधिकारी, विधी विभाग)**

---

**विषय नं.३१ (अ) संस्थान कर्मचारी किंवा त्यांचेवर अवलंबीत नातेवाईकांवर वैद्यकिय उपचारासाठी करण्यात आलेल्या जादा वैद्यकिय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी–** पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | रविंद्र बापू गावडे<br>विभाग- पाणीपुरवठा<br>हुददा – तारतंत्री | वडील | UTI<br>किडनी संसर्ग | डॉ. मुंदडा | साईबाबा हॉस्पिटल | ३०१०६.०० | ३०१०६.०० | संस्थान रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याने बाहेरुन विकत घेतले |
| २ | रुकसाना साजिद खान<br>विभाग- साईनाथ हॉस्पिटल<br>हुददा – परिचारिका | स्वतः | Blood Pressure (रक्तदाब ) | डॉ. मनोहर शिंदे | साईबाबा हॉस्पिटल | १३६८४.०० | १३६८४.०० | |
| | | | | **अ - एकूण रक्कम** | | ४३७९०.०० | ४३७९०.०० | |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झाल्याने संस्थान मान्य यादीत रेफर केले होते.** | | | | | | | |
| ३ | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग-आय टी आय<br>हुद्दा- निर्देशक | पत्नी | Ca<br>कर्करोग | डॉ. बो-हाडे व्ही एम | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | १६६३६.०० | १४६५६.०० | |
| ४ | चौधरी मंजुषा विजय<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा-लॅब टेक्निशियन | वडिल | Ca<br>कर्करोग | डॉ.जाधव र | मानवता क्यूरी कॅन्सर सेंटर, नाशिक | २६२१६.०० | २४८७५.०० | |
| ५ | अशोक नामदेव झुंरगे<br>विभाग- भांडार<br>हुद्दा-अधिक्षक | स्वतः | Blood Pressure (रक्तदाब ) | डॉ.जाधव र | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल | ३३१२३.०० | ३०२७५.०० | |
| ६ | सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग -ध्वनीक्षेपण<br>हुद्दा -विद्युत पर्यवेक्षक | मुला | Renal transplant किडनी प्रत्यारोपण | डॉ.जाधव र | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ५९६११.०० | ४३७२१.०० | |
| ७ | रामचंद्र दगडू घनघाव<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा –प्रयोगशाळा तंत्रज्ञ | मुला | Left Eye keratoconus डाव्या डोळयाची शस्त्रक्रिया | डॉ. अजित पाटील | जहांगीर हॉस्पिटल , पुणे | ४२८४७.०० | ४०४७९.०० | |
| | | | | **ब - एकूण रक्कम** | | १७८४३३.०० | १५४००६.०० | |
| | | | | **अ+ब - एकूण रक्कम** | | २२२२२३.०० | १९७७९६.०० | |
| | | | | **एकूण देय रक्कम रु.** | | १९७७९६.०० | | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.१,९७,७९६/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत**– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत.

**प्रस्ताव**– उपरोक्त ०७ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.१,९७,७९६/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

---

**विषय नं.३१ (ब)** **संस्थान कर्मचारी किंवा त्यांचेवर अवलंबीत नातेवाईकांवर वैद्यकिय उपचारासाठी करण्यात आलेल्या जादा वैद्यकिय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक** – खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा -याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | | |
| १ | रविंद्र बापू गावडे<br>विभाग –पाणीपुरवठा<br>हुद्दा –तारतंत्री | वडिल | Ca<br>कर्करोग | डॉ. मुंदडा | साईबाबा हॉस्पिटल | ३११४२.०० | ३०५९९.०० | ५४३४७.०० |
| | | | | अ - एकूण रक्कम | | ३११४२.०० | ३०५९९.०० | |
| | ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झाल्याने संस्थान मान्य यादीत रेफर केले होते. | | | | | | | |
| २ | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग-आय टी आय<br>हुद्दा- निर्देशक | पत्नी | Ca<br>कर्करोग | डॉ. बो-हाडे | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | २७९४४.०० | २६८७४.०० | १२८२३२.०० |
| ३ | दिलीप गंगाधर बकरे<br>विभाग- अभिलेख कक्ष हुद्दा-प्र. अधिक्षक | पत्नी | Obstrutiveuropathy DM/H TN Hypothyroidism<br>मुत्राशयातील अडथळा | डॉ. जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | १४५६९५.०० | १३७०७०.०० | ५६०६.०० |
| ४ | राजेंद्र कोंडाजी वाणी<br>विभाग- वाहन<br>हुद्दा-मदतनीस | स्वतः | CVA,NHZ With midliveshift<br>अर्धांगवायू | डॉ. ढाकणे | रुबी हॉल क्लिनिक पुणे | ३७६७१३.०० | ३७१६४८.०० | ०.०० |
| ५ | कुलकर्णी मानिनी नंदकुमार<br>विभाग-साईनाथ हॉस्पि.<br>हुद्दा-परिचारिका | स्वतः | Pulmonary embolismwith DM/HTN/IHD<br>पॅरॉलिसिस /हदयासंदर्भात | डॉ. जाधवर | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | २७०४४९.०० | २६९९७२.०० | ०.०० |
| ६ | आशा तुळशीराम रोकडे<br>विभाग-साईनाथ | स्वतः | CVA<br>अर्धांगवायु | डॉ.जाधवर | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल | ४८५६४.०० | ३७९०८.०० | २९३८.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हॉस्पि. हुद्दा-परिचारिका | | | | | | | |
| ७ | चौधरी मंजुषा विजय विभाग- साईबाबा हॉस्पि. हुद्दा-लॅब टेक्निशियन | वडिल | Ca Prostate ग्रंथीचा कर्करोग | डॉ.जाधव र | मानवता क्यूरी कॅन्सर सेंटर, नाशिक | ३२६२५.०० | ३२६२५.०० | ०.०० |
| | | | | **ब - एकूण रक्कम** | | ९०१९९०.०० | ८७६०९७.०० | |
| | **क. संस्थान रुग्णालयात व संस्थान मान्य यादीत उपचार न घेतलेले रेफर न केलेले ,निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतलेले** | | | | | | | |
| ८ | चाळके दिलीप बाळू विभाग-औ.प्र. संस्था हुद्दा-निर्देशक | स्वतः | Heart Surgery हृदय शस्त्रक्रिया | राजदुत अशोक | एम्स हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर पुणे | २८०४१४.०० | २२३४२७.०० | ४८९१.०० |
| ९ | कल्पना रघुनाथ मुसमाडे विभाग- साईनाथ हॉस्पि. हुद्दा-परिचारिका | पती | Heart Attack उच्च रक्तदाब | डॉ. रविंद्र वामन | ओंकार हॉस्पिटल | ५५६२५.०० | ४११३४.०० | ८८७.०० |
| | | | | **क - एकूण रक्कम** | | **३३६०३९.००** | **२६४५६१.००** | |
| | | | **अ+ब +क - एकूण रक्कम** | | | **१२६९१७१.००** | **११७१२५७.००** | |
| | | | **एकूण देय रक्कम रु.** | | | **११७१२५७.००** | | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.११,७१,२५७ /- इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत.तसेच काही निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतले. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त ९ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.११,७१,२५७ /- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

---

**विषय नं.३१ (क)** **संस्थान कर्मचारी किंवा त्यांचेवर अवलंबीत नातेवाईकांवर वैद्यकिय उपचारासाठी करण्यात आलेल्या जादा वैद्यकिय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक**– खालील संस्थान कर्मचा-यांची रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | | |
| १ | श्री. अभयकुमार शांताराम दुनाखे विभाग-आय टी आय हुद्दा- निर्देशक | स्वतः | Blood Pressure (रक्तदाब ) | डॉ. पगारे डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | २३६४९.०० | २२६९३.०० | १२८२३२.०० |
| २ | श्री. अशोक आनाजी बनकर विभाग-संरक्षण हुद्दा-पहारेकरी | स्वतः | UTI मुत्रपिंड संसर्ग / अडथळा | डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १८७५४.०० | १८४४८.०० | १७४९६.०० |
| ३ | श्री. दिपक सुर्यकांत लोखंडे विभाग- लेखाशाखा हुद्दा- लिपिक | आई | Blood Pressure Diabetes (रक्तदाब मधुमेह ) | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५८२७.०० | ४०७७.०० | २००३५.०० |
| ४ | संगिता संजय थोरात विभाग -साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-परिचारिका | पती सासु | Blood Pressure Diabetes (रक्तदाब मधुमेह ) | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | २४२५४.०० | २१५३३.०० | २०३०१.०० |
| ५ | श्री. प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन विभाग-साईनाथ रुग्णालय हुद्दा- मदतनीस | स्वतः पत्नी | Diabetes& Skin Treatment (मधुमेह /त्वचा उपचार ) | डॉ.पोरवाल डॉ. वाघुळदे | श्री साईनाथ रुग्णालय | ५५२९.०० | ५५२९.०० | १९०५८.०० |
| ६ | श्री. हमिद झुंबर शेख विभाग- बांधकाम हुद्दा - मदतनिस | स्वतः | Renal Treatment (किडनी उपचार) | डॉ. वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १०९१४.०० | ८७२०.०० | १५१०२२.०० |
| ७ | कविता शंतनु सरवार विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-हिस्टोपॅथॉलिस्ट | वडिलां | Blood Pressure Diabetes (रक्तदाब मधुमेह ) | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६७९२.०० | ६७९२.०० | १४२५२.०० |
| ८ | श्री. अशोक नामदेव झुंगे विभाग- भांडार हुद्दा- अधिक्षक | स्वतः | Blood Pressure Diabetes (रक्तदाब मधुमेह) | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | १३२११.०० | ९६४०.०० | ११६६८०० |
| ९ | श्री.दिलीप बाळकृष्ण औदिच्य विभाग-औषध भांडार हुद्दा-स्टोअर मॅनेजर | मुलगा | Shoulder surgery (खांदयाची शस्त्रक्रिया ) | डॉ. धारसकर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६३९२०.०० | ६३९२०.०० | १०२०.०० |
| | | | | अ - एकूण रक्कम | | १७२८५०.०० | १६१३५२.०० | |
| | ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झाल्याने संस्थान मान्य यादीत रेफर केले होते. | | | | | | | |
| १० | स्वाती इंद्रभान कडू विभाग- ज्युनियर कॉलेज हुद्दा- शिक्षिका | पती | Diabetes mellitus with hyperbilirubimia (मधुमेह / काविळ) | डॉ. इंगळे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३२३७५.०० | ३२३३८.०० | ०० |
| ११ | श्री. दिलीप गंगाधर बकरे विभाग - अभिलेख कक्ष हुद्दा-अधिक्षक | स्वतः | CVA (अर्धांगवायू ) | डॉ. जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ५६९६.०० | ५६९६.०० | ५६०६.०० |
| १२ | श्री.परसराम सोमाजीभालेराव | पत्नी | Dengue encephalitis (डेंग सदृश्य आजार) | डॉ.काटे | रुबी हॉल क्लिनिक, | १०९९८.०० | १०९९८.०० | ९४०२.०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग-संरक्षण हुद्दा–पहारेकरी | | | | पुणे | | | |
| | | | | ब - एकूण रक्कम | | ४९०६९.०० | ४९०३२.०० | |
| | | | अ+ब - एकूण रक्कम | | | २२१९१९.०० | २१०३८४.०० | |
| | | | एकूण देय रक्कम रु. | | | २१०३८४.०० | | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.२,१०,३८४ /- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत** – नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत.

**प्रस्ताव**–उपरोक्त १२ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.२,१०,३८४/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील विषय नं.३१ (अ),(ब),(क) मधील प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त विषय नं.३१(अ) मधील ०७ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.१,९७,७९६/- मात्र, विषय नं.३१(ब) मधील ०९ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु. ११,७१,२५७ /- मात्र व विषय नं.३१ (क) मधील १२ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.२,१०,३८४ /- मात्र त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या वेतनश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्त्यानुसार एकत्रित मानधन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **मा व्यवस्थापन समिती ठराव क्र-**

१) मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १६०.

"श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली".

२) मा. व्यवस्थापन समिती दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३५७.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांचा प्र वैद्यकिय संचालक यांनी आढावा घेऊन, आवश्यक पदे जाहिरातीद्वारे ११ महिने कालावधीसाठी अथवा स्थायी स्वरूपात नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत आकृतीबंधातील संबंधीत पदांचे वेतनश्रेणीच्या (मुळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता + एनपीए) जवळपासचे मानधनावर कंत्राटी पध्दतीने घेणेस व त्यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेस मान्यता देण्यात आली.

तसेच मा. डीन, बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांनी प्रस्तावीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व विहीत मुदतीत अर्ज मागणविणेत येऊन, पात्र अर्जदारांच्या Walk-in-Interview घेण्यात याव्यात. यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठीत करणेत आली. १) मा कार्यकारी अधिकारी २) उपकार्यकारी अधिकारी ३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी ४) वैद्यकीय संचालक ५) वैद्यकीय अधिक्षिका. या निवड समितीने Walk-in-Interview मध्ये पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी जाहीर करावी. त्यानंतर या निवड यादीवर हरकती मागविणेत याव्यात व हरकती विचारात घेऊन नेमणूक आदेश देण्यात यावे. याचबरोबर श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकडील वैद्यकिय प्रशासनातील पदे (वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक इ.) स्थायी स्वरूपात स्वतंत्र जाहिरातीद्वारे भरणेत यावीत, असे ठरले

३) मा व्यवस्थापन समिती दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०३.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेकामी दि. २०/०६/२०१७ रोजी घेणेत आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्ताचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली. तसेच ज्या पदांवर उमेदवार उपलब्ध झालेले नाही अथवा ज्या पदावर नेमणूक आदेश देऊनही उमेदवार हजर झालेले नाहीत अथवा आकृतीबंधास अनुसरून, वैद्यकीय अधिका-यांच्या इतरही रिक्त जागा भरणेची आवश्यकता आहे, अशा पदांसाठी फेरजाहिरात देण्यात यावी. तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील पदे प्राधान्याने भरावीत, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२७.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित वैद्यकीय अधिका-यांना त्यांचा नेमणूक आदेश संपुष्टात आलेनंतर ०७ दिवस सर्विस ब्रेक देऊन दि. १३/०८/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने पुर्वीच्याच नेमणूक आदेशातील अटी शर्ती व वेतनावर नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

५) मा व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४३.

श्री साईबाबा रूग्णालयातील कार्डीयाक विभागातील कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. याकरीता तज्ञ वैद्यकीय अधिकारी आवश्यक आहे. डॉ संदिप नारायणराव देवरे, इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजीस्ट यांनी दि. ०७/०४/२०१८ रोजीचे अर्जान्वये राजीनामा दिला आहे. डॉ देवरे यांनी राजीनामा मागे घेणेबाबत अर्ज दिल्यास त्यांचा राजीनामा रद्द करून त्यांना एकत्रित मानधन रू.६५,९११/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा. तसेच डॉ मनोहर विश्वासराव शिंदे, इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजीस्ट व डॉ संदिप नारायणराव देवरे, इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजीस्ट यांना आठवडयातील ३-३ दिवस ओ.पी.डी. विभागुन देण्यात यावी, असे ठरले.

६) मा व्यवस्थापन समिती दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४३७.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील दि. २९/०६/२०१७ रोजी व दि. १६/११/२०१७ रोजी नेमणूका दिलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असलेचे लगतचे दिनांकापासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली.

७) मा व्यवस्थापन समिती दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४४०.

प्रस्तुत प्रकरणी दि. २७/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये शासनाने श्री साईबाबा रूग्णालयातील डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त प्रोत्साहन भत्ता (Inecentives) मंजूर केलेला असल्याने डॉ जाधवर यांची मागणी मान्य करता येणार नाही. डॉ जाधवर यांनी दि. ०३/०७/२०१८ अखेर पासून राजीनामा मंजुर करणेबाबत अर्ज दिलेला आहे. परंतु डॉ जाधवर यांचे कामकाज समाधानकारक असुन त्यांचे फिजिशियन या पदाचे सेवेची रूग्णालयास आवश्यकता असल्याने प्रशासनाने डॉ जाधवर यांचेशी चर्चा करून, राजीनामा मागे घेणेबाबत विनंती करावी, त्यांनी राजीनामा मागे घेतल्यास पुर्वी प्रमाणेच मासिक मानधन रू.६७,६००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता यानुसार पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले. सध्या साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व साईनाथ रूग्णालयाकरीता ०२ अशी एकुण ५ फिजिशियनची पदे रिक्त आहेत. दोन्ही रूग्णालयांना फिजिशियन डॉक्टरांची आवश्यकता असल्याने तातडीने फिजिशियनची पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन भरती प्रक्रिया राबविणेत यावी, फिजिशियन या पदाची जाहिरात देऊनही डॉक्टर्स उपलब्ध न झाल्यास वाढीव प्रोत्साहन भत्ता (Inecentives) देणेबाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा, असे ठरले.

**प्रस्तावना-** मा व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये आवश्यक वैद्यकीय अधिका-यांच्या ११ महिने कालावधीकरीता खालील नमुद केलेल्या मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका केलेल्या आहेत.

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव | पदाचे नाव | सध्याचे मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ संदीप नारायणराव देवरे | इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजीस्ट<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ६५,९११ व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०२ | डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर | आर्थोपेडीक सर्जन<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ६७,६०० व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०३ | डॉ अमित दिपक नाईकवाडे | मेडीकल ऑफीसर<br>(आर्थोपेडीक सर्जन)<br>श्री साईनाथ रूग्णालय | ६५,९११ |
| ०४ | डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर | फिजिशियन<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ६७,६०० व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०५ | डॉ संजलिया मिलनकुमार किशोरभाई | न्युरोसर्जन<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ६५,९०० व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०६ | डॉ नितीन दशरथ ठाकरे | कार्डीयाक सर्जन | ६५,९११ व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | श्री साईबाबा हॉस्पिटल | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०७ | डॉ विजय मुरलिधर थोरात | जनरल सर्जन<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ६५,९११ व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०८ | डॉ विद्या मनोहर बोराडे | जनरल सर्जन<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ६५,९११ व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०९ | डॉ प्रशांत दिलीप काळे | आर्थोपेडीक सर्जन<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ६५,९११ व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| १० | डॉ शोभना तुकाराम कोल्हे | मेडीकल ऑफीसर (ईएनटी सर्जरी)<br>श्री साईनाथ रूग्णालय | ६५,९११ |
| ११ | डॉ प्राजक्ता मुरलीधर खर्चे | ऑफ्थलमोलॉजीस्ट<br>श्री साईनाथ रूग्णालय | ६५,९११ |
| १२ | डॉ विशाल धनाजी पटेल | मेडीकल ऑफीसर<br>(आर्थोपेडीक सर्जन)<br>श्री साईनाथ रूग्णालय | ६५,९११ |
| १३ | डॉ पोर्णीमा रामराव शेळके | वैद्यकीय अधिकारी (दंतरोग)<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| १४ | डॉ प्रियंका प्रकाश दहीफळे | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| १५ | डॉ राजबाला रविंद्र निकम | ज्यु रेडीओलॉजीस्ट<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| १६ | डॉ अभिजीत माणिकराव डिकले | ज्यु रेडीओलॉजीस्ट<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| १७ | डॉ रोहित राजेंद्र सप्रे | ज्यु मायक्रोबायोलॉजीस्ट<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० व<br>संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| १८ | डॉ अंजली पदमाकर सोनवणे | आरएमओ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| १९ | डॉ सानिया मुस्ताक पटेल | आरएमओ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| २० | डॉ अजय नामदेव शिंदे | आरएमओ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| २१ | डॉ स्वाधीन किसनराव गाडेकर | आरएमओ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| २२ | डॉ राजासिंग राजिंदरसिंग<br>राजिंदरकौर अरोरा | आरएमओ<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| २३ | डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे | ज्यु पॅथोलॉजीस्ट<br>श्री साईनाथ रूग्णालय | ५४,६०० |
| २४ | डॉ जितेश मधुकर ठाकरे | आरएमओ<br>श्री साईनाथ रूग्णालय | ५४,६०० |
| २५ | डॉ पुनम सुनिलकुमार पाटील | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| २६ | डॉ स्वेता नारायण नेमाडे | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| २७ | डॉ संदीप चंद्रभान बनसोडे | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईनाथ रूग्णालय | ५४,६०० |
| २८ | डॉ वैशाली बालाजीराव हराळे | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | डॉ स्वप्नाली राम चव्हाण | निवासी वैद्यकीय अधिकारी<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५४,६०० |
| ३० | डॉ अमोल जालिंदर भोर | कॅज्युअल्टी मेडीकल ऑफीसर<br>श्री साईनाथ रूग्णालय | ५४,६०० |
| ३१ | डॉ उज्वला भाऊसाहेब काळे | मेडीकल ऑफीसर (दंत तज्ञ)<br>श्री साईनाथ रूग्णालय | ५४,६०० |

उपरोक्त वैद्यकीय अधिकारी यांना वेळोवेळी घेणेत आलेल्या मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आकृतीबंधामध्ये संबंधीत पदाचे मंजुर वेतनश्रेणीनुसार (बेसिक+ग्रेड पे+एनपीए) होणारे सुरवातीचे वेतनाएवढे मानधन दिलेले आहे. महागाई भत्त्यामध्ये दर सहा महिन्यानंतर वाढ होत असल्याने एकत्रित मानधनात बदल होतो व त्यानुसार त्या-त्या वेळी जाहिरातीद्वारे वैद्यकीय अधिका-यांच्या त्यावेळच्या महागाई भत्त्यानुसार एकत्रित मानधन देण्यात येते. परंतु पुर्वी नेमणेत आलेले वैद्यकीय अधिका-यांचे मानधन व सध्या देणेत आलेल्या जाहिरातीनुसार मानधनात फरक / तफावत राहत आहे. वरील अ.नं. ०१ ते ११ वैद्यकीय अधिका-यांना वेतनबॅन्ड रू.१५६००-३९१००, ग्रेड पे रू. ६६०० व अ.नं. १२ ते ३० वैद्यकीय अधिका-यांना वेतनबॅन्ड रू.१५६००-३९१०० ग्रेड पे रू. ५४०० या वेतनश्रेणीनुसार होणारे मानधनवर नेमणूका देणेत आलेल्या आहेत.

उपरोक्त वैद्यकीय अधिका-यांना नेमणेत आलेल्या पदांचे मंजुर वेतनश्रेणीनुसार सध्याचे महागाई भत्त्यानुसार होणारे एकत्रित मानधन खालीलप्रमाणे आहे.

| पे बॅन्ड<br>ग्रेड पे | मुळ<br>वेतन | महागाई भत्ता<br>(ग्रेड पे +मुळ वेतनx१३९%) | एन पी ए<br>(ग्रेड पे +मुळ वेतनx ३५%) | एकुण<br>वेतन | देय एकत्रित<br>मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| रू. १५६००-३९१००<br>रू. ६६०० | १८७५० | ३५२३७ | ८८७३ | रू.६९,४६० | रू.६९,००० |
| रू. १५६००-३९१००<br>रू. ५४०० | १५६०० | २९१९० | ७३५० | रू.५७,५४० | रू.५७,००० |

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये आवश्यक वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेकामी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये मंजुर आकृतीबंधानुसार संबंधीत पदांचे वेतनश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्त्यानुसार (उपरोक्त स्तंभ क्र ०७ मध्ये दर्शविलेप्रमाणे) मानधन नमुद केलेले आहे.

प्रस्ताव- तरी, उपरोक्त तक्त्यातील नेमणुक दिलेल्या वैद्यकीय अधिका-यांनाही त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या वेतनश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्त्यानुसार होणारे स्तंभ क्र ०७ मध्ये दर्शविलेले एकत्रित मानधन देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना त्यांचे संबंधीत पदासाठी मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद असलेल्या वेतनश्रेणीनुसार व सध्याचे महागाई भत्त्यानुसार एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३३** **डॉ.अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकिय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल हे दि.01.05.2015 पासुन आजपर्यंत कामावर गैरहजर असल्याने त्यांचेविरुध्द गैरवर्तन व गैरशिस्तीबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपपत्रातील दोषारोप सिध्द झालेले असून या प्रकरणात ते दोषी आढळून आलेले असल्याने दंडात्मक कारवाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम १४

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी हा समितीचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असेल. त्यास समितीच्या सर्वसाधारण नियंत्रणास अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समितीचे नियम अंमलात आणण्याचे अधिकार असतील.

(२) विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, मुख्य कार्यकारी अधिकारी, विश्वस्तव्यवस्थेची सर्व मालमत्ता व अभिलेख यांच्या अभिरक्षणेसाठी जबाबदार असेल तर तो, मंदिरास येणा-या अर्पण वस्तु गोळा करुन त्या ठेवण्याची योग्य ती व्यवस्था करील आणि समितीच्या नियंत्रणास अधील राहुन.

खंड क (२) समितीच्या कोणत्याही अधिका-याविरुध्द किंवा कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे.

**विनियम**:-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), सेवा(शिस्त आणि अपील) विनियम २०१३,

(६) शिस्तभंग प्राधिकारी :– (१) समिती विनियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दंडात्मक कारवाया संस्थानच्या कोणत्याही कर्मचा-यावर लादू शकते.

(२) उपविनियम (१) मधील तरतुदींना बाध न आणता मुख्य कार्यकारी अधिकारी विनियम ५मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही किरकोळ दंडात्मक कारवाया लादू शकतात.

प्रस्ताव:- डॉ. अमोल भगवंत सरदार यांना दि. ०९/०२/२००९ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये निवासी वैद्यकीय अधिकारी या पदावर नेमणूक देण्यात आलेली आहे. डॉ. सरदार हे दि. ०१/०५/२०१५ पासुन आज अखेरपर्यंत कामावर गैरहजर आहेत. डॉ. सरदार गैरहजर राहिल्यामुळे रुग्णसेवा विस्कळीत झाली. रुग्णांच्या रोषाला प्रशासनाला सामोरे जावे लागले. डॉ. सरदार यांच्या गैरवर्तनामुळे संस्थानच्या नावलौकिकास बाधा पोहोचली आहे. गैरशिस्तवर्तनाचे गांभिर्य विचारात घेऊन, त्यांना जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२३९५/२०१८ दि.२०/०२/२०१८ रोजीचे अभिकथनपत्र देण्यात आले असून अॅड. डॉ.मधुकर गिरी, लातुर यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. श्री.गिरी यांनी नियमाप्रमाणे खाते चौकशी पूर्ण करुन दि. ०६/०७/२०१८ रोजीचा खाते चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

गैरशिस्त वर्तनाचा तपशिल:- डॉ. अमोल सरदार, हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल येथे निवासी वैद्यकीय अधिकारी, म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दि. ०४/०२/२०१५ चे अर्जान्वये, सन २०१५ ते २०१७ दोन वर्षाची उच्च शिक्षणासाठी रजा मिळणेबाबत विनंती केली होती. त्यांचे अर्जास अनुसरुन, त्यांना जा.नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/६५०/२०१५ दि. ०८/०६/२०१५, अन्वये, पत्र देवून कळविण्यात आले आहे की, मा. व्य. स. समिती दि. २१/११/२०१० निर्णय क्र. ९३२ नुसार वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, पॅरामेडीकल स्टाफ व इतर कर्मचारी यांना अध्ययन / असाधारण रजेवर सोडणेबाबत नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीतील अट क्र. १ नुसार पहिले कर्मचारी परत आलेनंतरच एका वेळी दोन परिचारीका, एक वैद्यकीय अधिकारी, एक पॅरामेडीकल कर्मचारी व इतर पैकी ०१ असे कर्मचारी असाधारण रजेवर सोडण्यास सेवाज्येष्ठतेनुसार परवानगी देणेबाबत नमुद केलेले आहे. सध्या डॉ. राजश्री शिनगारे यांना उच्च शिक्षणासाठी असाधारण रजेवर सोडण्यात आलेले आहे.

तथापि, डॉ. राजश्री शिनगारे ह्या असाधारण रजेवर असल्याने, डॉ. सरदार यांची उच्च शिक्षणासाठी असाधारण रजा मंजूर करता येणार नाही, असे कळविले आहे.

प्र. वैद्यकीय संचालक यांनी दि. ०३/०१/२०१७ रोजी डॉ. सरदार यांचेबाबत गैरशिस्तवर्तनाचे रिपोर्ट केलेला आहे. डॉ. अमोल सरदार, दि. ०१/०५/२०१५ ते दि. ०३/०१/२०१७ पर्यंत गैरहजर राहिल्यामुळे रुग्णसेवा पुर्णपणे विस्कळीत झाली. रुग्णांच्या रोषाला प्रशासनाला सामोरे जावे लागले. डॉ. सरदार यांच्या गैरवर्तनामुळे संस्थानच्या नावलौकिकास बाधा पोहोचली आहे. तसेच इतर कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडतो. त्यांचे सदरचे कृत्य गैरशिस्त वर्तनात मोडते. सदर गैरशिस्त वर्तनाकरीता त्यांना जा.नं. एसएसएस/वशी-७ए/५४८१/२०१७ दि. २४/०१/२०१७, अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून सात दिवसांच्या आत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हास, संस्थान सेवेत स्वारस्य नाही, असे समजुन तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करणेत येईल, याची नोंद घ्यावी असे कळविण्यात आले होते. डॉ. अमोल सरदार अद्यापपर्यंत कामावर हजर झालेले नाहीत.

डॉ. सरदार हे कामावर हजर झालेले नसल्याने प्र. वैद्यकीय संचालक यांनी दि. ०७/०२/२०१७ रोजीचे गैरशिस्त रिपोर्ट सादर केले असुन डॉ. अमोल सरदार हे दि. ०४/०१/२०१७ ते दि. ०७/०२/२०१७ पर्यंत विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यांनी या आधी दि. ०१/०५/२०१५ ते दि. ०३/०१/२०१७ या कालावधीत गैरहजर

असल्याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५४८१/२०१७ दि. २४/०१/२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. डॉ. सरदार यांचे गैरहजेरीमुळे रुग्णसेवा विस्कळीत झाली. त्यांचे कामाचा बोजा इतर वैद्यकीय अधिकारी यांच्यावर आल्यामुळे त्यांचेवरील कामाचा ताण वाढला. रुग्णांना वेळेत सेवा देता आली नाही. त्यामुळे संस्थानच्या नावलौकिकास बाधा पोहचलेली आहे.

डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल हे दि. ०१/०२/२०१७ ते दि. ३१/१०/२०१७ पर्यंत विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यांना या आधी दि. ०१/०५/२०१५ ते दि. ०३/०१/२०१७ या कालावधीत गैरहजर असल्याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५४८१/२०१७ दि. २४/०१/२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. डॉ. सरदार यांचे गैरहजेरीमुळे रुग्णसेवा विस्कळीत झाली. त्यांचे कामाचा बोजा इतर वैद्यकीय अधिकारी यांच्यावर आल्यामुळे त्यांचेवरील कामाचा ताण वाढला. रुग्णांना वेळेत सेवा देता आली नाही. त्यामुळे संस्थानचे नाव लौकिकास बाधा पोहोचलेली आहे. असे त्यांचेविरुद्ध प्र. वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे दि. ०१/११/२०१७ रोजीचे निवेदन आलेले आहे. डॉ. सरदार यांचे सदरचे कृत्य हे गैरशिस्त वर्तनात मोडते.

डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३, विनियम ३ प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठ-ता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे. (१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

अशाप्रकारे डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) २०१३ चे कलम ३(१) अन्वये उपरोक्त कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

डॉ. सरदार यांनी उपरोक्त विनियमाचा भंग केल्याबाबत यांचे उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांचेवर जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२३९५/२०१८ दि. २०/०२/२०१८ अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपांची खाते चौकशी ॲड. श्री. मधुकर गिरी, लातुर खाते चौकशी अधिकारी यांनी पूर्ण करुन दि ०६/०७/२०१८ रोजीचा खाते चौकशी अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष दिलेला आहे.

बाबनिहाय निष्कर्ष –

१ विनापरवानगी गैरहजर राहणे– डॉ. अमोल सरदार हे दि. ०१/०५/२०१५ ते आजतागायत गैरहजर आहेत. गैरहजर राहण्याबाबत त्यांनी कोणतीही वरिष्ठांची परवानगी घेतली नाही. त्यांना वेळोवेळी म्हणजेच दि. ०६/०८/२०१४, ०३/०१/२०१७, २४/०१/२०१७, ०७/०२/२०१७, ०१/११/२०१७ प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांच्या रिपोर्टवरुन ते गैरहजर आहेत त्यावरुन त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेल्या आहेत. तरी ते उपस्थित झालेले नाही. त्यामुळे ते विनापरवानगी गैरहजर आहेत म्हणजेच त्यांनी त्यांच्या सेवेत प्रामाणिकपणा, एकनिष्ठता कायम राखलेली नाही हे स्पष्ट होते. यावरुन डॉ. सरदार हे विनापरवानगी गैरहजर आहेत. तुयामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ कलम ३ (१) चा भंग केलेला आहे. त्यांच्यावर ठेवण्यात आलेला विनापरवानगी गैरहजर राहणे हा दोषारोप सिद्ध होतो.

२ वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे - सुनावणीच्या वेळी अपचारी कर्मचारी हे नोटीसा देवूनही अनुपस्थित आहेत. तसेच विनापरवानगी गैरहजर बाबतही साईबाबा संस्थानने नोटीसा दिलेल्या आहेत तरीही ते उपस्थित नाहीत यावरुन ते वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करत नाही असे दिसुन येते. त्यांनी संस्थानच्या कर्मचा-यांच्या कर्तव्यात प्रामाणिकता, एकनिष्ठता व कर्मचा-याला साजेसे वर्तन केलेले नाही. त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३(१) चा भंग केलेला आहे. त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे हा दोषारोप सिद्ध होतो.

३ अनुपस्थितीमुळे रुग्ण सेवा विस्कळीत झाली त्यामुळे रुग्णांचे हाल झाले – डॉ. अमोल सरदार हे सुनावणीचे वेळेस अनुपस्थित आहेत. दि. ०१/०५/२०१५ पासुन आजतागायत अनुपस्थित आहेत त्यामुळे रुग्णांना तपासण्यासाठी सेवा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे रुग्णांचे हाल झाले आहेत असे दिसुन येते. त्यांनी संस्थानच्या कर्मचा-यांच्या कर्तव्यात प्रामाणिकता, एकनिष्ठता व कर्मचा-याला साजेसे वर्तन केलेले नाही. त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३ (१) चा भंग केलेला आहे. त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या अनुपस्थितीमुळे रुग्ण सेवा विस्कळीत झाली त्यामुळे रुग्णांचे हाल झाले हा दोषारोप सिद्ध होतो.

४ संस्थेच्या नावलौकिकास बाधा निर्माण झाली – डॉ. सरदार हे अनुपस्थित आहेत त्यामुळे रुग्णांचे हाल झाले आहेत. यावरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था याची बदनामी झालेली आहे. ही बदनामी भरुन न निघणारी आहे. त्यांच्या या गैरवर्तनामुळे संस्थेस बदनामी सहन करावी लागली आहे. त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३ (१) चा भंग केलेला आहे. त्यांच्यावर ठेवण्यात आलेला संस्थेच्या नावलौकिकास बाधा निर्माण झाली हा दोषारोप सिद्ध होतो.

यावरुन असे स्पष्ट होते की, डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपासंदर्भात अपचारी कर्मचारी यांनी मांडलेले म्हणणे, सादरकर्ता अधिकारी व साक्षीदार यांनी मांडलेले म्हणणे आणि आवश्यक असणारी देण्यात आलेली कागदपत्रे हे सर्व पाहिले असता, डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप क्र. ०१, ०२, ०३ व ०४ सिद्ध होत आहेत. त्यामुळे ते या प्रकरणात दोषी आढळून येत आहेत.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३ प्रकरण ३ विनियम ५ मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे -

किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय, किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे, सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो, तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी, पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (7) किंवा (8) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

विनियम ११ – आदेश कळविणे : -

शिस्तभंग प्राधिका-यांनी तयार कलेले आदेश संस्थानच्या कर्मचा-याला कळवण्यात येतील, तसेच त्याला शिस्तभंग प्राधिका-यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल, जर तो असेल तर, आणि दोषारोपातील प्रत्येक कलमासंबंधी निष्कर्ष दिले जातील, किंवा जेव्हा शिस्तभंग प्राधिकारी चौकशी नसतील तेव्हा चौकशी प्राधिका-याच्या अहवालाची प्रत आणि चौकशी प्राधिका-यांचे निष्कर्ष आणि मतभेदासंबंधीची संक्षिप्त कारणे, जर असतील तर, चौकशी प्राधिका-यांच्या निष्कर्षासहित, जर ती त्याला यापुर्वी देण्यात आली नसली तर, दिले जातील.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मत - डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांची खाते चौकशी करण्यात आली आहे. खाते चौकशी अधिकारी यांनी खाते चौकशी पूर्ण करुन दिलेल्या अहवाल व निर्णयानुसार डॉ. सरदार यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपपत्रातील दोषारोप सिद्ध झालेले असुन या प्रकरणात दोषी आढळून आलेले आहेत.

तरी उपरोक्त विनियम ५ (८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणेची दंडात्मक कारवाई करणेबाबत उपरोक्तप्रमाणे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे कृत्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) २०१३ चे कलम ३(१) अन्वये गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते. त्यामुळे गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३ प्रकरण ३ विनियम ५ (८) अन्वये डॉ. अमोल भगवंत सरदार, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना संस्थान सेवेतुन बडतर्फ करण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात न होणाऱ्या तपासण्या आऊटसोर्सिंग पध्दतीने करणेकामी पाच वर्ष कालावधीसाठी कोटेशन मागवून दर निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात दैनंदिन रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त व लघवीच्या तपासण्या केल्या जातात. परंतु, सर्व प्रकारच्या तपासण्या दोन्ही रुग्णालयातील लॅबमध्ये काही तांत्रिक कारणास्तव होऊ शकत नाहीत किंवा कोणत्याही एका लॅबमध्ये त्या होत नाहीत, त्यामुळे त्या बाहेरील लॅबमध्ये कराव्या लागतात. अशा तपासण्याचा खर्च जास्त असून त्याची क्वचित प्रमाणातच मागणी असते. त्यामुळे अशा तपासण्या रुग्णालयात आर्थिक व तांत्रिकदृष्टया करणे शक्य नसते. त्यामुळे अशा तपासण्या Outsource पध्दतीने कराव्या लागतात.

त्यामुळे सन २०१७-१८ या वर्षाकरीता दोन्ही रुग्णालयांमध्ये न होणा-या तपासण्याकामी Outsourcing पध्दतीने NABL मान्यता प्राप्त लॅबधारकांचे दर व त्यांची सर्व माहिती मागवून विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून दर मागविण्याच्या प्रस्तावास दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.१८० अन्वये मान्यता मिळालेली होती. परंतु तांत्रिक कारणास्तव उपरोक्त प्रस्तावास ई-निविदा मागविणेऐवजी कोटेशन मागविण्यास दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.८०५ अन्वये मान्यता घेण्यात आली होती.

त्यानुसार उपरोक्तकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयान्वये इकडील पत्र क्र.२५३१ दि.०४/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये एकुण १२ कोटेशनधारकांकडून विहित पध्दतीने कोटेशन मागवून निम्नत्तम दरधारक Krsnaa Diagnostics Private Limited, Pune यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३२२(११) अन्वये त्यांना इकडील पत्र क्र.८७५ दि.१३/०७/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. परंतु कार्यादेश गेल्यानंतर त्यांनी कामकाज सुरु न केल्यामुळे त्यांना इकडील पत्र क्र.१४१३ दि.०९/१०/२०१७ अन्वये स्मरणपत्र देऊन कार्यादेशानुसार कामकाज सुरु करणेकामी कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.२७/१०/२०१७ पासुन प्रत्यक्षात कामकाज सुरु केलेले असून ते अदयापपर्यंत कार्यादेशानुसार कामकाज करत आहेत.

तथापि Krsnaa Diagnostics Private Limited, Pune यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाचे कालावधीस ऑक्टोबर – २०१८ मध्ये एक वर्ष पुर्ण होणार असल्यामुळे पुढील कालावधीसाठी दोन्ही रुग्णालयांमध्ये न होणा-या तपासण्या Outsourcing पध्दतीने करणेकामी विहित पध्दतीने NABL मान्यता प्राप्त लॅबधारकांचे कोटेशन मागवून दर निश्चित करावे लागणार आहे.

त्या अनुशंगाने श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाला मागील दिलेल्या कार्यादेशामधील तपासण्यांमध्ये आणखी काही तपासण्यांचा समावेश करावा किंवा कसे ? याबाबत दि.२०/०६/२०१८ रोजी मा.वैद्यकिय संचालक यांचे स्वाक्षरीने पत्र देण्यात आले होते. त्यास अनुसरुन श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.०२/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये आणखी नविन तपासण्यांची यादी कळविली आहे.

परंतु श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने त्यांचेकडील अभिप्राय लवकर न कळविल्यामुळे त्यांना दि.२५/०८/२०१८ च्या पत्रान्वये मा.वैद्यकिय संचालक यांचे स्वाक्षरीने स्मरणपत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी दि.२८/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कुठलाही बदल न करणेबाबत पत्र दिलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील दोन्ही प्रयोगशाळा विभागांचे अभिप्रायानुसार ६४ प्रकारच्या तपासण्या Outsource पध्दतीने कराव्या लागणार व त्याकरीता मान्यता प्राप्त लॅबधारकांकडून कोटेशन मागवून पुढील पाच वर्षाकरीता दर निश्चित करावे असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात न होणा-या तपासण्या Outsourcing पध्दतीने करणेकामी विहित पध्दतीने मान्यता प्राप्त लॅबधारकांकडून कोटेशन मागवून पुढील पाच वर्षाकरीता दर निश्चित करणेकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात न होणाऱ्या तपासण्या आऊटसोर्सिंग पध्दतीने करणेकामी NABL मान्यता प्राप्त लॅबधारकांकडून तपासण्यांचे निकष व तपासण्यांची पध्दती (method) ठरवून एक वर्ष कालावधीसाठी कोटेशन मागवून दर निश्चित करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३५** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव

प्रास्ताविक:- श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामधुन सर्व वॉर्ड व ओ.टी.मध्ये कपडे दिले जातात. ते आता अतिशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले आहे.तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झालेले आहेत.सदरचे लिनन रोजच्या वापरामुळे खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक,०१/०१/२०१७ ते ३०/०६/२०१७ पर्यत सर्व विविध वॉर्ड/ ओ.टी. विभागातुन खराब लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक २९/०८/२०१७ निर्णय क्र.१४अन्वये नष्ट केलेले असुन,सदर लिननची खरेदी एकुण किंमत रु.३,५१,००८/-( अक्षरी रुपये तीन लाख एक्कावन्न हजार आठ मात्र) इतकी होती.

त्यानंतर दि.०१/०७/२०१७ ते ३०/०६/२०१८पर्यतचे विविध वॉर्ड /ओ.टी. विभागातुन खराब लिनन जमा झालेले असून त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे.सदर लिनन खरेदीची एकुण किमंत रु.५,०९,२७०/- (अक्षरी रु.पाच लाख नऊ हजार दोनशे सत्तर मात्र) इतकी आहे.पंरतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्यपरिस्थितीसह त्याची किंमत निरंक आहे. तसेच संस्थानच्या अंतर्गत लेखापरिक्षण विभागामार्फत त्याची तपासणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी व योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखित करणे गरजेचे आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- तरी सोबतच्या तक्त्यातील लिनन साठा रजिष्टरमधुन निर्लेखित करुन ते जाळून नष्ट करता येईल, तरी सदरचा प्रस्ताव निणयार्थ सादर.

**निर्णय क्र.६११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करुन ते जाळून नष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३६** **श्री साईनाथ रुग्णालयातील सद्यस्थितीला लागु असलेल्या वैद्यकिय सेवा आकाराच्या पुन:र्निश्चीतीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र - नवीन प्रस्ताव.

प्रास्तविक- समाजातील तळा–गाळातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर रुग्णालयांत एकुण ३०० बेड अंर्तरुग्ण विभागात कार्यरत आहेत. या रुग्णालयांत रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभुत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

सदरचे सेवा दर हे मा.व्यवस्थापन मंडळ ठराव नं.१२० दि.०३/०२/१९९१ प्रमाणे लागु करणेत यावेत असा दि.२८/०३/१९९१ रोजीचा मा.कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार रुग्णालयातील वैद्यकीय सेवा आकाराबाबतचे दर लागू करणेत आले .

त्यानंतर दि.२२/११/१९९१ च्या आदेशाने सोनोग्राफी व आयसीयु विभागातील दर निश्चीत करणेत आलेले होते.त्यानंतर वेळोवेळी व्यवस्थापन समितीच्या ठरावाने तसेच कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाने रुग्णालयातील विविध तपासण्या व उपचार यामध्ये वाढ करुन त्याअनुषंगाने सदरचे दर निश्चीत करणेत आले होते.तदनंतर शासन निर्णय क्रं. संकीर्ण २०१३/प्र.क्र.४६२/भाग २/आरोग्य ३ दि. २८/१२/२०१५ च्या दरानुसार

रक्तपेढीच्या दरामध्ये फेरबदल करणेत आलेल होते.तसेच सन २००६ साली श्री साईबाबा रुग्णालयाची स्थापना करणेत येवुन त्यांचे दर निश्चीत करणेत आले.सदयस्थितीला श्री साईनाथ रुगणांलयातील दरांचा विचार करता सदरचे दर हे सन १९९१ पासुन कार्यान्वीत झालेले आहेत.याअनुषंगाने रुग्णालयाची चॅरिटी व सेवा आकार ही तत्कालीन दराप्रमाणे ज्या रुग्णांना चॅरिटी दिली त्याप्रमाणे दाखविली जात होती.परंतु आज २६ वर्षानंतरही सदरच्या चॅरीटीच्या रकमेच्या दरात फारसा बदल वा फारशी वाढ झालेली दिसुन येत नाही.

श्री साईनाथ रुग्णालयातील मा.व्यवस्थापन समिती ठराव दि.२२/१२/२०१६ निर्णय क्रं.९४४ नूसार संपुर्ण समाजातील सर्व स्तरातील रुग्णांना उपचार मोफत करणेत आलेले असून सदर बाबत रुग्णालयामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्यानूसार रुग्णालयातील केसपेपर विभागातून नवीन केसपेपरसाठी रु.१०/- तसेच जुन्या केसपेपरसाठी देखील रु.१०/-इतके शुल्क आकारुन रुग्णांस मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत विषय क्र.६ अन्वये मोफत उपचारांबाबत नियमावली मान्यतेसाठी सादर करणेत आलेली होती. त्यावर निर्णय क्र.६ अन्वये नियमावलीतील खालील मुद्यांना मान्यता मिळाली.

३.) श्री साईनाथ रुग्णालयातील कोणत्याही भरती रुग्णांना रक्त व रक्तघटकांची गरज पडते अशा वेळेस रक्तपिशव्या किंवा रक्तघटक श्री साईनाथ रक्तपेढीतून वेळोवेळी मोफत देणेत यावेत.

४.) श्री साईनाथ रुग्णालयात बाहयरुग्ण विभागात आलेला रुग्ण १० रु.च्या एका केसपेपरवर पॅथॉलॉजी,रेडिओलॉजी, व इतर विभागातील तपासण्या करुन घेवू शकतो. तसेच एका रुग्णास एका दिवसात फक्त एकाच डॉक्टरांकडे उपचार घेता येतील. जर संबंधित डॉक्टरांनी दुस-या डॉक्टरांकडे रेफर केल्यास त्याच केसपेपरवर इतर विभागात तपासणीसाठी जाता येईल.

५.) खाजगी डॉक्टरांनी सांगितलेल्या तपासण्या रुग्णालयात करण्यात येणार नाहीत.

६.) रुग्णालयातून डिसचार्ज घेतलेल्या रुग्णास घरी जाणेकामी मोफत अॅब्युलन्स सेवा देता येणार नाही. रुग्णास इतर रुग्णालयात रेफर केल्यास अत्यावश्यक वेळेस मोफत देणेत येईल.

मुददा क्रं.८) नुसार रुग्णालयात उपलब्ध नसलेली औषधे व आर्थो इंप्लांटस रुग्णांनी स्वता: विकत आणणेबाबत नमुद करणेत आलेले होते.

श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांस मोफत उपचार पुरविले जात असलेमुळे गरीब व गरजु रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय हे ५३ वर्षापासुन मोठे वरदान ठरलेले आहे.श्री साईनाथ रुग्णालयात सध्या अॅलोपथी,होमिओपॅथी व आयुर्वेदिक असे विविध उपचार पदधतीने रुग्णांना उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये विविध वार्डामध्ये विविध प्रकारचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात.त्यांना उपचारासाठी आपले रुग्णालयांत उपलब्ध असलेले इंजेक्शन,औषधे व इतर उपचार देणेत येऊन सदर इंजेक्शन व उपचारांची किंमत रुग्ण डिस्चार्ज होतेवेळी बिलाव्दारे वसुल करण्यात येत होती.परंतु वर नमुद केलेप्रमाणे सदरचे उपचार मोफत केलेले असलेमुळे बिलाची रक्कम चॅरीटी म्हणून खर्ची टाकणेत येत आहे.

श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णा ालय आहे.सदर रुग्णालयाची दैनंदिन ओपीडीची रुग्णसंख्या ही साधारण ७००ते ८०० होती.परंतु मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्रं.९४४ ,दि.२२/१२/२०१६ अन्वये, श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवुन त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि.०१/०१/२०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार सर्वासाठी मोफत करणेबाबत निर्णय घेणेत आलेमुळे दैनंदिन ओपीडीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे.तसेच रुग्णालयातील काही वैद्यकीय अधिका-यांची नव्याने काही उपचार व शस्त्रक्रिया करणेची तयारी दर्शविलेली आहे.

**सन २०१४ ते सन २०१७ या वर्षीचा श्री साईनाथ रुग्णालयाची ओपीडी,आयपी व शस्त्रक्रिया संख्या खालीलप्रमाणे –**

| अ.नं. | रुग्णालयाचे नांव | वर्ष | ओपीडी रुग्णसंख्या | आय पी रुग्णसंख्या | शस्त्रक्रिया संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईनाथ रुग्णालय | एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ | २,९७,०९७ | १२,२७९ | ८,६८८ |
| २ | श्री साईनाथ रुग्णालय | एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ | २,८६,४२६ | ११,६४८ | ७,४१४ |
| ३ | श्री साईनाथ रुग्णालय | एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ | ३,१४,८१२ | १३,५६० | ९,१८५ |

**सन २०१४ ते सन २०१७ रुग्णांना दिलेली सवलत खालीलप्रमाणे –**

| अ.नं. | वर्ष | रुग्ण संख्या | सवलत पोटी खर्च झालेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ | ५,१२१ | रु.३४,१०,३८९/- |
| २ | एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ | ४,७२७ | रु.३४,४३,४२५/- |
| ३ | एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ | ९९,९७९ | रु.१०,१०९,८३२/- |

**सन २०१४ ते सन २०१७ या कालावधीतील रुग्णालयाच्या उत्पन्नाचा,आस्थापनेचा व इतर खर्च खालीलप्रमाणे –**

| अ.नं. | तपशील | वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ |
| १) | **उत्पन्न** | | | |
| **अ)**श्री साईनाथ रुग्णालय / ब्लड बँक | | २६,७९७,५८४ | २७,००७,१७५ | ३०,३५४,१४५ |
| | | | | |
| | **खर्च** | | | |
| | कायम/ कंत्राटी/आऊटसोर्स कर्मचारी पगार | १३४३६२३८६ | १४८४६१५०० | १५७१२६९६६ |
| | **रुग्णालयावरील इतर खर्च** | ४१,५५५,०६५ | ३७,९८४,८४४ | ४१,५२२,७५२ |
| २) | **ब)** एकुण खर्च | १७५,९१७,४५१ | १८६,४४६,३४४ | १९८,६४९,७१८ |
| | निव्वळ तुट (**अ –ब**) | -१४,९१,१९,८६७ | -१५,९४,३९,१६९ | -१६,८२,९५,५७३ |

वरील रकमा श्री साईबाबा हॉस्पीटलच्या वित्त विभागाकडुन तपासुन घेण्यात आलेल्या आहेत.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-

विभागाचा अभिप्राय व स्पष्ट मत- वरील सर्व बाबींचा विचार करता श्री साईनाथ रुग्णालयातील सेवाआकार दरांबाबत फेरविचार करणे आवश्यक वाटते. याकरीता सोबत शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे परिपत्रक दर व श्री साईबाबा रुग्णालयातील सदयस्थितींचे सेवा आकांराचे दरपत्रक जोडलेले आहे.तसेच या दोन्ही रुग्णालयातील सेवाआकार व श्री साईनाथ रुग्णालयातील सेवाआकार याचा अभ्यास करुन तौलानिक तक्ता सोबत जोडलेला आहे.सदर तौलानिक तक्त्याचा अभ्यास करता शासन दराप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयात दर लागु केलेस ३ ते ४ पटीने सदर दरामध्ये वाढ होऊ शकते. तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील दर लागु केलेस ५ ते ६ पटीने सदर दरामध्ये वाढ होऊ शकते.

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील सदयस्थितीला लागू असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत,असे मत आहे.परंतु श्री साईनाथ रुग्णालयातील काही विभाग हे श्री साईबाबा रुग्णालयात अस्तित्वात नसलेमुळे सदरच्या दरांची तुलना श्री साईबाबा रुग्णालयातील तत्सम उपचारांशी करुन ते दर लागु करणेत यावे असे मत आहे. तसेच नव्याने काही उपचार व शस्त्रक्रिया करणे सुरु केलेनंतर त्यांचेही दर श्री साईबाबा रुग्णालयातील दराशी तुलना करुन निश्चीत करता येतील असे मत आहे. उदा. श्री साईनाथ रुग्णालयात होणा-या मायनर सर्जरीचे दर हे श्री साईबाबा रुग्णालयात असणा-या मायनर सर्जरीच्या दराइतकेच निश्चीत करता येतील. तशाच प्रकारचे मायनर, मेडीयम व सुपरा मेजर या सर्जरीचे दर देखील श्री साईबाबा रुग्णालयातील दराप्रमाणेच निश्चीत करावेत असे मत आहे. तसेच काही उपचार शस्त्रक्रिया हे साईबाबा रुग्णालयात होत नाहीत परंतु शासकीय रुग्णालयात होत आहेत अशा उपचारांचे दर शासनाच्या दराप्रमाणे घेता येतील. सदरचे दर लागु झालेनंतर श्री साईनाथ रुग्णालयाची चॅरीटीची रक्कम ही अंदाजे ५ ते ६ पटीने वाढु शकते,असे मत आहे.

तसेच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षानी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षानी १० टक्के वाढ करणेत यावे असे मत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षानी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षानी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक ०१.१०.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६१३** दिनांक ०१.१०.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

१. **श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाशी चर्चा वाटाघाटी करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचेनांव | श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल करीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेबाबत |
| ०२ | प्रशासकीय मान्यता | मा. व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१८ निर्णय क्रं. ४७२ |
| ०३ | अंदाजे खर्च | **८,८२,०००/-** |
| ०४ | प्रस्तावाची थोडक्यात माहिती. | श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 150 Cum/Day) येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयत्र उभारणेत आलेले आहे. सदर प्रकल्पाची प्रत्येक वर्षी AMC देण्यात येत असते. मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८३१(८) अन्वये सदर प्रकल्पाचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC)चे काम ठेकेदार मे. ग्रीन सायंटिफीक डेव्हलोपमेंट (इ) प्रा. लि., मुंबई यांना एक वर्षासाठी रुपये ८,४०,०००/- मात्रचे रकमेत (दोन्ही प्लॅन्ट रुपये ७०,०००/- प्रती महिना) दिनांक ०१/१०/२०१७ ते दिनांक ३०/०९/२०१८ या कालावधीसाठी देणेत आलेले आहे. सदरचा कालावधी हा दिनांक ३०/०९/२०१८ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यानंतर सांडपाणी प्रक्रिया सयंत्राची पुढिल एक वर्ष कालावधीकरीता AMC देणेकामी ई-निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे. |
| ०५ | ई-निविदा तपशिल - | महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा प्रसिध्द व करून ई-निविदा मागविणेत आली होती. ई-निविदा भरण्याची मुदत दिनांक २०/८/२०१८ ते दिनांक २८/०८/२०१८ अखेर होती. |
| | कामाची मुदत | ३६५ दिवस |
| | तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक व वेळा | दिनांक ३०/०८/२०१८ सकाळी ११:०० वाजता |
| | प्राप्त ई-निविदा | ०४ |
| | प्राप्त ई-निविदाधारकांनी सर्व आवश्यक | होय . |

| | | |
|---|---|---|
| | कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का? | |
| | सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले कागदपत्रे जमा केले आहेत का ? | होय |
| ०६ | मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रूपये | रक्कम रु. ८,४०,०००/- |
| | मागील निम्नत्तम दरधारक | मे. सांयट्रीफिक डेव्हलपमेंट प्रा. लि. मुंबई |

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा ॲटमवाईज तपशील.

| अ.नं. | निविदाधारकांचेनाव | ई निविदेतील प्राप्त दर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.ग्रीन सांयट्रीफिक डेव्हलपमेंट प्रा. लि. मुंबई | ८,६४,०००.०० | L१ |
| २ | मे. ऑक्सीपी सोल्युशन लि. मुंबई | १०,४५,०००.०० | L३ |
| ३ | मे. पानसे कन्सलटंट, पुणे | ९,६०,०००.०० | L२ |
| ४ | मे. स्पॅन हायड्रोटेक प्रा. लि. पुणे | १६,५२,७२८.०० | L४ |

उपरोक्त तपशिलानुसार,

श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल करीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी मे.ग्रीन सांयट्रीफिक डेव्हलपमेंट प्रा. लि. मुंबई यांचे दर रक्कम रूपये–८,६४,०००/- (अक्षरीरक्कमरूपये–आठ लाख चौसष्ट हजार ) मात्र निम्नत्तम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करून पुढील कार्यवाही करणेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.ग्रीन सांयट्रीफिक डेव्हलपमेंट प्रा. लि. मुंबई हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते, उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी निम्नतम दरधारक मे.ग्रीन सांयट्रीफिक डेव्हलपमेंट प्रा. लि. मुंबई यांचे रक्कम रु.८,६४,०००/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

२. **संस्थानचे विविध विभागांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या युपीएससाठी आवश्यक बॅट-या खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारकांना चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविणेबाबत.**

संस्थानचे विविध विभागांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या युपीएससाठी आवश्यक बॅट-या खरेदी करणेसाठी, दरकरार निश्चित करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल. | **युपीएससाठी आवश्यक बॅट-या खरेदी करणेसाठी, दरकरार निश्चित करणे.** |
| ०२ | मागणी | (see table below) |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.२४.०७.२०१८ ते दि.०९.०८.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट (sai.org.in) व पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | ०५ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले आहे. |

| Sr. No. | Batteries Brand | Specification of Material |
|---|---|---|
| 01 | EXIDE<br>LIMINIOUS<br>QUANTA<br>SF SONOC | 12 Volt 07 Ah |
| 02 | | 12 Volt 18 Ah |
| 03 | | 12 Volt 26 Ah |
| 04 | | 12 Volt 42 Ah |
| 05 | | 12 Volt 65 Ah |
| 06 | | 12 Volt 100Ah |

| | | |
|---|---|---|
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि.२४.०७.२०१८ सकाळी ११:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.१४.०८.२०१८<br>व्यावसायीक निविदा- दि.२४.०८.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०३ (तीन) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०३ (तीन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ? | लागू नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ? | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | लागू नाही. |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

| अ.नं. | निविदाकाराचे नाव | सादर केलेले दर (प्रती नग रु.) | स्थिती |
|---|---|---|---|
| EXIDE LIMINIOUS QUANTA SF SONOC 12 Volt 07 Ah | | | |
| 01 | M/s. Microtronics Aurangabad | 715.00 | L1 |
| 02 | M/s. Emergency Electronic Security India Pvt., Ltd Mumbai | 8,922.62 | L3 |
| 03 | M/s. Accutech Infosystems Pvt., Ltd | 780.00 | L2 |
| EXIDE LIMINIOUS QUANTA SF SONOC 12 Volt 18 Ah | | | |
| 01 | M/s. Microtronics Aurangabad | 1,858.00 | L1 |
| 02 | M/s. Emergency Electronic Security India Pvt., Ltd Mumbai | 5,910.53 | L3 |
| 03 | M/s. Accutech Infosystems Pvt., Ltd | 2,028.00 | L2 |
| EXIDE LIMINIOUS QUANTA SF SONOC 12 Volt 26 Ah | | | |
| 01 | M/s. Microtronics Aurangabad | 2,498.00 | L1 |
| 02 | M/s. Emergency Electronic Security India Pvt., Ltd Mumbai | 4,290.82 | L3 |
| 03 | M/s. Accutech Infosystems Pvt., Ltd | 2,656.00 | L2 |
| EXIDE LIMINIOUS QUANTA SF SONOC 12 Volt 42 Ah | | | |
| 01 | M/s. Microtronics Aurangabad | 3,834.00 | L2 |
| 02 | M/s. Emergency Electronic Security India Pvt., Ltd Mumbai | 2,841.60 | L1 |
| 03 | M/s. Accutech Infosystems Pvt., Ltd | 4,115.00 | L3 |
| EXIDE LIMINIOUS QUANTA SF SONOC 12 Volt 65 Ah | | | |
| 01 | M/s. Microtronics Aurangabad | 5,170.00 | L2 |
| 02 | M/s. Emergency Electronic Security India Pvt., Ltd Mumbai | 2,173.82 | L1 |
| 03 | M/s. Accutech Infosystems Pvt., Ltd | 5,600.00 | L3 |
| EXIDE LIMINIOUS QUANTA SF SONOC 12 Volt 100 Ah | | | |
| 01 | M/s. Microtronics Aurangabad | 8,066.00 | L2 |
| 02 | M/s. Emergency Electronic Security India Pvt., Ltd Mumbai | 824.06 | L1 |
| 03 | M/s. Accutech Infosystems Pvt., Ltd | 8,672.00 | L3 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर (दरकरार) –

| Sr.No | Year-2017-2018 | UOM | Amount |
|---|---|---|---|
| 01 | 12 Volt 07 Ah (AMRON QUANTA) | Nos | 1,050.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 02 | 12 Volt 18 Ah (AMRON QUANTA) | Nos | 1,575.00 |
| | | 03 | 12 Volt 26 Ah (AMRON QUANTA) | Nos | 1,849.00 |
| | | 04 | 12 Volt 42 Ah (AMRON QUANTA) | Nos | 2,944.00 |
| | | 05 | 12 Volt 65 Ah (AMRON QUANTA) | Nos | 4,106.00 |
| | | 06 | 12 Volt 100Ah (AMRON QUANTA) | Nos | 6,256.00 |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल -

| अ.नं. | तपशील | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|---|
| ०१ | 12 Volt 26 Ah (AMRON QUANTA) | २०१७ | १४,७९२/- |
| ०२ | 12 Volt 18 Ah (AMRON QUANTA) | २०१७ | १,२६,०००/- |
| एकूण रक्कम | | | १,४०,७९२/- + टॅक्स |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक | निरंक |
| १६ | मागील खरेदी दर | अ.नं. १३ प्रमाणे |

१७ मागील पुरवठादार

| अ.नं. | वस्तूचे वर्णन | पुरवठादाराचे नाव |
|---|---|---|
| 01 | 12 Volt 26 Ah (AMRON QUANTA) | M/s. Microtronics Aurangabad |
| 02 | 12 Volt 18 Ah (AMRON QUANTA) | |

१८ सध्याचे निम्नत्तम निविदा काराने सादर केलेले दर

| Sr. No. | Specification of Material | Amount |
|---|---|---|
| 01 | 12 Volt 07 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 715.00 |
| 02 | 12 Volt 18 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 1,858.00 |
| 03 | 12 Volt 26 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 2,498.00 |
| 04 | 12 Volt 42 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 2,841.60 |
| 05 | 12 Volt 65 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 2,173.82 |
| 06 | 12 Volt 100Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 824.06 |

१९ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराचे नाव

| Sr. No. | Name of Bidder | Specification of Material |
|---|---|---|
| 01 | M/s. Microtronics Aurangabad | 12 Volt 07 Ah |
| 02 | | 12 Volt 18 Ah |
| 03 | | 12 Volt 26 Ah |
| 04 | M/s. Emergency Electronic Security India Pvt., Ltd Mumbai | 12 Volt 42 Ah |
| 05 | | 12 Volt 65 Ah |
| 06 | | 12 Volt 100Ah |

| | | |
|---|---|---|
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रकल्प खरेदी समितीस मोर सादर करणेत आला असल्यास उपस्थितांची नावे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी तथा उपकार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.विभागप्रमुख, आयटी विभाग. |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कम रुपये ----प्रतिसेट मार्केट रेट रुपये ---- | |
| २३ | मागील खरेदी रु.-------------- सध्याचे प्राप्त दर रु.---------------------- फरक रु.----------- % ने कमी/जास्त रु.----------------- | |

| अ.नं. | तपशिल | मागील खरेदी दर | सध्याचे दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 12 Volt 07 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 1,050.00 | 715.00 | 335.00 | 32 % ने कमी |
| 02 | 12 Volt 18 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 1,575.00 | 1,858.00 | 283.00 | 18 % ने जास्त |
| 03 | 12 Volt 26 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 1,849.00 | 2,498.00 | 649.00 | 35 % ने जास्त |
| 04 | 12 Volt 42 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 2,944.00 | 2,841.60 | 102.4 | 03 % ने कमी |
| 05 | 12 Volt 65 Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 4,106.00 | 2,173.82 | 1932.18 | 47 % ने कमी |
| 06 | 12 Volt 100Ah (EXIDE/LIMINIOUS/QUANTA/SF SONOC) | 6,256.00 | 824.06 | 5431.94 | 87 % ने कमी |

२४. संक्षिप्त टिप:- संस्थानचे विविध विभागांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या युपीएससाठी

आवश्यक बॅट-या खरेदी करणेसाठी, दरकरार निश्चित करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या दरामध्ये मुद्दा क्र.१८ व १९ मध्ये नमुद केलेप्रमाणे अ.नं.०१ ते ०३ साठीचे M/s. Microtronics Aurangabad यांचे दर निम्नत्तम असून अ.नं.०४ ते ०६ साठीचे M/s. Emergency Electronic Security India Pvt Ltd Mumbai यांनी देऊ केलेले दर हे निम्नत्तम आहेत.

M/s. Emergency Electronic Security India Pvt Ltd Mumbai यांनी दि.२७ ऑगष्ट, २०१८ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांचेकडून ऑनलाईन वाणिज्यिक निविदा भरतांना नजरचुकीने दर हे उलटया क्रमाने भरलेबाबत कळविलेले आहे. ई-मेलमध्ये त्यांनी नमुद केलेप्रमाणे त्यांनी भरलेल्या दरांची क्रमवारी दुरूस्त केल्यास अ.क्र.०१ ते ०६ साठी M/s. Microtronics Aurangabad यांनी देऊ केलेले दर हे निम्नत्तम ठरतात.

सबब, संस्थानचे विविध विभागांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या युपीएससाठी आवश्यक बॅट-या खरेदी करणेसाठी, दरकरार निश्चित करणेकामी निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s. Microtronics Aurangabad व M/s. Emergency Electronic Security India Pvt Ltd Mumbai यांना त्यांनी देऊ केलेल्या दरांबाबत चर्चा व वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामीचा विषय मा.उपसमितीचे सभेत शिफारशीसाठी सविनय सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील अ.नं.०१ ते ०३ साठीचे निम्नत्तम दरधारक M/s. Microtronics Aurangabad हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळयाच्या व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर व्यवस्था तसेच उत्सव व सुटयांचे कालावधीत तात्पुरते निवास व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६३,८६,७१८/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेत मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार सदरहू कामी ई-निविदा तयार करुन संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.१८/०९/२०१८ अखेर ई- निविदा मागविणेत आल्या. |
| ५) | निविदा तपशिल | ई-निविदा अपलोड करणेचे दि.१८/०९/२०१८ रोजी पर्यंतचे मुदतीत खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.<br>१) कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर<br>२) कला साधना, नाशिक<br>३) मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर<br>४) निकिता एस.बी.एस.को.ऑ.सोसायटी लि., औरंगाबाद<br>५) ऋतूजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद<br>६) वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा |
| अ) | निविदा कालावधी | दि.१०/०९/२०१८ ते दि.१८/०९/२०१८ |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.२१/०९/२०१८, सकाळी ११.०० वाजता |
| क) | निविदा प्रक्रीयेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०६ (सहा) |
| ड) | सर्व निविदा धारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | होय. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहे काय ? | होय. ईएमडी रक्कम रु.६३,९००/- चा तपशिल अनुक्रमे खालीलप्रमाणे आहे.<br>1) UTR NO. IGAEJDFSJ8 Dtd- 17/09/2018<br>2) UTR NO. IGAEJPTE17 Dtd- 18/09/2018<br>3) UTR NO. IGAEJMVNW1 Dtd- 17/09/2018 |

| | | |
|---|---|---|
| | | 4) UTR NO. IGAEJGIP14 Dtd- 18/09/2018<br>5) UTR NO. IGAEJPLHX3 Dtd- 18/09/2018<br>6) UTR NO. IGAEJPWZR3 Dtd- 18/09/2018 |
| ई) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ६३,८६,७१८/- |
| | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिल – | |

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर | ४४,२२,९४६.५५ | निम्नतम |
| ०२ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ४८,४८,१९७.४२ | |
| ०३ | वायुनंदन मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, नेवासा | ५७,२९,०१४.५० | |
| ०४ | ऋतूजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | ५८,९६,९२९.५० | |
| ०५ | कला साधना, नाशिक | ९५,३१,१६५.५० | |
| ०६ | निकिता एस.बी.एस.को.ऑ.सोसायटी लि., औरंगाबाद | १०४,२७०,६७.५० | |

**(७) निम्नतम निविदाधारकाचा तपशिल –**

| | | |
|---|---|---|
| अ) | ठेकेदाराचे नाव | मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ब) | निविदा रक्कम | रु. ४४,२२,९४६.५५ |
| क) | निविदा टक्केवारी कमी/अधिक | **३०.७४८% कमी** |

| | | |
|---|---|---|
| (८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा.व्यवस्थापन समिती,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

वरील नमूद तपशिलानुसार सन २०१८-१९ या वर्ष भरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळा, दिपावली, नाताळ सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतरअनुषंगीक व्यवस्था उभारणे कामी प्राप्त निविदाधारकांचे उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक लिफाफाचे तुलनात्मक तक्त्यानुसार ठेकेदार मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे दर रक्कम रु.४४,२२,९४६.५५ मात्र निम्नतम आहे.

तरी याकामी ठेकेदार यांना मा.उपसमितीचे सभेपुढे बोलवून त्यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मार्फत सन २०१८-१९ या वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळा,दिपावली, नाताळ सुट्टयांचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी निम्नतम निविदाधारक मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे निम्नतम दर रक्कम रु. ४४,२२,९४६.५५ मात्र स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने खालील आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली**

१४. **श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ कीर्तनकार ठरविणे व मानधन निश्चित करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय -** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०९ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ साठी अनुभवी कीर्तनकाराची निवड करण्यात यावी, तसेच समिती सदस्य मा. ॲड. मोहन जयकर साहेब यांनी नावे सुचवावीत, असे ठरले.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थानमार्फत साजरा होणा-या श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ (दि. १७,१८,१९ ऑक्टोबर २०१८) मध्ये खालील कीर्तनकार यांनी कीर्तन सेवेची संधी मिळणेबाबत विनंती केली आहे. तीन दिवसांचे तीन कीर्तन सेवांचे साथीदारांसह मानधन खालील प्रमाणे.

| अ.नं. | किर्तनकारांचे नाव | मानधन |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प. प्रशांत धोंड, शंकरवाडी, सिंधुदुर्ग | १८०००/- |
| ०२ | ह.भ.प. विवेक गोखले, नृसिंहवाडी | ६०,०००/- |
| ०३ | ह.भ.प. डॉ. दिलीप डबीर, नागपुर | १,००,०००/- |
| ०४ | ह.भ.प. समीहन चंन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | संस्थान देईल ते |

संस्थानतर्फे साजरे केल्या जाणा-या उत्सवातील कीर्तन मंदिराच्या उत्तर बाजूच्या स्टेजवर होते.

ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण, गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकारांचे कीर्तन श्री रामनवमी उत्सवात ठेवण्यात येते ही परंपरा ह.भ.प. दासगणू महाराज यांनी स्वत: रामनवमी उत्सवात कीर्तन सेवा देण्यास सुरुवात केल्यापासून आजतागायत अखंडीत चालू आहे. तयानुसार ह.भ.प. दासगणू महाराज प्रतिष्ठाण गोरटे यांनी पाठविलेल्या कीर्तनकारांचे कीर्तन रामनवमी उत्सवात परंपरेनुसार ठेवले जाते.

संस्थानमार्फत गुरूपौर्णिमा व पुण्यतिथी उत्सवात कीर्तनकारांचे प्राप्त झालेले सर्व अर्ज एकत्रित करून कीर्तनकारांचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात येतो. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन योग्य कीर्तनकाराची निवड व मानधनाबाबत निर्णय घेण्यात येतो.

गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवात श्री रामनवमी उत्सावाप्रमाणे कोणत्याही कीर्तनकाराची कीर्तन सेवा करण्याची परंपरा नाही. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे कीर्तनकाराची निवड केली जाते.

**श्री पुण्यतिथी उत्सवात सेवा दिलेल्या कीर्तनकारांची नांवे खालीलप्रमाणे..**

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव | पुण्यतिथी उत्सवात कीर्तन सेवा दिलेले साल |
|---|---|---|
| ०१ | ह.भ.प.शरद महाराज नेरळकर, नांदेड | दि.१/१०/२००६ ते दि.४/१०/२००६ |
| ०२ | ह.भ.प.शरद महाराज नेरलकर नांदेड | दि.२०/१०/२००७ ते दि.२३/१०/२००७ |
| ०३ | ह.भ.प.मंदार गंगाधर व्यास, डोंबीवली | दि.८/१०/२००८ ते दि.१०/१०/२००८ |
| ०४ | ह.भ.प. मनोहर दिक्षीत, औरंगाबाद | दि.२७/०९/२००९ ते दि.२९/०९/२००९ |
| ०५ | ह.भ.प.श्री. शरद महाराज नेरलकर, नांदेड | दि.१६/१०/२०१० ते दि.१९/१०/२०१० |
| ०६ | ह.भ.प.श्री.मनोहर महाराज, कोकलेगांवकर | दि.५/१०/२०११ ते दि.८/१०/२०११ |
| ०७ | ह.भ.प.मनोहर वा.कोकलेगांवकर, नांदेड | दि.२३/१०/२०१२ ते दि.२६/१०/२०१२ |
| ०८ | ह.भ.प. मनोहरबुवा बाळकृष्ण दिक्षित, औरंगाबाद | दि.१२/१०/२०१३ ते दि.१४/१०/२०१३ |
| ०९ | ह.भ.प. मनोहरबुवा बाळकृष्ण दिक्षित , औरंगाबाद | दि. ०२/१०/२०१४ ते दि. ०४/१०/२०१४ |
| १० | ह.भ.प. समीहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | दि. २१/१०/२०१५ ते दि. २४/१०/२०१५ |
| ११ | ह.भ.प. मंदार गंगाधर बुआ व्यास, डोंबिवली | दि.१०/१०/२०१६ ते दि.१३/ १०/ २०१६ |
| १२ | ह.भ.प. समिहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपुर | दि.२९/०९/२०१७ ते दि.०२/१०/२०१७ |

श्री पुण्यतिथी उत्सव २०१७ मध्ये केलेल्या कीर्तनकारास चार दिवसाचे मानधन १५,००१/- देण्यात आले होते.

श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ मध्ये कीर्तनाची संधी मिळणेसाठी अर्ज केलेल्या चार कीर्तनकारांपैकी ह.भ.प.आठवले यांचे कीर्तन पुण्यतिथी उत्सव २०१७ मध्ये झालेले आहे. उर्वरीत तीन कीर्तनकारापैकी २

कीर्तनकार ह.भ.प. विवेक गोखले व ह.भ.प. डॉ. दिलीप डबीर, हे नामवत कीर्तनकार असून ह.भ.प. प्रशांत धोंड यांचेबाबत फारशी प्रसिध्दी दिसत नाही. त्यामुळे फक्त दोन नामंवत कीर्तनकारांची नावे शिल्लक राहिली आहेत.

शताब्दी वर्षाची सांगता पुण्यतिथी उत्सावाने होणार असल्याने येणा-या पुण्यतिथी उत्सवात नेहमीप्रमाणे सर्वसाधारण कीर्तनकारांची कीर्तने ठेवणेऐवजी प्रसिद्ध् नामवंत किर्तनकाराचे कीर्तन ठेवल्यास शताब्दी वर्षात साईभक्तांना कीर्तनातून एक वेगळ्या प्रकाराचे प्रबोधन होऊ शकेल.

श्री.गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ मध्ये नामवंत कीर्तन ह.भ.प. चारुदत्त आफळे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यांना मानधन रु.५१,०००/- आदा करण्यात आले होते.

श्रींचे समोर कार्यक्रम सादर करणा-या कीर्तनकार, प्रवचनकार, कलाकार यांची संस्थानमार्फत मोफत निवास, भोजन, चहापाणी, नाष्टा, दर्शन इ. सुविधा करणेबाबत मा. व्यवस्थान समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र. १५१ झालेला आहे.

मध्यतंरीच्या काळात श्री पुण्यतिथी उत्सवासाठी सौ. राधिका गोपालकृष्ण कालेकर, कोल्हापूर यांनीही कीर्तनसेवेची संधी मिळावी असा अर्ज दिलेला आहे.

विभागाचा अभिप्राय:- पुण्यतिथी उत्सव सुरू होणेस फक्त २१ दिवसच शिल्लक राहिले असल्याने कीर्तनकाराची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच आता कीर्तनकाराची निश्चिती न केल्यास अनुभवी व नामांकित कीर्तनकार मिळणे शक्य होणार नाही.

प्रस्तावः- तरी श्री पुण्यतिथी उत्सवासाठी कीर्तनाची संधी मिळणेसाठी आलेल्या अर्जातून एका कीर्तनकाराचे नाव व मानधन निश्चित करणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ मध्ये** (दि. १७,१८,१९ ऑक्टोबर २०१८) **ह.भ.प. विवेक गोखले, नृसिंहवाडी यांना कीर्तन सेवेची संधी देण्यात यावी व त्यासाठी त्यांना रक्कम रु.६०,०००/- मात्र मानधन देण्यात यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम शताब्दी विभाग)**

---

**१५. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त एक दिवसीय अखंड पारायण सोहळा कार्यक्रमाचे काला कीर्तन, मिरवणूक व प्रसाद व्यवस्थेबाबत.**

प्रास्ताविक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने श्रीसाईबाबांचे समाधीचे शताब्दी वर्षे पुर्ण होत असल्याने श्रींचे पुण्यतिथी उत्सव-२०१८ मोठया प्रमाणात साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते दि.१९ ऑक्टोबर, २०१८ अखेर प्रत्येक दिवसाचे कार्यक्रमांचे स्वरुप व व्याप्ती, पुण्यतिथी उत्सवाचे स्वरुप, कार्यक्रमांचे ठिकाण, समारोप निमंत्रीत मान्यवरांची निश्चिती करणे इत्यादी कार्यक्रम निश्चित झालेनंतर संस्थानचे संबंधीत विभागाने अंदाजपत्रक तयार करुन कार्यक्रमाबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. त्यामध्ये अ.क्र.०२ नुसार मंदिर विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

| दिनांक | प्रस्तावित कार्यक्रमांचा तपशील | कार्यक्रमाचे प्रस्तावित ठिकाण | व्यवस्थापन समितीचे निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| गुरुवार, दि.११/१०/२०१८ | **एक दिवसीय अखंड पारायण सोहळा** | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साई आश्रम भक्तनिवास | एक दिवसीय अखंड पारायण सोहळा १६ गुंठे परिसरात आयोजित करणेत यावा. | प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष/ प्र.अधिक्षक, मंदिर विभाग |

त्यानुसार मंदिर विभागाचे दि.१०.०९.२०१८ रोजीचे मंजूर टिपणीनुसार गुरुवार, दि.११/१०/२०१८ रोजी एक दिवसीय पारायण सोहळयाचे नियोजन करण्यात आले असुन सदर प्रस्तावास मान्यता घेण्यात आली आहे व जा.क्र.एसएसएस/१८०६/२०१८, दि.१८.०९.२०१८चे कार्यालयीन आदेशानुसार विभागनीहाय कामाचे नियोजन करणेत आलेले आहे.

प्रस्ताव:- गुरुवार, दि.२७/०९/२०१८ रोजी एक दिवसीय पारायण सोहळयाचे नियोजनाची आढावा बैठक मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षामध्ये नाट्य रसिक संच यांचे समवेत घेण्यात आली आहे. त्यामध्ये खालील मुद्द्यांबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत ठरले-

१) श्रीसाईसच्चरित एक दिवसीय पारायण सोहळयाचा कार्यक्रम भव्य प्रमाणात करण्याचे नियोजन असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे नियोजनानुसार नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे अनुभवाचा

लाभ घेऊन त्यांचे सर्व समावेशक सहकार्य घेणेत यावे. तसेच नाट्य रसिक संच, शिर्डीमार्फत नांव नोंदणी करण्यासाठी अनुमती द्यावी. याबाबत संस्थानमार्फत नाट्य रसिक संच, शिर्डी यांना सोबतचे पत्र देणेत यावे.

२) नांव नोंदणी पुर्ण झालेनंतर नोंदणी झालेल्या वाचकांची माहिती एकत्र करुन संख्येनुसार बॅचेस बनविण्यात येतील व अध्याय वाचनाचे व वेळ निश्चित करुन इतर नियोजन करण्यात येणार आहे. (अध्याय वाचनाकरीता भाग्यवान साईभक्तांची ड्रॉ पद्धतीने निवड करुन अध्यायाचे वेळी ०१ पुरुष -०१ स्त्री अशी नांवे ड्रॉमध्ये काढुन त्यांना पुजारी वाचकांचे समवेत बसुन वाचण्याची संधी देण्यात यावी, अशी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संकल्पना आहे, तरी त्यास मान्यता असावी, ही विनंती.)

३) एक दिवसीय श्रीसाईसच्चरित अखंड पारायण हे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता कार्यक्रमाची सुरुवात असल्याने पारायण समाप्तीनंतर दि.१२/१०/२०१८ रोजी सकाळी पारायण संपलेनंतर शिर्डी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात यावी.मिरवणूकीनंतर काल्याचे कीर्तन पारायणाचे ठिकाणी शताब्दी मंडपात करणेत यावे. त्याकरीता नाट्य रसिक संच, शिर्डीमार्फत किंवा संस्थानमार्फत परिसरातील कीर्तनकार यांचेकडुन काल्याचे कीर्तन करता येईल. श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सुरुवातीस दि.०१.१०.२०१७रोजी झालेल्या भव्य मिरवणूकीप्रमाणे दि.१२/१०/२०१८रोजीची मिरवणूक काढण्यात यावी. त्यावेळीचे मिरवणूकीप्रमाणे प्रदर्शन, बॅण्ड,आर्केस्ट्रा. बॅन्जो, संबळ, वेषभूषा, देखावे, भजनी मंडळ इ. चा समावेश मिरवणूकीत असावा. संस्थानमार्फत ठरवुन दिल्यानुसार मानधन देऊन मिरवणूक पार पाडण्यास मान्यता असावी. तसेच मिरवणूकीसाठी आमंत्रीत भजनी मंडळ, बॅण्ड पथके, सनई पथके, इ. किरकोळ या सर्वाकरिता व इतर सर्व समावेशक अंदाजे रक्कम रु.७,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

शताब्दी मंडपामध्ये कार्यक्रमाचे वेळी फुलांचे डेकोरेशन करणे, मॅटीन, गादी, जादा प्रकाश योजना करणेत यावी. तसेच श्रीसाईसच्चरित अखंड पारायण समाप्तीनंतर दि.१२/१०/२०१८ रोजी दुपारी कीर्तनानंतर व माध्यान्ह आरतीनंतर शताब्दी मंडपामध्ये साईभक्तांना प्रसाद वाटण्यात यावा. संस्थानचे प्रसादालयामध्ये बनविलेला शिराप्रसाद किंवा बुंदी प्रसाद वाटप करुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात यावा, असे ठरले आहे. त्याचप्रमाणे अखंड पारायणाचे वेळी पारायण वाचकांकरीता वाचनानंतर चाहा-पानाची व्यवस्था संस्थानमार्फत करणेत येईल. याकामी होणा-या सर्व समावेशक खर्चाकरिता अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

४) तसेच मिरवणूकीमध्ये सहभाग घेणा-या मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांची नांवे शिश्चित होणेस मान्यता असावी, ही विनंती.

| तपशील | सन-२०१७ ची मान्यवरांची नांवे | सन-२०१८ चे मान्यवरांची नांवे | दि.११/१०/२०१८चे पारायण मिरवणूक नांवे |
|---|---|---|---|
| विणा- | मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य | |
| पोथी- | मा.सौ.योगिताताई अभय शेळके, सदस्या | मा.सौ.योगिताताई अभय शेळके, सदस्या | |
| प्रतिमा- | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य | मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष | |
| | मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य | मा.श्री.धनंजय निकम, उपजिल्हाधिकारी | |
| कलश पूजन | मा.श्रीमती रुबल अग्रवाल,भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी | मा.श्रीमती रुबल अग्रवाल,भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी | |

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-**

तरी दि.२७.०९.२०१८रोजीचे आढावा बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे मान्यता मिळणेस विनंती.-

१) दि.११/१०/२०१८ रोजीचे एक दिवसीय अखंड पारायण सोहळ्याचे भव्यता लक्षात घेता कार्यक्रमासाठी शिर्डी येथील नाट्य रसिक संच, शिर्डी यांची सर्व समावेशक मदत घेऊन नाव नोंदणी व इतर कार्यक्रमाचे नियोजन करणेबाबत त्यांना सोबतचे पत्र देणेस मान्यता असावी.

२) श्रीसाईसच्चरित पारायण संपलेनंतर शिर्डी गावातून भव्य मिरवणूक काढणेस व त्याकामीचे नियोजन करणेस व सर्व समावेषक खर्च अंदाजे रक्कम रु.७,००,०००/- खर्चास व इतर डेकोरेशन, मॅटीन, गादी, इ किरकोळ खर्चाकरीता अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- असे एकूण अंदाजे खर्च रक्कम रु.१०,००,०००/- (अक्षरी

रुपये दहा लाख मात्र) खर्चास मान्यता मिळणेस विनंती.तसेच शिर्डी नगरपंचायतबांधकाम, शिर्डी पोलीस स्टेशन यांना संरक्षण विभागामार्फत आवश्यक त्या परवानगीचे पत्र देणेस मान्यता असावी.

३) तसेच मिरवणूकीमध्ये सहभाग घेणारे मा.व्यवस्थापन समितीचे सभेचे सदस्यांची नांवे निश्चित होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त दि.११.१०.२०१८ रोजी शताब्दी मंडप (१६ गुंठे) येथे एक दिवसीय अखंड पारायण सोहळा कार्यक्रमाचे काला कीर्तन, मिरवणूक व प्रसाद व्यवस्थेबाबत उपसमितीच्या खालील प्रमाणे शिफारशी मान्य करण्यात आल्या.**

**१. उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी.**
**२. डेकोरेशनचे कामासाठी देणगीदार मिळाल्यास त्यामधुन सदरचे काम करुन घेण्यात यावे.**
**३. काल्याचे किर्तनानंतर संस्थानचे प्रसादालयामार्फत महाप्रसाद देण्यात यावा, यासाठी प्रसादालयाकरीता येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१०,००,०००/- मात्र खर्च जमा-नावे करण्यास मान्यता देण्यात यावी.**
**४. सदर कार्यक्रमाचे स्टेजवर पारायणासाठी येणाऱ्या मा.विश्वस्तांची बैठक व्यवस्था करणेत यावी.**
**५. मिरवणूकीमध्ये सहभाग घेणेसाठी खालील प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांची नांवे निश्चित करणेत यावी.**

| तपशील | सन-२०१७ ची मान्यवरांची नांवे | सन-२०१८ चे मान्यवरांची नांवे | दि.११/१०/२०१८चे पारायण मिरवणूक नांवे |
|---|---|---|---|
| विणा- | मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य | मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| पोथी- | मा.सौ.योगिताताई अभय शेळके, सदस्या | मा.सौ.योगिताताई अभय शेळके, सदस्या | मा.सौ.योगिताताई अभय शेळके, सदस्या |
| प्रतिमा- | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य | मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य | मा.श्री.धनंजय निकम, उपजिल्हाधिकारी | मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| कलश पूजन | मा.श्रीमती रुबल अग्रवाल,भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी | मा.श्रीमती रुबल अग्रवाल,भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी | मा.श्रीमती रुबल अग्रवाल,भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी |

**(कार्यवाही- मंदिर विभाग प्रमुख/ शताब्दी कक्ष प्रमुख/प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग)**

---

१६. **संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींग साठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारकांना चर्चा करणेसाठी बोलविणेबाबत.**

संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊडसर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

<table>
<tr><td>०१</td><td>खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल.</td><td>संस्थानचे www.sai.org.inव online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणे.</td></tr>
<tr><td>०२</td><td>मागणी</td><td><table>
<tr><td>Sr. No</td><td>Description of work/Item</td><td>Qty</td></tr>
<tr><td>01</td><td>Servers/Services, Tools mention in Annexure VI-A in tender document with Software, Certificates and tools Connectivity as per Annexure VI-C in tender document Amount should be per</td><td>01</td></tr>
</table></td></tr>
</table>

<table>
<tr><td></td><td></td><td><table>
<tr><td></td><td>annum. (VI-A+VI-C)</td><td></td></tr>
<tr><td>02</td><td>Network Connectivity as per Annexure VI-B in tender document<br>Amount should be per annum.</td><td>01</td></tr>
<tr><td>03</td><td>SMS Services<br>Within India (Give rate per SMS)</td><td>01</td></tr>
<tr><td>04</td><td>SMS Service Provider<br>Outside of India/International (give rate per SMS)</td><td>01</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>०३</td><td>ई-निविदा प्रसिद्धी</td><td>दि.२४.०७.२०१८ ते दि.०४.०९.२०१८</td></tr>
<tr><td>०४</td><td>वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ?</td><td>www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट (sai.org.in) व पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे.</td></tr>
<tr><td>०५</td><td>तर तसे, कोणाला पाठविले ?</td><td>०६ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले आहे.</td></tr>
<tr><td>०६</td><td>निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ</td><td>दि.२४.०७.२०१८ सकाळी १०:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.१२.०९.२०१८<br>व्यावसायीक निविदा- दि.१५.०९.२०१८</td></tr>
<tr><td>०७</td><td>प्राप्त निविदाकारांची संख्या</td><td>०४ (चार)</td></tr>
<tr><td>०८</td><td>पात्र निविदाकारांची संख्या</td><td>०२ (दोन)</td></tr>
<tr><td>०९</td><td>सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ?</td><td>लागू नाही.</td></tr>
<tr><td>१०</td><td>सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ?</td><td>सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे.</td></tr>
<tr><td>११</td><td>जर नमुने दिले नाही, तर का ?</td><td>लागू नाही.</td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="2">निविदाकारांनी सादर केलेले दर –<table>
<tr><th>अ.नं.</th><th>निविदाकाराचे नाव</th><th>सादर केलेले दर (प्रती नग रु.)</th><th>स्थिती</th></tr>
<tr><td colspan="4">Servers/Services, Tools mention in Annexure VI-A in tender document with Software, Certificates and tools Connectivity as per Annexure VI-C in tender document Amount should be per annum. (VI-A+VI-C)</td></tr>
<tr><td>01</td><td>M/s. ESDS Software Solution Pvt Ltd</td><td>52,45,479</td><td>L1</td></tr>
<tr><td>02</td><td>M/s. CtrlS Datacenters Limited</td><td>99,21,789</td><td>L2</td></tr>
<tr><td colspan="4">Network Connectivity as per Annexure VI-B in tender document<br>Amount should be per annum.</td></tr>
<tr><td>01</td><td>M/s. ESDS Software Solution Pvt Ltd</td><td>10,69,182</td><td>L2</td></tr>
<tr><td>02</td><td>M/s. CtrlS Datacenters Limited</td><td>7,78,800</td><td>L1</td></tr>
<tr><td colspan="4">SMS Services<br>Within India (Give rate per SMS)</td></tr>
<tr><td>01</td><td>M/s. ESDS Software Solution Pvt Ltd</td><td>.17</td><td>L1</td></tr>
<tr><td>02</td><td>M/s. CtrlS Datacenters Limited</td><td>1.18</td><td>L2</td></tr>
<tr><td colspan="4">SMS Service Provider<br>Outside of India/International (give rate per SMS)</td></tr>
<tr><td>01</td><td>M/s. ESDS Software Solution Pvt</td><td>2.30</td><td>L1</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Ltd | | |
| | 02 | M/s. CtrlS Datacenters Limited | 10 | L2 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर - निरंक | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - निरंक | |
| १५ | सध्याची शिल्लक | निरंक |
| १६ | मागील खरेदी दर | निरंक |
| १७ | मागील पुरवठादार | निरंक |

१८ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराने सादर केलेले दर

| Sr. No. | Specification of Material | Amount |
|---|---|---|
| 01 | Servers/Services, Tools mention in Annexure VI-A in tender document with Software, Certificates and tools Connectivity as per Annexure VI-C in tender document Amount should be per annum. (VI-A+VI-C) | 52,45,479 |
| 02 | Network Connectivity as per Annexure VI-B in tender document<br>Amount should be per annum. | 7,78,800 |
| 03 | SMS Services<br>Within India (Give rate per SMS) | .17 |
| 04 | SMS Service Provider<br>Outside of India/International (give rate per SMS) | 2.30 |

१९ सध्याचे निम्नत्तम निविदाकाराचे नाव

| Sr. No. | Name of Bidder | Specification of Material |
|---|---|---|
| 01 | M/s. ESDS Software Solution Pvt Ltd | Servers/Services, Tools mention in Annexure VI-A in tender document with Software, Certificates and tools Connectivity as per Annexure VI-C in tender document Amount should be per annum. (VI-A+VI-C) |
| 02 | | SMS Services<br>Within India (Give rate per SMS) |
| 03 | | SMS Service Provider<br>Outside of India/International (give rate per SMS) |
| 04 | M/s. CtrlS Datacenters Limited | Network Connectivity as per Annexure VI-B in tender document<br>Amount should be per annum. |

| | | |
|---|---|---|
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करणेत आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रकल्प खरेदी समितीसमोर | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी तथा उपकार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.विभागप्रमुख, आयटी विभाग. |

| | | |
|---|---|---|
| | सादर करणेत आला असल्यास उपस्थितांची नावे | |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अंदाजे रक्कम रुपये ----प्रतिसेट मार्केट रेट रुपये ---- | |
| २३ | मागील खरेदी रु.-------------- सध्याचे प्राप्त दर रु.---------------------- फरक रु.----------- % ने कमी/जास्त रु.----------------- | |

| अ.नं. | तपशिल | मागील खरेदी दर | सध्याचे दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Servers/Services, Tools mention in Annexure VI-A in tender document with Software, Certificates and tools Connectivity as per Annexure VI-C in tender document Amount should be per annum. (VI-A+VI-C) | -- | 52,45,479 | -- | -- |
| 02 | SMS Services Within India (Give rate per SMS) | -- | 7,78,800 | -- | -- |
| 03 | SMS Service Provider Outside of India/International (give rate per SMS) | -- | .17 | -- | -- |
| 04 | Network Connectivity as per Annexure VI-B in tender document Amount should be per annum. | -- | 2.30 | -- | -- |

२४. **संक्षिप्त टिप** :-संस्थानचे www.sai.org.inव online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली असुन, सदरचे प्रक्रियेस तीन वेळेस मुदतवाढ देणेत आलेली आहे. राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पुढीलप्रमाणे एकुण चार निविदाधारकांनी त्यांच्या ई-निविदा सादर केलेल्या होत्या. प्राप्त ई-निविदांचा तांत्रिक ई-निविदांचा मुल्यांकनाचा तपशील पुढीलप्रमाणे.

| Sr.No. | Name of Bidder | Technical Evaluation |
|---|---|---|
| 01 | CtrlS Data Centre Limited | Qualified |
| 02 | ESDS Software Solution Pvt. Ltd. | Qualified |
| 03 | Orient Technology Pvt. Ltd. | Disqualified |
| 04 | Swan Solution and Services Pvt. Ltd. | Disqualified |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेप्रमाणे अ.नं. ३ व ४ अनुक्रमे Orient Technology Pvt. Ltd. व Swan Solution and Services Pvt. Ltd. हे निविदेमध्ये Qualification Criteria अंतर्गत मुद्दा क्रं.०१ प्रमाणे पात्र नाहीत तसेच अं.नं. ०४. Swan Solution and Services Pvt. Ltd. यांनी Letter of Incorporation/ Registration सादर केलेले नाही. सबब, अं.नं. ०३ व ०४ यांना तांत्रिक मुल्यांकनामध्ये अपात्र ठरविणेत आलेले आहे.

साईभक्तांना संस्थानमार्फत उपलब्ध सेवा-सुविधांचा लाभ इंटरनेटद्वारे घेता यावा याकरीता साईटेक प्रकल्पाअंतर्गत online.sai.org.in हि वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेली आहे, वेबसाईटद्वारे सेवा-सुविधांचा लाभ घेणा-या साईभक्तांचे संख्येमध्ये लक्षणिय वाढ होत आहे.सदर वेबसाईट कार्यान्वीत करणेकरीता वापरणेत आलेले Server हे २०११ साली कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. सद्यस्थितीत

online.sai.org.in या वेबसाईटद्वारे रुम बुकींग, दर्शन पास सारख्या सुविधांचा लाभ घेताना साईभक्तांना प्रचंड प्रमाणात अडचणी येत आहेत. सबब, सदर भक्तांमार्फत येणा-या टेलीफोन कॉल व ई-मेलचे प्रमाणातही प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच, सदरचे वेबसाईटवर होणा-या बुकींग तसेच इतर प्रक्रियांचा शिर्डी येथे कार्यान्वीत असलेल्या रुम बुकींग, देणगी, दर्शन पास इ. कार्यप्रणालीशी संबंध असल्याने सदरच्या कार्यप्रणालीही गर्दीचे वेळी अनेक वेळेस बंद पडतात, अशा वेळेस संस्थानला साईभक्तांचे रोषास सामोरे जावे लागते व पर्यायाने संस्थानचे लौकीकास बाधा येते. अनेक वेळेस साईभक्त थेट मा.पंतप्रधान कार्यालय, मा.राज्यपाल कार्यालय येथे सदर बाबतीत तक्रार करतात.

उपरोक्त अडचणींचे निरसण होणेकामी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी वापरात असलेले सर्व्हर हे कालबाह्य झाल्याने अत्याधुनिक क्षमतेचे नविन सर्व्हर कार्यान्वीत करणे अत्यावश्यक असल्याचे यापुर्वी कळविलेले आहे. तसेच, मे.टाटा कन्सल्टन्सी यांनीही online.sai.org.in हि वेबसाईट क्लाऊड सर्व्हरवर होस्ट करणेस व शिर्डी येथे कार्यान्वीत कार्यप्रणालीसाठी डेटा सेंटर येथे तातडीने अत्याधुनिक क्षमतेचे नविन सर्व्हर खरेदी करण्याचे सुचित केलेले आहे.

ऑक्टोबर महिन्यात साजरा होणा-या श्रींच्या समाधी शताब्धी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डीमध्ये होणा-या साईभक्तांच्या संभाव्य गर्दीचा विचार करता, कार्यप्रणाली अखंडीतपणे सुरळीत सुरू राहणे अत्यावश्यक आहे. सबब, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व मे.टाटा कन्सल्टन्सी यांनी सुचीत केलेप्रमाणे अत्याधुनिक क्षमतेचे नविन सर्व्हर डेटा सेंटर येथे कार्यान्वीत करणे व online.sai.org.in हि वेबसाईट क्लाऊड सर्व्हरवर होस्ट करणेची कार्यवाही तातडीने करणे आवश्यक आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २७५ अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयामध्ये "साईटेक प्रकल्प-०२ अंतर्गत Hardware करीता मे.टाटा सन्स

यांचे सल्ल्यानुसार, संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी" असे निर्देश देण्यात आलेले आहे.

खरेदी नियमावली मुद्दा क्र.४.४.३.१ अंतर्गत पुढीलप्रमाणे निर्देशीत करणेत आलेले आहे. "कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ०३ निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल अशा प्रसंगी, किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल."

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत संगणक प्रणाली अखंडीतपणे सुरळीत सुरु राहाव्यात याकरीता online.sai.org.in हि वेबसाईट क्लाऊड सर्व्हरवर होस्ट करणेची तातडीची आवश्यकता पाहता ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत तांत्रीकदृष्टया पात्र ठरलेल्या दोन ई-निविदांच्या वाणिज्यक ई-निविदा खरेदी नियमावली मुद्दा क्रं. ४.४.३.१ चे अधिन राहुन, दि.१५.०९.२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत.

उघडणेत आलेल्या वाणिज्यक ई-निविदाप्रमाणे प्राप्त झालेल्या दरामध्ये मुद्दा क्र.१२,१८ व १९ मध्ये नमुद केलेप्रमाणे ई-निविदेमध्ये नमुद अ.नं.०१, ०३ तसेच ०४ साठीचे M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी देऊ केलेले दर हे निम्नत्तम असून, अ.नं.०२ साठीचे M/s. CtrlS Datacenters Limited यांचे दर निम्नत्तम आहेत. सदरची सुविधा उपलब्ध करुन घेणेकामी ई-निविदेअंतर्गत सर्व बाबी ह्या एकमेकांशी निगडीत असल्याने याकामी तांत्रीकदृष्टया सर्व बाबींसाठी एकाच निविदाधारकास कार्यादेश देणे आवश्यक असल्याने, सर्व बाबींसाठीचे निविदाधारकांनी देऊ केलेले दरांची एकुण रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

१. M/s. ESDS Software Solution Pvt Ltd - रक्कम रुपये ६३,१४,६६३.४७

२. M/s. CtrlS Datacenters Limited - रक्कम रुपये १,०७,००,६००.१८

महाराष्ट्र शासनाने क्लाऊड सर्व्हिसेस बाबत मार्गदर्शक सुचनासाठी जारी केलेल्या शासन नियम GR No. मातंसं - 060/32017/2 मध्ये दि.०१.०५.२०१८ ते दि.३०.०४.२०२१ या कालावधीसाठी शासकीय विभाग यांना क्लाऊड सर्व्हिसेसची सुविधा पुरविणेसाठी नमुद केलेल्या पुरवठाधारकांच्या यादीमध्ये उपरोक्त M/s. ESDS Software Solution Pvt Ltd, व M/s. CtrlS Datacenters Limited दोन्ही निविदाधारकांचा समावेश आहे. तसेच सदरचे GR मध्ये सदरची सुविधासाठीचे दरपत्रक प्रसिद्ध करणेत आलेले आहे. सदरचे दरपत्रकाप्रमाणे प्रसिद्ध करणेत आलेल्या ई-निविदेमध्ये नमुद तपशीलाप्रमाणेची सुविधा उपलब्ध करणेकामी एका वर्षासाठी अपेक्षित अंदाजे खर्चाची रक्कम काढणेसाठी मे.टाटा कन्सल्टन्सी यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दि.१८.०९.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे GR मध्ये फक्त सर्व्हरचे दरपत्रक

असल्याने त्या दराप्रमाणे आवश्यक सर्व्हर साठी एका वर्षासाठी किमान रक्कम रु.५२,७०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे असे कळविलेले आहे. त्यानुसार ई-निविदेमध्ये नमुद तपशीलाप्रमाणेची सुविधा उपलब्ध करणेकामी सर्व्हर साठी रक्कम रु. ५२,७०,०००/-, नेटवर्क कनेक्टीव्हीटीसाठी निविदेअंतर्गत निम्नत्तम निविदाकाराने देऊ केलेले दराप्रमाणे रक्कम रु. ७,७८,८०० व सॉफ्टवेअरसाठी ESDS Software Solution यांचेमार्फत चौकशीअंती कळविणेत आलेप्रमाणे रक्कम रु.१३,७७,१५९ असा एकुण रक्कम अंदाजे खर्च रक्कम रु. ७४,२५,९५९/- इतका प्रतिवर्ष अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :**

१. संस्थानचे www.sai.org.inव online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियाअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s. ESDS Software Solution Pvt. Ltd, यांनी देऊ केलेले दराबाबत त्यांचेबरोबर याबाबत चर्चा व वाटाघाटी करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर शिफारशीसाठी सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

२. GR No. मातंसं-060/32017/2 शासन नियमामध्ये दि.०१.०५.२०१८ ते दि.३०.०४.२०२१ या कालावधीसाठी शासकीय विभाग यांना क्लाऊड सर्व्हिसेसची सुविधा पुरविणेसाठी नमुद केलेल्या दराप्रमाणे, प्रसिद्ध करणेत आलेल्या ई-निविदेअंतर्गत नमुद तपशीलातील क्लाऊड सर्व्हर भाडे तत्वावर घेणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु ५२,७०,०००/-, नेटवर्क कनेक्टीव्हीटीसाठी निविदेअंतर्गत निम्नत्तम निविदाकाराने देऊ केलेले दराप्रमाणे रक्कम रु. ७,७८,८०० व सॉफ्टवेअरसाठी ESDS Software Solution यांचेमार्फत चौकशीअंती कळविणेत आलेप्रमाणे रक्कम रु.१३,७७,१५९ असा एकुण रक्कम अंदाजे खर्च रक्कम रु. ७४,२५,९५९/- इतका प्रतिवर्ष याप्रमाणे तीन वर्षाकरीताचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव शिफारशीसाठी मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव:** संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी निम्नत्तम दरधारक निविदाकार M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी देऊ केलेले दराबाबत चर्चा व वाटाघाटी होऊन निर्णयार्थ तसेच याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७४,२५,९५९/- खर्च प्रतिवर्ष याप्रमाणे तीन वर्षासाठीचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव शिफारशीसाठी मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s. ESDS Software Solution Pvt Ltd हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेच्या वेळी M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी अ.नं.१ – सर्व्हेर व अनुषंगीक संगणक प्रणाली (software) करीता रक्कम रु.५२,४५,४७९/- मात्र या निम्नतम दरात सवलत देऊन रु.५१,८५,०९८/- मात्र इतके दर देऊ केले. तसेच Network Connectivity साठी M/s. CtrlS Datacenters Limited यांचे रक्कम रु.७,७८,८००/- मात्र निम्नतम दर आहेत.**

**तथापी संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींग साठी क्लाऊड सर्व्हरची कामे ही एकमेकाशी निगडीत असल्याने Network Connectivity साठी M/s. CtrlS Datacenters Limited यांचे प्राप्त झालेले निम्नतम दर रक्कम रु.७,७८,८००/- मात्र मध्ये M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी चर्चेअंती सवलत देऊन रक्कम रु.७,७८,३०४/- मात्र दर देऊ केले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींग साठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी निम्नतम दरधारक M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी चर्चेअंती देऊ केलेले एकत्रित रक्कम रु.५९,६३,४०४/- मात्र (सर्व करासहीत) दर स्विकारणेत येऊन सदरचे काम तातडीचे असल्याने स्थानिक उपसमितीचे मान्यतेने त्यांना तात्काळ कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

सदर उपसमितीची शिफारस मान्य करतांना खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक M/s. ESDS Software Solution Pvt Ltd हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेच्या वेळी M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी अ.नं.१ – सर्व्हेर व अनुषंगीक संगणक प्रणाली (software) करीता रक्कम रु.५२,४५,४७९/- मात्र या निम्नतम दरात सवलत देऊन रु.५१,८५,०९८/- मात्र इतके**

**दर देऊ केले. तसेच Network Connectivity साठी M/s. CtrlS Datacenters Limited यांचे रक्कम रु.७,७८,८००/- मात्र निम्नतम दर आहेत.**

**तथापी संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींग साठी क्लाऊड सर्व्हरची कामे ही एकमेकाशी निगडीत असल्याने Network Connectivity साठी M/s. CtrlS Datacenters Limited यांचे प्राप्त झालेले निम्नतम दर रक्कम रु.७,७८,८००/- मात्र मध्ये M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी चर्चेअंती सवलत देऊन रक्कम रु.७,७८,३०४/- मात्र दर देऊ केले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे www.sai.org.in व online.sai.org.in या वेबसाईटचे होस्टींग साठी क्लाऊड सर्व्हर भाडेतत्वावर घेणेकामी निम्नतम दरधारक M/s. ESDS Software Solution Pvt Ltd यांनी चर्चेअंती देऊ केलेले प्रति वर्षाकरीता एकत्रित रक्कम रु.५९,६३,४०४/- मात्र (सर्व करासहीत) दर स्विकारणेत येऊन, याप्रमाणे तीन वर्षासाठी येण्याऱ्या रक्कम रु.१,७८,९०,२१२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

१७. **बेडशीट व पिलोकव्हर संबंधित निविदा रद्द करुन त्याची मागणी महासंघाकडे नोंदविणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, मुंबई (महाटेक्स) यांनी दि.२१.०९.२०१८ चे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

"उपरोक्त विषयास अनुसरून हे 'महासंघ' महाराष्ट्र राज्य शासनाचे पुरस्कृत संस्था असून राज्यातील हातमाग धारकांची शिखर संस्था आहे. या संस्थेकडून राज्यातील हातमाग विणकर सहकारी संस्थांची उत्पादित केलेल्या हातमाग कापडाचा पुरवठा राज्यातील शासकीय/निमशासकीय विभागांना केला जातो.

संदर्भ क्रं.१ नुसार आपल्या संस्थाकडून बेडशिट व पिलो कव्हर खरेदीबाबत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. परंतु संदर्भ शासन निर्णय क्रं.३ मधील परिच्छेद क्र.५.१६ नुसार राज्यातील सर्व खरेदीदार विभागांनी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ, (महाटेक्स), व महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, नागपूर यांकरीता आरक्षित असलेल्या वस्तुंची खरेदी करणे बंधणकारक केले आहे व या वस्तुंची संदर्भ क्रं.४ नुसार दरनिश्चितीची मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत करण्यात आलेली आहे. या दरनिश्चितीची प्रत सोबत जोडीत आहे. तसेच संदर्भ क्रं.५ नुसार अहमदनगर या जिल्हयाचे कार्यक्षेत्र या महासंघाकरीता राखीव आहे.

तरी आपल्याला विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली ई-निविदा रद्द करून आपली मागणी या महासंघाकडे नोंदवावी."

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

साईप्रसाद निवासस्थान विभागाने सदर बेडशीट व पिलो कव्हर हे ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेकामी मा.व्यव्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करून निर्णय क्रं.४२५ अन्वये मान्यता घेतली होती व खरेदी विभागाकडे बेडशीट व पिलो कव्हर ई-निविदा पध्दतीने खरेदीकामी प्रस्ताव पाठविला होता. त्यास अनुसरून खरेदी विभागाकडून ई-निविदा पध्दतीने खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या.

सदर ऑनलाईन ई-निविदा मुदत दि.२४.०९.२०१८ रोजी संपलेली असून याकामी एकुण ७ ई-निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदर ई-निविदाच्या तांत्रिक निविदा उघडणेसाठी दि.२६.०९.२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेत सादर केला होता त्यावेळी महाटेक्सने दिलेले वरील पत्रावर झालेल्या चर्चेत सदर निविदेचे तांत्रिक बीड स्थगित ठेऊन महाटेक्सचे संबंधित अधिका-यांना बेडशीट व पिलो कव्हरचे नमुन्यासह दि.०१.१०.२०१८ रोजी होणारे मा.उपसमितीचे सभेत बोलाविणेचे ठरले आहे. त्याप्रमाणे महाटेक्स प्रतिनिधी दि.०१.१०.२०१८ चे मा.उपसमितीचे सभेत बेडशीट व पिलो कव्हरचे नमुन्यासह उपस्थित राहणार आहेत.

शासनाचे सन २०१६ चे खरेदीनियमावलीतील परीच्छेद क्रं.५.१६ नुसार हातमाग महासंघ व हातमाग महामंडळ यांनी स्व:उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी आरक्षण देण्यात आलेले आहे. यामध्ये बेडशीटचा समावेश आहे व सदर नियमावली संस्थानला लागू आहे.

संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान विभागाने सदर बेडशीट व पिलो कव्हर खरेदीसाठी रू.६,५५,५००/- मात्रचे अंदाजित खर्चास मान्यता घेतलेली आहे. तर महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मुंबई यांनी सदर बेडशीट व पिलो कव्हर खरेदीसाठी R.C दराने रू.१२,२१,२२९/- मात्र एकुण खर्च कळविलेला आहे.

प्रस्ताव- तरी सदर बेडशीट व पिलो कव्हरचे नमुनेबाबत चर्चा होऊन खरेदीबाबत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मुंबई यांचे आजचे स्थानिक उपसमितीसमोर हजर असलेले प्रतिनिधी यांनी बेडशीट व पिलो कव्हरचे एक रंगीत व एक पांढरा असे नमुने सादर**

**केले, कापडाचा दर्जा नमुन्याप्रमाणेच राहिल मात्र बेडशिट वेगवेगळया डिझाईनमध्ये प्रिंट करुन देता येईल असे सांगितले. त्यावर वेगवेगळया डिझाईनचे नमुने प्राप्त झाल्यानंतर बेडशीट व पिलो कव्हर खरेदीबाबत निर्णय घेता येईल, अशी उपसमितीची शिफारस होती.**

**सदर शिफारस मान्य करतांना खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

**महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मुंबई यांचे शासनाने निश्चीत केलेल्या दरपत्रकानुसार बेडशीट खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१२,२१,२२९/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच बेडशीट खरेदीसाठी सुरु करण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**१८. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाचे सुत्र संचालनाबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

४) अधिनयामाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यववस्थेची उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

५) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पा

६) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

**शासन निर्णयः-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय-**

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१

*श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे.*

४) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८

मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील संभाव्य दौ-यासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम दि.१९/१०/२०१८ रोजी घेणेबाबत प्रस्तावित करण्यात आले असून, सदरहू समारोपाचे कार्यक्रमांसाठी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांना निमंत्रीत करण्यात आलेले आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाचे सूत्र संचालनासाठी श्रीमती कश्यता भाटीया यांनी ई-मेलद्वारे विनंती केलेली असून, ते हि सेवा मोफत करणार आहेत. तसेच त्यांनी याकामी ०२ व्यक्तीची मोफत निवास, भोजन, दर्शन व्यवस्था होणेस विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समाधी शताब्दी समारोपाच्या कार्यक्रमांसाठी मा. पंतप्रधान महोदय यांचेसह इतर प्रमुख मान्यंवर उपस्थित राहाणार असल्याची शक्यता आहे. यापूर्वी शिर्डी येथे मा. महामहिम श्री. राम नाथ कोविंद, राष्ट्रपती, भारत सरकार यांचे शुभहस्ते झालेल्या श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव उदघाटन सोहळयाचे कार्यक्रमांचे व मा. व्यंकय्या नायडू, उपराष्ट्रपती यांचे शुभहस्ते झालेल्या ग्लोबल टेंम्पल समिट या कार्यक्रमांचे सुत्र संचालन श्रीमती कश्यता भाटीया यांनी केलेले असून, त्यांचा कार्यक्रमांचा पूर्वानुभव बघता त्यांचेकडून समारोप कार्यक्रमांचे सुत्र संचालन करता येईल, असे नम्र मत आहे.

**प्रस्तावः-** तरी समारोप कार्यक्रमांचे सुत्र संचालन श्रीमती कश्यता भाटीया यांचेकडून करून घेणेस व याकामी त्यांची द्वारावती भक्तनिवास येथे ०१ वातानूकूलित रूम, नाष्टा, प्रसाद भोजन, दर्शन व्यवस्था मोफत होणेसाठी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्रीमती कश्यता भाटीया यांचेकडून विनामुल्य करून घेणेत यावे व त्यासाठी दोन व्यक्तींची द्वारावती भक्तनिवास येथे ०१ वातानूकूलित रूम, नाष्टा, प्रसाद भोजन, दर्शन इत्यादी व्यवस्था मोफत करण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली** (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)

---

**१९. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाची निमत्रंण पत्रिका शिर्डीतील ग्रामस्थाना देणेकामी पत्रिका छपाई खर्चास व दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

***श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-***

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थे

चा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावना– श्री साईबाबा यांच्या समाधीस दि. १८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पुर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे वतीने श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि. ०१ ऑक्टोबर २०१७ ते दि. १८ ऑक्टोबर २०१८(विजयादशमी) या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतीक तसेच सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, तर्फे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम दि.१९.१०.२०१८ रोजी भव्यदिव्य स्वरुपात करण्याचे निश्चित करण्यात आले असून, सदहू कार्यक्रमासाठी भारताचे पतंप्रधान मा. ना. श्री.नरेंद्र मोदी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव ग्रामस्थांशीही निगडीत असल्याने शिर्डी ग्रामस्थ व पंचक्रोषीतील प्रमुख व्यक्तींना निमंत्रण पत्रिका पाठविण्याचे नियोजन आहे.

विभागाचा अभिप्राय–श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपकार्यक्रमांच्या निमंत्रण पत्रिका राज्यातील मान्यवर व्यक्तींना देणेसाठी मा. व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

आता समारोपाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण पत्रिका शिर्डी ग्रामस्थ व पंचक्रोषीतील प्रमुख व्यक्तींना पाठविण्यासाठी १०,००० नग निमंत्रण पत्रिका पाकीटासह छपाई करुन घ्याव्या लागतील याकामी एका पत्रिकेचा छपाईसह दर रु १०/- याप्रमाणे १०,००० पत्रिकांची छपाई करण्यास एकूण रक्कम रु १,००,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

प्रस्ताव– तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपकार्यक्रमांच्या १०,००० निमंत्रण पत्रिका शिर्डी ग्रामस्थ व पंचक्रोषीतील प्रमुख व्यक्तींना देणेसाठी पाकीटासह प्रती दर रु.१०/- प्रमाणे छपाई करणेस व

त्याकामी येणा-या अंदाजे एकुण रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाची निमत्रंण पत्रिका छपाईकामी खालील प्रमाणे उपसमितीच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या-

१. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाच्या २५,००० निमंत्रण पत्रिका छापणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी.

२. विशेष निमंत्रीतांसाठी वेगळया पत्रिका छापणेत याव्या.

३. शिर्डीमधील सर्व ग्रामस्थांना व पंचक्रोशीतील प्रमुख व्यक्तींना निमंत्रण पत्रिका देण्यात याव्या.

(कार्यवाही- शताब्दी कक्ष)

---

आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे शिफारस करणेत आली.

२० जिल्हा परिषद, अहमदनगर यांना नवीन शाळा खोल्या बांधकामासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने कळविलेल्या शाळा खोल्यामधुन शाळांची निवड दि.०३.०९.२०१८ रोजीच्या स्थानिक उपसमितीचे सभेमध्ये करण्यात आली होती. मात्र यावर पुन्हा चर्चा होऊन मा.जिल्हाधिकारी यांनी फेर आढावा घेतल्यानंतर त्यांचेकडून नव्याने नवीन शाळा खोल्यांची गरज असलेल्या शाळांची नावे व संख्या प्राप्त झाल्यानंतर नव्याने शाळा खोल्यांची निवड करण्यासाठी प्रस्ताव स्थानिक उपसमिती सभेपुढे सादर करण्यात यावा, तोपर्यत पहिल्या टप्पयातील अनुदान रु.१० कोटी स्थगित ठेवण्यात यावे. अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग)

---

२१ मा. अध्यक्ष, स्थानिक उपसमिती यांनी आजचे सभेत श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc. (Computer Science) व BCA हा नविन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी शैक्षणीक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेबाबत सुचना दिल्या त्यासाठी विद्यापिठाचे अधिकृत संकेतस्थळावर Online प्रस्ताव सादर करुन त्यासाठी रु. १,९८,०००/- मात्र लागणारे शुल्क भरणेस मान्यता देण्यात आली.

श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc. (Computer Science) व BCA हा नविन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी शैक्षणीक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेसाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळ, वर्ग खोल्या, फर्निचर, व इतर अनुशंगीक येणाऱ्या खर्चासह सविस्तर प्रस्ताव स्वतंत्रपणे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली

(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौऱ्याचेवेळी मान्यवरांचे उपस्थीतीबाबत.
प्रस्ताव- पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचे गोपनीय जा.क्र.०२२/२०१८ दि.०२/१०/२०१८ चे पत्रान्वये मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार हे दि.१९/१०/२०१८ रोजी शिर्डी येथे नियोजीत दौऱ्यावर येणार असुन मा.महनीय व्यक्ती यांना “झेड स्पेशल” सुरक्षा व्यवस्था असल्याने त्यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मा.व्ही.व्ही.आय.पी. यांचे साई समाधी सोहळयाचे ध्वजावतरण व साई समाधी दर्शन असा नियोजीत कार्यक्रमांचे संदर्भाने खालील प्रमाणे कार्यवाही होणेस कळविले आहे.

१. श्री साई समाधी शताब्दी महोत्सव कार्यक्रम व लेंडीबागेत ध्वज पुजन असा कार्यक्रमाचे वेळी मा.व्ही.व्ही.आय.पी. यांचे समवेत कोण-कोण मान्यवर असणार आहेत? त्यांचे नांव, पत्ता, मो.नं. व ३ फोटो तसेच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पासेसकरीता यादी मिळावी.
२. लेंडीबागेत ध्वज पुजन कार्यक्रमाचे वेळी मा.व्ही.व्ही.आय.पी. यांचे स्वागत करणाऱ्या मान्यवरांची नांव, पत्ता, मोबाईल नंबर व ३ फोटो तसेच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पासेसकरीता यादी मिळावी.
३. मा.व्ही.व्ही.आय.पी. यांचे स्वागत करण्यासाठी पुष्पहार / पुष्प गुच्छ ज्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात असणार आहेत, सदर कर्मचारी यांचे नांव, पत्ता, मोबाईल नंबर व ३ फोटो तसेच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पासेसकरीता यादी मिळावी.

४. मा.व्ही.व्ही.आय.पी. हे साईबाबा समाधी दर्शन / आरती / पुजा करणार असून सदर वेळी त्यांचे सोबत श्री साई समाधी मंदिरात कोण ? कोण उपस्थित असणार आहेत, सदर मान्यवरांचे नांव, पत्ता, मोबाईल नंबर व ३ फोटो तसेच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पासेसकरीता यादी मिळावी.

तसेच याव्यतिरीक्त समाधी मंदिरातील पुजारी, स्वच्छता कर्मचारी व इतर आवश्यक विभागाचे कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, स्टेजवर अँकरींग करणारे व्यक्ती इ.चे नांव, पत्ता, मोबाईल नंबर व ३ फोटो तसेच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पासेसकरीता यादी मिळावी असे कळविले आहे. नविन दर्शन रांगचे भुमिपुजन कार्यक्रम, हेलीपॅड रोड, शेती महामंडळ मैदान इ. कार्यक्रम स्थळाचे आवाराचे क्षेत्रफळाची सार्वजनीक बांधकम विभाग / भुमी अभिलेख विभाग यांचे मार्फतीने मोजणी करु नमुद ठिकाणी किती व्यक्ती समावू शकतात, त्याबाबत प्रमाण सदर कडून प्राप्त करुन तेवढयाच व्यक्तींची पासेस शिफारस करण्यात यावी, असे कळविले आहे.

मा.पंतप्रधान महोदय यांना “झेड स्पेशन सिक्युरिटी ” श्री साई समाधी शताब्दी महोत्सव कार्यक्रम व नविन दर्शन रांगेचे भुमिपुजन, समाधी मंदिर दर्शनाचे वेळी उपस्थीत आवश्यक कर्मचारी यांची नांवे प्रशासकीय पातळीवर कामाचे निकडीनुसार निश्चीत करण्यात येतील.

तथापी श्री साई समाधी शताब्दी महोत्सव कार्यक्रम व लेंडीबागेत ध्वज पुजन, समाधी मंदिर दर्शन व संस्थानचे वतीने स्वागत करणाऱ्या मान्यवरांची नांवे, तसेच इतर कोण-कोण मान्यवर यांना कार्यक्रमाचे वेळी व्ही.व्ही.आय.पी. पास देणेबाबत शिफारस करणे आवश्यक आहे, याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन मान्यवरांची नांवे निश्चीत होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचे मंदिरामध्ये श्रींचे दर्शनाचे वेळी सर्व विश्वस्तांना त्यांचे कुटुंबीयासह प्रवेश देणेत यावा. मंदिरामध्ये फक्त मा.पंतप्रधान महोदय यांचा सत्कार करण्यात येऊन १. श्रींची मुर्ती २. आरतीचे वेळी चढविलेले महावस्त्र, शॉल,श्री साईसत्चरित्र ३. श्रींचा Black & White 3D फोटो इत्यादी साहित्य भेट म्हणून देण्यात यावे. ध्वजस्तंभाजवळील कार्यक्रमाचे वेळी फोटो शुट करण्यात यावे. तसेच दर्शनरांग भुमीपुजनाचे ठिकाणी विश्वस्तांना प्रवेश देण्यात यावा. असे ठरले.**

**(कार्यवाही- संरक्षण विभाग प्रमुख/मंदिर विभाग प्रमुख)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमांकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने कराव्या लागणा-या व्यवस्थेसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पा

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

**शासन निर्णयः**-महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच

श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१

*श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे.*

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८

मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील संभाव्य दौ-यासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८ अन्वये मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील संभाव्य दौ-यासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम दि.१९/१०/२०१८ रोजी घेणेबाबत प्रस्तावित करण्यात आले असून, सदरहू समारोपाचे कार्यक्रमांसाठी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांना निमंत्रीत करण्यात आलेले आहे. मा. पंतप्रधान महोदय यांचे शुभहस्ते संस्थानचे विविध योजनांचे भूमीपूजन व उदघाटन करण्यात येणार असून, या कार्यक्रमांसाठी अहमदनगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील नागरिक तसेच साईभक्त उपिस्थत राहण्याची शक्यता आहे. त्यासाठी संभाव्य गर्दीचे व्यवस्थेकरीता महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमिन अधिग्रहण करणे, मंडपाची क्षमता वाढविणे. तसेच इतर सर्व आवश्यक अनुषंगिक सोई-सुविधांसह कार्यक्रमांचे नियोजनासाठी विविध उपाय-योजना राबविणे व संस्थानचे विविध विभागामार्फत अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.

याकामी होणा-या अंदाजे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | कार्यवाहीचा विभाग | अंदाजे खर्चाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ व श्री. तुकाराम शंकरराव गोंदकर व श्री गणतप गोंदकर यांची जमिन अधिग्रहण करणे व जमिनीचे भाडे अदा करणेसाठी होणारा अंदाजित खर्च. (दि.०४/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या कालावधीकरीता) | मालमत्ता विभाग | २०,००,०००/- |
| ०२. | जमिन अधिग्रहीत केलेनंतर मरूमीकरण व इतर अनुषंगिक कामासाठी अंदाजित खर्च | बांधकाम विभाग | २४,५०,०००/- |
| ०२. | समारोप कार्यक्रमांकरीता मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी खर्च ( मंजूर निविदा रक्कम ) | बांधकाम विभाग | ८४,००,०००/- |
| ०३. | समारोप कार्यक्रमांकरीता मंडपाची क्षमता वाढविणेकरीता तसेच इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी होणारा अंदाजित खर्च. | बांधकाम विभाग | ४२,००,०००/- |
| ०४. | स्टेज डेकोरेशनसाठी होणारा अंदाजित खर्च. | बांधकाम विभाग | २०,००,०००/- |
| ०५. | स्टेज, ग्रीनरूम, वातानूकूलित (ए/सी) व्यवस्थेसाठी होणारा अंदाजित खर्च. | बांधकाम विभाग | ०२,००,०००/- |
| ०६. | १) हेलीपॅड डांबरीकरण, बॅरेकेंडीग व इतर बाबींकरीता होणारा अंदाजित खर्च.<br>२) गवत काढणे, झाडे कापणेसाठी होणारा अंदाजित खर्च.<br>३) सुरक्षेसाठी CCTV यंत्रणा बसविणेकामी होणारा अंदाजित खर्च.<br>४) विदयुत व्यवस्थेकरीता होणारा अंदाजित खर्च.<br>५) सुरक्षा व्यवस्थेकरीता होणारा अंदाजित खर्च. | बांधकाम विभाग<br>बगिचा विभाग<br>सिसिटीव्ही विभाग<br>विदयुत विभाग<br>संरक्षण विभाग | ०८,००,०००/-<br>५०,०००/-<br>६०,०००/-<br>०२,००,०००/-<br>५०,०००/- |
| ०७. | निमंत्रीत मान्यवरांना स्मृतीचिन्ह देणेसाठी अंदाजित खर्च. | शताब्दी कक्ष | ०५,००,०००/- |
| ०८. | समारोप कार्यक्रमांचे नियोजनासाठी येणा-या शासकीय वरीष्ठ अधिकारी यांचेकरीता हॉटेलमध्ये निवासव्यवस्था तसेच चहा-पाणी, नाष्टा, भोजन | द्वारावती भक्तनिवासस्थान | ०५,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | व्यवस्थेसाठी होणारा अंदाजित खर्च. | विभाग | |
| ०९. | स्टेज फॉल्वर डेकोरेशनसाठी होणारा अंदाजित खर्च. (देणगी स्वरूपात करणार आहेत.) | बगिचा विभाग | --------------- |
| १०. | मा. पंतप्रधान महोदय व इतर प्रमुख मान्यवरांकरीता चहा, पाणी, नाष्टा, भोजनव्यवस्थेसाठी होणारा अंदाजित खर्च. | साईप्रसाद निवास्थाने विभाग | ०१,००,०००/- |
| ११. | मुख्य समारंभ निमत्रंण पत्रिकासाठी होणारा अंदाजित खर्च. | शताब्दी कक्ष | ०१,२०,०००/- |
| १२. | मुख्य समारंभ शिर्डी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिक यांचेसाठी होणार अंदाजित खर्च. | शताब्दी कक्ष | ०२,५०,०००/- |
| १३. | उदघाटन वृत्तचित्र (Doccumentry) साठी होणार अंदाजित खर्च. | सिसिटीव्ही विभाग | ०१,००,०००/- |
| १४. | संस्थान समिती सदस्य, वरिष्ठ शासकीय अधिकारी, संस्थान अधिकारी/कर्मचारी इनोव्हा कार व इतर वाहन व्यवस्थेसाठी होणारा अंदाजित खर्च. | वाहन विभाग | ०२,००,०००/- |
| १५. | उदघाटन कोनशिला करीता होणारा अंदाजित खर्च. | बांधकाम विभाग | ५०,०००/- |
| १६. | थ्री डी मॉडेल वॉक-थ्रुकरीता होणारा अंदाजित खर्च. | बांधकाम विभाग | ०३,००,०००/- |
| १७. | प्रांसगिक खर्चासाठी (ऐनवेळी उदभवणारा खर्च) | सर्व संबंधीत विभाग | २०,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम** | **२,४५,३०,०००/-** |

**विभागाचा अभिप्रायः-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समाधी शताब्दी समारोपाच्या कार्यक्रमांसाठी मा. पंतप्रधान महोदय यांचेसह इतर प्रमुख मान्यंवर उपस्थित राहाणार आहेत. त्या अनुषंगाने कार्यक्रमांचे नियोजनासाठी व इतर व्यवस्थेकरीता अंदाजे रक्कम रू.२,४५,३०,०००/- (अक्षरी रक्कम रू. दोन कोटी पंचेचाळीस लाख तीस हजार मात्र) इतका खर्च होणार असून, याकामी संस्थानचे विविध विभागामार्फत कार्यक्रमांचे नियोजनाची कार्यवाही करता येईल असे नम्र मत आहे.

**प्रस्तावः-** तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाचे नियोजनासाठी उपरोक्त तपशिलात नमूद केलेप्रमाणे अंदाजे रक्कम रू.२,४५,३०,०००/- (अक्षरी रक्कम रू. दोन कोटी पंचेचाळीस लाख तीस हजार मात्र) होणा-या खर्चास मान्यता मिळणेस व या कार्यक्रमांचे नियोजन आणि व्यवस्थेकरीता संस्थानचे संबंधीत विभागामार्फत कार्यवाही होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमांकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे संबधीत विभागाने करावयाचे कामास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,४५,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत योगिराज सदगुरू राजाकौरी विधी यांचा एक लाख करोड साईनाम जप याग आयोजनाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

१) अधिनयामाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यववस्थेची उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

२) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पा

३) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

**शासन निर्णयः-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय-**

*१)* मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१ *श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे.*

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८

मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील संभाव्य दौ-यासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावनाः-**

श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

परब्रम्ह चॅरिटेबल ट्रस्ट, मलकापूरम, आंध्रप्रदेश आणि साईनिर्माण ग्रुप, शिर्डी ग्रामस्थ यांचेमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते १८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत योगिराज सदगुरू राजाकौरी विधी यांचा एक लाख करोड साई नाम जप याग शिर्डी येथे निमगांव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे ५२ एकर जागेत करविण्याचे योजीले आहे व तो याग करण्याचा आमाचा मानस असून, आपण आम्हाला साई नाम जाप याग करण्याची परवानगी दयावी व आपली यंत्रणा मिळावी हि नम्र विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४८ अन्वये "..मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील संभाव्य दौ-यासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.." त्यानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समाधी शताब्दी समारोपाच्या कार्यक्रमांसाठी मा. पंतप्रधान महोदय यांचे संभाव्य दौ-याचे नियोजनासाठी निमगांव-को-हाळे शेती महामंडळाची जमिन अधिग्रहीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. दि.०१/१०/२०१८ रोजी शिर्डी येथे साईनिवास अतिथीगृह येथे झालेल्या मा. स्थानिक उपसमितीचे सभेत मा. उपाध्यक्ष महोदय यांनी समारोप कार्यक्रमांकरीता मंडप ठेकेदार यांना तात्काळ काम सुरू करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

परब्रम्ह चॅरिटेबल ट्रस्ट, मलकापूर व साईनिर्माण ग्रुप, शिर्डी ग्रामस्थ यांचे उपरोक्त प्राप्त प्रस्तावात श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत योगिराज सदगुरू राजाकौरी विधी यांचा एक लाख करोड साई नाम जप याग या कार्यक्रमांचे निमगांव-को-हाळे येथिल शेती महामंडळाचे ५२ एकर जागेत आयोजित करण्याचे योजिले असून, यासाठी संस्थान यंत्रणेची मिळणेकामी मागणी केलेली आहे. परंतू श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम निमगांव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जागेत करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच या कार्यक्रमांचे नियोजनासाठी संस्थान यंत्रणेमार्फत कार्यवाही करण्यात येत असल्याने, एक लाख करोड साई नाम जप याग या कार्यक्रमांचे आयोजन करणे शक्य होणार नाही असे नम्र मत आहे.

**प्रस्तावः-** तरी दि.१९ ऑक्टोबर, २०१८ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम मा. पंतप्रधान महोदय यांचे उपस्थितीत निमगांव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जागेत आयोजन

करण्याचे निश्चित झाले असल्याने परब्रम्ह चॅरिटेबल ट्रस्ट, मलकापूर व साईनिर्माण ग्रुप, शिर्डी ग्रामस्थ यांनी सादर केलेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.६१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१९ ऑक्टोबर, २०१८ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाचा कार्यक्रम मा. पंतप्रधान महोदय यांचे उपस्थितीत निमगांव-को-हाळे येथील शेती महामंडळाचे जागेत आयोजन करण्याचे निश्चित झाले असल्याने सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. (कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात माहे-ऑक्टोबर-२०१८ मध्ये कल्याण येथील श्रीराम मारूती समाधी मंदिर येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजन करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातील विविध राज्यांमध्ये श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे श्री संत राममारूती समाधी संस्थान, कल्याण यांनी मा. अध्यक्ष महोदय यांना अग्रेषीत केलेल्या पत्रामध्ये कळविलेले आहे की, श्री संत राममारूती महाराजाचा शताब्दी पुण्यतिथी उत्सव दि.२६ सप्टे, २०१८ ते दि.०३ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत समाधी मंदिरात साजरा होत आहे. श्री संतराम मारूती महाराजाच्या समाधी सोहळयानंतर १६ दिवस महाराजाचा उत्सव साजरा करण्यात आला होता. उतसवाचे काल्याच्या कीर्तनाच्या वेळी शिर्डी येथे श्री साईनाथ महाराजानी समाधी घेतली. या घटनेला यावर्षी १०० वर्ष पुर्ण होत आहेत. यास्तव महाराजाचा शताब्दी पुण्यतिथी उत्सव १८ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत साजरा करण्यात येणार आहे.

श्री साईबाबांच्या पादुका दि.०६ व ०७ ऑगस्ट, २०१८ रोजी मुंबईत येत आहेत. नाशिक वरून मुंबई येथे जातांना कल्याण वरून जावे लागते. श्रींबाबाचे व महाराजाचे बंधूत्वाचे संबंध लक्षात घेऊन श्री साईबाबांच्या पादुका श्री संत राममारूती समाधी मंदिरात केवळ ०१ तासासाठी तरी भेटीसाठी घेवून याव्यात ही विनंती केलेली आहे. तसेच याबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी (Pls Cheak and respond early) व मा. विश्‍वस्त श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करणेबाबत दूरध्वनीद्वारे निर्देश दिलेले आहेत.

**विभागाचा अभिप्रायः**- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार बोरिवली, मुंबई येथे दि.०६/१०/२०१८ ते दि.०७/१०/२०१८ या कालावधीत श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करणेस मान्यता देण्यात आलेली असून, श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे नियोजनासाठी संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांची दि.०६/१०/२०१८ ते दि.०८/१०/२०१८ पर्यंत नेमणूक करण्यात आलेली आहे.

श्री संत राममारूती समाधी संस्थान, कल्याण यांचे प्राप्त प्रस्तावाचे अनुषंगाने व श्री साईसच्चरित मधील दोन्ही संताची भेटीचा प्रसंगाचा उल्लेख असल्याने दि.०६/१०/२०१८ रोजी बोरीवली, मुंबई येथील दौ-याचे वेळी सकाळी श्रीराम मारूती समाधी मंदीरात श्रींचे पादुका भाविकांचे दर्शनासाठी उपलब्ध करून देता येतील, असे नम्र मत आहे.

**प्रस्तावः**- तरी श्री संत राममारूती समाधी संस्थान, कल्याण येथे दि.०६/१०/२०१८ रोजी श्रींचे पादुका भाविकांचे दर्शनासाठी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, बोरिवली, मुंबई येथे दि.०६/१०/२०१८ ते दि.०७/१०/२०१८ या कालावधीत श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.०६/१०/२०१८ रोजी बोरिवली, मुंबई येथे जातांना श्री संत राममारूती समाधी संस्थान, कल्याण येथे दोन ते तीन तास कालावधीसाठी श्रींचे पादुका भाविकांचे दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे ठरले. (कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते नियोजित असलेल्या संस्थानचे विविध प्रकल्पांचे भूमिपूजन समारंभाच्या कोनशिला तयार करणेबाबत..**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** मा.व्यवस्थापन समितीने संस्थानचे नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत, शैक्षणिक संकुल प्रकल्प, साई नॉलेज पार्क व वाढीव संयुक्त पाणी पुरवठा योजना (टप्पा-१) प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. दि.१९/१०/२०१८ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता समारंभासाठी मा.पंतप्रधान, भारत सरकार उपस्थित राहणार असून, त्यांचे शुभ हस्ते सदरहू तीनही प्रकल्पाचे भूमिपूजन करणे प्रस्तावित आहे. त्याकरीता सदर कार्यक्रमांची कोनशिला तयार करणे आवश्यक असून, सदरची कोनशिला ब्लॅक ग्रेनाईटवर गोल्डन अक्षरामध्ये खालील मसुद्यानुसार तयार करुन घेता येईल.

<u>कोनशिला मसुदा. (प्रकल्प क्र.०१)</u>

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

## श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत भूमिपूजन समारंभ

**मा.ना.श्री. नरेंद्र मोदी,**

**पंतप्रधान, भारत सरकार**

**यांचे शुभहस्ते**

शुक्रवार, दिनांक १९ ऑक्टोबर,२०१८ रोजी

**खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

| | |
|---|---|
| **मा.श्री.चे.विद्यासागर राव,**<br>राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | **मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस,**<br>मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य |
| **निमंत्रण पत्रिकेवरील मान्यवर** | |

**मा.व्यवस्थापन समिती**

**मा.डॉ. सुरेश काशिनाथ हावरे,**

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

| | |
|---|---|
| **मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम**<br>**उपाध्यक्ष** | **मा. श्रीमती रूबल अग्रवाल, भा.प्र.से.**<br>**मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य | मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| मा. डॉ. राजेंद्र राजाबली सिंह, सदस्य | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,सदस्य |
| मा. डॉ. मनिषा शामसुंदर कायंदे, सदस्य | मा. श्री. रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य |
| मा. श्री. अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य | मा. सौ. योगिताताई अभय शेळके,<br>नगराध्यक्षा, शिर्डी व पदसिध्द सदस्या |

-----------------------------------------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| मा. श्री. धनंजय निकम, उप जिल्हाधिकारी | मा.श्री.मनोज घोडेपाटील,उप जिल्हाधिकारी |
| मा.श्री.आनंद भोईटे, पोलीस उप अधिक्षक | मा.श्री.बाबासाहेब घोरपडे,उपकार्यकारी अधिकारी |
| मा. श्री. रवि घुले, कार्यकारी अभियंता | मा.श्री.रघुनाथ आहेर, उपकार्यकारी अभियंता |
| वास्तूविशारद:- माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस,नवी दिल्ली | बांधकाम ठेकेदार भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई |

कोनशिला मसुदा. (प्रकल्प क्र.०२)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**श्री साईबाबा शैक्षणिक संकुल भूमिपूजन समारंभ**

**मा.ना.श्री. नरेंद्र मोदी,**

**पंतप्रधान, भारत सरकार**

**यांचे शुभहस्ते**

शुक्रवार, दिनांक १९ ऑक्टोबर,२०१८ रोजी

**खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

| | |
|---|---|
| **मा.श्री.चे.विद्यासागर राव,**<br>राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | **मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस,**<br>मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य |
| **निमंत्रण पत्रिकेवरील मान्यवर** | |

**मा.व्यवस्थापन समिती**

**मा.डॉ. सुरेश काशिनाथ हावरे,**

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम**
**उपाध्यक्ष**

**मा. श्रीमती रूबल अग्रवाल, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
मा. डॉ. राजेंद्र राजाबली सिंह, सदस्य
मा. डॉ. मनिषा शामसुंदर कायंदे, सदस्य
मा. श्री. अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य

मा. अॅड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,सदस्य
मा. श्री. रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य
मा. सौ. योगिताताई अभय शेळके,
नगराध्यक्षा, शिर्डी व पदसिध्द सदस्या

---

मा. श्री. धनंजय निकम, उप जिल्हाधिकारी
मा.श्री.आनंद भोईटे, पोलीस उप अधिक्षक
मा. श्री. रवि घुले, कार्यकारी अभियंता

मा.श्री.मनोज घोडेपाटील,उप जिल्हाधिकारी
मा.श्री.बाबासाहेब घोरपडे,उपकार्यकारी अधिकारी
मा.श्री.रघुनाथ आहेर, उपकार्यकारी अभियंता

वास्तूविशारद:- डी.ओ.निकम, पुणे

कोनशिला मसुदा. (प्रकल्प क्र.०३)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**साई नॉलेज पार्क भूमिपूजन समारंभ**

**मा.ना.श्री. नरेंद्र मोदी,**

**पंतप्रधान, भारत सरकार**

**यांचे शुभहस्ते**

शुक्रवार, दिनांक १९ ऑक्टोबर,२०१८ रोजी

**खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

| | |
|---|---|
| **मा.श्री.चे.विद्यासागर राव,**<br>राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | **मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस,**<br>मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य |

निमंत्रण पत्रिकेवरील मान्यवर

**मा.व्यवस्थापन समिती**

**मा.डॉ. सुरेश काशिनाथ हावरे,**

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

| | |
|---|---|
| **मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम** | **मा. श्रीमती रूबल अग्रवाल, भा.प्र.से.** |
| **उपाध्यक्ष** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य | मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| मा. डॉ. राजेंद्र राजाबली सिंह, सदस्य | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,सदस्य |
| मा. डॉ. मनिषा शामसुंदर कायंदे, सदस्य | मा. श्री. रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य |
| मा. श्री. अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य | मा. सौ. योगिताताई अभय शेळके,<br>नगराध्यक्षा, शिर्डी व पदसिध्द सदस्या |

---

| | |
|---|---|
| मा. श्री. धनंजय निकम, उप जिल्हाधिकारी | मा.श्री.मनोज घोडेपाटील,उप जिल्हाधिकारी |
| मा.श्री.आनंद भोईटे, पोलीस उप अधिक्षक | मा.श्री.बाबासाहेब घोरपडे,उपकार्यकारी अधिकारी |
| मा. श्री. रवि घुले, कार्यकारी अभियंता | मा.श्री.रघुनाथ आहेर, उपकार्यकारी अभियंता |

प्रकल्प सल्लागार – संदिप शिक्रे ॲण्ड असोसिएटस, मुंबई

कोनशिला मसुदा. (प्रकल्प क्र.०४)

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

## वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना (टप्पा-१)

**मा.ना.श्री. नरेंद्र मोदी,**

**पंतप्रधान, भारत सरकार**

**यांचे शुभहस्ते**

शुक्रवार, दिनांक १९ ऑक्टोबर,२०१८ रोजी

**खालील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

| | |
|---|---|
| **मा.श्री.चे.विद्यासागर राव,**<br>राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | **मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस,**<br>मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य |

निमंत्रण पत्रिकेवरील मान्यवर

**मा.व्यवस्थापन समिती**

**मा.डॉ. सुरेश काशिनाथ हावरे,**

अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

| | |
|---|---|
| **मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम** | **मा. श्रीमती रूबल अग्रवाल, भा.प्र.से.** |
| **उपाध्यक्ष** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य | मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| मा. डॉ. राजेंद्र राजाबली सिंह, सदस्य | मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,सदस्य |
| मा. डॉ. मनिषा शामसुंदर कायंदे, सदस्य | मा. श्री. रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य |
| मा. श्री. अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य | मा. सौ. योगिताताई अभय शेळके, |

| | |
|---|---|
| | नगराध्यक्षा, शिर्डी व पदसिध्द सदस्या |
| मा. श्री. धनंजय निकम, उप जिल्हाधिकारी | मा.श्री.मनोज घोडेपाटील,उप जिल्हाधिकारी |
| मा.श्री.आनंद भोईटे, पोलीस उप अधिक्षक | मा.श्री.बाबासाहेब घोरपडे,उपकार्यकारी अधिकारी |
| मा. श्री. रवि घुले, कार्यकारी अभियंता | मा.श्री.राजेंद्र जगताप, पाणी पुरवठा विभाग प्र. |

वरीलप्रमाणे प्रत्येकी ३'x ५' = १५ चौरस फुट आकाराच्या ०४ कोनशिला तयार करणेसाठी अंदाजे रु.५०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव:-** तरी संस्थानचे नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत, शैक्षणिक संकुल प्रकल्प, साई नॉलेज पार्क व वाढीव संयुक्त पाणी पुरवठा योजना (टप्पा-१) प्रकल्पाचे भूमिपूजन समारंभासाठी उपरोक्त मसुद्यानुसार ०४ कोनशिला तयार करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास तसेच कोनशिला मसुद्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.६१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते नियोजित असलेल्या संस्थानचे सर्व प्रकल्पांचे भूमिपूजन समारंभाच्या ४'x ६' आकाराच्या कोनशिला चांगल्या प्रकारचे ब्लॅक ग्रेनाईटवर गोल्डन अक्षरामध्ये तयार करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदर कार्यक्रमापुर्वी संस्थानचे इतर प्रकल्पांना शासनाकडून मान्यता मिळाल्यास व सदर कामांचे भूमिपुजन मुख्य समारंभात करावयाचे ठरल्यास त्यासाठीची कोनशिला तयार करुन घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **नियोजीत शैक्षणिक संकुल बांधकामासाठी येणारे रक्कम रु.१५८.७४ कोटी मात्रचे खर्चास तसेच वेळोवेळी होणा-या सुधारित रक्कमेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय-**

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९५५

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४५

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांकरीता एकत्रित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत उभारणे प्रस्तावीत आहे. सदरहुकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

" यावरसविस्तरचर्चाहोऊन, श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ मधील जागेत करणेसाठीआर्किटेक्ट यांनी सादर केलेले आराखडे व राज्य दरसुची प्रमाणे सविस्तर अंदाजपत्रकानुसार येणाऱ्या सुधारीत रक्कम रु.१४१.२२ कोटी मात्रचे खर्चास तसेच प्रशासकीय मान्यता देतांना शासनाने काही बदल सुचविल्यास त्या अनुषंगाने अंदाजपत्रकीय खर्चाचे रकमेत होणाऱ्या बदलास मान्यतादेण्यातआली. तसेचसदरहू प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेसादर करणेसमान्यतेसाठीसादरकरणेतयावा, असेठरले."

सदरहूकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे दि.०५/०७/२०१८ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर विधी व न्याय विभागाकडील दि.२३/०८/२०१८ रोजीचे पत्रान्वये सदरहू कामाचे अंदाजपत्रके मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून साक्षांकित करुन प्रस्ताव फेर सादर करणेबाबत कळविणेत आले आहे.

त्यानुसार याकामी मुख्य अभियंता, सा.बां.विभाग नाशिक यांचेकडे दि.२१/०९/२०१८ रोजी अंदाजपत्रक सादर करणेत आले होते. तथापी, सन २०१८- २०१९ करीता नविन एसएसआर हा दि.१९/०९/२०१८ पासून लागू झाल्याने त्यांनी अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे सुधारणा करणेत आली.

| | |
|---|---|
| Total Cost Rs.: | 114,82,20,179.00 |
| Add 10% Increase in SSR Rs.: | 11,48,22,017.00 |
| Add Contingencies 5% Rs.: | 5,74,11,009.00 |
| Add 10% Escalation Rs.: | 11,48,22,017.00 |
| Technical Scrutiny Charges 1.25% Rs.: | 1,43,52,752.00 |
| Add GST 12% Rs.: | 13,77,86,421.00 |
| **Total Project Cost** Rs.: | **158,74,14,395.00** |

मा.मुख्य अभियंता यांनी वरीलप्रमाणे साक्षांकित करुन दिलेले अंदाजपत्रक उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे दि.२५/०९/२०१८ विधी व न्याय विभागाचे पुढील मान्यतेस्तव सादर करणेत आले आहे.

**प्रस्ताव:** श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ मधील जागेत करणेसाठीमुख्य अभियंता, सा.बां.विभाग, नासिक यांनी तपासणी करुन दिलेले सुधारित रक्कम रु.१५८.७४कोटी मात्रचे खर्चाचा तसेच प्रशासकिय मान्यतेचे वेळी छानणीअंती होण-या सुधारीत वाढीव खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.६१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकुलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ मधील जागेत करणेसाठी मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, नाशिक यांनी तपासणी करुन दिलेले सुधारित रक्कम रु.१५८.७४कोटी मात्रचे खर्चाचा तसेच प्रशासकिय मान्यतेचे वेळी छानणीअंती होणा-या सुधारीत वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ **चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्ती करणे व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणे.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद :**

**प्रस्ताव-** (२००४ चा महा. १४) याच्या कलम २१ च्या पोट-कलम (१ क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबांच्या समाधीस दिनांक १८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमीत्त संस्थानमार्फत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३० ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षे साजरे केले जात आहे. या निमीत्त श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप सभारंभ कार्यक्रम मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सदरहू कार्यक्रमाचे अनुषंगाने मा. ना. राम शिंदे, पालक मंत्री, अहमदनगर यांनी बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीसाठी मा. पोलीस महानिरीक्षक, नाशिक, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर तसेच इतर शासकिय अधिकारी उपस्थित होते. सदरचे बैठकीनंतर त्यांनी संस्थानचे हेलिपॅड येथे भेट दिली. त्यावेळी मा. पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांनी सदरहू हेलिपॅडकडे जाणा-या रस्त्याचे व हेलिपॅडचे डांबरीकरण खराब झालेले असल्याने, डांबरीकरण करणेबाबत निर्देश दिले आहेत.

(अ) मौजे निमगांव को-हाळे ता. राहाता येथे गट नं.१९५ पै. मध्ये संस्थान मालकीचे हेलिपॅड आहे. सदरचे हेलिपॅडचे सन २०११-१२ मध्ये १००६२ चौ. मी. क्षेत्रात करणेत आलेले डांबरीकरण सद्यस्थितीत खराब असलेने, पुनःश्च डांबरीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी पाहणी करुन रु.३० लक्ष मात्र खर्च अपेक्षित असलेबाबत कळविले आहे.

**(ब)** उपरोक्त हेलिपॅडकडे जाणेसाठी अहमदनगर- मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने चारी क्र.११ बंदीस्त करुन, त्यावर रस्ता विकसीत करणेचे काम संस्थानमार्फत सन २०११-१२ मध्ये करणेत आलेले आहे. या रस्त्याबाबत पाटबंधारे विभागाशी झालेले करारनाम्यानुसार २६ जुलै, २०११ पासून ०५ वर्षे मुदतीसाठी संस्थानकडे विकसनासाठी देणेत आला होता. सदरचा रस्ता सद्यस्थितीत पाटबंधारे विभागाचे अखत्यारीत आहे. सततचे वापराने सदरचे रस्त्याचे डांबरीकरण खराब झालेले असल्याने, सदरहू दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी पाहणी करुन रु.३५ लक्ष मात्र खर्च अपेक्षित असलेबाबत कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** वरीलप्रमाणे चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकामी व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी एकुण रु.६५ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-यानिमित्त कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक असलेने, सदरचे कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून करुन घेऊन, याकामी येणा-या खर्चाची रक्कम त्यांचेकडे वर्ग करता येईल. तसेच संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार शासनास कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

**प्रस्ताव:-** तरी चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकामी व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी एकुण रु.६५ लक्ष मात्रचे खर्चास, सदरहू कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून करुन घेणेस, याकामी येणा-या खर्चाची रक्कम त्यांचेकडे वर्ग करणेस तसेच संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार शासनास कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, चारी क्र.११ वरुन हेलीपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्त करणे व हेलीपॅडचे डांबरीकरणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सा.बां.विभागाने कळविलेल्या अंदाजे रक्कम रु.६५ लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.**

**मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचा नियोजीत दौरा असल्याने उपरोक्त कामाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविणेस पुरेसा कालावधी शिल्लक नाही. मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचा नियोजीत दौऱ्यानिमीत्त सदरची कामे तातडीने पुर्ण करणे आवश्यक आहे.**

**उपरोक्त दोन्ही कामांसाठी कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, संगमनेर यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रकीय खर्च मागवून घेण्यात यावा व त्याप्रमाणे निधी कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, संगमनेर यांचेकडे तातडीने वर्ग करणेस मान्यता देण्यात आली. व तसा प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०९ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे शिर्डी येथिल संभाव्य दौरा व कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक अतिरिक्त व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.
२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-** दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र. ४४८."…. यावर सविस्तर चर्चा होवून, मा. पंतप्रधान यांचे संभाव्य दौ-याचे वेळी आवश्यकतेनुसार तातडीने करावयाचे उपाय योजना व त्यासाठी येणा-या अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत आली आहे".

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने संस्थानतर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीकोनातून कामकाज चालू आहे. दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र. ४४८ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरहू प्राप्त निविदा दि.१५/०९/२०१८ रोजी उघडण्यात आल्या असून यामध्ये ठेकेदार

श्री. बी. एस. कातुरे, पुणे यांची निविदा रक्कम रु.८५,०५,२५०/- मात्र इतकी निम्नतम स्वरुपाची असून यावर दि.०१/१०/२०१८ रोजीचे मा. उप समितीचे सभेत ठेकेदार यांचे समवेत चर्चा केली असता त्यांनी सदर निविदा रकमेवर रू.१,०५,२५०/- मात्र इतकी सुट देवू केलेली आहे. सदर काम ते रू.८४,००,०००/- मात्र इतक्या रकमेत करणार आहे. सदरकामी ठेकेदार श्री. बी. एस. कातुरे, पुणे यांना कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे येत्या सभेत सादर केलेला आहे.

आता दि.०२/१०/२०१८ रोजी मा. ना. श्री. राम शिंदे सो., मंत्री, जलसंधारण, राजशिष्टाचार तथा पालकमंत्री, अहमदनगर, मा. डॉ. दोरजे, आय. जी. पोलीस विभाग, नाशिक परीक्षेत्र, मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस अधिक्षक, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपजिल्हाधिकारी व शासनाचे अधिकारी यांचे उपस्थित शिर्डी येथे झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी सदरहू समारोप कार्यक्रमांसाठी ०१ लाख नागरिक व साईभक्त उपस्थित राहाणार असल्याची शक्यता वर्तविल्याने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था वाढविण्याचे सुचना केलेल्या आहेत.

त्याकरीता खालील प्रमाणे व्यवस्थेत वाढ करावी लागणार आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | सुपरस्ट्रक्चर मंडप व्यवस्था - ९४,००० चौ. फुट. | ०८ | श्री सिटर सोफा - १०० नग. |
| ०२ | स्टेज व्यवस्था - ८०० चौ. फुट. | ०९ | विद्युत व्यवस्था व्यवस्था वाढविणे. |
| ०३ | कारपेट व्यवस्था - ९४,००० चौ. फुट. | १० | साऊंड सिस्टीम व्यवस्था व्यवस्था वाढविणे. |
| ०४ | बॅरेकेडींग व्यवस्था - ३००० र. फुट. | ११ | व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी व्यवस्था वाढविणे. |
| ०५ | स्वागत कक्ष व माहीती कक्ष - ०२ नग. | १२ | एल. ई. डी स्क्रिन / वॉल - ०५ नग. |
| ०६ | ग्रीन रूम - ०२ नग. | १३ | तात्पुरत्या मुता-यांची व्यवस्था करणे - २० नग. |
| ०७ | फायबर खुर्च्या - २०००० नग. | १४ | स्टेज व स्टेज समोरील सिलिंग कापड फायरप्रुफ करणे. |

**विभागाचा अभिप्राय:-** वरील प्रमाणे वाढीव व्यवस्थेसाठी ठेकेदार बी.एस.कातुरे, पुणे यांचे मंजूर दराने काम कराव्याचे झाल्यास त्यासाठी रु.४०.६३ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित असून, सदरहू काम पूर्ण करणेसाठी कमी कालावधी शिल्लक असल्यामुळे तातडीची बाब म्हणून उपरोक्त प्रमाणे नमूद केलेली वाढीव व्यवस्था बी.एस.कातुरे, पुणे यांचेकडून मंजूर दराने करुन घेता येईल.

**प्रस्ताव -** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे शिर्डी येथिल संभाव्य दौरा व कार्यक्रमासाठी वाढीव मंडप व इतर अनुषंगिक अतिरिक्त व्यवस्था बी.एस.कातुरे, पुणे यांचेकडून मंजूर दराने करुन घेण्यास व याकामी येणा-या रु.४०.६३ लक्ष खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.६२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे शिर्डी येथिल संभाव्य दौरा व कार्यक्रमासाठी वाढीव मंडप व इतर अनुषंगिक अतिरिक्त व्यवस्था बी.एस.कातुरे, पुणे यांचेकडून मंजूर दराने करुन घेण्यास व याकामी येणा-या रु.४०.६३ लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० **शासनाचे विधी व न्याय विभागाकडील पत्र क्रं.सासंवि-२०१८/प्र.क्र.१४८/का.१६दि.२९/०९/२०१८ च्या अनुषंगाने श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांचे मालकीची मौजे कनकुरी,ता.राहाता येथील जमीनगट नं.१४३/अ/१ (जूना गट नं.१४३/५) क्षेत्र १.५१.५० आर या जमीन क्षेत्राचे दर संस्थान स्तरावर निश्चित करुन ठोस निर्णय घेणे,जमीन खरेदी धोरणाप्रमाणे प्रस्तावित जमीन क्षेत्राची योग्यता,संस्थानला या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे किंवा कसे याबाबत संस्थानचे व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद**– संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्तावना-** श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी येथील जमीन गट नं. १४३/अ/१ (जूना गट नं.१४३/५) क्षेत्र १.५१.५० आर आकार रु.५=२५ ही जमीन श्री साईबाबा संस्थानला कायमस्वरुपी खरेदी देणेकामीच्या प्रकरणी १) यापूर्वी त्रिसदस्यीय समिती अस्तित्वात असल्याने उपरोक्त जमीन खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन

क्रं.१२३१५/२०१४ चे दाखल करण्यात आले होते. त्यात मौजे शिर्डी येथील संस्थानसाठी आरक्षित असलेली जमीन स.नं.२०३/१ पै. व २०३/२ पै.आणि स.नं.२१२/२ पै. व २१२/३ या जमीनी खरेदीकामी आणि मौजे कनकुरी येथील सदर गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५ हेक्टर ही जमीन संस्थान मालकीची असलेली जमीन गट नं.१३४ ला सलग असलेचे नमूद केलेले होते. त्यामुळे मे.उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१५ रोजी सदर सिव्हील ॲप्लिकेशन मान्य केले आहे व त्यातील Clause B मधील विनंतीप्रमाणे मौजे कनकुरी येथील गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५० आर हे संबंधीत दुय्यम निबंधक यांचेकडून बाजारमूल्य ठरवून घेवून त्याप्रमाणे उक्त क्षेत्र खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि चौकशीअंती सदरचे क्षेत्र संस्थानच्या जमीनीलगत नसलेचे निदर्शनास आलेले आहे. निदर्शनास आल्यानंतर अर्जदार यांनी कागदपत्रात दुरुस्ती करुन घेतलेली आहे. त्यात पोटहिस्सा फाळणीमुळे सदर जमीनीचा गट नं.१४३/अ/१ असा झालेला आहे. परिणामी संस्थान मालकीची जमीन गट नं.१३४ ला सदर क्षेत्र सलग येत नाही.

२) उक्त जमीनीच्या लगतच्या चारही बाजूंस असलेल्या जमीनीच्या शासनाचे सन २०१६-१७ चे रेडी रेकनरचे अवलोकन केले असता त्यात प्रस्तुतची जमीन विभाग क्रं.९ बिनशेती झालेल्या जमीनी या झोनमध्ये दर्शविलेली असून इतर जमीनी विभाग क्रं.६ जिरायत जमीनी यात दर्शविलेल्या आहेत. परिणामी उक्त जमीनीचा दर प्रति चौमी रु.३,६७०/- इतका दर्शविला असून आजूबाजूच्या जमीनींचा दर प्रति हेक्टरी रु.२१,६३,३००/- (प्रति चौमी रु.२१६/-) इतका दर्शविलेला आहे. तथापि उक्त जमीन ही शेतजमीन आहे.

सन २०१६-१७ चे रेडी रेकनर दराप्रमाणे सदर जमीनीची एकूण किंमत रक्कम रु.५,५६,००,५००/- (अक्षरी रु.पाच कोटी छप्पन्न लाख पाचशे मात्र) अशी होत आहे.

३) यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना जमीनी कायमस्वरुपी खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर चर्चा करुन जमीनी खरेदी संबंधात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीच्या सभेपूढे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यात निर्णय क्रं.४२ अन्वये प्रस्तावित जमीनीचा वापर कशासाठी होवू शकतो,संस्थान मिळकतीशेजारी यापैकी कोणत्या जमीनी आहेत, (उपयोगिता व सलगता तपासणे),रेडी रेकनरच्या दरापेक्षा कमी दराने जमीनी मिळणार आहे काय याप्रमाणे प्राधान्यक्रम करणेबाबतचा निर्णय झालेला आहे. तथापि याबाबतची कार्यपध्दती निश्चित झालेली नसलेने सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे बाकी आहे.

४) सदर अर्जाप्रमाणे सध्यस्थितीत संस्थानकडे, संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी कायमस्वरुपी खरेदी देणेकामीचे १० प्रस्ताव प्राप्त झालेले असून आरक्षणा व्यतिरिक्त इतर जमीनी खरेदी देणेबाबतचे सुमारे ३७ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. जमीनींच्या खरेदीबाबत वेळोवेळी जमीनी खरेदी करणे हा धोरणात्मक निर्णय आहे. याबाबत जमीन खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेनंतर प्रत्येक वेळी शासनाचे विधी व न्याय विभागाची परवानगी घ्यावी लागेलइ. बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीच्या सभेपूढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे.यावर निर्णय क्रं.७५८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. “यावर सविस्तर चर्चा होऊन, “उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता प्रस्तावित जमीन शेतजमीन स्वरुपाची असून तिचा शासनाच्या बाजारमुल्य दर तक्त्यामध्ये बिनशेती गटात समावेश असल्यामुळे तो दर बिनशेती जमीनीचा आहे. तथापि सदरची जमीन भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाची असल्यामुळे व सध्यस्थितीत जमीनीचे स्वरुप शेतजमीन असल्याने उपरोक्त जमीनीच्या गट नंबरच्या लगतच्या शेतजमीनीच्या दराप्रमाणे खरेदी करणेस हरकत नाही,असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता सदरहू जमीनीच्या परिसरातील शेतजमीनीच्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे खरेदी करणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव सादर करणेत यावा,”असे ठरले.

तथापि तद्नंतर सदरचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेचे इतिवृत्त दि.२५/०९/२०१७ रोजीच्या बैठकीत वाचून कायम करतेवेळी निर्णय क्रं.७९२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय करण्यात आलेला आहे.

निर्णय क्रं.७९२-दि.०८/०९/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरवण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येवून, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

(४) निर्णय क्रं.७५८- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, प्रस्तावित जमीन शेतजमीन स्वरुपाची असून तिचा शासनाच्या बाजारमुल्य दर तक्त्यामध्ये बिनशेती गटात समावेश असल्यामुळे तो दर बिनशेती जमीनीचा आहे. तथापि, सदरची जमीन भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाची असल्यामुळे व

सध्यस्थितीत जमीनीचे स्वरुप शेतजमीन असल्याने उपरोक्त जमीनीच्या गट नंबरच्या लगतच्या शेतजमीनीच्या दराप्रमाणे खरेदी करण्यास हरकत नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता सदरहू जमीनीच्या परिसरातील शेतजमीनीच्या बाजारमुल्य दर तक्त्यातील दराप्रमाणे खरेदी करणेकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा,असे ठरले.

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, तत्कालीन त्रिसदस्य समितीच्या दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६३० अन्वये प्रस्तावित जमीनी खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या त्रिसदस्य समितीच्या निर्णयास अधीन राहून श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांच्या मालकीची मौजे कनकुरी,ता.राहाता येथील गट नं.१४३/अ/१ (जूना गट नं.१४३/५) शेतजमीन क्षेत्र १.५१.५० आर खरेदी करण्यात यावी,असे ठरले. आजच्या सभेत अर्जदार श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी व इतर उपस्थित होते. त्यांनी सन २०१७ मधील रेडी रेकनरप्रमाणे जमीनीची किंमत मिळावी, अशी विनंती केली. परंतु सदरहू जमीन खरेदी करावयास मान्यता मिळाली, त्या वेळेसच्या शासकीय दराने सदरहू जमीनीची खरेदी करणेत यावी,असे समितीचे मत झाले,त्यास अर्जदार यांनी संमती दिली. तसेच याकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३९०९/२०१७ दि.२६/१०/२०१७ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस अहवाल सादर करणेत आलेला आहे.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील क्रं. सासंवि-१०१७/१८४३/प्र.क्र.२००/का.१६ दि.०७/०२/२०१८ अन्वये "उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मला आपणास असे कळविण्याचे आदेश आहेत की गट नं.१४३/अ/१,शेतजमीन क्षेत्र १.५१.५० आर या श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या जमीन क्षेत्राची योग्यता,संस्थानसाठी या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे वा कसे अथवा सदर जमीनीच्या किंमतीची योग्यता याबाबत आपले तसेच श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे अभिप्राय तात्काळ या विभागास उपलब्ध करुन देण्यात यावेत" असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुतकामी उपरोक्त प्रस्तावात मुद्देसूद अहवाल सादर करणेत आलेला आहे. प्रस्तुत जमीनीचे ७/१२ उतारे, जमीनीचा मोजणी नकाशा,गावचा नकाशा इ.कागदपत्रांचे अवलोकन केले असता वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१) "मौजे कनकुरी,ता.राहाता येथील उक्त जमीन गट नं.१४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आर ची दक्षिणोत्तर लांबी सुमारे ४०० मीटर व पूर्व पश्चिम रुंदी ४० मीटर अशी आहे. सदर जमीनीची उपअधिक्षक,भूमी अभिलेख,राहाता यांनी दि.१२/०३/२०१६ रोजी मोजणी केलेली असून सदर मोजणी नकाशावरुन बिन स्केली स्थळदर्शक नकाशा (लोकेशन प्लॅन) तयार करुन यासोबत सादर केलेला आहे. सदर प्रस्तावित क्षेत्राचे पश्चिमेकडेस मुळ मालकांचे क्षेत्र आहे व त्यात मुळ मालकांच्या दोन विहीरी आहेत.

२) शासनाचे रेडी रेकनरप्रमाणे सदर क्षेत्राचे व त्यालगत असलेल्या जमीनींचे वर्षवार दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | वर्ष | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचे मालकीचे उपरोक्त जमीनीचे प्रति चौमी.दर | सदर क्षेत्रालगत गाव नकाशात दर्शविलेल्या जमीनी गट नं.१३०,१३१,१३२,१३४,१३६,१३८,१३९,१४४व १४५ चे प्रति हेक्टरी दर |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१४ | रु.२,९८०/- | -- |
| ०२ | सन २०१५ | रु.३,४००/- | रु.२०,०३,१००/- (i.e.प्रति चौमी.रु.२००/-) |
| ०३ | सन २०१६-१७ | रु.३,६७०/- | रु.२१,६३,३००/- (i.e.प्रति चौमी रु.२१६/-) |
| ०४ | सन २०१७-१८ | रु.३,८५०/- | रु.२७,०४,१००/- (i.e.प्रति चौमी रु.२७०/-) |

३) सदरची जमीन ही शेतजमीन आहे.

४) चौकशीअंती सदरचे क्षेत्र संस्थानच्या जमीनीलगत नसलेचे निदर्शनास आलेले आहे. निदर्शनास आल्यानंतर अर्जदार यांनी कागदपत्रात दुरुस्ती करुन घेतलेली आहे. त्यात पोटहिस्सा फाळणीमुळे सदर जमीनीचा गट नं.१४३/अ/१ असा झालेला आहे. परिणामी संस्थान मालकीची जमीन गट नं.१३४ ला सदर क्षेत्र सलग येत नाही.

मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील उपरोक्त दि.०७/०२/२०१८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विषयांकित जमीन क्षेत्राची योग्यता,संस्थानची या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे किंवा कसे अथवा सदर जमीनीच्या किंमतीची योग्यता या उपस्थित मुद्यांवर मा.व्यवस्थापन समितीचे अभिप्राय शासनास सादर करणेच्या निर्णयार्थ

सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.२६८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**प्रस्तावित जमीनीचे क्षेत्र योग्य असून भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाचे राहील. विषयांकित जमीन व लगतचे जमीनींचे शासनाचे दरसुचीनुसार प्रति चौमी.दर पुढीलप्रमाणे असून**

| अ.नं. | वर्ष | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचे मालकीचे उपरोक्त जमीनीचे प्रति चौमी.दर | सदर क्षेत्रालगत गाव नकाशात दर्शविलेल्या जमीनी गट नं.१३०,१३१,१३२,१३४,१३६,१३८,१३९,१४४व १४५ चे प्रति हेक्टरी दर |
|---|---|---|---|
| ०१ | **सन २०१४** | **रु.२,९८०/-** | -- |
| ०२ | **सन २०१५** | **रु.३,४००/-** | **रु.२०,०३,१००/- (i.e.प्रति चौमी.रु.२००/-)** |
| ०३ | **सन २०१६-१७** | **रु.३,६७०/-** | **रु.२१,६३,३००/- (i.e.प्रति चौमी रु.२१६/-)** |
| ०४ | **सन २०१७-१८** | **रु.३,८५०/-** | **रु.२७,०४,१००/- (i.e.प्रति चौमी रु.२७०/-)** |

**किंमतीबाबत उपरोक्त दरांची वस्तुस्थिती पाहून शासनाने किंमत ठरवावी असा समितीचा अभिप्राय शासनास सादर करणेत यावा,**असे ठरले.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५२९/२०१८ दि.२८/०४/२०१८ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस अहवाल सादर करणेत आला. त्यास अनुसरुन शासनाकडील पत्र सासंवि-१०१७/१८४३/प्र.क्र.२००/का.१६ दि.२५/०५/२०१८ अन्वये सदर प्रकरणी जमीन खरेदी करण्याबाबत खालील मुद्दे विचारात घेण्यात यावेत.

१) श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या जमीनीच्या ७/१२ वरील नोंदी तपासून सदर जमीन कृषक अथवा अकृषक स्वरुपाची आहे याची पडताळणी करण्यात यावी. जर जमीन कृषक स्वरुपाची असल्यास कृषक जमीन ज्या दराने खरेदी केली त्याच दराने सदर जमीन खरेदी करणे आवश्यक आहे.

२) श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या उपरोक्त जमीनीच्या लगत असणा-या इतर जमीनी कोणत्या दराने खरेदी वा विक्री केल्या जात आहेत त्याच दराने सदर जमीन खरेदी करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने काही तांत्रिक बाबी उदभवत असल्यास अशा तांत्रिक मुद्यांचे निराकरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३) उपरोक्त मुद्दे विचारात घेवून सदर जमीनीचे दर संस्थान स्तरावर निश्चित करुन ठोस निर्णयासह प्रस्ताव शासनास सादर करणेत यावा, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

दरम्यानचे काळात श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथील रिट याचिका क्रं.८९०३/२०१८ दाखल केली. त्यात महाराष्ट्र शासनास प्रतिवादी नं.१ म्हणून सामील केलेले आहे. तदनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-२०१८/प्र.क्र.१४८/का.१६ दि.०४/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करण्याबाबतचा शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५/०६/२०१८ निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार विषयांकित प्रकरणी तसेच शासनाचे दि.२५/०५/२०१८ रोजीचे पत्राचे अनुषंगाने प्रस्ताव तपासून तात्काळ सादर करण्यात यावा. उक्त रिट याचिकेच्या संदर्भात न्यायालयीन प्रकरणासाठी जबाबदार अधिका-याची नियुक्त करण्यात यावी. या प्रकरणी परिच्छेदनिहाय अभिप्राय/शपथपत्र तयार करुन प्रथम त्यास शासन

मान्यता घेण्यात यावी व त्यानंतरच मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडेस सादर करणेत यावे, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तदनुषंगाने इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/२८६३/२०१८ दि.१५/०९/२०१८ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस अहवाल सादर करणेत आलेला आहे.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-२०१८/प्र.क्र.१४८/का.१६ दि.२९/०९/२०१८ अन्वये खालील मुद्यांवर अहवाल मागविलेला आहे.

१) प्रस्तावित जमीनीचे दर संस्थान स्तरावर निश्चित करुन ठोस निर्णयासह प्रस्ताव शासनास सादर करणेत यावा.

२) दि.२५/०६/२०१८ रोजीच्या जमीन खरेदी धोरणाप्रमाणे उपरोक्त जमीन खरेदी प्रस्ताव तपासल्यानंतर त्या संदर्भातील अभिप्रायासह प्रस्तावित जमीन क्षेत्राची योग्यता,संस्थानला या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची किंमत वाजवी आहे किंवा कसे

उपरोक्त पत्राचे अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणेकामी मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय**– १) श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांच्या जमीनीचे ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता तसेच मा.सहायक संचालक,नगररचना,अहमदनगर यांचेकडील दि.२२/०३/२०१८ रोजीच्या पत्रासोबतच्या भाग नकाशाचे अवलोकन केले असता प्रस्तावित क्षेत्र हे कृषक आहे. याशिवाय श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनीदेखील त्यांचेकडील दि.१२/०९/२०१६ रोजीच्या अर्जान्वये सदरच्या क्षेत्रास अकृषीक वापरास परवानगी घेतलेली नाही. सदर क्षेत्र शेतजमीन आहे,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

२) श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या व त्यांच्या उक्त जमीनीलगत असणा-या शेत जमीनींचे रेडी रेकनरप्रमाणे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | वर्ष | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचे मालकीचे उपरोक्त जमीनीचे प्रति चौमी.दर | सदर क्षेत्रालगत गाव नकाशात दर्शविलेल्या जमीनी गट नं.१३०,१३१,१३२,१३४,१३६,१३८,१३९,१४४व १४५ चे प्रति हेक्टरी दर |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१४ | रु.२,९८०/- | -- |
| ०२ | सन २०१५ | रु.३,४००/- | रु.२०,०३,१००/- (i.e.प्रति चौमी.रु.२००/-) |
| ०३ | सन २०१६-१७ | रु.३,६७०/- | रु.२१,६३,३००/- (i.e.प्रति चौमी रु.२१६/-) |
| ०४ | सन २०१७-१८ | रु.३,८५०/- | रु.२७,०४,१००/- (i.e.प्रति चौमी रु.२७०/-) |

उपरोक्त तक्त्यातील दराचे तुलनात्मक दृष्टिने अवलोकन केले असता श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या शेतजमीनीचे दर अवास्तव असल्याचे दिसून येते.

३) दि.२५/०६/२०१८ रोजीच्या जमीन खरेदी धोरणातील निकषाच्या अनुषंगाने सदरचे क्षेत्र हरितपट्टयात असून संस्थानचे क्षेत्रालगत नाही. सदर क्षेत्राची लांबी सुमारे ४०० मीटर व रुंदी ४० मीटर अशी आहे. म्हणजेच सदरचे क्षेत्र आयताकृती आहे. त्यामुळे सदर जमीनीचे आकारमान व सलगता पाहता प्रस्तावित जमीन पाणी साठवण तलावासाठी उपयुक्त होईल असे वाटत नाही आणि पाणी साठवण तलावा व्यतिरिक्त उक्त परिसरात संस्थानचे सध्यस्थितीत अन्य कोणतेही प्रकल्प प्रस्तावित नाहीत.

**प्रस्ताव**– शासनाचे विधी व न्याय विभागाकडील पत्र क्रं.सासंवि-२०१८/प्र.क्र.१४८/का.१६ दि.२९/०९/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने १) श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या जमीनीच्या ७/१२ वरील नोंदी तपासून सदर जमीन कृषक अथवा अकृषक स्वरुपाची आहे याची पडताळणी करण्यात यावी. जर जमीन कृषक स्वरुपाची असल्यास कृषक जमीन ज्या दराने खरेदी केली त्याच दराने सदर जमीन खरेदी करणे आवश्यक आहे.

२) श्री.बाबासाहेब गोंदकर यांच्या उपरोक्त जमीनीच्या लगत असणा-या इतर जमीनी कोणत्या दराने खरेदी वा विक्री केल्या जात आहेत त्याच दराने सदर जमीन खरेदी करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने काही तांत्रिक बाबी उदभवत असल्यास अशा तांत्रिक मुद्यांचे निराकरण करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३) उपरोक्त मुद्दे विचारात घेवून सदर जमीनीचे दर संस्थान स्तरावर निश्चित करुन ठोस निर्णयासह दि.२५/०६/२०१८ रोजीच्या "जमीन खरेदी धोरणाप्रमाणे" उपरोक्त जमीन खरेदी प्रस्ताव तपासल्यानंतर त्या संदर्भातील अभिप्रायासह प्रस्तावित जमीन क्षेत्राची योग्यता, संस्थानला या जमीनीची उपयुक्तता व सदर जमीनीची

किंमत वाजवी आहे किंवा कसे याबाबतचे अभिप्रायासह प्रस्ताव शासनास सादर करणेकामीच्या निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव सादर.

निर्णय क्र.६२२ **यावर सविस्तर चर्चा करणेत आली, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसाठी "जमीन खरेदी धारेण" निश्चीत करणेबाबतचा महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र.सासंवि/ १०१७/ १८४४/प्र.क्र./२०१/का.१६, दि.२५.०६.२०१८ अन्वये निर्णय पारित करणेत आलेला आहे.**

**सदर निर्णयातील निकषाचे अवलोकन केले असता १. श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचे मौजे कनकुरी येथील जमीन गट नं.१४३/अ/१ (जुना गट नं.१४३/५) क्षेत्र १.५१.५० आर ही जमीन हरीत पटटयात (ग्रीन झोन) आहे. संस्थानसाठी जमीन खरेदी करावयाची झाल्यास ती येलो झोन मधील असणे आवश्यक आहे. २. सदर क्षेत्रात संस्थानचा कोणताही प्रकल्प प्रस्तावीत नाही.३) सदरचे क्षेत्राचे आकारमान व सलगतेचा विचार करता सदरचे क्षेत्र संस्थानला योग्य व उपयुक्त नाही. ४) सदरचे क्षेत्र संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत येत नाही. ५) सदरचे क्षेत्र हे शेतजमीन (कृषक) आहे. ६) सदर जमीनीचे रेडी रेकनरमधील दराचे अवलोकन केले असता ते अकृषिक जमीनीच्या दराप्रमाणे असलेचे दिसून येत आहे व सदर क्षेत्रालगतच्या शेतजमीनीच्या दरांचे अवलोकन केले असता त्यात मोठया प्रमाणात तफावत आहे. म्हणजेच सदर जमीनीचे रेडी रेकनरमध्ये नमूद केलेले दर हे अवास्तव आहेत.**

**यास्तव सदरचे क्षेत्र, संस्थानसाठी जमीन खरेदी करणेबाबत निश्चीत करण्यात आलेल्या धोरणातील निकषात बसत नाही. त्यामुळे सदर क्षेत्र संस्थानसाठी खरेदी करावयाचे प्रयोजन नाही, असे अभिप्राय शासनास सादर करणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार यांचे मुदतवाढ व वेतनवाढबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

**प्रस्तावना**– संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादर करणेत आला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व दि.१९/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेत आलेला आहे.

मालमत्ता विभागाकडे सध्यस्थितीत खालीलप्रमाणे कामकाज सुरु आहे.

१) संस्थानचे मिळकत रजिस्टर अद्ययावत ठेवणे.

२) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी जमीनी खरेदी करणेकामी तसेच आरक्षणा व्यतिरिक्त खाजगी जमीनी खरेदी करणेकामी संस्थानकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणे,जागेची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

३) देणगी स्वरुपात मिळकती स्विकारणेबाबतच्या प्रस्तावांची छाननी करणे,मिळकतीची पाहणी करणे व उचित कार्यवाही करणे.

४) खरेदी केलेल्या मिळकतींच्या व दान स्वरुपात प्राप्त झालेल्या मिळकतींच्या नोंदी महसुल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.

५) खरेदी घेतलेल्या व दान स्विकारलेल्या मिळकतींची शासकीय मोजणी करुन हद्दी निशाण्या ठरवून घेणे.

६) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतचे प्रकरणी समन्वय साधून उचित कार्यवाही करणे.

७) विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेसबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

८) संस्थान मालकीच्या भाडेतत्वावर दिलेल्या अथवा द्यावयाच्या मिळकतींचे करारनामे करुन घेणे.

९) संस्थानचे मालमत्तेबाबतचे शासकीय कर,नगरपंचायत कर व ग्रामपंचायत कर इ.भरणेबाबत कार्यवाही करणे.

१०) संस्थानने भाडेपट्टयाने घेतलेल्या मिळकतींचे भाडे व स्थानिक कर भरणा करणे.

११) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे पालखी थांब्यासाठी जागांचा शोध घेणे,जागा उपलब्ध करणे,जागेची निश्चिती करणे व पुढील उचित कार्यवाही करणे.

१२) सर्व राज्यातील मुख्य शहरात संस्थानचे माहीती केंद्र उभारणेकामी जागा उपलब्ध करणे.

१३) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील नियोजनासाठी आवश्यकतेप्रमाणे जमीनी अधिग्रहीत करणेबाबतची कार्यवाही करणे.

१४) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील जमीनी कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचे प्रस्ताव व तद्गुषंगाने कार्यवाही करणे.

१५) संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणी दूर करणे,वरिष्ठांना अहवाल सादर करणे.

सदर कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पदधतीने मासिक रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर प्रथमत: दि.२६/१०/२०१५ पासून इकडील दि.१०/१०/२०१५ रोजीच्या मंजूर कार्यालयीन टिपणीप्रमाणे प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७६६ अन्वये त्यांच्या नेमणूकीची मुदत दि.१९/१०/२०१६ पासून पूढे एक वर्ष कालावधीसाठी मासिक रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे व त्यापुढील दि.१९/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी पुढील मुदत वाढवून मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८९९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कं.सल्लागार,मालमत्ता विभाग यांना पूर्वीच्याच अटी/शर्ती व एकत्रित मानधनावर, त्यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. त्याचबरोबर श्री.वालझाडे यांना निवासासाठी शांतीनिकेतन इमारतीमधील एक खोली देण्यात यावी व दरम्यानचे कालावधीमध्ये मालमत्ता विभागासाठी कंत्राटी पध्दतीने सल्लागार मिळणेसाठी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी,"असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे यांना दि.१९/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी मुदत वाढवून देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि.१८/१०/२०१८ रोजी संपत आहे. मालमत्ता विभागाकडे सध्यस्थितीत उपरोक्तप्रमाणे कामकाज सुरु आहे. त्यातील बहुतांश कामकाज हे महसुल विभागाशी निगडीत आहे. त्यामुळे कंत्राटी सल्लागार यांची मालमत्ता विभागास यापूढेही अत्यंत आवश्यकता आहे.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी खालीलप्रमाणे दृष्टिक्षेपात येणारी कामे केलेली आहेत.

१) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी खरेदी करणेसाठी प्राप्त झालेले प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण केली आहे.

२) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला नोंदी करुन घेतल्या आहेत.

३) मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवरील सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या वर्षासाठीची ग्रामपंचायतने आकारणी केलेली ग्रामपंचायत कर प्रतिवर्षी रु.१२,७८,०००/-इतके भरणेस कळविलेले होते. ती कमी करण्याचा प्रस्ताव तयार करुन प्रति वर्ष रु.६,३९,०००/- या दराने आकारणी करणेकामी ग्रामपंचायतीस भाग पाडलेले आहे.

४) मौजे घारी,ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन २००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामीचे प्रकरण करुन सदरची रक्कम मिळणेकामी दिवाणी न्यायालयात प्रकरण करणेत आलेले आहे.

५) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याबाबतचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क प्रकरणी कामकाज केले आहे.

६) मौजे निघोज येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील,रा.कोपरी यांनी त्यांचे मालकीच्या साई पालखी निवारा येथीलइमारती बी व डी दान केल्या संबंधातील कागदपत्र प्राप्त करुन तपासून नोंदणीकृत दानपत्र करुन घेणेबाबतची कार्यवाही पूर्ण केली असून त्याप्रमाणे महसुल दप्तरी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदी करुन घेतलेल्या आहेत.

७) शिर्डी येथील द्वारावती भक्तनिवास चे सर्वे नं.१४८/१,१४८/२/१,१४८/२/२,१४८/२/३ चा अकृषिक सारा माफी अनुज्ञेय असताना कामगार तलाठी यांनी सन २०१६-१७ या वर्षासाठी सदर क्षेत्राचा अकृषिक सारा मागणी नोटीस दिलेली होती. सदर बाब कामगार तलाठी,शिर्डी यांचे निदर्शनास आणून देवून त्यासाठीची अकृषिक सारा मागणी नोटीस रद्द करुन घेतली.

८) मौजे पांढुर्ली,ता.सिन्नर येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.१९ क्षेत्र ०.४९ आर या अकृषिक जमीनीचा आकार महाराष्ट्रजमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ११७(३) चे तरतुदीनुसार माफ होणेबाबतचे प्रकरण तयार करुन मा.उपविभागीय अधिकारी,निफाड भाग,निफाड यांचेकडेस सादर करण्यात आले आहे व पाठपुरावा करीत आहे.

९) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे करणेकामी मार्गदर्शन केले आहे.

१०) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेल्या भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केला आहे. त्यात आरक्षण क्रं.३४ ची भुसंपादन कार्यवाही यापूर्वीच पूर्ण झालेली होती. मात्र भुसंपादित क्षेत्राचा ताबा संस्थानला मिळणेस ऊशिर होत होता. त्याकामी पाठपुरावा करुन भुसंपादन क्षेत्र ६९०३ चौमी.चा ताबा संस्थानला दि.०७/०३/२०१८ रोजी मिळविलेला आहे.

११) संस्थानच्या मिळकती संबंधातील विविध न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये मार्गदर्शन केले.

१२) शताब्दी उत्सव कालावधीत आवश्यकतेनुसार खाजगी व शेती महामंडळाची जमीन वेळचे वेळी अधिग्रहण करणेची कार्यवाही पूर्ण केली आहे.

१३) संस्थान मालमत्तेची देखभाल करणेकामी वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणींबाबत मार्गदर्शन केले.

१४) सध्यस्थितीत मा.उच्च न्यायालयात श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी संस्थानचे विरोधात दाखल केलेल्या दाव्याचे कामकाज चालू आहे. तसेच साखरबाई हरीभाऊ शेळके यांची जमीन संस्थानला भुसंपादनाद्वारे खरेदी करणेचे प्रकरण देखील मा.उच्च न्यायालयात चालू आहे. याबाबत उचित कार्यवाही चालू आहे.

याशिवाय पुढील कालावधीत १) मुंबई ते शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे ते शिर्डी, अहमदनगर ते शिर्डी,भंडारदरा ते शिर्डी या मार्गांवर संस्थानचे पालखी थांबे उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागांचा शोध घेणे, जागा दानपत्र घेणे, जागा खरेदी घेणे याबाबतची प्रकरणांची छाननी करणे इ. २) सर्व राज्यांच्या महत्वाच्या ठिकाणी संस्थानचे माहिती केंद्र उभारणेचे प्रस्तावित आहे. त्यासाठी जागा निश्चिती करणे, जागा उपलब्ध करणे व तत्संबंधी कामकाज करणे. ३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कायमस्वरुपी खरेदी करणे. ४) मौजे रुई,ता.राहाता येथे संस्थानचे वैद्यकीय संकुल प्रस्तावित आहे. त्यासाठी संस्थान मालकीच्या क्षेत्रालगत असलेली जमीन खरेदी करणेकामी कागदपत्रांची छानणी करणे, मोजणी करुन घेणे व त्यासंबंधीत कामकाज करणे. ५) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे संस्थानसाठीची यापूर्वीची आरक्षणे रद्द करणे व संस्थानच्या मिळकतींवर टाकलेली आरक्षणे रद्द करणेकामीची कार्यवाही करणे. ६) मालमत्ता व भुसंपादन संबंधात विविध कोर्टात उदा.दिवाणी न्यायालय,राहाता, कोपरगाव, दिवाणी न्यायालय,व.स्तर,कोपरगाव, सत्र न्यायालय, कोपरगाव, उच्च न्यायालय,औरंगाबाद व सर्वोच्च न्यायालय,दिल्ली इ.कोर्टात चालू असलेल्या ३८ केसेमध्ये उचित कार्यवाही करणे. ७) संस्थानचे ताब्यात असलेल्या मोफत सर्वे नं.१ पै. चे क्षेत्रासंबंधात शासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या दंडात्मक कार्यवाहीचे प्रकरणी कामकाज पाहणे ८) मोफत सर्वे नं.१ च्या क्षेत्राचा ताळमेळ घेणेचे प्रकरणी कार्यवाही करणे ९) यापूर्वीचे भुसंपादन प्रकरणात शासनाकडे संस्थानने भरलेली अनामत रक्कम परत मिळणेकामीचे प्रस्ताव तयार करणे व पाठपुरावा करणे १०) संस्थान मालकीच्या जमीनींच्या पोटहिश्श्यांचे सामीलीकरण करणेचे प्रस्ताव तयार करणे, अशा प्रकारची महत्वाची कामे करावयाची आहेत.

यासाठी व दैनंदिन कामकाजातील मार्गदर्शनासाठी मालमत्ता विभागास श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार यांची यापुढील कालावधीसाठी देखील आवश्यकता आहे.

यापूर्वी श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,सेवानिवृत्त नायब तहसिलदारतथा कं.सल्लागार,मालमत्ता विभाग यांनी इकडेस दि.०१/०८/२०१७ रोजी मानधन वाढवून देणेकामी अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी मी श्री साईबाबा संस्थान,शिर्डी येथे दि.२६/१०/२०१५ पासून मालमत्ता विभागात मासिक मानधन तत्वावर कार्यरत आहे. मला माहे सप्टेंबर-२०१६ पासून दरमहा रु.१५,०००/- इतके मासिक मानधन दिले जात आहे. मात्र रजा सवलत,शासकीय सुट्टया वगैरे इ.सवलती दिल्या जात नाहीत. त्यामुळे मी काही अडचणीच्या वेळेस एक दोन दिवसांची सुटी घेतली तर त्या दिवसांचा माझा पगार कापला जातो. परिणामी मला दरमहा रु.१५,०००/- पेक्षाही कमी पगार मिळतो. माझे कुटूंब संगमनेर येथे राहते व मी नोकरीनिमित्त शिर्डी येथे राहतो. त्यामुळे माझा दोन्ही

ठिकाणी खर्च होत आहे. सदरचे मानधन हे अत्यल्प असल्याने व महागाई भयंकर वाढलेली असल्याने मला माझा कुटूंबाचा खर्च भागविणे कठीण होत आहे. तरी मी केलेल्या कामाचा,विशेषत: महागाईचा व माझे पदाचा विचार करुन माझे मासिक मानधन किमान रु.२५,०००/- करण्यात यावे,अशी विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** १) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार,(सेवानिवृत्त नायब तहसिलदार)यांची नेमणूकीची मुदत दि.१८/१०/२०१८ अखेर संपत आहे. त्यांनी उपरोक्तप्रमाणे समाधानकारक कामे केलेली असून मालमत्ता विभागाचे दैनंदिन कामकाजात देखील मार्गदर्शन केलेले आहे. मालमत्ता विभागामार्फत यापूढे उपरोक्तप्रमाणे कामे प्रस्तावित आहेत. उपरोक्त कामांच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टिने यापूढेही त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे. तरी दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९ या एक वर्षाचे कालावधीसाठी त्यांची प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून एकत्रित मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देता येईल.

२) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना रजा व सुटी सवलत नसल्याने त्यांचे मानधनातून रजेचे व सुटीचे पैसे कपात केले जातात. त्यासाठी त्यांना रजा सवलत न देता फक्त शासकीय सुट्या पगारी अनुज्ञेय करता येतील.

३) श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना मागील दोन वर्षात मानधन वाढवून न दिलेने त्यांना पूर्वीचे मानधन रु.१५,०००/- मध्ये वाढ करुन एकत्रित मासिक मानधन रु.२५,०००/- इतके करता येईल.

**प्रस्ताव**– श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार,(सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांच्या नेमणूकीची मुदत दि.१९/१०/२०१८ पासून दि.१८/१०/२०१९ पर्यंत या एक वर्ष कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून एकत्रित रक्कम रु.२५,०००/- इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देणेच्या व फक्त शासकीय सुट्या पगारी अनुज्ञेय करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार,(सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना दि.१९/१०/२०१८ पासून दि.१८/१०/२०१९ पर्यंत या एक वर्ष कालावधीसाठी प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून एकत्रित रक्कम रु.२५,०००/- इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ **कंत्राटदारामार्फत आऊटसोर्सिंग पध्दतीने कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना इनसोर्समध्ये वर्ग करुन घेण्याबाबत / इनसोर्समध्ये कामे करत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे देण्यात येत असलेल्या सोयी-सवलती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांकित कामी शिर्डी कंत्राटी कामगार संघटना, शिर्डी यांचा अर्ज इकडिल कार्यालयास प्राप्त झाला असून त्यात त्यांनी, मा.कार्यकरी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व मा.एम.पी.इंटरप्रायजेस पुणे स्पिक न स्पाईन पुणे, या उभयंतामध्ये संस्थान चालवित असलेल्या रुग्णालयातील, श्री साईआश्रम १, श्री साईआश्रम २, व्दारावती भोजनालय, अशा विभागात स्वच्छतेचे व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग माध्यमातून करण्याबाबत करार करण्यात आले असून सदर कराराप्रमाणे कामगारांची नोमणूक करण्यात आलेली आहे.

संस्थानने त्यांच्याकडील कंत्राटदार, सिक्युरिटी फोर्स लि, सी.आय.एस.एस. इंटरप्रायजेस, जय भवानी इंटरप्रायजेस, बी.व्ही.जी.इंटरप्रायजेस या संस्थान मार्फत काम करणा-या कंत्राटी कामगारांना त्याच्या वेतनात ४०% वेतनवाढ जाहिर करुन १ एप्रिल २०१७ पासून सुरुवात केलेली आहे. वास्तविक सदर कामगाराप्रमाणेच एम.पी.इंटरप्रायजेस पुणे आणि स्पिक न स्पाईन पुणे या संस्थेतील कामाचे स्वरुप कंत्राटी पध्दतीनेच असल्याने या सर्व १७०० कर्मचा-यांना देखील ४०% वेतनवाढ मिळणे आवश्यक आहे. कारण श्री साईबाबा विश्वस्त समितीतील भूमीतील सदस्यांनी २५/०२/२०१७ रोजी ही ४०% वेतनवाढ आऊटसोर्स कामगारांना ही होईल असे तोंडी आश्वासन देऊन ४०% वेतनवाढीतुन वगळण्यात आलेले आहेत व उभयंताचे कृत्य व अनुचित व अनफेअर असून सदर कामगारांवर अन्याय करणारे आहे.

सदर कामगार हे अनेक वर्षांपासून संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी, ता.राहाता यांचे कडेस कंत्राटी कामगार म्हणून नियमितपणे व सलग काम करित आहे. संस्थानचे कायम कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांच्या कामाचे

स्वरुप सारखेच आहे. परंतू त्यांना मिळणा-या वैद्यकीय सुविधा, (पिवळा केस पेपर, विमा उतरविणे, शैक्षणिक फि परतावा, आणि वेतनात फार मोठी तफावत आहे.)

सदर सर्व कर्मचा-यांना अनेक वर्षांपासून ६ ते ७ हजार रुपये इतक्या तुटपुंज्या पगारावर कुटुंब निर्वाह करावा लागतो. या ६ ते ७ हजार पगारावर कर्मचा-यांनी आपला उदरनिर्वाह कसा करावा.

सदर कुठलाही कंत्राटदार कर्मचा-यांना पेमेंट वेळेवर न करणे पेमेंट चिठ्ठी न देणे, विमा उतरविणे, वैद्यकीय सुविधा न देणे, पेमेंट कमी देणे असे अनेक गैरप्रकार अनेक वर्षांपासून घडत असून यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही होत नसून सदर कर्मचा-यांवर अन्याय व पिळवणूक होत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

या सर्व कारणामुळे सर्व कामगारांना योग्य न्याय मिळावा म्हणून श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापनाशी चर्चा करुन अभयपक्षी सर्वमान्य तडजोड करावी व सर्व विभाग श्री साई आश्रम१, श्री साईआश्रम २, व्दारावती भक्तनिवास, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ हॉस्पीटल, भोजनालय विभाग अशा सर्व विभागातील आऊटसोर्स कर्मचा-यांना श्री साईबाबा संस्थान मध्ये इनसोर्स मध्ये वर्ग करण्यात यावे अशी विनंती.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, वरिल मागणीचा सहानुभुतीपूर्वक विचार करण्यात येऊन मागणी दि.२०/७/२०१८ पर्यंत शिर्डी कंत्राटी कामगार संघटनेशी चर्चा करुन मागणीची सोडवणूक करावी ही नम्र विनंती अन्यथा दि.२५/७/२०१८ रोजी शिर्डी कंत्राटी कामगार संघटनेमार्फत श्री साईआश्रम १, श्री साईआश्रम २, व्दारावती, भोजनालय, श्री साईबाबा हॉस्पिटल या सर्व विभागातील १७०० ते १८०० कर्मचा-यांबरोबर कुटुंब परिवारासह बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येईल याची साईबाबा विश्वस्तव्यवस्था व कंत्राटदार यांनी दक्षता घ्यावी ही नम्र विनंती. असे नमूद केलेले आहे.

**प्रस्तावनाः-** याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११७०/२०१८, दि.२१.०७.२०१८ अन्वये मे.एम.पी. एंटरप्रायझेस, पुणे व मे.स्पिक एन स्पॅन, मुंबई यांना तुमचे एजन्सीकडील कंत्राटी कर्मचारी यांनी दि.१३.०७.२०१८ रोजीचे पत्रान्वये दि.२५.०७.२०१८ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करणार असल्याने, सदर कर्मचा-यांना आंदोलनापासून परावृत्त करावे किंवा पत्रात नमूद केलेल्या तारखेस कामबंद आंदोलन केल्यास संस्थानच्या संबंधित विभागातील कामाची अडचण / खोळंबा होऊ नये म्हणून आपण सदर ठिकाणी कामगारांची पर्यायी व्यवस्था करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तसेच जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२०१७/२०१८, दि.२५.०७.२०१८ अन्वये मे.स्पिक एन स्पॅन, मुंबई यांना व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२०१८/२०१८, दि.२५.०७.२०१८ अन्वये मे.एम.पी.एंटरप्रायझेस,पुणे यांना संबंधित कंत्राटी कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधींशी व संबंधित एजन्सीचे प्रतिनिधी यांचे समवेत पोलिस उपअधिक्षक, प्रशासकीय अधिकारी यांनी दि.२०.०७.२०१८ रोजी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनीही दि.२४.०७.२०१८ रोजी आंदोलन करु नये याबाबत संबंधितांशी समक्ष चर्चाही केली होती. तथापि सदर आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी आपले भुमिकेवर ठाम राहिल्याने संबंधित दोन्ही ठेकेदार एजन्सींला कामाची पर्यायी व्यवस्था करणेबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, ऐन श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१८ चे दरम्यान दि.२५.०७.२०१८ पासून संबंधित आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांनी कामबंद आंदोलन केले होते. त्यामुळे श्री साई भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून, करारनाम्यात नमूद केलेप्रमाणे सदर आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांचे बदली पर्यायी नव्याने आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करुन द्यावेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२०२८/२०१८, दि.२५.०७.२०१८ अन्वये मे.एम.पी.एंटरप्रायझेस, पुणे व मे.स्पिक एन स्पॅन, मुंबई यांना कळविण्यात आले होते.

श्री साईबाबा संस्थानचे, श्री साई आश्रम, श्री साईबाबा धर्मशाळा, व्दारावती विभाग, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल, श्री साई प्रसादालय विभाग, लाडू निमिती विभाग इ. ठिकाणी स्वच्छता , हाऊस किपींग,लाडू व बर्फी तयार करणे, बुंदी तयार करणे,चपाती तयार करणे व नाष्टा पाकीटे तयार करणे इत्यादी कामाकरीता यांत्रिकी करणासह उक्ते स्वरुपात कामे आऊसोर्स पध्दतीने खालीलप्रमाणे ठेकेदारांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यानुसार त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कर्मचारी पुरविणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

| अनं | कॉन्ट्रक्टरचे नांव | विभागाचे नांव व कामाचे स्वरुप | मनुष्यबळ संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कुशल | अकुशल | एकूण |
| १. | मे.एम.पी.एंटरप्रायझेस, पुणे. | श्री साईआश्रम (हाऊस किपींग) | ९९ | ५६६ | ६६५ |
| २ | मे.एम.पी.एंटरप्रायझेस, पुणे. | व्दारावती भक्तनिवासस्थान (हाऊस किपींग) | ०६ | ९९ | १०५ |
| ३. | मे.स्पिक न स्पॅन, सर्व्हिसेस, पुणे. | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय (हाऊस किपींग) | १० | १४३ | १५३ |
| ४. | मे.स्पिक न स्पॅन, सर्व्हिसेस, पुणे. | श्री साईप्रसादालय विभाग (हाऊस किपींग) | ११ | १८१ | १९२ |
| ५. | मे.एम.पी.एंटरप्रायझेस, पुणे. | श्री साईधर्मशाळा विभाग (हाऊस किपींग) | ३१ | २०८ | २३९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | मे. श्री साई केटरर्स, श्रीरामपूर. | १. मोतीचूर लाडू तयार करणे व सुटी बुंदी तयार करणे<br>२. अन्न पाकिटे तयार करणे<br>३. मशिनवर चपाती बनविणे<br>४. स्वामी नारायण चपाती तयार करणे. | ००<br>००<br>००<br>०० | १७५<br>६०<br>४०<br>६० | १७५<br>६०<br>४०<br>६० |
| | | **एकूण** | **१५७** | **१५३२** | **१६८९** |

सध्या श्री साई आश्रम, श्री साईबाबा धर्मशाळा, व्दारावती विभाग, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल, श्री साई प्रसादालय विभाग, लाडू निमिती विभागाकडे कंत्राटदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने अंदाजे एकूण १६८९ कर्मचारी कामे करीत आहे.

सदरचे कंत्राटदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने कामे करत असलेल्या कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील, दि.२८ सप्टेंबर-२०१०, रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८, अंतर्गत, शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.३, या अधिसुचनेस उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई, यांचे कडील, दि.०६.०२.२०१८, रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौंन्सप्रमाणे सध्या किमान वेतनदरानुसार अकुशल कंत्राटी कामगार रूपये ३०६.३० प्रतिदिनी व कुशल कंत्राटी कामगार रूपये ३३७.०७ प्रतिदिनी या प्रमाणे किमान वेतन देण्यात येत आहे, व वेळोवेळी स्पेशल अलौंन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येते.

उपरोक्त नमूद प्रमाणे कामे आऊटसोर्स पध्दतीने दरमहा सर्व करांसहित रकमेने देण्यात आलेली असून, दर महिन्यास प्रत्यक्षात कामावर असलेल्या कर्मचारी संख्येनुसार संबंधित ठेकेदारास बिले आदा करण्यात येतात,पैकी साईधर्मशाळा, व्दारावती, साईआश्रम, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालय व श्री साईप्रसादालय येथील कॉन्ट्रक्टर त्यांचेकडील कर्मचा-यांना किमान वेतन दरानुसार वेतन अदा करीत आहेत.

या व्यतिरिक्त लाडू पाकिटे, बुंदीप्रसाद,अन्नपाकिटे,चपाती तयार करणेचे काम मे.श्री साई केटरर्स, श्रीरामपूर, दि. यशोधरा महिला सहकारी उत्पादक संस्था, नाशिक यांना देण्यात आलेले असून, त्यांचे कॉन्ट्रक्ट हे प्रति हजारी व चपाती, अन्नपाकिटे यांचे कॉन्ट्रक्ट हे प्रति क्विंटल दराने देण्यात आलेले आहे, त्यांचे कडील कर्मचा-यांना उक्त्या पध्दतीने काम देवून पेमेंट करण्यात येते,

सध्या कंत्राटदारामार्फत नेमणूक करण्यात आलेल्या इनसोर्स कंत्राटी कर्मचा-यांना खालीलप्रमाणे सुविधा देण्यात येत आहे.

अ) संस्थानमध्ये आज अखेर इनसोर्स पध्दतीने एकूण २६५० अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी काम करत असून, सदर कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचेकडील, दि.२८ सप्टेंबर-२०१०, रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८, अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अधिसुचनेस उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई, यांचेकडील, दि.०६.०२.२०१८, रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौंन्सप्रमाणे सध्या किमान वेतनदरानुसार तसेच माहे-एप्रिल-२०१७ पासुन किमान वेतनावर ४०% वेतनवाढ धरुन अकुशल कंत्राटी कामगार रूपये ४२८.८२ प्रतिदिनी व कुशल कंत्राटी कामगार रूपये ४७१.८९ प्रतिदिनी वेतन देण्यात येत आहे. व वेळोवेळी स्पेशल अलौंन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवून कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतनदराप्रमाणे वेतन देणेत येत आहे.

ब) मोफत वैद्यकिय सेवा व नियमावलीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.११.२०११ निर्णय क्र.७६५(२३) अन्वये मान्यता मिळालेली असुन, सदर नियमावली दि.०१.०१.२०१२ पासुन लागु करण्यात आलेली आहे सदर वैद्यकिय उपचारासाठी वार्षिक मर्यादा व सेवेचा कालावधी खालीलप्रमाणेः-

०१ ते ०५ वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.३०,०००/- पर्यंत

०५ ते १० वर्षे पर्यंत सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.४०,०००/- पर्यंत

१० वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा झालेले कंत्राटी कर्मचारी बिलमर्यादा रक्कम रू.५०,०००/- पर्यंत

क) दरवर्षी एकुण हजर दिवसाच्या ८.३३% प्रमाणे दिपावली निमित्त सानुग्रह अनूदान देण्यात येत आहे.

ड) कर्मचा-यांच्या पाल्यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.११.२०१६ निर्णय क्र.८१० नुसार तसेच शासन आदेश क्र.सासंवि १०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६ दि.१५.०४.२०१७ अन्वये शैक्षणिक फि परतावा देण्यात येत आहे.

ई) कुशल, अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना संबंधित ठेकेदारामार्फत दोन गणवेश, ओळखपत्र देण्यात येते. तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश, बुट, टोपी, शिटी व काठी देण्यात येते.

उ) कंत्राटी कर्मचा-यांस नुकसान भरपाई अधिनियमन १९२३(वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट,१९२३ नुसार कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख पर्यंतचा विमा उतरविण्यात येतो.

विभागाचा अभिप्रायः- अ) सध्या कंत्राटदारामार्फत आऊटसोर्स कर्मचारी १६८९ इतके आहेत. त्यांना आऊटसोर्स कंत्राटदारामार्फत किमान वेतन कायदयानुसार प्रतिदिनी अकुशल- रु.३०६.३० व कुशल- रु.३३७.०७ असे किमान वेतन अदा करण्यात येते. सदर आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांना इनसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे प्रमाणे ४०% वेतन वाढ दयावयाची झाल्यास प्रतिदिनी अकुशल कर्मचारी रु.१२२.५२ व कुशल कंत्राटी कर्मचारी यांना रु.१३४.८२ इतके प्रतिदिनी अतिरिक्त वेतन अदा करावे लागेल.

०१) अकुशल कर्मचारी प्रतिदिनी - १२२.५२ × १५३२ = रु.१,८७,७००.००इतके प्रतिदिनी अतिरीक्त वेतन अदा करावे लागेल.

०२) कुशल कर्मचारी प्रतिदिनी - १३४.८२ × १५७ = रु. २१,१६६.००इतके प्रतिदिनी अतिरीक्त वेतन अदा करावे लागेल.

प्रतिदिनी एकूण आर्थिक भारः- रु. २,०८,८६६.०० या प्रमाणे प्रतिमहा एकूण रु.५४,३०,५१६/- इतका आर्थिक भार संस्थानला वाढेल.

ब) सन -२०१७ पासून श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल झालेल्या सर्व रुग्णांवर मोफत सल्ला/ उपचार केले जातात. त्यानुसार संबंधित आऊटसोर्स कंत्राटदारामार्फत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना रुग्णालयामध्ये मोफत सल्ला/उपचार व त्यांना रुग्णालयातील सवलती देता येतील.

तथापिः-

१) सध्या श्री साईआश्रम भक्तनिवासस्थान, श्री साई धर्मशाळा, व्दारावती, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालय व श्री साईप्रसादालय विभागाकडे यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, पेस्टकंट्रोल, स्वच्छता, वाढपी, इत्यादि कामासाठी आऊटसोर्स कंत्राटदारांची उक्ते पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली आहेत. सदरची कामे कंत्राटदाराने पूर्ण करुन घेणेकामी कंत्राटदारांकडे आऊटसोर्स पध्दतीने कुशल, अकुशल असे एकूण- १६८९ कंत्राटी कर्मचारी कामे करत आहेत.

२) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० चे तरतुदीनुसार बाहय एजन्सी अथवा कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले कंत्राटी कामगार व आस्थापना अथवा कंपनी यांचे मध्ये थेट नाकर व मालक संबंध प्रस्थापित होऊ शकत नाही. सदर कंत्राटी कामगार हे मालक संस्थेचे कामगार नसुन ते कंत्राटदाराचे कामगार आहेत. त्यामुळे त्यांचे सेवा शर्ती, वेतन, नियुक्ती ,सेवासमाप्ती , पर्यवेक्षण, आर्थिक देणी ,सुविधा इत्यादि बाबत कायदेशिर जबाबदारी ही मालक संस्थेची नसून ही कंत्राटदाराची आहे. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी खालीलप्रमाणे वेळोवेळी निकाल दिलेले आहे.

**01) In The Supreme Court of India.**

Civil Appeal Nos 5061-62/1984,dated September 8,1993

**02) Supreme Court of India**

Civil Appeal No.12845 of 1996 ,Decided on 21.02.2001

**03) Supreme Court of India**

Civil Appeal No.3375 of 1998

**04) Supreme Court of India**

Civil Appeal Nos 8452 to 8463 of 2003,october28, 2003

**05)In The High Court of Judicature at Bombay**

O.O.C.J.Writ Petition No.846 of 2003

**06) In The High Court of Judicature at Bombay**

Original Side Writ Petition No 1409 of 2004

**07) In The High Court of Judicature at Bombay**

Ordinary Original Civil Jurisdiction Writ Petition No.2190 of 2005

**7A) In The High Court of Judicature at Bombay**

Ordinary Original Civil Jurisdiction Writ Petition No.1431 of 2003

**08) Bombay High Court**

O.O.C.J. Writ Petition No. 2568 of 2005

09) In The High Court Of Bombay

C.A.J.W.P. No. 1142 / 1997 dated September 12, 2007)

10) In The High Court Of Bombay

L.P.A. Nos. 102/2007 and 103/2007 dated (Reserved on October 12, 2007)

Pronounced on October 23, 2007

11) In The Supreme Court Of India

Civil Appeal No. 2355 Of 1991 With (C.A.NOS. 2356-66/91, 2366-A-69/91,S.L.P.(C) Nos.9755/91,9830/91&10235-43/91)

12) In The Supreme Court Of India

Steel Authority of India Ltd. etc.etc. _____Appellants

13) Bombay High Court – Nagpur Bench

Writ Petition No. 3765 of 2008

३) आऊटसोर्स कंत्राटदारांना उपरोक्त काम देताना संस्थान व कंत्राटदार यांचेमध्ये १ ते ७२ अटी व शर्ती नमूद करुन निविदेतील व कार्यादेशातील अटी मान्य असलेबाबत त्यांचे समवेत तसा करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. त्यात अ.नं. ६ पार्टी नं.२ यांनी कामासाठी लावण्यात येणा-या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडंड फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रककम तसेच वर्कमॅन कॉम्पेनसेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतची सर्व कायदेशीर जबाबदारी पार्टी नं.०२ वर राहील. यापैकी कोणतीही जबाबदारी पार्टी नं.०१ वर राहणार नाही. कामगार वेतन कायदा १९३६, कामगार नुकसान भरपाई कायदा १९६१, कामगार कायदा १९३८, कामगार नियमीत करणे व काढुन टाकणेचा कायदा १९७९ नुसार वेळोवेळी झालेल्या कायदेशीर सुधारणा पार्टी नं.०२ वर बंधनकारक राहतील.

४) सदरचे कंत्राट आऊटसोर्स (यांत्रिकीकरणासह उक्त्या) पध्दतीने असल्याने, संस्थान सदर आऊटसोर्स ठेकेदारास फक्त दिलेल्या मंजूर पॉईंटनुसार कर्मचारी पुरविणेचे आदेश देत असते. याकामी त्यांनी कोणते कर्मचारी पुरवायाचे याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित ठेकेदाराची असते. तसेच दिलेल्या प्रति महिना मंजूरी व त्यांनी प्रत्यक्षात पुरविलेल्या प्रति कंत्राटी कर्मचारी पॉईंटप्रमाणे संस्थान सदर ठेकेदारास वेतन अदा करत असते. त्यामुळे सदरचे कंत्राटी कर्मचारी यांची नेमणूक करणे ,त्यांची सेवा समाप्त करणे, संबंधित कंत्राटी कर्मचा-यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे याची नियमानुसार कायदेशीर जबाबदारी ही संबंधित ठेकेदाराची असल्याने संबंधित आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी व संस्थान त्यांचेमध्ये मालक व नोकर असा कोणताही संबध प्रस्तापित होत नाही .सदर कंत्राटी कर्मचारी हे संबंधित एजन्सीचे कर्मचारी असल्याने त्यांना सोई /सुविधा देणे बाबतची सर्व जबाबदारी ही आऊटसोर्स ठेकेदार यांची असून सदरची बाबत संस्थानवर बंधनकारक नाही.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी येथे मनुष्यबळ परीक्षण अहवालानुसार संस्थानचे विविध विभागांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त मनुष्यबळ असल्याचे निदर्शनास आले आहे.याकरीता यापुढे अकुशल/सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांची भरती करण्यात येऊ नये याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१४१ पारीत झालेला आहे.

**प्रस्तावः-** तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे संबंधित विभागाकडे कंत्राटदारामार्फत यांत्रिकीकरणासह व साहित्यासह उक्त्या पध्दतीने आऊटसोर्स पध्दतीने कामास असलेल्या एकूण १६८९ कंत्राटी कर्मचा-यांना ते थेट कंत्राटदाराचे कर्मचारी असल्याने त्यांना प्रतिदिन वेतनावर इनसोर्स पध्दतीने कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या इनसोर्स कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे सुविधा देणे संस्थानवर बंधनकारक नाही. कारण सदर आऊटसोर्स कंत्राटी कामगार व संस्थान यांचेमध्ये मालक व नोकर असा थेटसंबंध प्रस्तापित होत नाही. सदर कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन अधिनियम- १९४८ नुसार किमान वेतन देणे, प्रॉव्हीडंट फंड ॲक्ट– १९५२ नुसार प्रॉव्हीडंट फंड वर्गणी भरणे, कामगार नुकसान भरपाई अधिनियम- १९२३ नुसार अपघात विमा उतरविणे, सानुग्रह अनुदान ८.३३% देणे इत्यादि कायदेशीर आर्थिक देणी कंत्राटदार त्यांचे कामगारांना देतो की नाही हे पाहण्याची जबाबदारी प्रिन्सीपल एम्प्लॉयर म्हणून संस्थानवर आहे. या व्यतिरिक्त आर्थिक देणी व सोई-सुविधा देणेची जबाबदारी ही निविदेतील, कार्यादेशातील व करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार आऊटसोर्स एजन्सी / कंत्राटदाराची आहे. त्यामध्ये त्यांनी निविदा भरताना या सर्व बाबी विचारात घेऊनच निविदा भरलेली आहे. त्यामुळे शिर्डी कंत्राटी

कामगार संघटना, शिर्डी यांनी दि.१३.०७.२०१८ रोजीचे पत्रान्वये केलेल्या मागण्यांबाबत संस्थानचा थेट संबंधि येत नाही. त्यांनी कंत्राटदाराकडे / एजन्सीकडे मागणीकरणे उचित राहिल. असे मत आहे.

तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे संबंधित विभागाकडे कंत्राटदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने कामास असलेल्या एकूण १६८९ कंत्राटी कर्मचा-यांना इनसोर्स पध्दतीने कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या इनसोर्स कंत्राटी कर्मचा-यांप्रमाणे सुविधा देता येणार नाही. तथापि सदरची बाब धोरणात्मक असल्याने सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ६२४** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.** **(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३** **१० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी कामी प्री-बीड मध्ये बिडर्स यांनी उपस्थित केलेल्या शंका निरसनावर मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी सादर केलेल्या तक्ता क्र.०३ मधील अनुपालनांचे अवलोकन होऊन धोरणात्मक निर्णय होणेबाबत .**

प्रस्ताव- दि.०७-०८-२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये मा.विश्वस्तांनी केलेल्या सुचनेनुसार अपारंपारिक उर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम बसविणेकामी विद्युत विभागाच्या दि.२६-१२-२०१७ रोजीच्या टिपणी अन्वये रक्कम रु. ४०/- कोटी इतक्या खर्चास तसेच या प्रकल्पासाठी राज्य शासनाची मान्यता घेणेस व या प्रकल्पाचे कामासाठी विहीत पध्दतीने (मराठीतील व इंग्रजीतील जादा खपाच्या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन) तसेच शासनाचे महा-टेंडर या संकतेस्थळावरुन ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. यावर मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०८-०१-२०१८ रोजीचे सभेतील विषय क्र.१९ निर्णय क्र.१९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, अपारंपारिक उर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम बसविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ४०/- कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी राज्य शासनाची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार राज्य शासनाची मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव,विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. संस्थानमार्फत करण्यात आलेल्या पत्रव्यवहारानंतर मा.प्रधान सचिव,विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांचे शासन निर्णय क्र.सासवि-१०१८/०४/प्र.क्र.०२/का.१६ दि.१६-०८-२०१८ रोजीचे पत्रानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत १० मेगावॅट सोलर पी.व्ही.प्रकल्प उभारणेस व त्यासाठी येणा-या रु.३९,९५,३७,०००/- इतक्या खर्चास मंजुरी मिळाल्याबाबतचे पत्र श्री साईबाबा संस्थानला दि.२०-०८-२०१८ रोजी प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार अपारंपारिक उर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम बसविणेकामाची ई-निविदा दि.१०-९-२०१८ रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatendrs.gov.in. या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. ई-निविदा अपलोड करणेसाठी दिनांक १०-०९-२०१८ ते दिनांक ०१-१०-२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. तसेच प्री-बीड साठी दि.१७-०९-२०१८ ही तारीख देण्यात आलेली होती.

सदर प्री-बीड मिटींग दि.१७-०९-२०१८ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी साहेब, मा.कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) तसेच मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे श्री.दिपक झाडे, श्री.नंदकिशोर धकाते यांचे उपस्थितीत झाली. सदर प्री-बीड मिटींगला एकुण पुढीलप्रमाणे १७ कंत्राटदार उपस्थित होते.

| Sr.No. | Name of Company |
|---|---|
| 1 | Anupam Renewable Energy, V.U.Nagar, Anand, Gujarat |
| 2 | Swoftmail Communication Pvt.Ltd., Noida, Uttar Pradesh |
| 3 | Waaree Energies Limited, Mumbai, Maharashtra |
| 4 | Mundra Solar Pvt.Ltd., Adani, Ahmedabad, Gujarat |
| 5 | Corps Energy Pvt.Ltd., Mumbai, Maharashtra |
| 6 | Ujaas Energy Ltd., Indore, MP |
| 7 | BVG Clean Energy Ltd., Pune, Maharashtra |
| 8 | Siemens Gamesa Renewable Power Pvt.Ltd., Chennai, Tamil Nadu |
| 9 | Ravindra Energy Ltd., Pune Maharashtra |

| | |
|---|---|
| 10 | Toshiwa Solar Pvt.Ltd., Aurangabad, Maharashtra |
| 11 | Baritech Projects Pvt.Ltd., Aurangabad, Maharashtra |
| 12 | Harsh Energy, Pune, Maharashtra |
| 13 | Ezsol Power, |
| 14 | Enrich Energy Pvt.Ltd., Pune, Maharashtra |
| 15 | Greenlife Energy Pvt.Ltd., Pune, Maharashtra |
| 16 | SunInfra Energy Pvt.Ltd., Thane, Maharashtra |
| 17 | Sai Solar Solutions, Rahuri, Maharashtra |

दि.१७-०९-२०१८ रोजी झालेल्या प्री-बीड मिटींगमध्ये कंत्राटदारांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत चर्चा झाली. त्यानुसार संबंधीत कंत्राटदारांनी त्यांचे शंका ई-मेलव्दारे पाठविलेनंतर त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी साहेब तसेच मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे श्री.दिपक झाडे यांची दि.१९-०९-२०१८ रोजी शिर्डी येथे चर्चा झाली. परंतु अद्याप मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी ई-मेलव्दारे शंका निरसनाबाबतचा तक्ता पाठविलेला नाही. त्यामुळे शंकानिरसन तक्ता वेबसाईटवर अपलोड करता आलेला नाही. आतापर्यंत टेंडरधारकांकडून प्राप्त झालेले टेंडरमधील अटींबाबतचे ई-मेल मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना वेळोवेळी पाठविण्यात आलेले आहेत.

आतापर्यंत ई-मेल पाठविले टेंडरधारक 01) Marine Electricals (I) Pvt.Ltd., Mumbai (02) Sungrow (I) Pvt.Ltd, Mumbai (03) BVG India Ltd., Pune (04) Teyma India Pvt.Ltd., Mubai यामध्ये टेंडरधारकांनी टेंडर सबमिशन तारीख वाढविण्याची मागणी केली होती. त्यानुसार विद्युत विभागामार्फत ई-निविदेस मुदतवाढ देणेकामी दि.२७-०९-२०१८ रोजी टिपणी सादर करणेत आली होती. त्यास मिळालेल्या मान्यतेनुसार Tender ID 2018_SAI_350408_1 यास दि.१३-१०-२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेकडून शंकानिरसन तक्ता दि.०१ ऑक्टोबर, २०१८ रोजी प्राप्त झाला असून तो तीन प्रकारात प्राप्त झालेला आहे.

(01). Devination

(02). Tender Conditions Prevails

(03). Policy Decision to be taken by Sansthan

उपरोक्त ०१ व ०२ हे टेक्निकल स्पेसिफिकेशन व इतर बाबींबाबत असून ते वेबसाईटवर व महाटेंडरर्स वर अपलोड करता येईल. तक्ता क्र.०३ मध्ये ज्या निर्णयावर श्री साईबाबा संस्थानच्या निर्णयाची गरज आहे ते मुद्दे खालीलप्रमाणे.

| **PRE-BID QUERIES & CLARIFICATION : POLICY DECISION BY SSSTS - 10 MW SOLAR POWER PROJECT** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **S. No.** | **Clause No.** | **Page No.** | **Existing provision** | **Clarification / Change Requested by vender** | **Clarification to Bidder/Amendment** |
| **E** | **Enrich Energy Pvt. Ltd.** | | | | |
| 14 | 7.46.1 | | The power from the plant must be evacuated to nearby connecting substation through multicore co – axial cable of appropriate size as per prevailing condition at site. | We propose overhead conductor for transmission line? | As SSST will be selecting L1 bidder guaranteeing generation (as mentioned in tender document) at the grid substation, bidder can be provided with an option to set up underground cable or overhead transmission line as per the site condition. Underground cable or overhead transmission line should be in line with the guidelines. As it is policy decision, SSST management should take final decision. |
| Note :- ओव्हरहेड ट्रान्समिशन लाईनला खर्च कमी लागणार असून भूमिगत केबलकरीता खर्च जास्त लागू शकतो. सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच वहन क्षमतेच्या दृष्टीने भूमिगत केबलिंग चांगली असून त्यावर उन, वारा, पाऊस याचा कोणताही परिणाम होत नाही. परंतू ओव्हरहेड ट्रानसमिशन लाईनला वादळ वा-यामुळे तारा तुटणे, पोल वाकणे इ.समस्या निर्माण होऊ शकतात. | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **G** | **Mundra Solar PV Ltd.** | | | | |
| 1 | | | | 1. Supplier should be a Bloomberg Tier – 1 and DNV-GL certified domestic manufacturer of Solar Cells and Solar modules. 2. Average turnover of last 3 years should be more than 100 crore. 3. Experience in development of atleast 40 MW Solar power ground mount projects. 4. No JV's and consortium for this tender is allowed but however the bidder can use the credentials of their associate/ group companies. | For point no. 1; As SSST will be selecting L1 bidder guaranteeing generation (as mentioned in tender document) at the grid substation, bidder can select Indian or international solar modules. As it is policy decision, SSST management should take final decision. For all other points, Tender conditions prevails. |
| Note :- यामध्ये स्वदेशी बनावटीचे तसेच परदेशी बनावटीचे असे दोन पर्याय सोलर मॉडयुल करीता उपलब्ध असून याबाबत संस्थानने निर्णय घेणे अपेक्षित आहे. | | | | | |
| **H** | **Adani** | | | | |
| | | | | 1) Supplier should be a domestic module manufacturing facility with at least 50 MW of module manufacturing facility and should have supplied atleast 50 MW of panel supply experience in last 3 years. 2) In case bidder is manufacturer they have consortium with land party and EPC company. Bidder cannot utlize EPC companies financial credentials, they can only utilize the installation experience. 3) Average Net Worth of the manufacturing company should not be below 25 crore. 4) Bidder is allowed to use credentials of their associate/ group companies 5) Land agreement should be part of bid document 6) Land should not more than 5 kms from substation | For point no. 1&6; As SSST will be selecting L1 bidder guaranteeing generation (as mentioned in tender document) at the grid substation, bidder can select Indian or international solar modules. Moreover, bidder will select the land close to the grid substation to reduce transmission loss. As it is policy decision, SSST management should take final decision. For point no. 4; accepted. For all other points, Tender conditions prevails. |
| Note :- संस्थानकडे सादर करावयाच्या प्रमाणपत्रामध्ये बिडर्सने त्यांचेशी संलग्न असलेल्या छोटया मोठया कंपन्यांचे ट्रेडिन्शियल (प्रमाणपत्र) स्विकारावे अशी मागणी बिडर्सने केलेली आहे. परंतू सदर कंपन्या एकमेकांशी सलग्न असल्याबाबत तपासणी करणे शक्य होणार नाही. | | | | | |
| 5 | Page No. 42 & Clause No. 3.4, Point No. 4 | | Land Arrangement criteria: It is mandatory to submit the Certificate of concerned authority with Technical Bid about concerned land having solar radiation norms are (5 - 6 kWh/ m2/day) suitable for installation of the solar power project. | As yourself would also agree to, that finding a suitable land having solar radiation norms (5-6 kWh/m2/day) is not easy to locate, therefore we request you to please amend the clause as: the bidder should submit the land details within 15 days from the date of acceptance of LOA. | It is mandatory to submit the Certificate of concerned authority/ Certificate of bidder which is self cetified certificate of radiation data downloaded from NASA/ Meteonorm for the location of selected land parcel with Technical Bid about concerned land having solar radiation norms are (5 - 6 kWh/m2/day) suitable for installation of the solar power project |

Note :- ज्या जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे त्याची सौर उत्सर्जनाची क्षमता ही तपासून त्याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आहे. परंतू यासाठी तसे प्रमाणपत्र मिळणे अवघड असल्याने NASA / Meteonorm या दोन्ही संस्थानचे वेबसाईटवर असलेल्या नकाशा डाऊनलोड करुन सोबत बिडर्सने स्वत:चे प्रमाणपत्र जोडावयाचे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **J** | **Refex Energy Ltd.** | | | | |
| 1 | Section II – ITB, Clause 2.2 (4) | 13-14 | Cost of bidding document: INR 20,000 | As per Gazette Notification dated 23.03.2012 for Public Procurement Policy notified by the Government of India. Those who are registered in Ministry of Micro Small & Medium Enterprises, MSMEs and National Small Industries Corporation NSIC are exempted for Bid Document Fee and Bid Security (EMD). PSU's like NTPC, NTPC – SAIL, NLC, Kandla Port Trust, Cantonment Boards (Ministry of Defence), BHEL and others have issued tenders for solar plants in recent past, in which tender fee and EMD are exempted | As it is policy decision, SSST management should take final decision. |
| | | | | against submitting of MSME and NSIC certificates. Since, our company Refex Energy Limited is registered with MSME as well as with NSIC, we would like to avail benefits entitled for MSME & NSIC. Requesting SSST to amend the same with necessary clarifications and allow us to participate in this upcoming event. Kindly, Confirm. | |
| 2 | Section II – ITB, Clause 2.2 (4) | 13-14 | Bid Security: INR 50,00,000/- | As per Gazette Notification dated 23.03.2012 for Public Procurement Policy notified by the Government of India. Those who are registered in Ministry of Micro Small & Medium Enterprises, MSMEs and National Small Industries Corporation NSIC are exempted for Bid Document Fee and Bid Security (EMD). PSU's like NTPC, NTPC – SAIL, NLC, Kandla Port Trust, Cantonment Boards (Ministry of Defence), BHEL and others have issued tenders for solar plants in recent past, in which tender fee and EMD are exempted against submitting of MSME and NSIC certificates. Since, our company Refex Energy Limited is registered with MSME as well as with NSIC, we would like to avail benefits entitled for MSME & NSIC. Requesting SSST to amend the same with necessary clarifications and allow us to participate in this upcoming event. Kindly, Confirm. | As it is policy decision, SSST management should take final decision. |

Note :- ज्या बिडर्सकडे केंद्र सरकारशी संलग्न असलेल्या संस्थानने अथवा महाराष्ट्र शासनाचे एक्झेमशन बाबत (EMD + Tender Fee) जर संबंधित बिडर्सला मान्यता दिलेली असेल तर महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीमधील पा.क्र.१०७ वरील ६.८ परिशिष्ट-८ मधील मुद्दा क्र.०२ मध्ये “ शासकीय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना तसेच सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात यावी. यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमागर महामंडळ / महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहिल" असे नमूद आहे. यावर निर्णय घ्यावा लागणार आहे. | | | | | |
| **L** | **SunSource Energy Pvt. Ltd.** | | | | |
| 1 | Exemption from the payment of the Tender Fee & EMD | | | Being a MSME registered under NSIC makes us eligible for the exemption from the payment of the Tender Fee & EMD. Request you to kindly consider allowing the MSMEs to avail this exemption, as this will reduce the entry barrier for this Tender and make the bidding process more competitive. For your kind reference and consideration, please find attached our NSIC registration & exemption certificate. | As it is policy decision, SSST management should take final decision. |
| Note :- ज्या बिडर्सकडे केंद्र सरकारशी संलग्न असलेल्या संस्थानने अथवा महाराष्ट्र शासनाचे एक्झेमशन बाबत (EMD + Tender Fee) जर संबंधित बिडर्सला मान्यता दिलेली असेल तर महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमावलीमधील पा.क्र.१०७ वरील ६.८ परिशिष्ट-८ मधील मुद्दा क्र.०२ मध्ये " शासकीय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना तसेच सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात यावी. यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमागर महामंडळ / महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहिल" असे नमूद आहे. यावर निर्णय घ्यावा लागणार आहे. | | | | | |

०१). मे.सनसोर्स एनर्जी लि.यांनी ई-मेलव्दारे त्यांना टेंडर फी व ईएमडी भरण्यापासून शासनाने सूट दिल्याचे नमूद करुन त्याप्रमाणे टेंडरमध्ये पात्रतेविषयी नमूद अटींमध्ये बदल करण्याविषयी कळविले आहे.

याबाबत संस्थानने या प्रकल्पासाठी नेमलेले कन्सल्टंट मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना अभिप्रायासाठी विचारणा केली असता त्यांनी उलट ई-मेल पाठवून संस्थाननेच याबाबत निर्णय घ्यावा असे कळविले आहे. परंतु याचसोबत मे.सनसोर्स एनर्जी लि.यांनी ई-मेल सोबत जोडलेले टेंडर फी व ईएमडीच्या सूटबाबत शासनाचे दिलेले पत्र वैध आहे किंवा नाही तसेच या पत्रातील अटी संस्थानला लागू होतील की नाही याबाबत मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी अहवाल पाठविलेला नाही.

विभागाचा अभिप्राय :- दि.१७-०९-२०१८ रोजी १० मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी प्री-बीड मिटींग घेण्यात आली. सदर प्री-बीड मिटींगला १७ कंत्राटदार उपस्थित होते. प्री-बीड मिटींगमध्ये कंत्राटदारांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत चर्चा झाली. त्यानुसार संबंधीत कंत्राटदारांनी त्यांचे शंका ई-मेलव्दारे पाठविल्या. ई-मेल व्दारे प्राप्त झालेल्या सर्व शंकाचे मेल संस्थानचे सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना वेळोवेळी ई-मेल व्दारे पाठविण्यात आलेले आहे.

आतापर्यंत ई-मेल पाठविले टेंडरधारक 01) Marine Electricals (I) Pvt.Ltd., Mumbai (02) Sungrow (I) Pvt.Ltd, Mumbai (03) BVG India Ltd., Pune (04) Teyma India Pvt.Ltd., Mubai यामध्ये टेंडरधारकांनी टेंडर सबमिशन तारीख वाढविण्याची मागणी केली होती. त्यानुसार विद्युत विभागामार्फत ई-निविदेस मुदतवाढ देणेकामी दि.२७-०९-२०१८ रोजी टिपणी सादर करणेत आली होती. त्यास मिळालेल्या मान्यतेनुसार Tender ID 2018_SAI_350408_1 यास दि.१३-१०-२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेकडून शंकानिरसन तक्ता दि.०१ ऑक्टोबर, २०१८ रोजी प्राप्त झाला असून तो तीन प्रकारात प्राप्त झालेला आहे.

(01). Devination

(02). Tender Conditions Prevails

(03). Policy Decision to be taken by Sansthan

उपरोक्त तक्ता क्र.०१ व व तक्ता क्र.०२ हे टेक्निकल स्पेसिफिकेशन व इतर बाबींबाबत असून मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी शिफारस केलेप्रमाणे मान्य करता येईल.

तक्ता क्र.०३ मधील मुद्दे हे धोरणात्मक असून त्यावरील निर्णयानुसार निविदेचा Scope बदलणार असल्याने यावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणे उचित होईल.

प्रस्ताव :- १० मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी प्री-बीड मधील प्राप्त झालेल्या Queries बाबत संस्थानचे अधिकृत सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुपालन/खुलासा याबाबतच्या मुद्देनिहाय तपशिल ०१ ते ०३ तक्त्यामध्ये सादर केलेला आहे. सदर अ.क्र.०३ मधील सादर केलेल्या Querie चे अवलोकन होऊन धोरणात्मक निर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.६२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, १० मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी झालेल्या प्री-बीड मिटींगमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या QUERIES बाबत संस्थानचे अधिकृत सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी अनुपालन / खुलासा तक्ता सादर केला होता. त्या अनुषंगाने आजचे सभेत मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधी यांनी समक्ष उपस्थित राहून खालील अनुपालन / खुलासा तक्त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांवर मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधीने उत्तरे देऊन मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे शंका समाधान केले.**

**त्यानुसार आजचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्री-बीड मिटींग मधील उपस्थित करण्यात आलेल्या QUERIES & CLARIFICATON बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

PRE-BID QUERIES & CLARIFICATION : POLICY DECISION BY SSSTS - 10 MW SOLAR POWER PROJECT

| S. No. | Clause No. | Page No. | Existing provision | Clarification / Change Requested by vendor | Decision by Management Committee |
|---|---|---|---|---|---|
| E | Enrich Energy Pvt. Ltd. | | | | |
| 14 | 7.46.1 | | The power from the plant must be evacuated to nearby connecting substation through multicore co – axial cable of appropriate size as per prevailing condition at site. | We propose overhead conductor for transmission line? | Tender conditions prevails. |
| G | Mundra Solar PV Ltd. | | | | |
| 1 | | | | 1. Supplier should be a Bloomberg Tier – 1 and DNV-GL certified domestic manufacturer of Solar Cells and Solar modules. 2. Average turnover of last 3 years should be more than 100 crore. 3. Experience in development of atleast 40 MW Solar power ground mount projects. 4. No JV's and consortium for this tender is allowed but however the bidder can use the credentials of their associate/ group companies. | Point no. 1 ; Solar Module supplier should be a Bloomberg Tier – 1 domestic manufacturer only. Point No. 2 ; Not accepted. Tender conditions prevails. Point No. 3 ; Tender conditions prevails. Point No. 4 ; JV is not allowed & consortium allowed as per tender conditions. Credentials of associate group companies not allowed. |
| H | Adani | | | | |
| | | | | 1) Supplier should be a domestic module manufacturing facility with at least 50 MW of module manufacturing facility and should have supplied atleast 50 MW of panel supply experience in last 3 years. 2) In case bidder is manufacturer they have consortium with land party and EPC company. Bidder | Point no. 1 ; Solar Module supplier should be a Bloomberg Tier – 1 domestic manufacturer only. Point no. 2 & 6; Accepted. Point No. 4 ; Not accepted Point No. 3 & 5 ;Tender conditions prevails. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | cannot utlize EPC companies financial credentials, they can only utilize the installation experience.<br>3) Average Net Worth of the manufacturing company should not be below 25 crore.<br>4) Bidder is allowed to use credentials of their associate/ group companies<br>5) Land agreement should be part of bid document<br>6) Land should not more than 5 kms from substation. | |
| J | Refex Energy Ltd. | | | | |
| 1 | Section II – ITB, Clause 2.2 (4) | 13-14 | Cost of bidding document: INR 20,000 | As per Gazette Notification dated 23.03.2012for Public Procurement Policy notified by the Government of India. Those who are registered in Ministry of Micro Small & Medium Enterprises, MSMEs and National Small Industries Corporation NSIC are exempted for Bid Document Fee and Bid Security (EMD). PSU's like NTPC, NTPC – SAIL, NLC, Kandla Port Trust, Cantonment Boards (Ministry of Defence), BHEL and others have issued tenders for solar plants in recent past, in which tender fee and EMD are exempted against submitting of MSME and NSIC certificates. Since, our company Refex Energy Limited is registered with MSME as well as with NSIC, we would like to avail benefits entitled for MSME & NSIC. Requesting SSST to amend the same with necessary clarifications and allow us to participate in this upcoming event. Kindly, Confirm | Not Accepted. Tender conditions prevails. |
| 2 | Section II – ITB, Clause 2.2 (4) | 13-14 | Bid Security: INR 50,00,000/- | As per Gazette Notification dated 23.03.2012for Public Procurement Policy notified by the Government of India. Those who are registered in Ministry of Micro Small & Medium Enterprises, MSMEs and National Small Industries Corporation NSIC are exempted for Bid Document Fee and Bid Security (EMD). PSU's like NTPC, NTPC – SAIL, NLC,Kandla Port Trust,Cantonment Boards (Ministry of Defence), BHEL and others have issued tenders for solar plants in recent past, in which tender | Not Accepted. Tender conditions prevails. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | fee and EMD are exempted against submitting of MSME and NSIC certificates. Since, our company Refex Energy Limited is registered with MSME as well as with NSIC, we would like to avail benefits entitled for MSME & NSIC. Requesting SSST to amend the same with necessary clarifications and allow us to participate in this upcoming event. Kindly, Confirm. | |
| L | SunSource Energy Pvt. Ltd. | | | | |
| 1 | Exemption from the payment of the Tender Fee & EMD | | | Being a MSME registered under NSIC makes us eligible for the exemption from the payment of the Tender Fee & EMD. Request you to kindly consider allowing the MSMEs to avail this exemption, as this will reduce the entry barrier for this Tender and make the bidding process more competitive.<br>For your kind reference and consideration,please find attached our NSIC registration & exemption certificate. | Not Accepted. Tender conditions prevails. |
| P | Anupam Renewable Energy Pvt. Ltd. | | | | |
| | | | | 1. Companies with Domestic Solar Panel Manufacturing Facilities with minimum 50 MW panel supply experience in last 3 years.<br>2. In case bidder is a manufacturer they can have consortium with land party & EPC companies. Bidder can not utilize EPC companies financial credential they can only utilize installation experience.<br>3. Average net woth of manufacturing company should not be below 25 Crore. | Point no. 1 ; Solar Module supplier should be a Bloomberg Tier – 1 domestic manufacturer only.<br>Point No. 2 ; Accepted<br>Point No.3 ; Tender conditions prevails |

उपरोक्त निर्णयाप्रमाणे तक्त्यातील अनुपालन / खुलासा तातडीने वेबसाईटवर अपलोड करावा व टेंडर प्रक्रिया त्वरीत पुर्ण करावी असे ठरले. (कार्यवाही- विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी प्रसिद्ध केलेल्या ई-निवीदेच्या प्री-बीड मधील निवीदाधारकांचे Queries बाबत धोरणात्मक निर्णय होणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद - सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६ - १७(१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –

१) दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०८, निर्णय क्र.८२.

२) दि.०४/०४/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०३, निर्णय क्र.२६९.

३) दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०९, निर्णय क्र.४२३.
४) दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०२,निर्णय क्र.४६१ (२ निर्णय क्र.४२३).

<u>**प्रास्ताविक**</u> - श्री साईबाबा शताब्दी उत्सव-२०१८ मध्ये मध्ये साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभतेने होण्यासाठी मोठया साईजचे LED Wall Screen मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात बसविणे आवश्यक आहे. याकरीता यापुर्वी सदरकामी  दोन वेळेस ई-निवीदा मागविणेत आलेल्या होत्या. त्यामध्ये एकुण १३ नग LED Wall Screen खरेदी करणेकामी पहिल्या वेळेस दि.२५/०५/२०१७ ते दि.२७/०६/२०१७ अखेर ई-निवीदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्याकरीता सहा निवीदाधारकांनी ऑनलाईन निवीदेमध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये ०३ निवीदाधारक पात्र झालेले आहे. परंतु, सदर ०३ निवीदाधारकांनी एकच कंपनीसाठी दर भरलेले असलेमुळे दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०२, निर्णय क्र.६७७ अन्वये **"सदर LED Wall Screen खरेदी करणेकामी या क्षेत्रातील सर्व कंपन्यांचे स्पेसीफीकेशन देऊन, नव्याने फेर ई-निवीदा मागणी करणेत यावी"** असा निर्णय घेण्यात आला.

सदर निर्णयास अनुसरुन,निवीदेतील Specification मध्ये बदल करणेत येवुन पुनःश्च दुस-या वेळेस दि.२१/०९/२०१७ ते दि.०५/१०/२०१७ अखेर ई-निवीदा प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु, सदर ई-निवीदांचे दि.०५/०९/२०१७ रोजीचे प्री-बीड मिटींगमध्ये उपस्थित असणारे ०७ निवीदाधारकच्या कंपन्या हया आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असल्याने त्यांनी उच्च दर्जाचे Specification दिलेले होते. त्यामुळे सदर LED Wall Screen खरेदी करणेकामी मंजुर रक्कमेपेक्षा जास्त खर्च येणार असल्याने दुस-या वेळेस प्रसिद्ध करण्यात आलेली ई-निवीदा रद्द करण्यात आलेली आहे.

तदनंतर १६ नग LED Wall Screen चे ठिकाणे निश्चित करणे व Specification ठरविणे, तसेच सदरहु खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी दि. ०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०८, निर्णय क्र.८२ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन, "संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen खरेदी करणेचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठवणेत यावा व आवश्यक त्यावेळी भाडोत्री तत्वावर लावण्यात याव्यात. तसेच LED Wall Screen देणगी स्वरुपात मिळाल्यास त्या बसविणेत याव्यात व त्या स्क्रीनवर सौजन्य म्हणुन सदरहू साईभक्तांना जाहिरात करणेसाठी एक स्ट्रीप ठेवणेस परवानगी देण्यात यावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत सदरहु LED Wall Screen वर जाहिरात दाखविण्यात येवु नये" असे ठरले.

सदर निर्णयास अनुसरुन, सदरचे LED Wall Screen देणगी स्वरुपात घेणेकामी साईभक्तांना आवाहन करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर दि.२७/०३/२०१८ रोजी मसुदा प्रसिद्ध करण्यात आलेला होता. तसेच सर्व राष्ट्रीयकृत बॅकेकडुन सदर LED Wall Screen संस्थानला देणेगी स्वरुपात मिळणेकामी सर्व बॅकांना जा.नं.एसएसएसटी/सीसीटीव्हीसेल/६८६२/२०१८, दि.२१/०३/२०१८ नुसार पत्र देण्यात आलेले होते.

परंतु, दि.०४/०४/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०३, निर्णय क्र. २६९ अन्वये "संस्थानमधील चालु व प्रस्तावित असलेल्या उपरोक्त महत्वाच्या प्रकल्पांच्या सद्यस्थितीची माहिती घेवुन, त्याचा आढावा घेण्यात आला. त्यामधील LED Wall Screen खरेदी संदर्भात दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८२ अन्वये LED Wall Screen देणगी स्वरुपात मिळाल्यास त्या बसविणेत याव्यात व  स्क्रीनवर सौजन्य म्हणुन सदरहू साईभक्तांना जाहिरात करणेसाठी एक स्ट्रीप ठेवणेस परवानगी देण्यात यावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत सदरहु LED Wall Screen वर जाहिरात दाखविण्यात येवु नये, असे ठरले होते. परंतु आजतागायत LED Wall Screenदेणगी स्वरुपात मिळालेली नसल्याने प्रथम ५ नग LED Wall Screen विहीत पद्धतीने खरेदी करणेस मंजुरी देण्यात आली व त्याची उपयुक्तता पाहुन भविष्यामध्ये उर्वरित LED Wall Screen खरेदी करणेबाबत निर्णय घेण्यात येईल" असे ठरले. त्यानुसार ०५ नग LED Wall Screen खरेदी करणेकामी दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०९,निर्णय क्र.४२३ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन, "संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता प्रथम LED Wall Screen, Size 4.80m x 2.88m  ०५ नग LED Wall Screen ई-निवीदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ७ कोटी ९० लाख + GST मात्रचे खर्चास  मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थानचे परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता सदर LED Wall Screen नगर-मनमाड हायवेवरिल संस्थानचे मिळकतीमध्ये, लेंडीबाग, १६ गुंठे परिसर, याठिकाणी बसविण्यात यावेत, असे ठरले.

तसेच सभेच्या वेळी LED पॅनेलचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. LED पॅनेलची उपयुक्तता असुन त्याचे अंदाजे खर्च प्रति पॅनेल २५ ते ३५ लाख असुन प्रथमतः १० LED पॅनेल देखील ई-टेंडर पद्धतीने खरेदी करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२.५ कोटी चे खर्चास मान्यता देण्यात आली."

तदनंतर उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयात दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.०२, निर्णय क्र.४६१(२निर्णय क्र.४२३) नुसार "संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता प्रथम LED Wall Screen, Size 4.80m x 2.88m ०५ नग LED Wall Screen ई-निवीदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ७ कोटी ९० लाख + GST मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता सदरचे LED Wall Screen बसविणेकामी प्रथम स्थानिक उपसमितीमध्ये जागेची निश्चिती करणेत यावी.

तसेच सभेच्या वेळी LED पॅनेलचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. संस्थानचे सर्व निवासस्थाने, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा रुग्णालय, देणगी कार्यालय इ. ठिकाणी LED ची उपयुक्तता असुन त्याचे अंदाजे खर्च २५ ते ३० लाख असुन प्रथमतः १० LED पॅनेल देखील ई-टेंडर पद्धतीने खरेदी करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२.५ कोटी चे खर्चास मान्यता देण्यात आली."

तरी, दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, वरिष्ठांचे निर्देशानुसार प्रथमतः एकुण ०५ नग LED Wall Screen खरेदी करणेकरीता ई-निवीदा मागविणेकामी दि.११/०९/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१९/०९/२०१८ ते दि.०९/१०/२०१८ अखेर (Tender ID-2018_SAI_353450_1) जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर ई-निवीदांची प्री-बीड मिटींग दि.२५/०९/२०१८ रोजी घेण्यात आलेली असुन सदर ई-निवीदेची प्री-बीड मिटींगमध्ये १५ निवीदाधारकांनी प्रतिसाद दिलेला आहे. सदर प्री-बीड मिटींगमध्ये निवीदाधारकांनी एकुण ९४ Queries (मुद्दे) उपस्थित केले असुन त्यातील ८४ मुद्दांबाबत प्रशासकीय पातळीवर निर्णय घेणेस व उर्वरीत खालील नमुद केलेल्या एकुण १० Queries (मुद्दे) हया बहुतांशी पुरवठाधारकांच्या सारख्याच असुन त्याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

| Sr.No. | Tender page / Clause No. | Tender Specification | Bidders Common Query in Pre-Bid Meeting |
|---|---|---|---|
| 1. | 5 (3/11) | **Brands**:-Preferred Makes: Samsung, Delta, Mitsubishi, Barco, LG, Leyard, planar, NEC, Synergy, Orion, Christie, Panasonic | **Bidders request Add this Brand :-** Shine, Alida, Video wall India, YNG LED Delta, Xtreme Media or Equivalant |
| 2. | 31/ANNEXURE-2 | **LED Bulb**:- Cree, Nichia, Nationstar | Bidders wants to keep remain Nationstar Gold Only along with Cree and Nichia. |
| 3. | 32/Item 3 | Outdoor Cabinet Air Conditioner | Air-condition systems are not required by Maximum Bidders. Because Outdoor LED wall has force cooling system is inbuilt. |
| 4. | 33/Item 5 | Servo Stabilizer | Stabilizer systems are not required by Maximum Bidders because Outdoor LED wall has force cooling system is inbuilt. |
| 5. | 6/9 | **Certification** :-BIS for both Outdoor LED Wall tiles as well as LED controller Mandatory. | BIS not required for LED Controller as it's a part of LED Wall and there is already BIS comes for full outdoor LED wall and most of the bidders agreed for this condition. So BIS is not required for LED Controller. |

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | 33/ Item 4 | Rack Frame with Power Distribution Unit to be mounted Behind the Structure | Every bidder has own structure and back protection design for safety. Only rack has enough space to keep the accessories. This way we can save cost. As this is one of mechanical part of Outdoor LED Wall and there is no any direct connection with the function of Outdoor LED Wall. Changes made in tender clause. |
| 7. | 34/Item 6 | Communication Interface Device | Item no.6 and Item No.7 Communication Interface Device and Network Switches must be removed because there is no need of these extra as media player and controller already having this. Due to this may be dispute can arise during bid opening. |
| 8. | 35/Item 7 | Network Switch | |
| 9. | 31/Annexure-2 | Outdoor LED Display **<u>Pixel Pitch</u>: -** 6 mm to 8 mm ±5% | Maximum bidders agree for one standard Pixel pitch of P6 and its world wide standard size must be kept same. No need to be changed any variations in size or tile and LED wall Size 2.88 m * 4.8 m. |
| 10. | 32/Item 2 | Media Player | This should keep optional (Because there are various types media players in market, which has multiple specifications but function is same, our moto is to display information and live darshan should be displayed by media player and it must be compatible with future requirement of SSST. Changes made and media player specifications will be optional. |

मागणी- उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१९/०९/२०१८ ते दि.०९/१०/२०१८ अखेर (Tender ID-2018_SAI_353450_1) जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर ई-निवीदांची प्री-बीड मिटींग दि.२५/०९/२०१८ रोजी घेण्यात आलेली आहे. सदर ई-निवीदांची प्री-बीड मिटींग दि.२५/०९/२०१८ रोजी घेण्यात आलेली असुन सदर ई-निवीदेची प्री-बीड मिटींगमध्ये १५ निवीदाधारकांनी प्रतिसाद दिलेला आहे. सदर प्री-बीड मिटींगमध्ये निवीदाधारकांनी एकुण ९४ Queries (मुद्दे) उपस्थित केले असुन त्यातील ८४ मुद्दांबाबत प्रशासकीय पातळीवर निर्णय घेणेस व उर्वरीत खालील नमुद केलेल्या एकुण १० Queries (मुद्दे) हया बहुतांशी पुरवठाधारकांच्या सारख्याच असुन त्याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान - तांत्रिक व आर्थिक.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय – उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेनुसार प्रथमतः एकुण ०५ नग LED Wall Screen खरेदी करणेकरीता ई-निवीदा मागविणेकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात प्री-बीड मिटींगमध्ये एकुण ९४ Queries (मुद्दे) उपस्थित केले असुन त्यातील ८४ मुद्दांबाबत प्रशासकीय पातळीवर निर्णय घेणेस व उर्वरीत खालील नमुद केलेल्या एकुण १० Queries (मुद्दे) हया बहुतांशी पुरवठाधारकांच्या सारख्याच असुन त्याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एकुण ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी झालेल्या प्री-बीड मिटींगमध्ये उपस्थीत करण्यात आलेल्या पुरवठाधारकांच्या Queries & Clarification बाबत खालील प्रमाणे धोरणात्मक निर्णय घेणेत आला आहे.**

# Pre-Bid queries& Clarification Policy DecisionBy SSSTS For LED Wall Screen

| Sr.No. | Tender page / Clause No. | Tender Specification | Bidders Common Query in Pre-Bid Meeting | Decision By Management Committee |
|---|---|---|---|---|
| 1. | 5 (3/11) | **Brands:-**Preferred Makes: Samsung, Delta, Mitsubishi, Barco, LG, Leyard, planar, NEC, Synergy, Orion, Christie, Panasonic | **Bidders request Add this Brand :-** Shine,Alida, Video wall India,YNG LED, Xtreme Media or Equivalant | Brand preferred make & Equivalent which meets all specification as per Tender Clause. |
| 2. | 31/ANNEXURE-2 | **LED Bulb:-** Cree, Nichia, Nationstar | Bidders wants to keep remain Nationstar Gold Only along with Cree and Nichia. | **Clause Amended as:-** Cree, Nichia, Nationstar Gold. |
| 3. | 32/Item 3 | Outdoor Cabinet Air Conditioner | Air-condition systems are not required by Maximum Bidders. Because Outdoor LED wall has force cooling system is inbuilt. | Outdoor Cabinet Air Conditioner is Optional. But it's functioning & performance as mentioned in Tender must be fulfilled by the alternative provision/ provisions in system. It should not affect the performance of the led wall adversely. |
| 4. | 33/Item 5 | Servo Stabilizer | Stabilizer systems are not required by Maximum Bidders. | Servo Stabilizer is optional. But it's functioning & performance as mentioned in Tender must be fulfilled by the alternative provision/ provisions in system. It should not affect the performance of the led wall adversely. |
| 5. | 6/9 | **Certification:-**BIS for both Outdoor LED Wall tiles as well as LED controller Mandatory. | BIS not required for LED Controller as it's a part of LED Wall and there is already BIS comes for full outdoor LED wall and most of the bidders agreed for this condition. So BIS is not required for LED Controller. | **Clause Amended as** :-BIS for outdoor LED wall is Mandatory. |
| 6. | 33/ Item 4 | Rack Frame with Power Distribution Unit to be mounted Behind the Structure | Every bidder has own structure and back protection design for safety. Only rack has enough space to keep the accessories. This way we can save cost. As this is one of mechanical part of Outdoor LED Wall and there is no any direct connection with the function of Outdoor LED Wall. Changes made in tender clause. | Accepted, Rack frame should be according LED wall design. But it's functioning & performance as mentioned in Tender must be fulfilled by the alternative provision/ provisions in system. It should not affect the performance of the led wall adversely. |
| 7. | 34/Item 6 | Communication Interface Device | Item no.6 and Item No.7 Communication | Item no.6 is as per OEM. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. | 35/Item 7 | Network Switch | Interface Device and Network Switches must be removed because there is no need of these extra as media player and controller already having this. Due to this may be dispute can arise during bid opening. | Network switch is Optional. But it's functioning & performance as mentioned in Tender must be fulfilled by the alternative provision/ provisions in system. It should not affect the performance of the led wall adversely. |
| 9. | 31/Annexure-2 | Outdoor LED Display **Pixel Pitch: -** 6 mm to 8 mm ±5% | Maximum bidders agree for one standard Pixel pitch of P6 and its worldwide standard size must be kept same. No need to be changed any variations in size or tile and LED wall Size 2.88 m * 4.8 m. | **Clause Amended as:-** Outdoor LED Display **Pixel Pitch:** - 6 mm ±5% |
| 10. | 32/Item 2 | Media Player | This should keep optional (Because there are various types media players in market, which has multiple specifications but function is same, our moto is to display information and live darshan should be displayed by media player and it must be compatible with future requirement of SSST. Changes made and media player specifications will be optional. | Accepted, Media Player specification should be capable of Live Darshan and Showing Information.<br><br>But it's functioning & performance as mentioned in Tender must be fulfilled by the alternative provision/ provisions in system. It should not affect the performance of the led wall adversely. |

**उपरोक्त निर्णया प्रमाणे तक्तयातील व इतर Query संबधीत अनुपालन/ खुलासा तातडीने वेबसाईट वर अपलोड करावा व निविदा प्रक्रिया त्वरीत पुर्ण करावी, असे ठरले. (कार्यवाही- सीसीटीव्ही विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **पाथर्डी, जि-अहमदनगर येथे आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबारासाठी श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकडुन जास्तीत जास्त वैद्यकीय मदत मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भीय अर्ज प्राप्त झालेला आहे त्यात पाथर्डी जि.अहमदनगर येथे पाथर्डी व शेव गांव तालुक्यातील रुग्णांसाठी दि.१४/१०/२०१८ रोजी महाआरोग्य शिबीराचे आयोजन केले आहे. हे महाआरोग्य शिबीर महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, धर्मादाय सलघ्न रुग्णालये, महात्मा फुले जन आरोग्य योजना, पाथर्डी /शेवगाव तालुका मेडिकल व केमिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले आहे. या आरोग्य शिबीरात गरजु रुग्णांना मोफत तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया करुन देण्याचा माणस आहे. त्या दृष्टीने आपले साईबाबा संस्थानकडुन जास्तीत जास्त मदतीची अपेक्षा आहे. तरी सदर महाआरोग्य शिबीरासाठी आपण साईबाबा हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर्स, इतर स्टाफ, वैद्यकीय साहित्य तसेच जास्तीत जास्त औषधे (मेडिसीन) उपलब्ध करुन द्यावेत ही विनंती. तसेच शिबीरात निदान झालेनंतरचे उपचार व शस्त्रक्रिया आपले हॉस्पिटलमध्ये मोफत व्हाव्यात ही विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानतर्फे सदर महाशिबीरासाठी ०४ ते ०५ कन्सलटंट डॉक्टर्स व ०२ आरएमओ ०२ मेल नर्सिंग स्टाफ, तसेच ०२ ईसीजी तंत्रज्ञ देता येईल, ०२ ईसीजी मशिन व इतर मेडिकल उपकरणे पाठविता येईल. सदर शिबीरासाठी डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ, ईसीजी तंत्रज्ञ, ईसीजी मशिन व उपकरणे पाठविणेसाठी वाहन विभागामार्फत वाहनाची (मीनीबसची) व्यवस्था होणे आवश्यक राहील. श्री साईनाथ

रुग्णालयामध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातात व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अल्पदरात उपचार केले जातात त्यामुळे महाशिबीरात निदान झालेनंतरचे उपचार व शस्त्रक्रिया जर श्री साईनाथ रुग्णालयात होत असेल तर तेथे मोफत करता येईल परंतु जे उपचार व शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयात होत नसतील ते श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये करणेकरीता महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत करावा लागेल किंवा कागदपत्रानुसार वैद्यकीय बिलात सवलत देता येईल.

तरी सदर महाशिबीरासाठी ०४ ते ०५ कन्सलटंट डॉक्टर्स, ०२ आरएमओ, ०२ मेल नर्सिंग स्टाफ व ०२ ईसीजी तंत्रज्ञ पाठविणेबाबत, सदर शिबीरासाठी डॉक्टर्स, इतर स्टाफ, उपकरणे पाठविणेसाठी वाहन विभागामार्फत वाहनाची (मीनीबसची) व्यवस्था होणेबाबत, तसेच शिबीरात निदान झालेनंतरचे उपचार व शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयात मोफत करणेबाबत परंतु जे उपचार व शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयात होत नसतील ते श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत करणेबाबत किंवा कागदपत्रानुसार वैद्यकीय बिलात सवलत देणेकरीता, तसेच त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता मिळणेकरीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर .

निर्णय क्र.६२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१४.१०.२०१८ रोजी पाथर्डी, जि.अहमदनगर येथे आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबीराकरीता संस्थानमार्फत ०४ ते ०५ कन्सलटंट डॉक्टर्स, ०२ आरएमओ, ०२ मेल नर्सिंग स्टाफ व ०२ ईसीजी तंत्रज्ञ पाठविणेस, तसेच सदर शिबीरासाठी डॉक्टर्स, इतर स्टाफ, उपकरणे व औषधे उपलब्ध करुन देण्यास, तसेच शिबीराकरीता जाणेकामी वाहन विभागामार्फत वाहनाची (मीनीबसची) व्यवस्था करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव असल्याने शिबीरात निदान झालेनंतरचे उपचार व शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयात मोफत करणेत याव्यात, परंतु जे उपचार व शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयात होत नसतील ते श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत करणेस किंवा कागदपत्रानुसार वैद्यकीय बिलात सवलत देणेस व त्या अनुषंगाने येणा-या रक्कम रु.५ लाख मात्र पर्यंतच्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- साईबाबा हॉस्पीटल)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ **श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री साईनाथ रुग्णालयात प्लॅस्टिक व ऑर्थो सर्जरी शिबीराचे आयोजन व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३० लाख मात्र खर्चास मान्यता मिळणे बाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण किंवा मानावाला अपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव – १) मा. व्यवस्थापन समिती दि. २०/०८/२०१७ विषय नं. ०७ निर्णय क्र. ६८२
२) मा. व्यवस्थापन समिती दि. २२/०८/२०१८ विषय नं. ०२ निर्णय क्र. ५०७
३) मा. व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ विषय नं. २० निर्णय क्र. १२६
४) मा. व्यवस्थापन समिती दि. २२/०८/२०१८ विषय नं. ०६ निर्णय क्र. ५३२
५) अग्रवाल क्लब, पुणे यांचा दिनांक २८/०९/२०१८ रोजीचा ई-मेल

प्रस्ताविक – उपरोक्त विषयांन्वये महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि. १५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिवार्णस दि. १८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्ष पुर्ण होत आहे. श्री साईनाथांचा भक्तगण भारतासह संपुर्ण जगभर विपुल संख्येने पसरलेला आहे. त्यांच्या व्दारे श्री साई तत्त्वज्ञान आणि शिकवणीच प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची १०० वे पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरा न करता. १०० व्या पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणुन साजरा करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या मा. व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि. ०१ ऑक्टोबर २०१८ ते दि. १८ ऑक्टोबर २०१८ हे वर्ष म्हणजे साईशताब्दी समाधी वर्ष असुन, हे संपुर्ण वर्ष उत्साही वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे.

श्री साईबाबा यांचे महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थान मार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि. ०१ ऑक्टोबर २०१८ ते दि. १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये वेगवेगळ्या धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करुन, संपुर्ण वर्षभरात शिरडीमध्ये भक्तीमय वातावरण राहुन श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीने कार्यक्रमाचे नियोजन केलेले

आहे. तरी शताब्दी वर्ष समारोप कार्यक्रमा निमित्त रुग्णालये विभागाकडुन दि. १३/१०/२०१८ रोजी सकाळी ०९ ते सायं. ०५ वा. या वेळेत साईनगर मैदानात खालील प्रमाणे शिबीरांचे आयोजन करणेत आलेले आहे.

१) मोफत सांधेरोपन निदान शिबीर (गुडघा व खुबा)

२) मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबीर

३) मोफत कॅन्सर निदान शिबीर

अ.नं. क्र. ०१ व ०३ शिबीरांचे दिनांक १२/१०/२०१८ रोजी नाव नोंदणी करण्यात येऊन सदर दाखल रुग्णांची योग्य तपासणी/निदान करण्यात येणार असुन गरज असलेल्या रुग्णांना नंतर तारीख देण्यात येऊन संस्थानच्या रुग्णालयात मोफत ऑपरेशन करण्यात येणार आहे.

तसेच श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळामध्ये भाग घेण्याकामी डॉ. पंकज जिंदाल, एम.एस., ऑर्थोपेडीक, पुणे यांनी दिनांक २५/०९/२०१८ रोजी ई-मेल व्दारे प्लॅस्टीक तसेच ऑर्थो सर्जरी कॅम्प घेणे बाबत कळविले आहे.

सदरहु शिबीरामध्ये त्यांनी जळलेले व्यंग, भाजल्यामुळे येणारे व्यंग, जन्मतः असलेले हाताचे, पायाचे व शरीरावरील व्यंग, जुळलेली, वाकडी, कमी व जास्त बोटे, चेह-यावरील वाकडे व्रण, न पसरणारे कोड, दुभंगलेले ओठ व टाळु, वाकडे नाक व कान हनुवटीच्या आकारात बदल, गरज नसलेले मोठे किंवा विचित्र व्रण, स्पेक्टीस पॅरेलीसेस, अपघाताने आलेल्या विकृती व व्यंग अशा विविध एकुण ७५ रुग्णांचे उपचार व शस्त्रक्रिया करण्याचा मानस व्यक्त केलेला आहे.

डॉ. पंकज जिंदाल हे व त्यांच्या सहकारी डॉक्टर्स सर्जन यांना प्लॅस्टीक सर्जरी कॅम्पमध्ये २५ वर्षांहुन अधिकचा अनुभव आहे. तसेच डॉ. पंकज जिंदाल व त्यांचे सहकारी डॉक्टर्स सर्जन हे गेल्या १८ वर्षांपासुन महाराट्रातील ग्रामीण भागात जाऊन गरीब व गरजु रुग्णांची निवड करुन त्यांच्यावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करत आहेत. तसेच शस्त्रक्रिया केलेल्या सर्व रुग्णांची Follow-up देखील डॉ. जिंदाल व त्यांची टीम ही घेणार आहेत.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान –

१) मा. व्यवस्थापन समिती दि. २०/०८/२०१७ विषय नं. ०७ निर्णय क्र. ६८२

२) मा. व्यवस्थापन समिती दि. २२/०८/२०१८ विषय नं. ०२ निर्णय क्र. ५०७

३) मा. व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ विषय नं. २० निर्णय क्र. १२६

४) मा. व्यवस्थापन समिती दि. २२/०८/२०१८ विषय नं. ०६ निर्णय क्र. ५३२

५) अग्रवाल क्लब, पुणे यांचा दिनांक २८/०९/२०१८ रोजीचा ई-मेल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– सदर शिबीरामध्ये दाखल झालेल्या रुग्णांची योग्य त्या प्रकारे निवड प्रक्रीया करण्यात येऊन डॉ. पंकज जिंदाल व त्यांच्या सहकारी डॉक्टर्स सर्जन व श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थो विभागातील सर्जन यांच्या नुसार एक तारीख निश्चित करुन सदर तारखे नुसार रुग्णांवर शस्त्रक्रिया करता येतील. तसेच रुग्णांना लागणारे औषधे ही रुग्णालयाच्या वार्षिक औषध खरेदीमधुन वापरता येतील.

प्रस्ताव– तरी उपरोक्त नमुद केलेलया प्रस्तावा प्रमाणे दिनांक १३/१०/२०१८ रोजी जळलेले व्यंग, भाजल्यामुळे येणारे व्यंग, जन्मतः असलेले हाताचे, पायाचे व शरीरावरील व्यंग, जुळलेली, वाकडी, कमी व जास्त बोटे,चेह-यावरील वाकडे व्रण, न पसरणारे कोड, दुभंगलेले ओठ व टाळु, वाकडे नाक व कान हनुवटीच्या आकारात बदल, गरत नसलेले मोठे किंवा विचित्र व्रण, स्पेक्टीस पॅरेलीसेस, अपघाताने आलेल्या विकृती व्यंग अशा विविध रुग्णांची आवश्यक तपासणी करुन नाव नोंदणी करुन सदर रुग्णांना आवश्यकतेनुसार तारीख देऊन शस्त्रक्रिया करण्यात येतील. शस्त्रक्रियेपुर्वी होणा-या निदानामध्ये आवश्यक त्या तपासण्या श्री साईनाथ रुग्णालयात करता येतील परंतु काही तपासण्या उदा. २डी-ईको या संस्थानच्या श्री साईबाबा रुग्णालयातून मोफत करणे आवश्यक आहे. तसेच CT. MRI इ. च्या तपासण्या आवश्यक असल्यास त्या प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी यांच्या मार्फत मोफत करुन त्यांना सदरचे बील अदा करणे आवश्यक आहे. तशा आशयाचा पत्रव्यवहार प्रवरा ग्रामीण रुग्णालय यांच्याशी करता येईल.

सदरचे शिबीराकरीता लागणा-या भुलतज्ञ डॉक्टरांची संख्या सद्यास्थितीला श्री साईनाथ रुग्णालयात कमी आहे. त्यामुळे आवश्यकतेनुसार बाहेरुन ऑन कॉल बेसिस भुलतज्ञ डॉक्टर्स बोलविता येतील व त्यांना प्रति रुग्ण बील अदा करता येईल.

त्या अनुषंगाने शिबीरामध्ये येणा-या मेडीसीन, औषध इ. अनुषंगीक गोष्टींच्या अंदाजे खर्चास रु. ३०,००,०००/- (रक्कम रुपये तीस लाख मात्र) मान्यता असावी. तसेच उपरोक्त कालावधीत विभागांमार्फत कामे करण्याकामी देखील मान्यता असावी.

तरी सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री साईनाथ रुग्णालयात प्लॅस्टिक व ऑर्थो सर्जरी शिबीराचे आयोजन करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३० लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- साईनाथ हॉस्पीटल )**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **समाधी मंदिरातील दक्षिणा पेटीमध्ये पैसे टाकत असतांना नजर चुकीने पडलेले सोन्याचे ब्रेसलेट श्री साईभक्तास परत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयास अनुसरुन, साईभक्त श्री. नीरज मेहता, बिलासपुर यांचे आवक क्रं. ०१२६१० दि. २८/०९/२०१८ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असुन, सदर पत्रात त्यांनी, दि. २८/०९/२०१८ रोजी सकाळी साधारण: ०८ वाजता समाधी मंदिरात मी श्री साईबाबांचे दर्शनासाठी परिवारासह आलो होतो. दर्शनाला येतांना एक सोन्याचे ब्रेसलेट श्री साईबाबांचे समाधीला लावुन पवित्र करणेसाठी सोबत आणलेले होते. दर्शनाचे वेळी सदरचे ब्रेसलेट त्यांनी श्री साई समाधी वरील डयुटीस असणा-या पुजारी यांचेकडे देऊन समाधीला लावुन पवित्र करुन परत घेऊन ते हातात ठेवले होते व बाहेर जातांना समाधी पाठीमागील दक्षिणापेटीमध्ये पैसे टाकत असतांना दक्षिणापेटीचा धक्का लागुन हातात असलेले सोन्याचे ब्रेसलेट सदरचे दक्षिणापेटीमध्ये पडले. ही बाब त्यांचे लक्षात येताच त्यांनी तेथे उपस्थित असलेले सुरक्षा रक्षकाचे निदर्शनास आणुन दिली. त्याच दिवशी शुक्रवार असल्याने, दक्षिणा पेटी मोजणी कामकाजासाठी सदर दक्षिणापेटी उघडण्यात आली होती. त्याच वेळेस साईभक्त श्री निरज मेहता, हे तेथे उपस्थित होते. त्यांनी दक्षिणापेटीत निघालेले ब्रेसलेट ओळखले. नजर चुकीने दक्षिणा पेटीत पडलेले ब्रेसलेट मला परत मिळावे म्हणुन त्यांनी विनंती केलेली आहे.

यापुर्वी साईभक्तांकडुन ऑनलाईन देणगी देतांना जास्त रक्कम संस्थानखाती जमा झालेली होती. सदरचे साईभक्तांनी रक्कम परत मिळावी म्हणुन विनंती अर्ज केले होते. त्यानुसार दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ५३६ अन्वये, ऑनलाईन देणगी सुविधेव्दारे साईभक्तांकडुन नजर चुकीने संस्थानला जमा झालेली देणगी रक्कम परत करणेस मान्यता देण्यात आली, तसेच यापुढेही अशा प्रकारे नजर चुकीने रक्कम जमा झाल्यास व भक्तांनी त्या रकमेची परत मागणी केल्यास, मा. कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अधिकारात याची सत्यता पडताळुन सदरहु रक्कम परत करावी, असा निर्णय झालेला आहे.

त्यास अनुसरुन, आता पर्यंत नेट बॅकींग व ऑनलाईन पेमेंट गेटवे वैगरे मार्फत अशी नजर चुकीने संस्थान खाती जादा जमा झालेली रक्कम जर भक्तांनी परत मागीतली तर त्याची सखोल पडताळणी करुन संस्थानकडुन भक्तांना सदर रक्कम परत करणेत येत आहे.

तसेच पुर्वी अशा प्रकारे दक्षिणापेटीमध्ये सोन्याचे मंगळसुत्र नजर चुकीने पडल्याची घटना घडलेली होती, त्यावर दि.०३/०६/२००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ३८० अन्वये, श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांनी त्यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे हिंदु संस्कृतीत मंगळसुत्र या दागीन्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. सदर महत्त्व लक्षात घेता, तसेच श्री साईभक्तांच्या बरोबर जीवनाच्या भावना निगडीत आहेत. या बाबींचा विचार करता एक खास विशेष बाब म्हणुन त्यांनी त्यांचे अर्जात मागणी केलेप्रमाणे सदर मंगळसुत्र श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांना परत करणे योग्य राहील. मात्र गुप्तदान पेटीतील दक्षिणेतील एक अनन्यसाधारण असा दागीना खास बाब म्हणुन परत करावयाचा असलेने, श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांचेकडुन मंगळसुत्राचे किंमती इतकी (संस्थान नियुक्त अधिकृत सोनाराकडुन ठरविलेली किंमत) रोख रक्कम दक्षिणा म्हणुन जमा करुन घेण्यात यावी व अपवादात्मक विशेषबाब म्हणुन त्यांचे मंगळसुत्र त्यांना परत करण्यात यावे असे ठरले. उपरोक्त निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

तथापि, श्री निरज मेहता, यांचे संदर्भातील घटना ही दक्षिणा पेटी संबंधीत असल्याने उपरोक्त नमुद प्रस्तावानुसार सदर कालावधीतील सीसीटीव्ही फुटेज तपासणेत आले असुन, सदर साईभक्ताने पुजेसाठी सोन्याचे ब्रेसलेट समाधीवरील पुजा-याकडे दिल्याचे व पुजा-याने परत संबंधीत भक्तास ते परत केल्याचे स्पष्ट दिसत आहे. तसेच सदर साईभक्ताने सदरचे सोन्याचे ब्रेसलेट खरेदी केल्याची मुळ पावती सादर केलेली आहे. सदर पावतीतील वजन व प्रत्यक्ष वजनाची पडताळणी केली असुन ते बरोबर आहे. यावरुन सदर ब्रेसलेट हे श्री निरज मेहता, यांचेच

आहे हे स्पष्ट होत आहे.

श्री निरज मेहता, बिलासपुर यांनी अर्जात वर्णन केलेले सोन्याचे ब्रेसलेट दि. २८/०९/२०१८ रोजी उघडण्यात आलेल्या दक्षिणा पेटीत प्राप्त झालेले आहे. परंतु सदर घटनेबाबत निर्णय होणे बाकी असल्याने सदरचे ब्रेसलेट व्यवस्थित पॅक करुन परत दक्षिणा पेटीत टाकणेत आलेले आहे.

तरी, साईभक्त श्री.नीरज मेहता, बिलासपुर यांचेकडुन नजर चुकीने दक्षिणा पेटीत पैसे टाकतांना सोन्याचे ब्रेसलेट पडलेले असल्याने, तसेच सीसीटीव्ही फुटेज नुसार व ब्रेसलेटची पावतीतील वजन व प्रत्यक्ष केलेले वजन तसेच ब्रेसलेट खरेदी पावती या सर्व बाबींची खातर जमा करुन सदरचे सोन्याचे ब्रेसलेट श्री निरज मेहता, बिलासपुर यांना परत करण्यास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय कर्.६२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.नीरज मेहता, बिलासपुर यांचेकडुन नजर चुकीने दक्षिणा पेटीत पैसे टाकतांना सोन्याचे ब्रेसलेट पडलेले असल्याने, तसेच सीसीटीव्ही फुटेज नुसार व ब्रेसलेटचे पावतीतील वजन व प्रत्यक्ष केलेले वजन तसेच ब्रेसलेट खरेदी पावती या सर्व बाबींची खातर जमा करुन सदरचे सोन्याचे ब्रेसलेट श्री.निरज मेहता, बिलासपुर यांना परत करण्यास मान्यता देण्यात आली.**
**(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

आयत्या वेळेचा
विषय नं.१८, निर्णय क्र.६३० पुण्यतीथी उत्सव-२०१८ याकालावधीत मंदिरात होणाऱ्या सर्व आरत्यांचे व्हिडीओ शुटींग करणेस मान्यता देण्यात आली. ड्रोन वापरासाठी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांची परवानगी घ्यावी, तसेच सदर आरत्यांचे चित्रीकरणाचे वेळी सर्व विश्वस्तांना आमंत्रित करण्यात यावे.
(कार्यवाही- सीसीटीव्ही विभागप्रमुख/ मंदिर विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१९, निर्णय क्र.६३१ संस्थानमार्फत नगर-मनमाड हायवेवर देणगीदारामार्फत तात्पुरत्या स्वागत कमानी तयार करण्याचे काम चालू आहे. सदर कमानी उभारणेकामी देणगीदाराने रक्कम न दिल्यास ती संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली, तसेच शक्य होईल तेवढी कामे संस्थानचे संबधीत विभागामार्फत करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच स्वागत कमानीचे ठिकाणी लाईटींग व फुलांची सजावट करण्यात यावी.
(कार्यवाही-कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, बगीचा विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२०, निर्णय क्र.६३२ देगणीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, हैदराबाद यांनी सोन्यामध्ये देगणीदाखल दिलेली "श्रध्दा" आणि "सबुरी" अशी दोन नावे व्दारकामाई येथे लावणेत यावी, असे ठरले.
(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२१, निर्णय क्र.६३३ आजचे सभेत शिर्डी येथील मोफत सर्व्हे क्र.१ मधील १०१ दुकानदार व त्यांचे वारसदार प्रतिनिधी यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना निवेदन दिले. सदर निवेदनात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था,शिर्डी यांनी मोफत सर्व्हे क्र.१ (त्रिकोण) ही जागा शासनाकडून घ्यावी व त्याजागेत मंजुर आराखडयानुसार शॉपिंग्र सेंटर व गार्डन करावे, शॉपिंग सेंटरचे बांधकाम खर्च सर्व दुकानदार करण्यास तयार आहेत. त्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अंमलबजावणी होऊन संस्थानचे रक्कम रु.१६

कोटी मात्र वाचतील, तरी मानवतेच्या दृष्टीकोनातुन सदर विषयावर कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.

यावर चर्चा होऊन, प्रथम मोफत सर्व्हे क्र.१ (त्रिकोण) या जागेवरील आरक्षण शासनाने काढून द्यावे तसेच त्याठिकाणी वाणिज्य वापर अनुज्ञेय करावा व वाणिज्य बांधकामाचे आराखडे मंजूर करुन घ्यावे. त्यानंतर सदर जागा संस्थानला नाममात्र दराने किंवा मोफत उपलब्ध करुन द्यावी. तसा प्रस्ताव शासनाला सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२२, निर्णय क्र.६३४ संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालयाकरीता मा.श्री. चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, समिती सदस्य, मा.श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आली. वरिष्ठ महाविद्यालयाचे तातडीचे व महत्वाचे कामासंबधी या समितीने निर्णय घ्यावेत, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२३, निर्णय क्र.६३५ श्री साईबाबा शताब्दी महोत्सव २०१८ सांगता कार्यकामाचे निमित्ताने विविध प्रकल्पांच्या उद् घाटनाच्या सर्व कार्यक्रमाचे “ Walk-Through ” तयार करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख/ सीसीटीव्ही विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२४, निर्णय क्र.६३६ व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार व्दारावती भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवासस्थान व साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इत्यादी मेन्टनन्स / स्वच्छता कामाबाबत एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे यांना दि. १ मार्च,२०१८ ते दि. २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीसाठी एक वर्षाकरीता कार्यादेश देण्यात आलेला होता. तथापी करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार संबधीत ठेकेदार यांनी लेबर लायसन्स संस्थानकडे जमा केले नाही, करारनाम्यानुसार स्वच्छतेसाठी काही मशिनरी पुरविलेल्या नाही. ज्या पुरविलेल्या होत्या, त्या कालबाहय झालेल्या आहेत. कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रीक प्रणाली बसविण्यात आलेली नाही. करारनाम्यानुसार पुरेसे मनुष्यबळ पुरविलेले नाही. कर्मचाऱ्यांची प्राव्हिडंड फंडाची पुर्ण रक्कम जमा केलेली नाही. कर्मचाऱ्यांचा जिवन सुरक्षा विमा घेतलेला नाही. कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी केलेली नाही. तसेच कर्मचाऱ्यांचे मागील माहे ऑगस्ट, सप्टेंबर-२०१८ या दोन महिन्यांचे वेतन अदा केलेले नाही. तसेच स्वच्छतेच्या बाबतीत अनेक भक्तांनी तक्रारी केलेल्या आहेत. तसेच एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे यांना वेळोवेळी नोटीस देऊनही त्यांचे कामात कोणतीही सुधारणा झालेली नाही. त्यांनी निविदा अटी व शर्तीचा भंग केल्याने तुमचा काळया यादीत समावेश का करु नये या नोटीसीचा देखील खुलासा दिलेला नाही. त्यामुळे एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे हे काम करण्यास सक्षम नाहीत, असे सर्व समिती सदस्यांचे मत झाले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटेड लि.पुणे यांचा आऊटसोर्सिंग कामाचा ठेका रद्द करुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली ५ % सुरक्षा अनामत रक्कम जमा करुन घेण्यात यावी. तसेच त्यांना संस्थानकडून देय असलेल्या रकमेतून इतर ठेकेदारामार्फत (एजन्सीमार्फत) कर्मचाऱ्यांचे दोन महिन्याचे वेतन आदा करणेत यावे व त्यांचा काळया यादीत समावेश

करण्यात यावा. तसेच व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इत्यादी मेन्टनन्स / स्वच्छता कामाकरीता तातडीने विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणाऱ्या योग्य त्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदार निश्चित होई पावेतो संस्थानच्या इतर विभागात कार्यरत ठेकेदाराकडून दर पत्रके मागवुन निम्नतम दरधारकाकडून व्दारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा या विभागांची यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इत्यादी मेन्टनन्स/ स्वच्छता इत्यादी कामे करुन घ्यावे, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,व्दारावती भक्तनिवास, प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास, प्र.अधिक्षक साईधर्मशाळा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२४, निर्णय क्र.६३७ श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष-२०१८ समारोप समारंभ कार्यक्रमाचे बंदोबस्तासाठी येणाऱ्या पोलीसांसाठी व इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी मागणी केल्यास मोफत निवासव्यवस्था करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सर्व निवासस्थाने)

---

वरील निर्णय क्र.५७७ ते ६३७ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.